पते २० वहन्त्यो वारि बहुलं फेनोडुपपरिप्लुतम् । परिसस्रुर्महाशब्दाः प्रकर्षन्त्यो महीरुहान् २१ तस्मिन्नुपरते शब्दे वाते च समतां गते । गते ह्यम्भसि निम्नानि प्रादुर्भूते दिवाकरे २२ निर्जग्मुस्ते शनैः सर्वे समाजग्मुश्च भारत । प्रतस्थिरे पुनर्वीराः पर्वतं गन्धमादनम् २३ [५४९०] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थयात्रायां गन्धमादनप्रवेशे त्रिचत्वारिंशदधिकशततमोऽध्यायः ॥ १४३ ॥

वैशंपायन उवाच ॥ क्रोशमात्रं प्रयातेषु पाण्डवेषु महात्मसु । पद्भ्यामनुचिता गन्तुं द्रौपदी समुपाविशत् १ श्रान्ता दुःखपरीता च वातवर्षेण तेन च । सौकुमार्याच्च पाञ्चाली संमुमोह तपस्विनी २ सा कम्पमाना मोहेन बाहुभ्यामसितेक्षणा । वृत्ताभ्यामनुरूपाभ्यामूरू समवलम्बत ३ आलम्बमाना सहितावूरू गजकरोपमौ । पपात सहसा भूमौ वेपन्ती कदली यथा ४ तां पतन्तीं वरारोहां भज्यमानां लतामिव । नकुलः समभिद्रुत्य परिजग्राह वीर्यवान् ५ नकुल उवाच ॥ राजन्पञ्चालराजस्य

वर्षाव होऊं लागला १९ आणि त्यामुळे हे प्रजापालका राजा, समुद्राला मिळणाऱ्या नद्यांना चोहोंकडून फेंसानें युक्त अशा खडूळ पाण्याचे पूर आले व त्या मोठमोठ्या वृक्षांना वाहून नेत असतां घो घो असा शब्द करूं लागल्या २०,२१. सारांश, कांहीं वेळानें तो गोंगाट बंद होऊन वारा शांत झाल्यावर व पाणी ओसरून पूर्वी इतकें झाल्यावर आणि (अभ्र नाहींसें होऊन) सूर्य दिसूं लागल्यावर २२ ते सर्व हळू हळू बाहेर निघाले व एकत्र होऊन, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, पुनरपि गंधमादन पर्वतावर चढूं लागले २३. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वांपैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं गंधमादनप्रवेशाविषयीं एकशें त्रेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ १४३॥

वैशंपायन सांगतातः—ते महात्मे पांडव सुमारें एक कोसभर गेले नाहींत तोंच द्रुपदराजकन्या द्रौपदी पायीं चालण्याविषयीं असमर्थ होऊन खालीं बसली १. रस्त्याच्या श्रमानें थकलेली, दुःखानें व्याकुळ झालेली व त्या वावटळींत सांपडल्यामुळें घाबरून गेलेली ती सुकुमार पांचालराजकन्या तपस्विनी द्रौपदी बेशुद्ध झाली २. ती कृष्णनयन द्रौपदी गांगरून गेल्यामुळें थरथर कांपत कांपत वर्तुलाकृति असलेल्या आपल्या मांड्यांवर हात टेकून ओणवी झाली ३ व हत्तीच्या सुंडादंडासारिख्या असलेल्या आपल्या मांड्यांवर हात ठेवून ओणवी होतांच एकाएकीं वाऱ्यानें पडणाऱ्या केळीप्रमाणें कांपत कांपत ती भूमीवर पडली ४. तेव्हां मोडून पडणाऱ्या लतेप्रमाणें पडलेल्या त्या द्रौपदीजवळ पराक्रमी नकुल गेला आणि तिला सांवरून तो म्हणाला ५ " हे भरतकुलोत्पन्ना

सुतेयमसितेक्षणा । श्रान्ता निपतिता भूमौ तामवेक्षस्व भारत ६ अदुः-
खार्हा परं दुःखं प्राप्तेयं मृदुगामिनी । आश्वासय महाराज तामिमां श्रम-
कर्शिताम् ७ वैशंपायन उवाच ॥ राजा तु वचनात्तस्य भृशं दुःखसम-
न्वितः । भीमश्च सहदेवश्च सहसा समुपाद्रवन् ८ तामवेक्ष्य तु कौन्तेयो
विवर्णवदनां कृशाम् । अङ्कमानीय धर्मात्मा पर्यदेवयदातुरः ९ युधिष्ठिर
उवाच ॥ कथं वेश्मसु गुप्तेषु स्वास्तीर्णशयनोचिता । भूमौ निपतिता
शेते सुखार्हा वरवर्णिनी १० सुकुमारौ कथं पादौ मुखं च कमलप्रभम् ।
मत्कृतेद्य वरार्हायाः श्यामतां समुपागतम् ११ किमिदं द्यूतकामेन मया
कृतमबुद्धिना । आदाय कृष्णां चरता वने मृगगणायुते १२ सुखं प्राप्स्यसि
कल्याणि पाण्डवान्प्राप्य वै पतीन् । इति द्रुपदराजेन पित्रा दत्तायते-
क्षणा १३ तत्सर्वमनवाप्येयं श्रमशोकाध्वकर्शिता । शेते निपतिता
भूमौ पापस्य मम कर्मभिः १४ वैशंपायन उवाच ॥ तथा लालप्यमाने

धर्मराजा, ही पांचालराजतनया कृष्णनयना द्रौपदी दमल्यामुळें पृथ्वीवर पडली आहे; इकडे पहा ६. हे महाराज, ही मंद मंद गमन करणारी व दुःखाला योग्य नसलेली द्रौपदी अत्यंत दुःखानें व्याप्त होऊन श्रमानें थकून गेल्यामुळें अस्वस्थ झाली आहे. ह्यास्तव तिला आपण धीर द्या." ७. वैशंपायन सांगतात:— हें त्याचें वचन श्रवण करितांक्षणीं भीमसेन, सहदेव व अत्यंत दुःखानें व्याकुल झालेला धर्मराज हे एकदम तिच्याजवळ गेले ८. कुंतीपुत्र धर्मराजानें, तिचें मुख उतरून गेलें आहे व ती कृश झाली आहे, असें पाहून तिला आपल्या मांडीवर घेतलें व तो धर्मात्मा दीन होऊन शोक करूं लागला ९. युधिष्ठिर ह्मणतो:— बंदोबस्ताच्या गृहामध्यें उत्कृष्ट रीतीनें पसरलेल्या शय्येवर निजण्याला व सुखोपभोग घेण्याला योग्य असलेली ही द्रौपदी आज ह्या भूमीवर कशी निजली आहे! १०. अरेरे! हीं हिचीं अत्यंत सुकुमार असलेलीं पाउलें व कमलाप्रमाणें टवटवीत असलेलें हें मुख आज माझ्याकरितांच काळें ठिक्कर पडलें ना! ११. अविचारीपणानें द्यूत खेळण्याचें मनामध्यें आणून मृगगणांनीं सेवित अशा ह्या वनामध्यें द्रौपदीसहवर्तमान मी संचार करीत आहे हें काय! १२. हे कल्याणि, हे विशालनयने, पांडव पति मिळाले असतां तूं सुखी होशील याच हेतूनें तुझा पिता जो द्रुपदराज त्यानें तुला आमच्या स्वाधीन केलें १३; परंतु, तें सर्व प्राप्त झालें नाहीं तें नाहींच; पण श्रम, शोक व मार्गाची (चालण्याची) दगदग ह्यांनी युक्त होऊन ह्या पापकर्म करणाऱ्याच्याच कर्मानें आज तूं पृथ्वीवर मात्र शयन करीत आहेस! १४. वैशंपायन सांगतातः—

तु धर्मराजे युधिष्ठिरे । धौम्यप्रभृतयः सर्वे तत्राजग्मुर्द्विजोत्तमाः १५ ते
समाश्वासयामासुराशीर्भिश्चाप्यपूजयन् । रक्षोघ्नांश्च तथा मन्त्राञ्जेपुश्च-
क्रुश्च ते क्रियाः १६ पठ्यमानेषु मन्त्रेषु शान्त्यर्थं परमर्षिभिः । स्पृश्य-
माना करैः शीतैः पाण्डवैश्च मुहुर्मुहुः १७ सेव्यमाना च शीतेन जलमि-
श्रेण वायुना । पाञ्चाली सुखमासाद्य लेभे चेतः शनैः शनैः १८ परि-
गृह्य च तां दीनां कृष्णामजिनसंस्तरे । पार्था विश्रामयामासुर्लब्धसंज्ञां
तपस्विनीम् १९ तस्या यमौ रक्ततलौ पादौ पूजितलक्षणौ । कराभ्यां
किणजाताभ्यां शनकैः संववाहतुः २० पर्याश्वासयदप्येनां धर्मराजो युधि-
ष्ठिरः । उवाच च कुरुश्रेष्ठो भीमसेनमिदं वचः २१ बहवः पर्वता भीम
विषमा हिमदुर्गमाः । तेषु कृष्णा महाबाहो कथं नु विचरिष्यति २२
भीमसेन उवाच ॥ त्वां राजन्राजपुत्रीं च यमौ च पुरुषर्षभ । स्वयं नेष्यामि
राजेन्द्र मा विषादे मनः कृथाः २३ हैडिम्बश्च महावीर्यो विहगो मद्-

---

ह्याप्रमाणें युधिष्ठिर धर्मराज शोक करीत असतां धौम्यप्रभृति सर्व द्विजश्रेष्ठ तेथें आले १५
आणि आशीर्वाद देऊन अभिनंदनपूर्वक नानाप्रकारच्या क्रिया करून राक्षोघ्न
मंत्रांचा (ह्मणजे ज्या मंत्रांचें पठण केलें असतां राक्षसांचा नाश होतो अशा मंत्रांचा)
जप करूं लागले १६. अशा रीतीनें मोठमोठाले ऋषि तिला बरें वाटावें ह्मणून मंत्रांचें पठण
करूं लागलें असतां व पांडव वरचेवर आपले गार हात तिच्या शरीरावरून फिरवीत
असतां आणि जलयुक्त गार वाऱ्याची झुळुक तिला लागली असतां ती पांचालराजकन्या
द्रौपदी हळूं हळूं शुद्धीवर येऊं लागली १७,१८. नंतर शुद्धीवर आलेल्या त्या तप-
स्विनी द्रौपदीला पांडवांनीं हळूच हात धरून एका पसरून ठेविलेल्या कृष्णाजिनावर
विश्रांति घेण्याकरितां नेऊन बसविलें १९ व तेथें मान देण्यास योग्य असलेल्या लक्ष-
णांनीं युक्त असे नकुलसहदेव (प्रत्यंचा ओढून ओढून) घट्टे पडलेल्या आपल्या
हातांनीं आरक्तवर्ण तळवे असलेले द्रौपदीचे पाय हळूं हळूं चेपूं लागले २०. तदनं-
तर कौरवश्रेष्ठ युधिष्ठिर धर्मराज तिचें सांत्वन करीत करीत भीमसेनाला ह्मणाला २१
“ हे भीमसेना, (अजूनपर्यंत) बिकट व बर्फामुळें चढतां येत नसलेल्या अशा शेंकडों
पर्वतांवर आपणाला जावयाचें आहे. तव्हां, हे महाबाहो भीमसेना, तेथें ही
द्रौपदी कशी बरें चालेल ? २२. भीमसेन ह्मणतो:—हे पुरुषश्रेष्ठा धर्मराजा, आपल्याला
वाटेल तर मी तुह्मांला, राजकन्या द्रौपदीला व ह्या नकुलसहदेवांना स्वतः खांद्यावर
घेऊन जाईन ; आपण खेद करूं नका २३. हे निष्पापा धर्मराजा,
महावीर्यवान्, आकाशांत संचार करणारा, माझ्यासारिखा पराक्रमी व हिडिंबेचा तनय

मोपमः। वहेदनघ सर्वान्नो वचनात्ते घटोत्कचः २४ वैशंपायन उवाच ॥ अनुज्ञातो धर्मराज्ञा पुत्रं सस्मार राक्षसम्। घटोत्कचस्तु धर्मात्मा स्मृतमात्रः पितुस्तदा २५ कृताञ्जलिरुपातिष्ठदभिवाद्याथ पाण्डवान्। ब्राह्मणांश्च महाबाहुः स च तैरभिनन्दितः २६ उवाच भीमसेनं स पितरं भीमविक्रमम्। स्मृतोस्मि भवता शीघ्रं शुश्रूषुरहमागतः २७ आज्ञापय महाबाहो सर्वं कर्तास्म्यसंशयम्। तच्छ्रुत्वा भीमसेनस्तु राक्षसं परिषस्वजे २८ [५५१८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैय्यासिक्यामारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थयात्रायां गन्धमादनप्रवेशे चतुश्चत्वारिंशदधिकशततमोध्यायः॥ १४४ ॥

युधिष्ठिर उवाच ॥ धर्मज्ञो बलवाञ्शूरः सत्यो राक्षसपुङ्गवः। भक्तोस्मानौरसः पुत्रो भीम गृह्णातु माचिरम् १ तव बाहुबलेनाहमतिभीमपराक्रम। अक्षतः सह पाञ्चाल्या गच्छेयं गन्धमादनम् २ वैशंपायन उवाच ॥ भ्रातुर्वचनमाज्ञाय भीमसेनो घटोत्कचम्। आदिदेश नरव्याघ्रस्तनयं

जो घटोत्कच तो तुझ्या सांगण्यावरून आम्हा सर्वांना वाहून नेईल २४. वैशंपायन सांगतातः—(ह्याप्रमाणें भीमाचें भाषण श्रवण करून) धर्मराजानें घटोत्कचाचें स्मरण करण्याविषयीं आज्ञा करितांच भीमानें त्याचें स्मरण केलें व तत्क्षणीं तो आपल्या पित्याच्या जवळ येऊन उभा राहिला २५ आणि हात जोडून त्या महाबाहूनें पांडवांना व सर्व ब्राह्मणांना अभिवंदन केलें असतां त्यांनीं त्याचें आगतस्वागत केलें २६. नंतर अतुल पराक्रम करणाऱ्या आपल्या पित्या भीमसेनाला तो ह्मणाला " आपण माझें स्मरण करितांच मी आपली सेवा करण्याकरितां सत्वर प्राप्त झालों आहें २७. तस्मात्, हे महाबाहो, मला आपण आज्ञा करा; मी आपलें सर्व कार्य करीन." हें ऐकून भीमसेनानें त्या राक्षसाला आलिंगन दिलें २८. ह्याप्रमाणें॰ वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं गंधमादनप्रवेशाविषयीं एकशें चव्वेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ १४४ ॥

युधिष्ठिर ह्मणतोः—हे भीमसेना, धर्म जाणणारा, बलाढ्य, शूर, सत्यप्रतिज्ञ, आमच्यावर भक्ति करणारा व प्रत्यक्ष तुझा औरस मुलगा जो घटोत्कच त्यानें ह्या पांचालीला (आपल्या खांद्यावर) घ्यावें १. हे भयंकर पराक्रम करणाऱ्या भीमसेना, तुझ्या बाहुबलाच्या साहाय्यानें ह्या पांचालराजकन्येसहवर्तमान मी कोणत्याही प्रकारची दुखापत न होतां गंधमादन पर्वतावर जाईन २. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें भ्रात्याचें वचन श्रवण केल्यावर शत्रूंना ताप देणाऱ्या आपल्या पुत्राला नरश्रेष्ठ भीम-

शत्रुकर्शनम् ३ भीमसेन उवाच ॥ हैडिम्बेय परिश्रान्ता तव मातापरा-
जिता । त्वं च कामगमस्तात बलवान्वह तां खग ४ स्कन्धमारोप्य भद्रं ते
मध्येऽस्माकं विहायसा । गच्छ नीचिकया गत्या यथा चैनां न पीडयेः ५
घटोत्कच उवाच ॥ धर्मराजं च धौम्यं च कृष्णां च यमजौ तथा ।
एकोऽप्यहमलं वोढुं किमुताद्य सहायवान् ६ अन्ये च शतशः शूरा विहङ्गाः
कामरूपिणः । सर्वान्वो ब्राह्मणैः सार्धं वक्ष्यन्ति सहितानघ ७ एवमुक्त्वा
ततः कृष्णामुवाह स घटोत्कचः । पाण्डूनां मध्यगो वीरः पाण्डवानपि
चापरे ८ लोमशः सिद्धमार्गेण जगामानुपमद्युतिः । स्वेनैव स प्रभावेण
द्वितीय इव भास्करः ९ ब्राह्मणांश्चापि तान्सर्वान्समुपादाय राक्षसाः ।
नियोगाद्राक्षसेन्द्रस्य जग्मुर्भीमपराक्रमाः १० एवं सुरमणीयानि वना-
न्युपवनानि च । आलोकयन्तस्ते जग्मुर्विशालां बदरीं प्रति ११ ते त्वाशु-
गतिभिर्वीरा राक्षसैस्तैर्महाजवैः । उह्यमाना ययुः शीघ्रं महदध्वानमल्प-
वत् १२ देशान्म्लेच्छजनाकीर्णान्नानारत्नाकरायुतान् । ददृशुर्गिरिपा-

---

सेनानें (द्रौपदीला खांद्यावर घेण्याविषयीं) आज्ञा केली आणि ह्मणाला ३ "हे हिडिं-बातनया घटोत्कचा, ही तुझी माता अत्यंत दमून गेली आहे. करितां, तुझें देव बरें करो, हे वत्सा, तूं इच्छेप्रमाणें गमन करणारा, आकाशांत संचार करणारा व बलाढ्य असल्यामुळें आमच्यांपैकीं द्रौपदीला खांद्यावर घेऊन तिला त्रास न होईल अशा रीतीनें आकाशांतून हळू हळू गमन कर" ४, ५ घटोत्कच ह्मणतोः—हे तात, धर्म-राज, धौम्य ऋषि, द्रौपदी व नकुलसहदेव ह्या सर्वांना वाहून नेण्याला मी एकटाच समर्थ आहें व त्यांतून आज तर मला साहाय्य आहे. (तेव्हां द्रौपदीला वाहून नेण्याविषयीं शंकाच नको.) ६. हे निष्पाप भीमसेना, माझ्यासहवर्तमान वाटेल तें रूप धारण करणारे, शूर व आकाशांत संचार करणार असे हे दुसरे शेंकडों राक्षस सर्व ब्राह्मणांसहवर्तमान आपणाला वाहून नेतील ७. ह्याप्रमाणें भाषण केल्यावर द्रौप-दीला घटोत्कचानें व पांडवांना इतर राक्षसांनीं खांद्यावर घेऊन ते चालले ८ आणि ज्यांच्या तेजाला उपमा देतां येत नाहीं व जे दुसरा सूर्यच कीं काय असे लोमशऋषि आपल्या स्वतःच्या प्रभावानें सिद्ध मार्गानें जाऊं लागले ९. नंतर भयंकर पराक्रम करणारे ते राक्षस राक्षसेंद्र घटोत्कचाच्या आज्ञेवरून त्या सर्व ब्राह्मणांना आपल्या खांद्यावर घेऊन जाऊं लागले असतां १०, अत्यंत रमणीय वनें आणि उपवनें अवलोकन करीत करीत विशाल बदरीवृक्षाकडे निघाले ११. अत्यंत वेगवान् राक्षसांच्या शीघ्रगतीमुळें बरा-चसा मार्ग चालून आले असतांही आपण थोडाच रस्ता चालून आलों असें त्यांना

दांश्च नानाधातुसमाचितान् १३ विद्याधरसमाकीर्णान्युतान्वानरकिं-
नरैः । तथा किंपुरुषैश्चैव गन्धर्वैश्च समंततः १४ मयूरैश्चमरैश्चैव वान-
रैरुरुभिस्तथा । वराहैर्गवयैश्चैव माहिषैश्च समावृतान् १५ नदीजालसमा-
कीर्णान्नानापक्षियुतान्बहून् । नानाविधमृगैर्जुष्टान्वानरैश्चोपशोभितान् १६
समदैश्चापि विहगैः पादपैरन्वितांस्तथा । तेवतीर्य बहून्देशानुत्तरांश्च कुरू-
नपि १७ ददृशुर्विविधाश्चर्यं कैलासं पर्वतोत्तमम् । तस्याभ्याशे तु ददृ-
शुर्नरनारायणाश्रमम् १८ उपेतं पादपैर्दिव्यैः सदापुष्पफलोपगैः । ददृ-
शुस्तां च बदरीं वृत्तस्कन्धां मनोरमाम् १९ स्निग्धामविरलच्छायां श्रिया
परमया युताम् । पत्रैः स्निग्धैरविरलैरुपेतां मृदुभिः शुभाम् २० विशा-
लशाखां विस्तीर्णामतिद्युतिसमन्विताम् । फलैरुपचितैर्दिव्यैराचितां स्वादु-
भिर्भृशम् २१ मधुस्रवैः सदा दिव्यां महर्षिगणसेविताम् । मदप्रमुदितै-
र्नित्यं नानाद्विजगणैर्युताम् २२ अदंशमशके देशे बहुमूलफलोदके ।
नीलशाद्वलसंछन्ने देवगन्धर्वसेविते २३ सुसमीकृतभूभागे स्वभावविहिते

वाटले १२. तेथें म्लेच्छ जातीच्या लोकांनीं भरलेले व नानाप्रकारच्या रत्नांच्या खाणींनीं युक्त असे देश त्यांच्या दृष्टीं पडले व नानाप्रकारच्या धातूंनीं युक्त असे डोंगराचे पायथेही त्यांनीं अवलोकन केले १३. त्याचप्रमाणें विद्याधरांनीं गजबजून गेलेले, वानर व किन्नर ह्यांनीं वसति केलेले, किंपुरुष व गंधर्व ह्यांनीं आसमंतात् मार्गी व्यापून गेलेले १४, मयूर, चमर, (ह्मणजे वनगाई. ज्यांच्या शेपटीच्या केसांच्या चवऱ्या करितात.) वानर, रुरु, वराह, गव व महिष ह्यांनीं वेढून टाकिलेले १५, नदीच्या समुदायानें युक्त, नानाप्रकारच्या पक्ष्यांनी युक्त, तऱ्हेतऱ्हेच्या मृगांनीं सेवित, वानरांनीं शोभिवंत १६ व मत्त झालेले पक्षी ज्यावर बसले आहेत अशा वृक्षांनीं युक्त असलेल्या उत्तर कुरुप्रभृति पुष्कळ देशांचें अतिक्रमण करून १७ शेकडों आश्चर्ययुक्त वस्तूंनीं भरलेला कैलास पर्वत अवलोकन केला व त्याच्याच जवळ नरनारायणाचा आश्रमही पाहिला १८. तो आश्रम नेहमीं पुष्पें व फळें येणाऱ्या वृक्षांनीं युक्त होता; तेथेंच मोठमोठ्या फांद्या असलेला व मनोहर असा एक बदरी वृक्ष होता १९. तो स्निग्ध, स्वच्छ व दाट छायेनें युक्त असून मृदु व दाट अशा पानांनी भरलेला होता २०. त्याच्या फांद्या मोठमोठ्या असून लांबवर गेलेल्या व तेजानें युक्त अशा होत्या. अत्यंत मधुर व दिव्य अशा मदस्राव करणाऱ्या फलांनीं तो लकडलेला होता २१. तो दिव्य वृक्ष महर्षिगणांनीं सेवित असून नेहमीं मदानें आनंदित झालेल्या नानाप्रकारच्या पक्षिगणांनीं सेवित होता २२. वनमक्षिका नसलेल्या, फल, मूल व उदक ह्यांची समृद्धि

शुभे । जातां हिममृदुस्पर्शे देशेपहतकण्टके २४ तामुपेत्य महात्मानः सह तैर्ब्राह्मणर्षभैः । अवतेरुस्ततः सर्वे राक्षसस्कन्धतः शनैः २५ ततस्तमाश्रमं रम्यं नरनारायणाश्रितम् । ददृशुः पाण्डवा राजन्सहिता द्विजपुङ्गवैः २६ तमसा रहितं पुण्यमनामृष्टं रवेः करैः । क्षुत्तृट्शीतोष्णदोषैश्च वर्जितं शोकनाशनम् २७ महर्षिगणसंबाधं ब्राह्मया लक्ष्म्या समन्वितम् । दुष्प्रवेशं महाराज नरैर्धर्मबहिष्कृतैः २८ बलिहोमार्चितं दिव्यं सुसंमृष्टानुलेपनम् । दिव्यपुष्पोपहारैश्च सर्वतोभिविराजितम् २९ विशालैरग्निशरणैः स्रुग्भाण्डैराचितं शुभैः । महद्भिस्तोयकलशैः कठिनैश्चोपशोभितम् ३० शरण्यं सर्वभूतानां ब्रह्मघोषनिनादितम् । दिव्यमाश्रयणीयं तमाश्रमं श्रमनाशनम् ३१ श्रिया युतमनिर्देश्यं देवचर्योपशोभितम् । फलमूलाशनैर्दान्तैश्चीरकृष्णाजिनाम्बरैः ३२ सूर्यवैश्वानरसमैस्तपसा भावि-

---

असलेल्या, देवगंधर्वांनीं सेवित व (कोवळें कोवळें गवत येऊन हिरवी गार दिसणाऱ्या) जमीनीनें युक्त असलेल्या २३ कांटे नसलेल्या, स्पर्श करितांच बर्फाप्रमाणें मृदु भासणाऱ्या, स्वभावतः कल्याणकारक व सपाट अशा शुभ प्रदेशाचे ठिकाणीं असलेल्या बदरी वृक्षाजवळ २४ ब्राह्मणश्रेष्ठांसहवर्तमान ते महात्मे पांडव प्राप्त झाल्यावर ते सर्वजण हळूं हळूं त्या राक्षसाच्या खांद्यावरून खालीं उतरले २५. हे राजा, तदनंतर त्या पांडुपुत्रांनीं द्विजश्रेष्ठांसहवर्तमान नरनारायणांनीं आश्रय केलेला असा तो सुंदर आश्रम अवलोकन केला २६. तो आश्रम अंधकारानें रहित, क्षुधा, तृषा, थंडी व ऊष्णता प्रभृति दोषांनीं रहित, शोक नाहींसा करणारा, पुण्यकारक व जेथें सूर्याच्या किरणांचा प्रवेश होत नाहीं असा होता २७. हे महाराज, तो महर्षींच्या समुदायांनीं व्याप्त, ब्राह्मी लक्ष्मीनें (ह्मणजे ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद ह्यांच्या पठणापासून उत्पन्न होणाऱ्या शोभेनें) युक्त असून धर्मबाह्य लोकांना तेथें प्रवेश करितां येत नव्हता २८. त्या दिव्य आश्रमांत चोहोंकडे बली व होम चालले असून तो सडा संमार्जन करून स्वच्छ केलेला होता व दिव्य अशा पुष्पांच्या मालादिकांनीं त्याला आसमतात् भागीं शोभा आलेली होती २९. तेथें मोठमोठ्या होमशाला असून स्रुवा प्रभृति शुभ पदार्थांनीं तो भरलेला होता. त्या ठिकाणीं मोठमोठाले उदकाचे कलश व शिंकीं अथवा करंडे यांची शोभा दिसत होती ३०. सर्व प्राण्यांचें रक्षण करण्याला योग्य, वेदघोषानें नादित, श्रम नाहींसा करणारा, दिव्य व आश्रय करण्याला योग्य असा तो आश्रम असून ३१ सत्यसंकल्पत्वादिक गुणांनीं युक्त होता व त्याची शोभा वर्णन करितां येण्यासारिखी नव्हती. तेथें फलमूलांवर उपजीविका

तात्मभिः । महर्षिभिर्मोक्षपरैर्यतिभिर्नियतेन्द्रियैः ३३ ब्रह्मभूतैर्महाभागै-
रुपेतं ब्रह्मवादिभिः । सोऽभ्यगच्छन्महातेजा स्तानृषीन्प्रयतः शुचिः ३४
भ्रातृभिः सहितो धीमान्धर्मपुत्रो युधिष्ठिरः । दिव्यज्ञानोपपन्नास्ते दृष्ट्वा
प्राप्तं युधिष्ठिरम् ३५ अभ्यगच्छन्त सुप्रीताः सर्व एव महर्षयः । आशी-
र्वादान्प्रयुञ्जानाः स्वाध्यायनिरता भृशम् ३६ प्रीतास्ते तस्य सत्कारं
विधिना पावकोपमाः । उपाजह्रुश्च सलिलं पुष्पमूलफलं शुचि ३७ स
तैः प्रीत्याथ सत्कारमुपनीतं महर्षिभिः । प्रयतः प्रतिगृह्याथ धर्मराजो
युधिष्ठिरः ३८ तं शक्रसदनप्रख्यं दिव्यगन्धं मनोरमम् । प्रीतः स्वर्गो-
पमं पुण्यं पाण्डवः सह कृष्णया ३९ विवेश शोभया युक्तं भ्रातृभिश्च
सहानघ । ब्राह्मणैर्वेदवेदाङ्गपारगैश्च सहस्रशः ४० तत्रापश्यत धर्मात्मा
देवदेवर्षिपूजितम् । नरनारायणस्थानं भागीरथ्योपशोभितम् । ४१ पश्य-
न्तस्ते नरव्याघ्रा रेमिरे तत्र पाण्डवाः । मधुस्रवफलं दिव्यं ब्रह्मर्षिगणसे-

---

करणारे, इंद्रियदमन करणारे, उत्कृष्ट कृष्णाजिनरूप वस्त्र परिधान करणारे ३२ व तपश्चर्येच्या तेजानें सूर्य किंवा अग्नि ह्यांच्याप्रमाणें तेजस्वी असणारे महर्षि, मोक्षाची इच्छा करणारे व इंद्रियांचें दमन करणारे असे यति ३३ आणि ब्रह्मरूप झालेले असे वेदपठण करणारे महाभाग्यवान् असंख्य ऋषि होते. त्यांच्याकडे महा-तेजस्वी, व्रत धारण करणारा व शुचिर्भूत असलेला धर्मराज प्राप्त झाला ३४. तेव्हां भ्रात्यांसहवर्तमान विचारी धर्मपुत्र युधिष्ठिर आपल्याकडे येत आहे असें त्या दिव्य ज्ञानानें युक्त असलेल्या ऋषींनीं अवलोकन करून ३५ ते महर्षि मोठ्या आनं-दानें त्याला सामोरे गेले आणि त्या स्वाध्यायाचे ठिकाणीं तत्पर असलेल्या ऋषींनीं त्याला पुष्कळ आशीर्वाद दिले ३६. ह्याप्रमाणें अग्नीसारिखे तेजस्वी असलेल्या त्या महर्षींनीं विधिपूर्वक मोठ्या प्रेमानें त्याचा सत्कार केल्यावर, पुष्पें, फळें व मुळें आणि स्वच्छ असें उदक त्याला दिलें ३७ आणि त्या युधिष्ठिर धर्मराजानें महर्षींनीं केलेल्या त्या सत्काराचा मोठ्या प्रेमानें स्वीकार केला ३८. नंतर इंद्राच्या गृहाप्रमाणें अस-लेल्या, दिव्य गंधानें युक्त, मनोहर, पुण्यकारक व स्वर्गाप्रमाणें असलेल्या त्या शोभायुक्त आश्रमामध्यें द्रुपदराजकन्या द्रौपदी ३९, भ्राते, वेद व वेदांचीं अंगें ह्यांमध्यें प्रवीण असलेल्या हजारों ब्राह्मणांसहवर्तमान त्या निष्पाप धर्मराजानें प्रवेश केला ४०. तेथें त्या धर्मात्म्या युधिष्ठिरानें भागीरथीनें शोभिवंत झालेलें आणि देव व देवर्षि ह्यांनीं पूजित असें नरनारायणांचें स्थान अवलोकन केलें ४१. ज्यांतून मधाचा स्राव होत आहे अशा फळांनीं युक्त, दिव्य व ब्रह्मर्षिसमुदायांनीं सेवित अशा त्या आश्रमाला

वितम् ४२ तदुपेत्य महात्मानस्तेवसन्ब्राह्मणैः सह । मुदा युक्ता महात्मानो रेमिरे तत्र ते तदा ४३ आलोकयन्तो मैनाकं नानाद्विजगुणायुतम् । हिरण्यशिखरं चैव तच्च बिन्दुसरः शिवम् ४४ तस्मिन्विहरमाणाश्च पाण्डवाः सह कृष्णया । मनोज्ञे काननवरे सर्वर्तुकुसुमोज्ज्वले ४५ पादपैः पुष्पविकचैः फलभारावनामिभिः । शोभिते सर्वतो रम्यैः पुंस्कोकिलगणायुतैः ४६ स्निग्धपत्रैरविरलैः शीतच्छायैर्मनोरमैः । सरांसि च विचित्राणि प्रसन्नसलिलानि च ४७ कमलैः सोत्पलैश्चैव भ्राजमानानि सर्वशः । पश्यन्तश्चारुरूपाणि रेमिरे तत्र पाण्डवाः ४८ पुण्यगन्धः सुखस्पर्शो ववौ तत्र समीरणः। ह्लादयन्पाण्डवान्सर्वान्द्रौपद्या सहितान्प्रभो ४९ भागीरथीं सुतीर्थां च सीतां विमलपङ्कजाम् । मणिप्रवालप्रस्तारां पादपैरुपशोभिताम् ५० दिव्यपुष्पसमाकीर्णां मनःप्रीतिविवर्धनीम् । वीक्षमाणा महात्मानो विशालां बदरीमनु ५१ तस्मिन्देवर्षिचरिते देशे परमदुर्गमे । भागीरथीपुण्यजले तर्पयाञ्चक्रिरे तदा ५२ देवानृषींश्च कौन्तेयाः

अवलोकन करून नरश्रेष्ठ पांडवांना अतिशय आनंद झाला ४२. त्या ठिकाणीं ते महात्मे पांडव ब्राह्मणांसहवर्तमान मोठ्या आनंदानें वास्तव्य करून कालक्षेप करीत असतां ४३ नानाप्रकरच्या पक्षिसमुदायांनीं सेवित व सुवर्णाच्या शृंगांनीं युक्त असा मैनाकपर्वत आणि कल्याणकारक बिंदुसरोवर हीं त्यांनीं अवलोकन केलीं ४४. व सर्व ऋतूंमध्यें उत्पन्न होणाऱ्या पुष्पानीं उज्ज्वल असलेल्या त्या सुंदर अरण्यांतील सरोवरामध्यें द्रौपदीसहवर्तमान ते विहार करूं लागले ४५. तें वन प्रफुल्लित झालेल्या व फलभारानें लवलेल्या वृक्षांनीं चोहोंकडे सुशोभित असून कोकिलांच्या रम्य अशा समुदायांनीं युक्त होतें ४६. मृदु व दाट पत्रांनीं व थंडगार छाया असलेल्या सुंदर वृक्षांनीं तें संपन्न असून स्वच्छ उदक असलेल्या विचित्र सरोवरांनींही तें सुशोभित होतें ४७. तेथें निरनिराळ्या आकाराचीं देदीप्यमान अशीं आसमंतात्भागीं पुष्कळ कमलें होतीं व तीं पाहून त्या पांडवांना मोठा आनंद होत असे ४८. हे प्रभो, त्या ठिकाणीं पुण्यकारक गंधाला वाहून आणणारा व स्पर्श होतांच सुख देणारा असा वारा वहात असून तो द्रौपदीसहवर्तमान त्या सर्व पांडवांना आनंदित करीत होता ४९. नंतर भागिरथी, सुतीर्था, स्वच्छ कमलांनीं युक्त असलेली, मणी व पोवळीं ह्यांचाच जिच्यामध्यें खडक आहे अशी, वृक्षांनीं शोभिवंत ५०, दिव्य पुष्पांनीं भरून गेलेली, अंतःकरणांतील आनंदाची वृद्धि करणारी व बदरीच्या वृक्षाच्या जवळ असलेली विशाल सीतानामक नदी अवलोकन करीत करीत ते कुरुकुलोत्पन्न कुंतीपुत्र महात्मे पांडव त्या देव आणि

परमं शौचमास्थिताः। तत्र ते तर्पयन्तश्च जपन्तश्च कुरूद्वहाः ५३ ब्राह्मणैः सहिता वीरा ह्यवसन्पुरुषर्षभाः। कृष्णायास्तत्र पश्यन्तः क्रीडितान्यमरप्रभाः। विचित्राणि नरव्याघ्रा रेमिरे तत्र पाण्डवाः ५४ [५५७२] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थयात्रायां गन्धमादनप्रवेशे पञ्चचत्वारिंशदधिकशततमोऽध्यायः ॥ १४५॥

वैशंपायन उवाच ॥ तत्र ते पुरुषव्याघ्राः परमं शौचमास्थिताः। षड्रात्रमवसन्वीरा धनञ्जयदिदृक्षवः १ ततः पूर्वोत्तरे वायुः प्लवमानो यदृच्छया। सहस्रपत्रमर्काभं दिव्यं पद्ममुपाहरत् २ तदवैक्षत पाञ्चाली दिव्यगन्धं मनोरमम्। अनिलेनाहृतं भूमौ पतितं जलजं शुचि ३ तच्छुभा शुभमासाद्य सौगन्धिकमनुत्तमम्। अतीवमुदिता राजन्भीमसेनमथाब्रवीत् ४ पश्य दिव्यं सुरुचिरं भीम पुष्पमनुत्तमम्। गन्धसंस्थानसंपन्नं मनसो मम नन्दनम् ५ इदं च धर्मराजाय प्रदास्यामि परन्तप। हरेदं मम कामाय काम्यके पुनराश्रमे ६ यदि तेऽहं प्रिया पार्थ

ऋषि ह्यांनीं युक्त व अत्यत दुर्गम अशा भागीरथीच्या पुण्यकारक जलामध्यें देव व ऋषि ह्यांचें तर्पण करून व अत्यंत शुचिर्भूत होऊन जप करूं लागले ५१,५२,५३. सारांश, तेथें ते देवांसारिखे पुरुषश्रेष्ठ महापराक्रमी वीर पांडव ब्राह्मणांसहवर्तमान वास्तव्य करीत असतां द्रौपदीच्या विचित्र क्रीडा अवलोकन करीत करीत आनंदानें राहिले ५४. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं गंधमादनप्रवेशाविषयीं एकशें पंचेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ १४५ ॥

वैशंपायन सांगतातः—त्या ठिकाणीं ते वीर पुरुषव्याघ्र अत्यंत शुचिर्भूतपणानें अर्जुनाला अवलोकन करण्याकरितां सहा रात्रीपर्यंत राहिले १. तेव्हां एके दिवशीं ईशान दिशेकडून सहज रीतीनें वारा आला असतां त्यानें सूर्याप्रमाणें देदीप्यमान व हजार पाकळ्या असलेलें एक दिव्य कमल आपल्या बरोबर वाहून आणिलें २. वाऱ्यानें वाहून आणिलेलें, शुद्ध, सुगंधानें युक्त व मनोहर असें तें कमल पांचालराजकन्या द्रौपदीनें जमिनीवर पडलेलें अवलोकन करितांक्षणीं ३ ती कल्याणी द्रौपदी सुगंधानें युक्त असलेल्या त्या उत्कृष्ट कमलाजवळ आली आणि, हे राजा, अत्यंत आनंदित होऊन भीमसेनाला म्हणाली ४ " हे भीमसेना, हें परम रमणीय असें उत्कृष्ट दिव्य पुष्प आपण अवलोकन करा; ह्याची आकृति पाहून मला फार आनंद होत आहे ५. हे शत्रुतापना भीमसेना, हें कमल मी धर्मराजाला देईन. आपण काम्यक वनांतील आश्रमामध्यें पुनरपि माझ्याकरितां अशा प्रकारचें एक कमल घेऊन चला ६.

बह्वीमान्युपाहर। तान्यहं नेतुमिच्छामि काम्यकं पुनराश्रमम् ७ एव-मुक्त्वा शुभापाङ्गी भीमसेनमनिन्दिता। जगाम पुष्पमादाय धर्मराजाय तत्तदा ८ अभिप्रायं तु विज्ञाय महिष्याः पुरुषर्षभः। प्रियायाः प्रिय-कामः स प्रायाद्भीमो महाबलः ९ वातं तमेवाभिमुखो यतस्तत्पुष्पमाग-तम्। आजिहीर्षुर्जगामाशु स पुष्पाण्यपराण्यपि १० रुक्मपृष्ठं धनुर्गृह्य शरांश्चाशीविषोपमान्। मृगराडिव संक्रुद्धः प्रभिन्न इव कुञ्जरः ११ ददृशुः सर्वभूतानि महाबाणधनुर्धरम्। न ग्लानिर्न च वैक्लव्यं न भयं न च संभ्रमः। कदाचिज्जुषते पार्थमात्मजं मातरिश्वनः १२ द्रौपद्याः प्रियम-न्विच्छन्स बाहुबलमाश्रितः १३ व्यपेतभयसंमोहः शैलमभ्यपतद्बली। स तं द्रुमलतागुल्मच्छन्नं नीलशिलातलम् १४ गिरिं चचारारिहरः किन्न-राचरितं शुभम्। नानावर्णधरैश्चित्रं धातुद्रुममृगाण्डजैः १५ सर्वभूषणसं-पूर्णं भूमेर्भुजमिवोच्छ्रितम्। सर्वत्र रमणीयेषु गन्धमादनसानुषु १६

हे पृथानंदना, मी जर तुह्माला प्रिय असेन तर ह्यासारिखीं आणखीं पुष्कळ कमलें माझ्याकरितां तुह्मी घेऊन या; मी तीं सर्व काम्यक वनांतील आश्रमामध्यें नेईन" ७. ह्याप्रमाणें उत्कृष्ट नेत्रकटाक्ष असलेल्या व निंदा करण्यास अयोग्य असलेल्या द्रौप-दीनें भीमसेनाशीं भाषण केल्यावर तें पुष्प घेऊन ती धर्मराजाकडे गेली ८. तदनंतर पुरुषश्रेष्ठ महाबलाढ्य भीमसेन आपल्या प्रिय पत्नीचा हेतु जाणून तिचें प्रिय करण्याच्या इच्छेनें पुष्पें आणण्याकरितां निघाला ९ आणि ज्या दिशेकडून वाऱ्यानें तें पुष्प आणिलें होतें त्या दिशेकडे मुख करून दुसरीं पुष्कळ पुष्पें आणण्याकरितां मोठ्या शीघ्र गतीनें गमन करूं लागला १०. तेव्हां हातामध्यें सोन्याच्या पाठीचें धनुष्य व सर्पासारिखे बाण घेऊन तो भीमसेन चालला असतां क्रुद्ध झालेल्या सिंहाप्रमाणें अथवा गंडस्थलांतून मदोदक वाहणाऱ्या हत्तीप्रमाणें लोकांना दिसला ११. मोठमोठे बाण व धनुष्य धारण करणाऱ्या त्या वायुतनय कुंतीपुत्राला ग्लानि, थकवा, भय अथवा त्वरा हीं मुळीं सुद्धां झालीं नाहींत १२. भय व मोह नाहींसा झालेला तो बलाढ्य भीमसेन द्रौपदीचें प्रिय करण्याकरितां आपल्या बाहुबलाचा आश्रय करून वृक्ष, लता व झुडुपें ह्यांनीं आच्छादित झालेल्या व नीलवर्ण पाषाणांनीं युक्त असलेल्या त्या पर्वतावर येऊन पोंचला १३, १४ आणि नानाप्रकारच्या रंगाचे धातू, वृक्ष, मृग व पक्षी ह्यांनीं शोभिवंत झालेल्या व किन्न-रांनीं सेवन केलेल्या त्या शुभ पर्वतावर तो शत्रूंचें हरण करणारा भीमसेन इकडे तिकडे फिरूं लागला १५. तो पर्वत सर्व प्रकारच्या अलंकारांनीं युक्त व उंच केलेला पृथ्वीचा हस्तच कीं काय असा दिसत होता. गंधमादन पर्वताच्या रमणीय शिखरा-

सक्तचक्षुरभिप्रायान्हृदयेनानुचिन्तयन् । पुंस्कोकिलनिनादेषु षट्पदाचरि
तेषु च १७ बद्धश्रोत्रमनश्चक्षुर्जगामामितविक्रमः । आजिघ्रन्स महातेजाः
सर्वर्तुकुसुमोद्भवम् १८ गन्धमुद्धतमुद्दामो वने मत्त इव द्विपः । वीज्य-
मानः सुपुण्येन नानाकुसुमगन्धिना १९ पितुः संस्पर्शशीतेन गन्धमादन-
वायुना । ह्रियमाणश्रमः पित्रा संप्रहृष्टतनूरुहः २० स यक्षगन्धर्वसुरब्रह्म-
र्षिगणसेवितम् । विलोकयामास तदा पुष्पहेतोररिन्दमः २१ विषमच्छ-
दैरचितैरनुलिप्त इवाङ्गुलैः । वलिभिर्धातुविच्छेदैः काञ्चनाञ्जनराजतैः ॥
सपक्षमिव नृत्यन्तं पार्श्वलग्नैः पयोधरैः २२ मुक्ताहारैरिव चितं च्युतैः
प्रस्रवणोदकैः । अभिरामदरीकुञ्जनिर्झरोदककन्दरम् २३ अप्सरोनूपुर-
रवैः प्रनृत्तवरबर्हिणम् । दिग्वारणविषाणाग्रैर्घृष्टोपलशिलातलम् २४ स्रस्तां
शुकमिवाक्षोभ्यैर्निम्नगानिःसृतैर्जलैः । सशष्पकवलैः स्वस्थैरदूरपरिव-
र्तिभिः २५ भयानभिज्ञैर्हरिणैः कौतूहलनिरीक्षितः । चालयानः स्ववे-

---

कडे १६ नजर देऊन तेथें असलेल्या (पुष्पकुशादि) वस्तूंचें मनानें चिंतन करीत करीत कोकिलांच्या पंचमस्वराकडे व षट्पदांच्या (ह्मणजे भ्रमरांच्या) गुंजारवाकडे कान, मन व डोळे यांची योजना करून तो अमितपराक्रमी महातेजस्वी भीमसेन सर्व ऋतूंतील कुसुमांचा सुटलेला सुगंध घेत घेत चालला असतां १७, १८, नाना-प्रकारच्या सुगंधयुक्त व पुण्यकारक वाऱ्याची झुळुक लागून उग्र गंधानें अरण्यांतील मत्त झालेल्या हत्तीप्रमाणें १९ गंधमादन पर्वतावरच्या शीतल वायूचा स्पर्श होताच श्रमपरिहार होऊन अंगावर रोमांच उभे राहिलेला २० तो शत्रुदमन करणारा भीम-सेन यक्ष, गंधर्व, सुर व ब्रह्मर्षि ह्यांनीं सेवित असा प्रदेश अवलोकन करीत चालला २१. तो पिंवळ्या, काळ्या व पांढऱ्या धातूचे रंग उडालेल्या पर्णांच्या योगानें बोटांनीं लाविलेल्या भस्माच्या पट्ट्याप्रमाणे दिसत असून पार्श्वभागाचे ठिकाणीं असणाऱ्या मेघांच्या योगानें सपक्ष होऊन नाचतोच आहे की काय असा भासत होता २२. त्याच्यावरून लहान लहान उदकांचे ओघ वहात होते व त्यामुळें तो मोत्यांची कंठी घातल्याप्रमाणें दिसत असून दरी, लतामंडप व पाण्याचे झरे असलेल्या गुहा ह्यांच्या योगानें शोभिवंत दिसत होता २३. त्याचप्रमाणें अप्सरांच्या पायांतील नूपुरांच्या शब्दानें मत्त होऊन नाचणाऱ्या मोरांनीं युक्त झालेला तो, दिग्गजांच्या दांतांच्या अग्रांनीं घासलेल्या शिलांनीं संपन्न होता २४. गळालेल्या वस्त्राप्रमाणें अक्षोभ्य, नद्यांमधून निघालेल्या (जलांच्या आजूबाजूला असलेल्या) गवतांचे ग्रास घेणाऱ्या, स्वस्थ, जवळ जवळ असणाऱ्या २५ व भयाला न जाणणाऱ्या हरिणांनीं ज्याच्याकडे आश्चर्यानें अवलोकन

गेन लताजालान्यनेकशः २६ आक्रीडमानो हृष्टात्मा श्रीमान्वायुसुतो
ययौ । प्रियामनोरथं कर्तुमुद्यतश्चारुलोचनः २७ प्रांशुः कनकवर्णाभः
सिंहसंहननो युवा । मत्तवारणविक्रान्तो मत्तवारणवेगवान् २८ मत्तवार-
णताम्राक्षो मत्तवारणवारणः । प्रियपार्श्वोपविष्टाभिर्व्यावृत्ताभिर्विचेष्टितैः २९
यक्षगन्धर्वयोषाभिरदृश्याभिर्निरीक्षितः । नवावतारं रूपस्य विक्रीडन्निव
पाण्डवः ३० चचार रमणीयेषु गन्धमादनसानुषु । संस्मरन्विविधान्क्लेशा-
न्दुर्योधनकृतान्बहून् ३१ द्रौपद्या वनवासिन्याः प्रियं कर्तुं समुद्यतः ।
सोऽचिन्तयद्गते स्वर्गमर्जुने मयि चागते ३२ पुष्पहेतोः कथं त्वार्यः करि-
ष्यति युधिष्ठिरः । स्नेहान्नरवरो नूनमविश्वासाद्बलस्य च ३३ नकुलं
सहदेवं च न मोक्ष्यति युधिष्ठिरः । कथं नु कुसुमावाप्तिः स्याच्छीघ्र-
मिति चिन्तयन् ३४ प्रतस्थे नरशार्दूलः पक्षिराडिव वेगितः । सज्जमा-
नमनोदृष्टिः फुल्लेषु गिरिसानुषु ३५ द्रौपदीवाक्यपाथेयो भीमः शीघ्र-

---

केलें आहे असा, आपल्या गतीनें अनेक लतासमूहांना कंपित करणारा २६, श्रीमान्, वायुतनय व उत्तम प्रकारचे नेत्र असलेला भीमसेन खेळत खेळत मोठ्या आनंदानें आपल्या प्रियेचा मनोरथ परिपूर्ण करण्याकरितां त्या पर्वतावर जात होता २७. तो कांचनाप्रमाणें गौरवर्ण, सिंहासारिखा बळकट, तरुण, मत्त हत्तीसारिखा पराक्रमी, मदोन्मत्त झालेल्या गजाप्रमाणें वेगवान् २८, प्रमत्त झालेल्या हत्तीच्या नेत्रांप्रमाणें आरक्तवर्ण नेत्र असलेला, उन्मत्त झालेल्या गजांचें निवारण करणारा आणि आपल्या प्रिय पतीच्या पार्श्वभागाचे ठिकाणीं बसलेल्या व कांहीं एक व्यापार न करणाऱ्या २९ यक्ष व गंधर्व यांच्या परम सुंदर स्त्रियांनीं ज्याचें तारुण्य व रूपसौंदर्य अवलोकन केलें आहे असा तो पांडुपुत्र भीमसेन क्रीडा करीत करीत ३० व दुर्योधनानें दिलेल्या नानाप्रकारच्या क्लेशाचें स्मरण करीत करीत गंधमादन पर्वताच्या रमणीय शिखरावर संचार करूं लागला ३१. तेव्हां " वनामध्यें वास्तव्य करणाऱ्या द्रौपदीचें प्रिय करण्याच्या हेतूनें पुष्पें आणण्याकरितां मी इकडे आलों असतां व अर्जुन स्वर्गाला गेला असतां तो नरश्रेष्ठ आर्य युधिष्ठिर आपल्या बलाची स्वतःला खात्री नसल्यामुळें आतां काय बरें करील ? ३२, ३३. तो युधिष्ठिर नकुल व सहदेव यांना सोडणार नाहीं. करितां, आपणाला पुष्पांची प्राप्ति सत्वर कशी होईल " असें चिंतन करीत करीत ३४ पक्षिराज गरुडाप्रमाणें वेगवान् असलेला नरश्रेष्ठ भीमसेन प्रफुल्लित झालेल्या पर्वताच्या शिखराकडे दृष्टि लावून चालला असतां उत्सवामध्यें होणाऱ्या उत्पाताप्रमाणें आपल्या पायांनीं पृथ्वीला कंपित करीत करीत द्रौपदीचें वाक्य हीच ज्याची रस्त्यांतील सामग्री

नरं ययौ । कम्पयन्मेदिनीं पद्भ्यां निर्घात इव पर्वसु ३६ त्रासयन्गज-
यूथानि वातरंहा वृकोदरः । सिंहव्याघ्रमृगांश्चैव मर्दयानो महाबलः ३७
उन्मुलयन्महावृक्षान्पोथयंस्तरसा बली । लतावल्लीश्च वेगेन विकर्षन्पा-
ण्डुनन्दनः । उपर्युपरि शैलाग्रमारुरुक्षुरिव द्विपः ३८ विनर्दमानोतिभृशं
सविद्युदिव तोयदः । तेन शब्देन महता भीमस्य प्रतिबोधिताः ३९ गुहां
संतत्यजुर्व्याघ्रा निलिल्युर्वनवासिनः । समुत्पेतुः खगास्त्रस्ता मृगयूथानि
दुद्रुवुः ४० ऋक्षाश्चोत्ससृजुर्वृक्षांस्तत्यजुर्हरयो गुहाम् । व्यजृम्भन्त महा-
सिंहा महिषाश्चावलोकयन् ४१ तेन वित्रासिता नागाः करेणुपरिवा-
रिताः । तद्वनं संपरित्यज्य जग्मुरन्यन्महावनम् ४२ वराहमृगसङ्घाश्च
महिषाश्च वनेचराः । व्याघ्रगोमायुसङ्घाश्च प्रणेदुर्गवयैः सह ४३ रथाङ्ग-
साह्वदात्यूहा हंसकारण्डवप्लवाः । शुकाः पुंस्कोकिलाः क्रौञ्चा विसंज्ञा
भेजिरे दिशः ४४ तथान्ये दर्पिता नागाः करेणुशरपीडिताः । सिंहव्या-
घ्राश्च संक्रुद्धा भीमसेनमथाद्रवन् ४५ शकृन्मूत्रं च मुञ्चाना भयविभ्रा-
न्तमानसाः । व्यादितास्या महारौद्रा व्यनदन्भीषणान्रवान् ४६ ततो

आहे असा तो भीमसेन पहिल्यापेक्षां जास्त जलदीनें जाऊं लागला ३५, ३६. तो वायूप्रमाणें वेगवान् महाबलाढ्य पांडुनंदन भीमसेन गजांच्या कळपांना त्रास देत सिंह, व्याघ्र व मृग यांना तुडवीत ३७ आणि मोठमोठाले वृक्ष उपटून टाकून लता व वेली यांना आपल्या पायानें ओढीत ओढीत शैलाग्रावर चढण्याची इच्छा करणाऱ्या हत्तीप्रमाणें वरवर चढूं लागला ३८. नंतर तो विद्युल्लतेनें युक्त असलेल्या मेघाप्रमाणें गर्जना करूं लागला व त्याच्या त्या भयकर शब्दानें व्याघ्र जागे होऊन ३९ गुहेचा त्याग करूं लागले, वनचर प्राणी दडूं लागले, पक्षी भयभीत होऊन उडूं लागले, हरणांचे कळप पळूं लागले ४०, अस्वली झाडांवरून उतरूं लागल्या, सिंह गुहेंतून बाहेर निघून जांभया देऊं लागले व रेडे कावरेबावरे होऊन इकडे तिकडे पाहूं लागले ४१. त्याचप्रमाणें त्या शब्दानें त्रस्त झालेले हत्ती आपल्या हातिणीसहवर्तमान दुसऱ्या घोर वनामध्यें शिरूं लागले ४२ आणि वराह, हरिणांचे कळप, वनांत संचार करणारे रेडे, व्याघ्र व कोल्हे यांचे समूह गव्यासहवर्तमान मोठ्यानें ओरडूं लागले ४३. त्याचप्रमाणें चक्रवाक, मयूर, हंस, कारंडव, शुक, कोकिला आणि क्रौंच पक्षी हेही घाबरून जाऊन दशदिशेला पळूं लागले ४४ आणि हत्तिणींच्या उत्तेजनानें गर्विष्ठ झालेले हत्ती, सिंह आणि व्याघ्र क्रुद्ध होऊन भीमसेनाच्या अंगावर धांवले ४५. भयानें अंतःकरण गांगरून गेलेले ते तोंडें वेडींवांकडीं करून मलमूत्रोत्सर्ग करीत अत्यंत घोर व भीति उत्पन्न करणारे असे शब्द करूं लागले ४६.

वायुसुतः क्रोधात्स्वबाहुबलमाश्रितः । गजेनान्यान्गजाञ्छ्रीमान्सिंहं सिंहेन वा विभुः ४७ तलप्रहारैरन्यांश्च व्यहनत्पाण्डवो बली । ते वध्यमाना भीमेन सिंहव्याघ्रतरक्षवः ४८ भयाद्विससृजुर्भीमं शकृन्मूत्रं च सुस्रुवः । प्रविवेश ततः क्षिप्रं तानपास्य महाबलः ४९ वनं पाण्डुसुतः श्रीमाञ्शब्देनापूरयन्दिशः । अथापश्यन्महाबाहुर्गन्धमादनसानुषु ५० सुरम्यं कदलीषण्डं बहुयोजनविस्तृतम् । तमभ्यगच्छद्वेगेन क्षोभयिष्यन्महाबलः ५१ महागज इवास्रावी प्रभञ्जन्विविधान्द्रुमान् । उत्पाट्य कदलीस्तंभान्बहुतालसमुच्छ्रयान् ५२ चिक्षेप तरसा भीमः समंताद्बलिनां वरः । विनदन्सुमहातेजा नृसिंह इव दर्पितः ५३ ततः सत्वान्युपाक्रामद्बहूनि सुमहान्ति च । रुरुवानरसिंहांश्च महिषांश्च जलाशयान् ५४ तेन शब्देन चैवाथ भीमसेनरवेण च । वनान्तरगताश्चापि वित्रेसुर्मृगपक्षिणः ५५ तं शब्दं सहसा श्रुत्वा मृगपक्षिसमीरितम् । जलार्द्रपक्षा विहगाः समुत्पेतुः सहस्रशः ५६ तानौदकान्पक्षिगणान्निरीक्ष्य भरतर्षभः । तानेवा-

---

तदनंतर आपल्या बाहुबलाचा आश्रय केलेला श्रीमान् वायुसुत विभु भीमसेन क्रोधामुळें हत्तीनें हत्तीला, सिंहानें सिंहाला ४७ आणि तळहाताच्या चपराकांनीं दुसऱ्या श्वापदांना मारूं लागला असतां बलवान् पांडुपुत्र भीमसेनानें प्रहार केलेले सिंह, व्याघ्र व तरस ४८ भयभीत होऊन मलमूत्रोत्सर्ग करूं लागले. तेव्हां श्रीमान् पांडुसुत महाबलवान् भीमसेनानें त्यांना सत्वर मोडून देऊन ४९ आपल्या शब्दानें दशदिशा भरून जातील असा मोठा शब्द केला आणि तो आजानुबाहु भीमसेन गंधमादन पर्वताच्या शिखराचे ठिकाणीं (आसमंतात्‌भागीं) अवलोकन करीत चालला असतां ५० पुष्कळ योजनें विस्तृत असलेला असा एक सुंदर केळीचा खुंट त्यानें अवलोकन केला व तो बलाढ्य भीमसेन पृथ्वी क्षुब्ध करीत करीत वेगानें त्याकडे गेला ५१. तेव्हां मदोन्मत्त झालेला हत्ती ज्याप्रमाणें नानाप्रकारच्या वृक्षांना मोडितो त्याप्रमाणें पुष्कळ ताड उंच गेलेले केळीचे खुंट उपटून ५२ बलावानांमध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या भीमसेनानें तत्काल आसमंतात् भागीं फेंकून दिले, व नृसिंहाप्रमाणें गर्वयुक्त झालेल्या भीमाला मोठा आनंद झाला ५३. तदनंतर मोठमोठाले शेंकडों प्राणी, रुरु, मोठमोठे वानर, सिंह, महिष व सरोवरें ह्यांचें अतिक्रमण करून भीम चालला असतां ५४ (त्याच्या चालण्यापासून) होणारा शब्द व त्याच्या ओरडण्याचा शब्द ह्या दोन शब्दांनीं दुसऱ्या वनांतीलही मृग व पक्षी यांना त्रास होऊन ते ओरडूं लागले ५५. तेव्हां तो मृगपक्ष्यांनीं केलेला शब्द एकाएकीं श्रवण केल्यावर आकाशांत संचार करणारे व पंख

सुसरम्यं ददर्श सुमहत्सरः ५७ काञ्चनैः कदलीषण्डैर्मन्दमारुतकम्पितैः ।
वीज्यमानमिवाक्षोभ्यं तीरात्तीरविसर्पिभिः ५८ तत्सरोऽथावतीर्याशु प्रभू-
तनलिनोत्पलम् । महागज इवोद्दामश्चिक्रीड बलवद्बली ५९ विक्रीड्य
तस्मिन्रुचिरमुत्ततारामितद्युतिः । ततोऽव्यग्रं तु वेगेन तद्वनं बहुपादपम् ६०
दध्मौ च शंखं स्वनवत्सर्वप्राणेन पाण्डवः । आस्फोटयच्च बलवान्भीमः
संनादयन्दिशः ६१ तस्य शंखस्य शब्देन भीमसेनरवेण च । बाहुशब्देन
चोग्रेण नदन्तीव गिरेर्गुहाः ६२ तं वज्रनिष्पेषसममास्फोटितमहारवम् ।
श्रुत्वा शैलगुहासुप्तैः सिंहैर्मुक्तो महास्वनः ६३ सिंहनादभयत्रस्तैः कुञ्ज-
रैरपि भारत । मुक्तो विरावः सुमहान्पर्वतो येन पूरितः ६४ तं तु नादं
ततः श्रुत्वा मुक्तं वारणपुङ्गवैः । भ्रातरं भीमसेनं तु विज्ञाय हनूमान्कपिः ६५
दिवङ्गमं रुरोधाथ मार्गं भीमस्य कारणात् । अनेन हि पथा मा वै
गच्छेदिति विचार्य सः ६६ आस्त एकायने मार्गे कदलीषण्डमण्डिते ।

भिजलेले हजारों पक्षी उडाले ५६. भरतवंशजश्रेष्ठ भीमसेनानें पाण्याच्या आसपास रहाणाऱ्या त्या पक्ष्यांना अवलोकन केल्यावर तो त्यांच्या मागें गेला व पुढें एक मोठें उत्कृष्ट व रमणीय असें सरोवर त्याच्या दृष्टीं पडलें ५७. तें एका तीरापासून दुसऱ्या तीरापर्यंत मंद मंद वाऱ्यानें हालणाऱ्या सोन्यासारिख्या केळींच्या खुंटांनीं हालतेसें दिसत असून त्यांतील उदक स्तब्ध होतें ५८. अशा प्रकारच्या पुष्कळ नीलकमलांनीं भरलेल्या त्या सरोवरामध्यें सत्वर प्रवेश करून मदोन्मत्त झालेल्या गजासारिखा असलेला तो बलवान् भीमसेन क्रीडा करूं लागला ५९. ह्याप्रमाणें त्या सरोवरामध्यें त्या महा-तेजस्वी भीमसेनानें क्रीडा केल्यावर तो पुष्कळ वृक्षांनीं युक्त असलेल्या दुसऱ्या वनांत जाण्याविषयीं उद्युक्त झाला ६० आणि अतिशय जोरानें फुंकर घालून त्या बलाढ्य भीमसेनानें शंख वाजविल्यावर सिंहाप्रमाणें ओरडून दंड थोपटले आणि त्यामुळें दशदिशा नादित केल्या ६१. भीमसेनाच्या त्या शंखाच्या शब्दानें, त्याच्या ओरडण्यानें व भयंकर अशा त्याच्या दंड थोपटण्यानें पर्वताच्या सर्व गुहा दुमदुमून गेल्या ६२. तो विद्युल्लतेच्या कडकडाटाप्रमाणें दंड थोपटण्याचा भयंकर शब्द श्रवण करितांक्षणीं पर्वताच्या गुहेंत निजलेले सिंहही जागे होऊन मोठ्यानें गर्जना करूं लागले ६३ व, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, त्या सिंहांच्या गर्जनेनें भयभीत झालेल्या गजांनीं अतिशय मोठ्यानें चीं चीं केलें व त्या योगानें तो पर्वत भरून गेला ६४. तो गजश्रेष्ठांनीं केलेला चीत्कार शब्द श्रवण करून आपला बंधु भीमसेन आला आहे असें कपि हनूमान् ह्यानें जाणिलें ६५ आणि ह्या मार्गानें त्यानें न जावें म्हणून त्याचा तो स्वर्गाला जाणारा मार्ग त्यानें अडवून धरिला ६६ व आपण आत्या भीमसेनाचें रक्षण

भ्रातुर्भीमस्य रक्षार्थं तं मार्गमवरुध्य वै ६७ मात्र प्राप्स्यति शापं वा धर्षणां वेति पाण्डवः । कदलीषण्डमध्यस्थो ह्येवं संचिन्त्य वानरः ६८ प्राजृम्भत महाकायो हनूमान्नाम वानरः । कदलीषण्डमध्यस्थो निद्रावशगतस्तदा ६९ जृम्भमाणः सुविपुलं शक्रध्वजमिवोच्छ्रितम् । आस्फोटयच्च लांगूलमिन्द्राशनिसमस्वनम् ७० तस्य लांगूलनिनदं पर्वतः सुगुहामुखैः । उद्गारमिव गौर्नर्दन्नुत्ससर्ज समन्ततः ७१ लांगूलास्फोटशब्दाच्च चलितः स महागिरिः । विघूर्णमानशिखरः समंतात्पर्यशीर्यत ७२ स लांगूलरवस्तस्य मत्तवारणनिःस्वनम् । अन्तर्धाय विचित्रेषु चचार गिरिसानुषु ७३ स भीमसेनस्तच्छ्रुत्वा संप्रहृष्टतनूरुहः । शब्दप्रभवमन्विच्छंश्चचार कदलीवनम् ७४ कदलीवनमध्यस्थमथ पीने शिलातले । ददर्श सुमहाबाहुर्वानराधिपतिं तदा ७५ विद्युत्संपातदुष्प्रेक्षं विद्युत्संपातपिङ्गलम् । विद्युत्संपातनिनदं विद्युत्संपातचञ्चलम् ७६ बाहुस्वस्तिकविन्यस्तपीनह्रस्वशिरोधरम् । स्कन्धभूयिष्ठकायत्वात्तनुमध्यकटीतटम् ७७

करण्याकरितां अतिशय अडचणीच्या व केळीच्या खुंटांनीं सुशोभित झालेल्या अशा मार्गामध्यें बसला ६७. कारण, त्या पांडुपुत्राला शाप न व्हावा व त्याची हेळसांड न व्हावी ह्याच विचारानें तो मारुति त्या केळीच्या वनामध्यें बसला ६८ व तो मोठें शरीर असलेला हनूमान् नामक वानर जांभया देत देत त्या केळींच्या खुंटांमध्येंच झोंपीं गेला ६९ आणि इंद्रध्वज पडला असतां अथवा वीज पडली असतां ज्याप्रमाणें अवाज होतो त्याप्रमाणें वरचेवर जांभया देत देत आपल्या पुच्छाचा तो आवाज करूं लागला ७०. त्याच्या शेपटाच्या त्या शब्दाला बैल ज्याप्रमाणें डुरकतो त्याप्रमाणें पर्वत आपल्या गुहारूपीं मुखानें प्रतिध्वनि करून रुकार देऊं लागला ७१. पुच्छाच्या आपटण्याच्या शब्दानें तो मोठा पर्वत थरथर कंपित होऊन व त्याचीं शिखरें हलून तीं चोहोंकडून ढासळून पडूं लागलीं ७२. त्या लांगूलताडणाच्या शब्दानें मदोन्मत्त हत्तीच्या चीत्काराला नाहींसें करून आपणच पर्वताचीं चित्रविचित्र शिखरें भरून टाकिलीं ७३. तो शब्द श्रवण करितांच त्या भीमसेनाच्या अंगावर रोमांच उभे राहिले आणि तो शब्द उत्पन्न झाल्याचें स्थान शोधीत शोधीत तो कदलीवनांत संचार करूं लागला ७४. तव्हां त्या कदलीवनामध्यें मोठ्या शिलेवर बसलेल्या वानराधिपति मारुतीला त्या महाबलाढ्य भीमसेनानें अवलोकन केलें ७५. विद्युल्लतेच्या चमकण्याकडे ज्याप्रमाणें पहातां येत नाहीं त्याप्रमाणें पहातां न येणारा असा विद्युल्लतेप्रमाणें पिंगट वर्ण, कडकडाट करणारा व चंचल असा तो होता ७६. त्याची अखूड व लठ्ठ

किञ्चिच्चाभुग्नशीर्षेण दीर्घरोमाञ्चितेन च । लाङ्गूलेनोर्ध्वगतिना ध्वजेनेव विराजितम् ७८ ह्रस्वौष्ठं ताम्रजिह्वास्यं रक्तवर्णं चलद्भ्रुवम् । विवृत्त-दंष्ट्रादशनं शुक्लतीक्ष्णाग्रशोभितम् ७९ अपश्यद्वदनं तस्य रश्मिवन्तमिवांशु-पम् । वदनाभ्यन्तरगतैः शुक्लैर्दन्तैरलंकृतम् ८० केसरोत्करसंमिश्रमशो-कानामिवोत्करम् । हिरण्मयीनां मध्यस्थं कदलीनां महाद्युतिम् ८१ दीप्यमानेन वपुषा स्वर्चिष्मन्तमिवानलम् । निरीक्षन्तममित्रघ्नं लोचनैर्म-धुपिङ्गलैः ८२ तं वानरवरं धीमानतिकायं महाबलम् । स्वर्गपन्थानमा-वृत्य हिमवन्तमिव स्थितम् ८३ दृष्ट्वा चैनं महाबाहुरेकं तस्मिन्महावने । अथोपसृत्य तरसा बिभीर्भीमस्ततो बली ८४ सिंहनादं चकारोग्रं वज्रा-शनिसमं बली । तेन शब्देन भीमस्य वित्रेसुर्मृगपक्षिणः ८५ हनूमांश्च महासत्त्व ईषदुन्मील्य लोचने । दृष्ट्वा तमथ सावज्ञं लोचनैर्मधुपिङ्गलैः । स्मितेन चैनमासाद्य हनुमानिदमब्रवीत् ८६ हनूमानुवाच ॥ किमर्थं सरुज-स्तेऽहं सुखसुप्तः प्रबोधितः । ननु नाम त्वया कार्या दया भूतेषु जानता ८७ वयं धर्मं न जानीमस्तिर्यग्योनिमुपाश्रिताः । नरास्तु बुद्धिसंपन्ना दयां

असलेली मान खांद्यावर टेकलेली असून खांद्याकडचा भाग स्थूल असल्यामुळें मध्य-प्रदेश व कटि अगदीं सूक्ष्म होती ७७. त्यानें आपलें लांब लांब केंस असलेलें शेंपूट अग्रभागाशीं दुमटून घेऊन उंच केल्यामुळें ते ध्वज उभारल्याप्रमाणें दिसत होतें ७८. लहान लहान ओठ, रक्तवर्ण जिह्वा व मुख, चंचल भ्रुकुटी, आणि उघड्या असलेल्या दाढांच्या व दंतांच्या अग्रांनीं सुशोभित असलेलें व किरणांनीं युक्त असलेल्या चंद्रा-प्रमाणें भासणारें असें आंतील शुभ्रवर्ण दंतांनीं शोभणारें त्याचें मुख त्यानें अवलो-कन केलें ७९,८०. मानेवरच्या आयाळींमध्यें अशोक पुष्पें मिसळलीं असल्यामुळें महातेजस्वी, सुवर्णमय कदलींच्या समुदायांत बसलेला ८१, ज्वालायुक्त अग्नीप्रमाणें तेजस्वी, मदामुळें पिंगट वर्ण झालेल्या नेत्रानें अवलोकन करणारा, शत्रुना-शक ८२, महाबलाढ्य वानरश्रेष्ठ व स्वर्गमार्गाचा रोध करणाऱ्या हिमालयाप्रमाणें बसलेल्या ८३ त्या कपिश्रेष्ठ मारुतीला विचारी आजानुबाहु भीमसेनानें त्या वनामध्यें अवलोकन करून तो बलाढ्य भीमसेन मोठ्या वेगानें त्याजकडे गेला ८४ आणि त्यानें, विद्युल्लतेच्या कडकडाटासारिखा भयंकर सिंहनाद केला असतां त्या भीमाच्या ओरडण्यानें मृग आणि पक्षी भयभीत झाले ८५. तेव्हां महाबलाढ्य हनुमानानें अर्धवट डोळे उघडून त्याजकडे पाहिल्यासारखें केलें व किंचित् हांसून तो ह्मणाला ८६ " अरे, पीडा झाल्यामुळें झोंप न येणाऱ्या मला आतांच थोडीशी सुखानें झोंप लागली असतां

कुर्वन्ति जन्तुषु ८८ क्रूरेषु कर्मसु कथं देहवाक्चित्तदूषिषु । धर्मघातिषु सज्जन्ते बुद्धिमन्तो भवद्विधाः ८९ न त्वं धर्मं विजानासि वृधा नोपासितास्त्वया । अल्पबुद्धितया बाल्यादुत्सादयसि यन्मृगान् ९० ब्रूहि कस्त्वं किमर्थं वा किमिदं वनमागतः । वर्जितं मानुषैर्भावैस्तथैव पुरुषैरपि ९१ क च त्वयाद्य गन्तव्यं प्रब्रूहि पुरुषर्षभ । अतःपरमगम्योयं पर्वतः सुदुरारुहः ९२ विना सिद्धगतिं वीर गतिरत्र न विद्यते । देवलोकस्य मार्गोयमगम्यो मानुषैः सदा ९३ कारुण्यात्त्वामहं वीर वारयामि निबोध मे । नातःपरं त्वया शक्यं गन्तुमाश्वसिहि प्रभो ९४ स्वागतं सर्वथैवेह तवाद्य मनुजर्षभ । इमान्यमृतकल्पानि मूलानि च फलानि च ९५ भक्षयित्वा निवर्तस्व मा वृथा प्राप्यसे वधम् । ग्राह्यं यदि वचो मह्यं हितं मनुजपुङ्गवः ९६ [५६६८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैय्यासिक्यामारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थयात्रायां भीमकदलीखण्डप्रवेशे षट्चत्वारिंशदधिकशततमोध्यायः ॥ १४६ ॥

तं मला कां जागें केलेस ? त्वां सूज्ञानें प्राणिमात्रांवर दया करावी ८७. मृगयोनींना आश्रय केल्यामुळें आह्माला धर्म माहीत नाहीं; परंतु, बुद्धिवान् मनुष्यें मात्र प्राणिमात्रावर दया करितात ८८. काया, वाचा व मन ह्यांना दोष उत्पन्न करणाऱ्या, क्रूर व धर्म नाहींसा करणाऱ्या अशा कर्मांच्या ठिकाणी तुझ्यासारिखे बुद्धिमान् लोक कसे प्रवृत्त होतात ? ८९. ज्याअर्थीं कोत्या विचारानें व पोरकटपणानें तूं ह्या मृगांचा नाश करीत आहेस त्याअर्थीं तू धर्म जाणीत नाहींस आणि विद्वानांची संगति केली नाहींस असें भासतें ९०. हे पुरुषा, जेथं मनुष्याचें वास्तव्य नाहीं इतकेंच नव्हे परंतु, त्यांचा वारा सुद्धां नाहीं अशा ह्या वनाचे ठिकाणीं तूं कां आला आहेस व तूं कोण आहेस हें मला निवदन कर ९१. हे पुरुषश्रेष्ठा, आज तुला कोणीकडे जावयाचें आहे? ह्या पुढं हा पर्वत अगम्य व चढण्याला फार कठीण आहे ९२. हे वीरा, सिद्धांवांचून येथं कोणालाही जातां यावयाचें नाहीं. हा देवलोकाचा मार्ग असल्यामुळें मनुष्यांना तो अगम्यच आहे ९३. हे वीरा, हे प्रभो, तुझ्यावर असलेल्या प्रेमामुळें तूं पुढं जाऊं नकोस ह्मणून मी तुला सांगत आहें तें तू ऐक. ह्या पुढें जाण्याला तं असमर्थ आहेस; करितां धीर धर ९४. हे मनुष्यश्रेष्ठा, आज तुझें सर्वप्रकारें स्वागत असो. हीं अमृतासारिखीं मधुर असलेलीं मुळें व फळें ९५ भक्षण करून माघारी परत; उगाच व्यर्थ मरूं नकोस. हे पुरुषश्रेष्ठा, माझें वाक्य जर तूं ऐकिलेंस तर तुझें कल्याण होईल ९६. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वांपैकीं लोमशतीर्थयात्रेसंबधीं कदलीवनामध्यें

वैशम्पायन उवाच ॥ एतच्छ्रुत्वा वचस्तस्य वानरेन्द्रस्य धीमतः ।
भीमसेनस्तदा वीरः प्रोवाचामित्रकर्षणः १ भीम उवाच ॥ को भवा-
न्किंनिमित्तं वा वानरं वपुरास्थितः । ब्राह्मणानन्तरो वर्णः क्षत्रियस्त्वां
तु पृच्छति २ कौरवः सोमवंशीयः कुन्त्या गर्भेण धारितः । पाण्डवो वायु-
तनयो भीमसेन इति श्रुतः ३ स वाक्यं कुरुवीरस्य स्मितेन प्रतिगृह्य
तत् । हनूमान्वायुतनयो वायुपुत्रमभाषत ४ हनूमानुवाच ॥ वानरोऽहं न
ते मार्गं प्रदास्यामि यथेप्सितम् । साधु गच्छ निवर्तस्व मा त्वं प्राप्स्यसि
वैशसम् ५ भीमसेन उवाच ॥ वैशसं वास्तु यद्वान्यन्न त्वां पृच्छामि
वानर । प्रयच्छ मार्गमुत्तिष्ठ मा मत्तः प्राप्स्यसे व्यथाम् ६ हनूमानुवाच ॥
नास्ति शक्तिर्ममोत्थातुं व्याधिना क्लेशितो ह्यहम् । यद्यवश्यं प्रयातव्यं
लङ्घयित्वा प्रयाहि माम् ७ भीम उवाच ॥ निर्गुणः परमात्मा तु देहं
व्याप्यावतिष्ठते । तमहं ज्ञानविज्ञेयं नावमन्ये न लङ्घये ८ यद्यागमैर्न
विद्यां च तमहं भूतभावनम् । क्रमेयं त्वां गिरिं चैव हनूमानिव साग-

---

झालेल्या भीमाच्या प्रवेशाविषयीं एकशे शेहेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥१४६॥

वैशंपायन सांगतातः—हें त्या विचारी वानरश्रेष्ठ मारुतीचें वाक्य श्रवण केल्या-वर शत्रुपक्षीयवीरनाशक वीर भीमसेन ह्मणाला १ " हे कपिश्रेष्ठा, तूं कोण आहेस व हें वानराचें शरीर कशाकरितां धारण केलें आहेस ? ब्राह्मणवर्णानंतरच्या क्षत्रिय वर्णाचा, सोमवंशांतील कुरूचा वंशज, कुंतीच्या उदरामध्यें गर्भरूपानें राहिलेला, पांडु-तनय व वायुपुत्र भीमसेन ह्मणून प्रसिद्ध असलेला मी तुला प्रश्न करीत आहें " २,३. हें त्या कुरुवीराचें वाक्य श्रवण करून वायुतनय मारुतीनं किंचित् हास्य केलें आणि तो वायुपुत्र भीमसेनाशीं बोलूं लागला ४. (तो ह्मणाला) " मी वानर आहें; तूं ज्या मार्गानें जाण्याची इच्छा करीत आहेस तो मार्ग मी सोडणार नाहीं. बऱ्या बोलानें माघारी फीर; उगाच विरोध माजवूं नकोस ५. भीमसेन ह्मणतोः—हे वानरा, मी तुला विरोध वाढविणें किंवा न वाढविणें ह्याविषयीं कांहीं विचारीत नाहीं. ऊठ; मला रस्ता सोड; विनाकारण आपल्या शरीराला इजा करून घेऊं नकोस ६. हनू-मान् ह्मणतोः—हे भीमसेना, व्याधीनें जर्जर झाल्यामुळें मला उठण्याची शक्ति नाहीं. जर तुला जाणें अवश्यच असेल तर मला ओलांडून जा ७. भीम ह्मणतोः—निर्गुण (ह्मणजे सत्व, रज, तम ह्या तीन गुणांनीं रहित) असा परमात्मा (नखशिखांत) देहाला व्यापून असल्यामुळें ज्ञानानें जाणण्यास योग्य असलेल्या त्या परमात्म्याचें अवमानानें मी उल्लंघन कसें करूं ? ८. त्या स्थावरजंगमात्मक जगतांतील प्राण्यांची

रम् ९ हनूमानुवाच ॥ क एष हनुमान्नाम सागरो येन लङ्घितः । पृच्छामि त्वां नरश्रेष्ठ कथ्यतां यदि शक्यते १० भीम उवाच ॥ भ्राता मम गुणश्लाघ्यो बुद्धिसत्वबलान्वितः । रामायणेतिविख्यातः श्रीमान्वानरपुङ्गवः ११ रामपत्नीकृते येन शतयोजनविस्तृतः । सागरः प्लवगेन्द्रेण क्रमेणैकेन लङ्घितः १२ स मे भ्राता महावीर्यस्तुल्योऽहं तस्य तेजसा । बले पराक्रमे युद्धे शक्तोऽहं तव निग्रहे १३ उत्तिष्ठ देहि मे मार्गं पश्य मे चाद्य पौरुषम् । मच्छासनमकुर्वाणं त्वां वा नेष्ये यमक्षयम् १४ वैशंपायन उवाच ॥ विज्ञाय तं बलोन्मत्तं बाहुवीर्येण दर्पितम् । हृदयेनावहस्यैनं हनूमान्वाक्यमब्रवीत् १५ हनूमानुवाच ॥ प्रसीद नास्ति मे शक्तिरुत्थातुं जरयानघ । ममानुकम्पया त्वेतत्पुच्छमुत्सार्य गम्यताम् १६ वैशंपायन उवाच ॥ एवमुक्ते हनुमता हीनवीर्यपराक्रमम् । मनसाचिन्तयद्भीमः स्वबाहुबलदर्पितः १७ पुच्छे प्रगृह्य तरसा हीनवीर्यपराक्रमम् ।

रचना करणाऱ्या प्रभूला जर मीं वेदांच्या साहाय्यानें जाणिलें नसतें तर मारुतीनें ज्याप्रमाणें समुद्र उल्लंघन केला त्याप्रमाणें हा पर्वत व तूं ह्या दोघांचें केव्हांच मी उल्लंघन केलें असतें ९. मारुति ह्मणतोः— हे पुरुषश्रेष्ठा, ज्यानें समुद्राचें उल्लंघन केलें, तो हनुमान् कोण हें मीं तुला विचारीत आहें. शक्य असल्यास सांग १०. भीम ह्मणतोः—तो श्रीमान् वानरश्रेष्ठ बुद्धि, चातुर्य व बल ह्यांनीं युक्त, वर्णन करण्यास योग्य असलेल्या गुणांनीं संपन्न व रामायणांत प्रख्यात असून प्रत्यक्ष माझा भ्राता आहे ११. त्या वानरश्रेष्ठानें रामचंद्राच्या पत्नीकरितां शंभर योजनें विस्तृत असलेला समुद्र एकट्यानें उल्लंघन केला १२. तो माझा भ्राता महावीर्यवान् आहे व मीही त्याच्यासारिखाच तेजस्वी आहें. करितां बल, पराक्रम व युद्ध ह्यांमध्यें हार न जातां तुझें निग्रहण करण्याला मी समर्थ आहें. १३. ह्यास्तव, ऊठ, मला मार्ग दे, माझा पराक्रम अवलोकन कर. जर तूं माझें ऐकिलें नाहींस तर मीं तुला यमसदनास पाठवीन १४ वैशंपायन ह्मणतातः—ह्याप्रमाणें भीम बलानें उन्मत्त झाला आहे व बाहुबलाचा त्याला गर्व झाला आहे असें जाणून हनूमान् मनांतल्या मनांत हंसून त्याच्याशीं बोलूं लागला १५. हनूमान् ह्मणतोः—हे निष्पापा भीमसेना, माझ्यावर कृपा कर. ह्या वार्धक्यामुळें मला उठण्याला शक्ति नाहीं; करितां, कृपा करून हें माझें पुच्छ बाजूला टाकून खुशाल चालता हो १६. वैशंपायन सांगतातः—हें हनुमंताचें भाषण श्रवण केल्यावर तो वीर्य व पराक्रम यांनीं रहित आहे असें मनाला वाटून आपल्या बाहुबलानें गर्विष्ठ झालेल्या भीमसेनानें १७ "आजच वीर्य व पराक्रम यांनीं रहित अस-

सालोक्यमन्तकस्यैवं नयाम्यद्येह वानरम् १८ सावज्ञमथ वामेन स्मयञ्जग्राह पाणिना। न चाशकच्चालयितुं भीमः पुच्छं महाकपेः १९ उच्चिक्षेप पुनर्दोर्भ्यामिन्द्रायुधमिवोच्छ्रितम्। नोद्धर्तुमशकद्भीमो दोर्भ्यामपि महाबलः २० उत्क्षिप्ता भ्रूर्विवृत्ताक्षः संहतभ्रुकुटीमुखः। स्विन्नगात्रोऽभवद्भीमो न चोद्धर्तुं शशाक तम् २१ यत्नवानपि तु श्रीमाँल्लांगूलोद्धरणोद्धुरः। कपेः पार्श्वगतो भीमस्तस्थौ व्रीडानताननः २२ प्रणिपत्य च कौन्तेयः प्राञ्जलिर्वाक्यमब्रवीत्। प्रसीद कपिशार्दूल दुरुक्तं क्षम्यतां मम २३ सिद्धो वा यदि वा देवो गन्धर्वो वाथ गुह्यकः। पृष्टः सन्कामया ब्रूहि कस्त्वं वानररूपधृक् २४ न चेद्गुह्यं महाबाहो श्रोतव्यं चेद्भवेन्मम। शिष्यवत्त्वां तु पृच्छामि उपपन्नोऽस्मि तेनघ २५ हनूमानुवाच ॥ यत्ते मम परिज्ञाने कौतूहलमरिन्दम। तत्सर्वमखिलेन त्वं शृणु पाण्डवनन्दन २६ अहं केसरिणः क्षेत्रे वायुना जगदायुना। जातः कमलप-

---

लेल्या ह्या वानराच्या शेपटीला धरून मी त्याला यमलोकाला पाठवून देईन" १८ (असे मनामध्यें आणून) हंसल्यासारखें केल्यावर डाव्याहातानें सहज त्याचें शेपूट धरिलें व उचलूं लागला; परंतु, त्या महाकपीचें तें शेपूट तो उचलण्यास समर्थ झाला नाहीं १९. नंतर इंद्राच्या आयुधाप्रमाणें असलेल्या त्या शेपटीला तो महाबलाढ्य भीमसेन पुनरपि उचलूं लागला असतांही त्याला तें उचलेना २०. तेव्हां फिरून एकदां भ्रुकुटी वर चढवून, डोळे वटारून व तोंड वेडेंवाकडें करून तो तें उचलूं लागला असतां त्याच्या अंगाला डवडवून घाम आला; तथापि तें त्याला उचललें नाहीं २१. सारांश, तो श्रीमान् भीमसेन पुष्कळ खटपट करूनही जेव्हां तें पुच्छ उचलेना तेव्हा लज्जेनें तोंड खालीं करून त्या मारुतीजवळ येऊन उभा राहिला २२ आणि हात जोडून त्याला नमस्कार केल्यावर तो कुंतीपुत्र भीमसेन त्या कपिश्रेष्ठ मारुतीला म्हणाला "हे कपे, मीं केलेल्या गर्वयुक्त भाषणाची मला क्षमा कर २३. वानररूप धारण करणारा तूं सिद्ध, देव, गंधर्व अथवा कोण आहेस हें मी तुला विचारीत आहें; तें तूं कथन कर २४. हे निष्पापा आजानुबाहो, तें गुह्य नसून जर श्रवण करण्यास योग्य असेल तर शिष्याप्रमाणें विचारीत असलेल्या व तुला शरण आलेल्या मला कथन कर" २५. हनूमान् म्हणतोः—हे शत्रुपक्षीय वीरनाशका पांडुपुत्रा भीमसेना, ज्याअर्थी माझें वृत्त जाणून घेण्याविषयीं तुला इच्छा झाली आहे त्याअर्थी तें तूं साद्यंत माझ्यापासून श्रवण कर २६. हे कमलपत्राप्रमाणें विस्तृत नेत्र असलेल्या भीमसेना, जगताचें जीवनरूप जो वायु त्यापासून केसरीनामक वानराच्या क्षेत्राचे (म्हणजे पत्नीचे) ठिकाणीं उत्पन्न झालेला

ख्यातः हनूमान्नाम वानरः २७ सूर्यपुत्रं च सुग्रीवं शक्रपुत्रं च वालिनम्। सर्वे वानरराजानस्तथा वानरयूथपाः २८ उपतस्थुर्महावीर्या मम चामित्रकर्षण। सुग्रीवेणाभवत्प्रीतिरनिलस्याग्निना यथा २९ निकृतः स ततो भ्रात्रा कस्मिंश्चित्कारणान्तरे। ऋष्यमूके मया सार्धं सुग्रीवो न्यवसच्चिरम् ३० अथ दाशरथिर्वीरो रामो नाम महाबलः। विष्णुर्मानुषरूपेण चचार वसुधातलम् ३१ स पितुः प्रियमन्विच्छन्सहभार्यः सहानुजः। सधनुर्धन्विनां श्रेष्ठो दण्डकारण्यमाश्रितः ३२ तस्य भार्या जनस्थानाच्छलेनापहृता बलात्। राक्षसेन्द्रेण बलिना रावणेन दुरात्मना ३३ सुवर्णरत्नचित्रेण मृगरूपेण रक्षसा। वञ्चयित्वा नरव्याघ्रं मारीचेन तदानघ ३४ [५७०२] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थयात्रायां हनुमद्भीमसंवादे सप्तचत्वारिंशदधिकशततमोऽध्यायः ॥ १४७ ॥

हनूमानुवाच ॥ हृतदारः सह भ्रात्रा पत्नीं मार्गन्स राघवः। दृष्टवाञ्शैलशिखरे सुग्रीवं वानरर्षभम् १ तेन तस्याभवत्सख्यं राघवस्य महात्मनः

हनूमान् नांवाचा मी वानर आहें २७. हे शत्रुदमना भीमसेना, सर्व वानरांचे राजे, वानरांच्या कळपाचे पालन करणारे व महावीर्यवान् असे वानर शक्रपुत्र वालीचें आराधन करीत असत; परंतु, वायूची आणि अग्नीची ज्याप्रमाणें मैत्री आहे त्याप्रमाणें सूर्यपुत्र सुग्रीवाची व माझी मैत्री होती २८,२९. तदनंतर कांहीं कारणानें भ्रात्या वालीनें सुग्रीवाला घरांतून काढून दिलें असतां, तो माझ्यासहवर्तमान पुष्कळ दिवस ऋष्यमूक पर्वतावर राहिला ३०. त्यावेळीं महाबलाढ्य विष्णु मनुष्यरूपानें दशरथाचा पुत्र वीर राम होऊन या भूतलावर संचार करूं लागला असतां ३१ आपल्या पित्याचें प्रिय करण्याकरितां भार्या व कनिष्ठ भ्राता लक्ष्मण ह्यांसहवर्तमान धनुष्य धारण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ असणारा तो दंडकारण्यामध्यें संचार करीत होता ३२. तेव्हां राक्षसश्रेष्ठ बलाढ्य दुरात्म्या रावणानें त्या रामचंद्राच्या भार्येचें जनस्थानाहून बलात्कारपूर्वक कपटानें हरण केलें ३३ व हें कपटरूप कृत्य रत्नखचित सुवर्णाच्या मृगाचें रूप धारण केलेल्या मारीच नामक राक्षसानें त्या नरश्रेष्ठ रामचंद्राला फसविण्याकरितां केलेलें होतें ३४. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वांपैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं मारुती व भीम यांच्या संवादाविषयीं एकशें सत्तेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ १४७ ॥

हनूमान् ह्मणतोः—तदनंतर रावणानें ज्याच्या स्त्रीचें हरण केलें आहे असा रामचंद्र भ्रात्यासहवर्तमान पत्नीचा शोध करीत असतां ऋष्यमूक पर्वताच्या शिखरावर

स हत्वा वालिनं राज्ये सुग्रीवमभिषिक्तवान् २ स राज्यं प्राप्य सुग्रीवः सीतायाः परिमार्गणे । वानरान्प्रेषयामास शतशोथ सहस्रशः ३ ततो वानरकोटीभिः सहितोहं नरर्षभ । सीतां मार्गन्महाबाहो प्रयातो दक्षिणां दिशम् ४ ततः प्रवृत्तिः सीतायाः गृध्रेण सुमहात्मना । संपातिना समाख्याता रावणस्य निवेशने ५ ततोहं कार्यसिद्ध्यर्थं रामस्याक्लिष्टकर्मणः । शतयोजनविस्तारमर्णवं सहसा प्लुतः ६ अहं स्ववीर्याद्दुत्तीर्य सागरं मकरालयम् । सुतां जनकराजस्य सीतां सुरसुतोपमाम् ७ दृष्टवान्भरतश्रेष्ठ रावणस्य निवेशने । समेत्य तामहं देवीं वैदेहीं राघवप्रियाम् ८ दग्ध्वा लङ्कामशेषेण साट्टप्राकारतोरणाम् । प्रत्यागतश्चापि पुनर्नाम तत्र प्रकाश्य वै ९ मद्वाक्यं चावधार्याशु रामो राजीवलोचनः । स बुद्धिपूर्वं सैन्यस्य बध्वा सेतुं महोदधौ १० वृतो वानरकोटीभिः समुत्तीर्णो महार्णवम् । ततो रामेण वीर्येण हत्वा तान्सर्वराक्षसान् ११ रणे तु राक्षसगणं रावणं लोकरावणम् । निशाचरेन्द्रं हत्वा तु सभ्रातृसु-

---

त्याने वानरश्रेष्ठ सुग्रीवाला अवलोकन केलें १. महात्म्या राघवाशीं त्याचें सख्य झाल्यानंतर रामचंद्रानें वालीचा वध करून सुग्रीवाला राज्याभिषेक केला २. तेव्हां सुग्रीवाला राज्यप्राप्ति झाल्यावर त्यानें शेंकडों हजारों (लाखों) वानर सीतेचा शोध करण्याकरितां पाठविले ३. तदनंतर, हे आजानुबाहु पुरुषश्रेष्ठा भीमसेना, मी कोट्यावधि वानरांसहवर्तमान सीतेचा शोध करण्याकरितां दक्षिण दिशेकडे गेलों असतां ४ महात्म्या संपातिनामक गृध्रानें रावणाच्या गृहाचे ठिकाणीं सीता असल्याबद्दल मला बातमी सांगितली ५. तेव्हां हातीं घेतलेलें काम सहज रीतीनें शेंवटास नेणाऱ्या रामचंद्राचें कार्य सिद्धीस नेण्याकरितां शंभर योजनें विस्तृत असलेल्या समुद्राला मी एकटाच सहज रीतीनें उल्लंघून गेलों ६. ह्याप्रमाणें स्वतःच्या पराक्रमानें मकराचें वसतिस्थान जो समुद्र त्याचें उल्लंघन करून गेल्यावर देवकन्येसारिख्या असलेल्या जनकराजकन्या सीतेला, हे भरतश्रेष्ठा, रावणाच्या गृहाचे ठिकाणीं मीं अवलोकन केलें आणि राघवाला प्रिय असलेल्या त्या देवी वैदेहीशी भाषण करून ती सीताच आहे अशी आपली खात्री करून घेतल्यानंतर ७,८ गोपुर, कोट व तोरणें ह्यांसहवर्तमान सर्व लंका जाळून व त्या ठिकाणीं रामचंद्राच्या नांवाची प्रसिद्धी करून पुनरपि मी परतलों ९. तेव्हां कमलपत्राक्ष रामचंद्रानें माझ्या वाक्याचा पूर्णपणें विचार करून सैन्य तरून जाण्याकरितां बुद्धिपूर्वक समुद्रावर सेतु बांधिला १० आणि कोट्यावधि वानरांसहवर्तमान त्या रामचंद्रानें स्वपराक्रमानें सर्व राक्षसांचा वध केला ११. सारांश, लोकांना ताप देणारा

तबान्धवम् १२ राज्येभिषिच्य लङ्कायां राक्षसेन्द्रं विभीषणम् । धार्मिकं भक्तिमन्तं च भक्तानुगतवत्सलम् १३ ततः प्रत्याहृता भार्या नष्टा वेदश्रुतिर्यथा । तयैव सहितः साध्व्या पत्न्या रामो महायशाः १४ गत्वा ततोतित्वरितः स्वां पुरीं रघुनन्दनः । अध्यावसत्ततोयोध्यामयोध्यां द्विषतां प्रभुः १५ ततः प्रतिष्ठितो राज्ये रामो नृपतिसत्तमः । वरं मया याचितोसौ रामो राजीवलोचनः १६ यावद्राम कथेयं ते भवेल्लोकेषु शत्रुहन् । तावज्जीवेयमित्येवं तथास्त्विति च सोब्रवीत् १७ सीताप्रसादाच्च सदा मामिहस्थमरिन्दम । उपतिष्ठन्ति दिव्या हि भोगा भीम यथेप्सिताः १८ दशवर्षसहस्राणि दशवर्षशतानि च । राज्यं कारितवान्रामस्ततः स्वभवनं गतः १९ तदिहाप्सरसस्तात गन्धर्वाश्च सदानघ । तस्य वीरस्य चरितं गायन्तो रमयन्ति माम् २० अयं च मार्गो मर्त्यानामगम्यः कुरुनन्दन । ततोहं रुद्धवान्मार्गं तवेमं देवसेवितम् २१ धर्षयेद्वा शपेद्वापि मा कश्चिदिति भारत । दिव्यो देवपथो ह्येष नात्र गच्छन्ति मानुषाः । यदर्थमा-

---

व निशाचरांचा अधिपति जो रावण त्याचा भ्राते, पुत्र व दुसरेही राक्षससमुदाय ह्यांसहवर्तमान रणांगणामध्यें नाश करून १२ राक्षसश्रेष्ठ, धर्माचरण करणारा, भक्तिमान् आणि भगवद्भक्तांवर दया करणारा अशा बिभीषणाला त्या रामचंद्रानें लंकेमध्यें राज्याभिषेक केला १३. नंतर नष्ट झालेले वेद ज्याप्रमाणें पुनरपि प्राप्त करून घ्यावें त्याप्रमाणें रावणानें हरण केलेल्या आपल्या पत्नीला महायशस्वी रामानें लंकेतून परत आणून १४ त्या साध्वी पत्नीसहवर्तमान तो रघुनंदन राम अत्यंत त्वरेनें आपल्या नगरीला आला आणि शत्रूंना युद्ध करण्याला अशक्य अशा अयोध्येमध्यें स्वस्थांतःकरणानें वास्तव्य करूं लागला १५. तदनंतर नृपश्रेष्ठ रामचंद्र सिंहासनारूढ झाला असतां मी त्या कमलपत्राक्ष रामचंद्रापाशीं वर मागितला कीं १६ "हे शत्रुनाशका रामचंद्रा, ह्या लोकामध्यें जोंपर्यंत तुझी कथा विश्रुत असेल तोंपर्यंत मी जिवंत रहावें," तेव्हां त्यानें "तथास्तु" असें म्हटलें १७. हे शत्रुदमन करणाऱ्या भीमसेना, सीतेच्या कृपेनें मला, येथें असतांही इच्छेला येतील त्या उपभोगाच्या दिव्य वस्तु प्राप्त होतात १८. त्या रामचंद्रानें दहा हजार दहाशें (म्हणजे अकरा हजार) वर्षें राज्य करून नंतर तो वैकुंठाला गेला १९. तेव्हांपासून, बा निष्पापा भीमसेना, त्या वीर रामचंद्राचें चरित्र गायन करून ह्या अप्सरा आणि गंधर्व सर्वोदित मला आनंदित करीत असतात २०. हे कुरुनंदना, हा मार्ग मर्त्यधर्मी मनुष्यांना अगम्य असल्यामुळेंच ह्या देवसेवित मार्गाचा तुझ्याकरितां मी रोध करून बसलों आहें २१. हे भरतकुलोत्पन्ना

गतश्चासि अत एव मरश्च तत् २२ [५७२४] इति श्रीमहाभारते० भारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थयात्रायां हनुमद्भीमसंवादे अष्टचत्वारिंशदधिकशततमोऽध्यायः ॥ १४८ ॥

वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्तो महाबाहुर्भीमसेनः प्रतापवान् । प्रणिपत्य ततः प्रीत्या भ्रातरं हृष्टमानसः १ उवाच श्लक्ष्णया वाचा हनूमन्तं कपीश्वरम् । मया धन्यतरो नास्ति यदार्यं दृष्टवानहम् २ अनुग्रहो मे सुमहांस्तृप्तिश्च तव दर्शनात् । एवं तु कृतमिच्छामि त्वयाद्य प्रियमात्मनः ३ यत्त्वेतदासीत्प्लवतः सागरं मकरालयम् । रूपमप्रतिमं वीर तदिच्छामि निरीक्षितुम् ४ एवं तुष्टो भविष्यामि श्रद्धास्यामि च ते वचः । एवमुक्तः स तेजस्वी प्रहस्य हरिरब्रवीत् ५ न तच्छक्यं त्वया द्रष्टुं रूपं नान्येन केनचित् । कालावस्था तदा ह्यन्या न सा वर्तति सांप्रतम् ६ अन्यः कृतयुगे कालस्त्रेतायां द्वापरे परः अयं प्रध्वंसनः कालो नाद्य तद्रूप-

---

भीमसेना, ह्या दिव्य देवपथाची कोणी पायमल्ली करूं नये व येथें आल्यामुळें कोणाला शाप होऊं नये ह्मणूनच मनुष्यांना येथें येण्याचा प्रतिबंध केला आहे. आतां ज्या सरोवराकरितां तूं आला आहेस तें हें इकडे आहे पहा २२. ह्याप्रमाणें० महाभारतांतर्गत वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं भीम व मारुती ह्यांच्या संवादाविषयीं एकशें अठेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ १४८ ॥

वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें त्या कपिश्रेष्ठाचें भाषण श्रवण केल्यावर आजानुबाहु प्रतापी भीमसेनानें मोठ्या आनंदानें त्याला नमस्कार करून १ मधुर वाणीनें त्या कपिश्रेष्ठ हनुमंताशीं भाषण केलें कीं, " ज्याअर्थी मला आज आर्याचें दर्शन झालें त्याअर्थीं मी आज धन्य आहें २. आपल्या दर्शनाचा लाभ झाल्यामुळें आज मला मोठें समाधान वाटलें; परंतु, पुढें सांगितल्याप्रमाणें आज आपण केलेंत ह्मणजे माझें अत्यंत प्रिय केल्यासारिखें होईल ३. मकरांचें वसतिस्थान जो समुद्र त्याचें उल्लंघन करीत असतांना आपण जें रूप धारण केलेंत तें अप्रतिम रूप, हे वीर्यवान् मारुते, अवलोकन करण्याची माझी इच्छा आहे ४ व ह्याप्रमाणें आपण केलें ह्मणजे मला आनंद होऊन आपल्या वचनावर माझा विश्वास बसेल. " हें ऐकिल्यावर त्या तेजस्वी हनुमानानें हास्य केलें आणि तो ह्मणाला ५ " बा भीमसेना, तें रूप तूं अथवा दुसरा कोणीही अवलोकन करण्यास समर्थ नाहीं. कारण, त्यावेळचा काळ निराळा होता व सध्यांचा निराळा आहे ६. कृतयुग, त्रेतायुग आणि द्वापर ह्या तिन्ही युगांतले काळ भिन्न भिन्न असतात आणि हल्लींचा तर हा ऱ्हास काल असल्यामुळें

मस्ति मे ७ भूमिर्नद्यो नगाः शैलाः सिद्धा देवा महर्षयः । कालं समनुवर्तन्ते यथा भावा युगे युगे ८ बलवर्ष्मप्रभावा हि प्रहीयन्त्युद्भवन्ति च । तदलं बत तद्रूपं द्रष्टुं कुरुकुलोद्वह । युगं समनुवर्तामि कालो हि दुरतिक्रमः ९ भीम उवाच ॥ युगसंख्यां समाचक्ष्व आचारं च युगे युगे । धर्मकामार्थभावांश्च कर्म वीर्यं भवाभवौ १० हनूमानुवाच ॥ कृतं नाम युगं तात यत्र धर्मः सनातनः । कृतमेव न कर्तव्यं तस्मिन्काले युगोत्तमे ११ न तत्र धर्माः सीदन्ति क्षीयन्ते न च वै प्रजाः । ततः कृतयुगं नाम कालेन गुणतां गतम् १२ देवदानवगन्धर्वयक्षराक्षसपन्नगाः । नासन्कृतयुगे तात तदा न क्रयविक्रयः १३ न सामऋग्यजुर्वर्णाः क्रिया नासीच्च मानवी । अभिध्याय फलं तत्र धर्मः संन्यास एव च १४ न तस्मिन्युगसंसर्गे व्याधयो नेन्द्रियक्षयः । नासूया नापि रुदितं न दर्पो नापि वैकृतम् १५ न विग्रहः कुतस्तन्द्री न द्वेषो न च पैशुनम् ।

माझें तेंही रूप कमी कमी होत चाललें आहे ७. भूमि, नद्या, वृक्ष, पर्वत, सिद्ध, देव, महर्षि आणि सर्व पदार्थ हे प्रत्येक युगायुगाचे ठिकाणीं कालाच्या अनुरोधानें वर्तन करीत असतात ८ व बल, शरीर आणि प्रभाव हेंही कमी कमी होऊनच उत्पन्न होत असतात. तस्मात्, हे कुरुवंशजश्रेष्ठा भीमसेना, तें रूप अवलोकन करण्याचा तूं नाद घेऊन बसूं नकोस; कालाचें अतिक्रमण करणें अशक्य असल्यामुळें मी युगधर्मप्रमाणेंच वर्तन करीत आहें" ९. भीम ह्मणतो:— हे वानरश्रेष्ठा, तूं आह्माला धर्म, अर्थ व काम ह्यांची उत्पत्ति व नाश, प्रत्येक युगांयुगांतील आचार, शुभाशुभ कर्म, फल प्राप्त होईपर्यंतची शक्ति, ऐश्वर्य, अनैश्वर्य आणि त्याचप्रमाणें युगायुगांची संख्या हीं सर्व कथन कर १०. हनुमान् ह्मणतो:—बा वत्सा भीमसेना, ज्या उत्कृष्ट युगामध्यें त्यावेळीं सर्व लोक कृतकृत्य असून सनातन धर्मानें वागणारे असत, त्या युगाला कृतयुग ह्मणतात ११. त्या वेळी कोणत्याही धर्मरूप क्रिया अपूर्त्या न रहातां प्रजाजनांचा नाश होत नसे. कालनिमित्तानें त्याला कृतयुग असें नांव प्राप्त झालें होतें १२. त्या कृतयुगामध्यें देव, दानव, गंधर्व, यक्ष, राक्षस आणि पन्नग हे नसून क्रयविक्रय *मुळींच* चालत नव्हता १३ आणि ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद ह्यांच्यापासून उत्पन्न होणाऱ्या मनुष्यकृतीच्या क्रिया (ह्मणजे यज्ञ) नसून संकल्पाबरोबर सर्व फलाची सिद्धि होत असे व *त्यावेळीं सन्यास हाच धर्म होता* १४. तें युग चाललें असतां व्याधि, इंद्रियांचा नाश, गुणांचे ठिकाणीं दोषदृष्टि, रोदन, *गर्व आणि* फसवाफसवी हीं अगदीं नसून १५ कलह, आळस, द्वेष, एकमेकांचें व्यंग बाहेर काढणें

न भयं नापि संतापो न चेर्ष्या न च मत्सरः १६ ततः परमकं ब्रह्म सा
गतिर्योगिनां परा । आत्मा च सर्वभूतानां शुक्लो नारायणस्तदा १७
ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः शूद्राश्च कृतलक्षणाः । कृते युगे समभवन्स्वक-
र्मनिरताः प्रजाः १८ समाश्रयं समाचारं समज्ञानं च केवलम् । तदा हि
समकर्माणो वर्णा धर्मानवाप्नुवन् १९ एकदेवसदायुक्ता एकमन्त्रविधिक्रियाः ।
पृथग्धर्मास्त्वेकवेदा धर्ममेकमनुव्रताः २० चातुराश्रम्ययुक्तेन कर्मणा
कालयोगिना । अकामफलसंयोगात्प्राप्नुवन्ति परां गतिम् २१ आत्मयो-
गसमायुक्तो धर्मोयं कृतलक्षणः । कृते युगे चतुष्पादश्चातुर्वर्ण्यस्य शाश्वतः २२
एतत्कृतयुगं नाम त्रैगुण्यपरिवर्जितम् । त्रेतामपि निबोध त्वं यस्मिन्सत्रं
प्रवर्तते २३ पादेन ह्रसते धर्मो रक्ततां याति चाच्युतः । सत्यप्रवृत्ताश्च
नराः क्रियाधर्मपरायणाः २४ ततो यज्ञाः प्रवर्तन्ते धर्माश्च विविधाः क्रियाः ।
त्रेतायां भावसंकल्पाः क्रियादानफलोपगाः २५ प्रचलन्ति न वै धर्मात्त-

---

भय, संताप, ईर्ष्या आणि मत्सर ह्यांचा सर्वस्वी लोप होता १६. त्यानंतर योग्यांना
परमगति (ह्मणजे आत्मानंदावाप्ति) विहित असून आत्मा सर्व भूतांमध्यें व्यापक
होता १७; ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे कृतकृत्य होऊन सर्व प्रजांसहवर्तमान
आपल्या कर्मामध्यें तत्पर असत १८ आणि ब्रह्माचा आश्रय करणारा व ब्रह्माला प्राप्त
करून देणारा ज्याचा आचार आहे असा जो धर्म त्याचेंच सर्व वर्णांनीं अवलंबन केलेलें
होतें १९. त्या कालीं लोक एक देव जो प्रत्यगात्मा त्याचीच प्राप्ति करून घेणारे,
एकमंत्र (ह्मणजे प्रणव), एक विधि (ह्मणजे वेदांचें श्रवण) आणि (ध्यानादि) एक
क्रिया करणारे, एक वेदाचें (ह्मणजे तत्त्वप्रतिपादक वेदाचें) अध्ययन करणारे
आणि एक धर्माचेंच अवलंबन करणारे होते २०. त्यावेळीं ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम,
वानप्रस्थ व चतुर्थाश्रम प्रभृति आश्रमांत सांगितलेलें कर्म करून त्याचें फल जें स्त्रीस्व-
र्गादिक सुख तें प्राप्त करून न घेतल्यानें उत्कृष्ट गति प्राप्त होत असे २१. कृतयुगांत
सुचविलेला योगाख्य धर्म ब्रह्माशीं ऐक्य करून देणारा असून तो चतुष्पाद आहे
असे चारी वर्णांचे लोक ह्मणतात २२. सारांश, हें कृतयुग सत्व, रज व तम ह्या
तीन गुणांनीं रहित होतें. आतां ज्यांत यज्ञ क्रियेची प्रवृत्ति झाली तें त्रेतायुग तूं
श्रवण कर २३. त्यावेळीं धर्माचा एक पाय कमी होऊन अच्युत प्रभु रक्तवर्ण झाला
आणि लोक सत्याचे ठिकाणीं प्रवृत्त होऊन यज्ञयागादि क्रिया करू लागले २४
तदनंतर त्रेतायुगामध्यें यज्ञ, धर्म व नानाप्रकारच्या क्रिया याचे ठिकाणीं लोक प्रवृत्त
झाल्यामुळें कृपा व दान यांच्या फलांचा ते उपभोग घेणारे झाले. कृतयुगाप्रमाणें

पोदानपरायणाः। स्वधर्मस्थाः क्रियावन्तो नरास्त्रेतायुगेभवन् २६ द्वापरे च युगे धर्मो द्विभागोनः प्रवर्तते। विष्णुर्वै पीततां याति चतुर्धा वेद एव च २७ ततोऽन्ये च चतुर्वेदास्त्रिवेदाश्च तथापरे। द्विवेदाश्चैकवेदाश्चाप्यनृचश्च तथापरे २८ एवं शास्त्रेषु भिन्नेषु बहुधा नीयते क्रिया। तपोदानप्रवृत्ता च राजसी भवति प्रजा २९ एकवेदस्य चाज्ञानाद्वेदास्ते बहवः कृताः। सत्त्वस्य चेह विभ्रंशात्सत्ये कश्चिदवस्थितः ३० सत्यात्प्रच्यवमानानां व्याधयो बहवोभवन्। कामाश्चोपद्रवाश्चैव तदा वै दैवकारिताः ३१ यैरर्द्यमानाः सुभृशं तपस्तप्यन्ति मानवाः। कामकामाः स्वर्गकामा यज्ञांस्तन्वन्ति चापरे ३२ एवं द्वापरमासाद्य प्रजाः क्षीयन्त्यधर्मतः। पादेनैकेन कौन्तेय धर्मः कलियुगे स्थितः ३३ तामसं युगमासाद्य कृष्णो भवति केशवः। वेदाचाराः प्रशाम्यन्ति धर्मयज्ञक्रियास्तथा ३४ ईतयो व्याधयस्तन्द्री दोषाः क्रोधादयस्तथा। उपद्रवाः प्रवर्तन्ते आधयः क्षुद्भयं

संकल्पाबरोबर त्याना फलप्राप्ति होत नव्हती २५. तप व दान ह्यांविषयीं तत्पर, स्वधर्माचें पालन करणारे व क्रिया करणारे असेच लोक त्रेतायुगाचे ठिकाणीं असून ते स्वधर्मापासून च्युत होणारे नव्हते २६. द्वापर युगामध्यें धर्माचे दोन पाद राहून विष्णूचा पीतवर्ण झाला व वेद चार प्रकारचे झाले २७. तेव्हां कित्येक चारी वेदांचे ठिकाणीं (ह्मणजे वेद त्रयांनीं सांगितलेलें कर्म आणि ध्यान ह्यांचे ठिकाणीं)रत, कित्येक तीन वेदांचे ठिकाणीं(ह्मणजे केवल कर्मठ), कित्येक दोन वेदाचे ठिकाणीं (ह्मणजे आपल्या शाखेंत सांगितलेलें संध्यावदनादि कर्म आणि ध्यान ह्यांचे ठिकाणीं) रत, कित्येक एक वेदाचे ठिकाणीं रत (ह्मणजे ध्याननिष्ठ) आणि कित्येक कृतकृत्य असे लोक होते २८. ह्याप्रमाणें शास्त्राचे ठिकाणीं निरनिराळ्या क्रिया सांगितल्यामुळें प्रजा तपश्चर्या व दान ह्यांचे ठिकाणीं प्रवृत्त होऊन रजोगुणी झाल्या २९. एका वेदाच्या आज्ञानानें पुष्कळ वेद झाले आणि बुद्धीच्या भ्रंशानें कित्येक लोकांनीं सत्याचें अवलंबन केलें ३०. नंतर जे सत्यापासून च्युत होऊं लागले त्यांना दैवानें प्राप्त झालेल्या शेकडों व्याधि, काम आणि उपद्रव हीं भोगावीं लागलीं ३१. ह्याप्रमाणें ह्या व्याधिप्रभृतींनीं अत्यंत त्रासून गेलेल्या पुरुषांना अवलोकन करून दुसरे लोक मनोरथ पूर्ण होण्याकरितां व स्वर्गप्राप्तीकरितां यज्ञ करूं लागले ३२. अशा रीतीनें द्वापर युगांमध्यें अधर्मानें प्रजांचा नाश होत असे. हे कुंतीपुत्रा भीमसेना, आतां ह्या कलियुगामध्यें धर्माचा एकच पाद राहिलेला आहे ३३. ह्या युगामध्यें केशवानें कृष्णवर्ण धारण केला आहे. ह्या तमोगुणप्रधान युगामध्यें वेदाचा आचार, धर्म आणि यज्ञादिक क्रिया नाहींशा होतील ३४.

तथा ३५ युगेष्वावर्तमानेषु धर्मो व्यावर्तते पुनः । धर्मे व्यावर्तमाने तु लोको व्यावर्तते पुनः ३६ लोके क्षीणे क्षयं यान्ति भावा लोकप्रवर्तकाः । युगक्षयकृता धर्माः प्रार्थनानि विकुर्वते ३७ एतत्कलियुगं नाम अचिराद्यत्प्रवर्तते । युगानुवर्तनं त्वेतत्कुर्वन्ति चिरजीविनः ३८ यच्च ते मत्परिज्ञाने कौतूहलमरिन्दम । अनर्थकेषु को भावः पुरुषस्य विजानतः ३९ एतत्ते सर्वमाख्यातं यन्मां त्वं परिपृच्छसि । युगसंख्यां महाबाहो स्वस्ति प्राप्नुहि गम्यताम् ४० [५७६४] इति श्रीमहाभारते० वैयासिक्यामारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थयात्रायां कदलीषण्डे हनुमद्भीमसंवादे ऊनपञ्चाशदधिकशततमोऽध्यायः ॥ १४९ ॥

भीमसेन उवाच ॥ पूर्वरूपमदृष्ट्वा ते न यास्यामि कथञ्चन । यदि तेऽहमनुग्राह्यो दर्शयात्मानमात्मना १ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्तस्तु भीमेन स्मितं कृत्वा प्लवङ्गमः । तद्रूपं दर्शयामास यद्वै सागरलङ्घने २ भ्रातुः प्रियमभीप्सन्वै चकार सुमहद्वपुः । देहस्तस्य ततोतीव वर्धत्यायाः-

---

अतिवृष्टि अनावृष्ट्यादि दोष, व्याधि, मानसिक चिंता, क्षुधा, भय इत्यादि उपद्रव उत्पन्न होतील ३५ आणि अशी स्थिति झाली असतां युगांचा नाश होतो; युगाचा नाश झाला असतां धर्माचा नाश होतो व धर्माचा नाश झाला असतां लोकांचा नाश होतो ३६. लोकांचा क्षय झाला असतां धर्मज्ञानादिकांचा नाश होतो व त्यामुळें करावें एक आणि होतें एक अशी स्थिति होते ३७. हे भीमसेना, आतां लवकरच हें कलियुग नांवाचें युग सुरू होईल; ह्मणून माझ्यासारिखे पुष्कळ दिवस वाचणारेही कालाप्रमाणें वागणारे होतात ३८. हे शत्रुनाशका भीमसेना, माझी हकीकत जाणून घेण्याविषयीं जी तुला जिज्ञासा उत्पन्न झाली होती ती आतां पूर्ण करून घे; बा वत्सा, निरर्थक गोष्टींविषयीं शहाणा मनुष्य कधींही आग्रह धरून बसत नाहीं ३९. हे आजानुबाहो भीमसेना, युगसंख्येविषयीं जें तूं मला विचारिलेंस तें मीं तुला सांगितलें. बा वत्सा, तुझें कल्याण असो; आतां खुशाल चालता हो ४०. ह्याप्रमाणें० महाभारतांतर्गत वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वांपैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं भीम व मारुती ह्यांच्या संवादाविषयीं एकशें एकुणपन्नासावा अध्याय समाप्त झाला ॥ १४९ ॥

भीमसेन ह्मणतो:—हे हनूमन्, मी तुझें पूर्वींचें रूप अवलोकन केल्यावांचून कधींही जावयाचा नाहीं. माझ्यावर कृपा करावी असें जर तुझ्या मनांत असेल तर तूं तें आपलें रूप मला दाखीव १. वैशंपायन ह्मणतात:—ह्याप्रमाणें भीमसेनाचें भाषण श्रवण केल्यावर त्या महाकपीनें हास्य केलें आणि समुद्राचें उल्लंघन करितांना जें रूप

मविस्तरैः ३ सद्रुमं कदलीषण्डं छादयन्नमितद्युतिः । गिरेश्चोच्छ्रयमा-
क्रम्य तस्थौ तत्र च वानरः ४ समुच्छ्रितमहाकायो द्वितीय इव पर्वतः ।
ताम्रेक्षणस्तीक्ष्णदंष्ट्रो भ्रुकुटीकुटिलाननः ५ दीर्घलांगूलमाविध्य दिशो
व्याप्य स्थितः कपिः । तद्रूपं महदालक्ष्य भ्रातुः कौरवनन्दनः ६ विसि-
ष्मिये तदा भीमो जहृषे च पुनः पुनः । तमर्कमिव तेजोभिः सौवर्णमिव
पर्वतम् ७ प्रदीप्तमिव चाकाशं दृष्ट्वा भीमो न्यमीलयत् । आबभाषे च
हनुमान्भीमसेनं स्मयन्निव ८ एतावदिह शक्तस्त्वं द्रष्टुं रूपं ममानघ । वर्धेहं
चाप्यतो भूयो यावन्मे मनसि स्थितम् । भीम शत्रुषु चात्यर्थं वर्धते मूर्ति-
रोजसा ९ वैशंपायन उवाच ॥ तदद्भुतं महारौद्रं विन्ध्यपर्वतसन्निभम् ।
दृष्ट्वा हनूमतो वर्ष्म सम्भ्रान्तः पवनात्मजः १० प्रत्युवाच ततो भीमः संप्र-
हृष्टतनूरुहः । कृताञ्जलिरदीनात्मा हनूमन्तं पुरःस्थितम् ११ दृष्टं प्रमाणं
विपुलं शरीरस्यास्य ते विभो । संहरस्व महावीर्य स्वयमात्मानमात्मना १२

धारण केलें होतें तें रूप दाखवलें २. व भ्रात्याचें प्रिय करण्याची इच्छा कर-
णाऱ्या त्या मारुतीनें आपलें शरीर आडवें उभें असें अतिशय मोठें केलें ३ व त्या
महातेजस्वी मारुतीनें वृक्षांसहित केळीच्या खंडांना आच्छादित करून पर्वताच्या
उंचीपेक्षांही उंच आला ४. त्यानें शरीर वाढविल्यामुळें दुसरा पर्वतच कीं काय असा
रक्तवर्ण नेत्र व तीक्ष्ण दाढा असलेला आणि भ्रुकुटी चढविलेला असा तो
दिसत होता ५. त्याचें शेपूट अतिशय लांब गेलें असून त्याच्या शरीरानें
दशदिशा भरून गेल्या होत्या. हें आपल्या भ्रात्याचें मोठें स्वरूप अवलो-
कन केल्यावर कुरुनंदन भीमसेनाला ६ मोठा आनंद आणि विस्मय उत्पन्न झाली
आणि तेजानें सूर्यासारिखा, सुवर्णाच्या पर्वताप्रमाणें लकलकणारा ७ व आपल्या
शरीराच्या कांतीनें आकाश प्रकाशित करणारा अशा कपि हनुमानाला अवलोकन
करून भीमाचे डोळे दिपून गेले असतां हनुमान् हास्यपूर्वक त्याला ह्मणाला ८ " हे
निष्पापा भीमसेना, येवढेंच रूप अवलोकन करण्याला तूं समर्थ आहेस; ह्यापेक्षां
माझ्या मनाला वाटेल तितकें मोठें रूप मला धारण करितां येतें आणि शत्रुसमुदाया-
मध्यें तर माझें रूप व माझें बल हीं अत्यंत वाढतात " ९. वैशंपायन सांगतात:—
तें अद्भुत व अत्यंत भीति उत्पन्न करणारें पर्वतासारिखें असें हनुमंताचें रूप अवलो-
कन करून वायुतनय भीमसेन भांबावून गेला आणि अंगावर रोमांच उभे राहिलेला
तो महापराक्रमी भीम पुढें असलेल्या हनूमंताला हात जोडून ह्मणाला १०,११ " हे
विभो, अतिशय मोठें असलेलें आपलें शरीर मीं अवलोकन केलें. हे महापराक्रमी

न हि शक्नोमि त्वां द्रष्टुं दिवाकरमिवोदितम् । अप्रमेयमनाधृष्यं मैनाकमिव पर्वतम् १३ विस्मयश्चैव मे वीर सुमहान्मनसोद्य वै । यद्रामस्त्वयि पार्श्वस्थे स्वयं रावणमभ्यगात् १४ त्वमेव शक्तस्तां लङ्कां सयोधां सहवाहनाम् । स्वबाहुबलमाश्रित्य विनाशयितुमञ्जसा १५ न हि ते किञ्चिदप्राप्यं मारुतात्मज विद्यते । तव नैकस्य पर्याप्तो रावणः सगणो युधि १६ वैशंपायन उवाच ॥ एवमुक्तस्तु भीमेन हनूमान्प्लवगोत्तमः । प्रत्युवाच ततो वाक्यं स्निग्धगम्भीरया गिरा १७ हनूमानुवाच ॥ एवमेतन्महाबाहो यथा वदसि भारत । भीमसेन न पर्याप्तो ममासौ राक्षसाधमः १८ मया तु निहते तस्मिन्रावणे लोककण्टके । कीर्तिर्नश्येद्राघवस्य तत एतदुपेक्षितम् १९ तेन वीरेण तं हत्वा सगणं राक्षसाधमम् । आनीता स्वपुरं सीता कीर्तिश्चाख्यापिता नृषु २० तद्गच्छ विपुलप्रज्ञ भ्रातुः प्रियहिते रतः । अरिष्टं क्षेममध्वानं वायुना परिरक्षितः २१ एष पन्थाः कुरुश्रेष्ठ सौग-

---

वायुतनया, आतां तुझा तूंच स्वत: आपल्या शरीराचा उपसंहार कर १२. उदय पावलेल्या सूर्याकडे ज्याप्रमाणें अवलोकन करवत नाहीं त्याप्रमाणें तुझ्याकडे मला पहावत नाहीं. तूं उच्चीनें मोजला जाण्यास अशक्य असून ज्याच्याशीं युद्ध करितां येत नाहीं अशा मैनाकपर्वतासारिखा आहेस १३. हे वीरा, माझ्या मनामध्यें आज अतिशय आश्चर्य वाटत आहे कीं, तूं पार्श्वभागाचे ठिकाणीं असतांना रामचंद्र स्वत: रावणावर कसा चालून गेला ? १४. कारण, आपल्या बाहुबलाचा आश्रय केलेला तूंच योद्धे व वाहनें ह्यांसहवर्तमान लंकेचा सत्वर नाश करण्यास समर्थ आहेस १५. हे वायुतनया, तुला ह्या पृथ्वीतलाचे ठिकाणीं प्राप्त करून घेण्यास अशक्य असें कांहीं एक नाहीं व भ्रात्यांसहवर्तमान रावणही तुझ्या एकट्याबरोबर युद्ध करण्यास समर्थ नाहीं १६. वैशंपायन सांगतात:— वानरश्रेष्ठ हनुमानाशीं भीमसेनानें असें भाषण केल्यावर तो मारुती मृदु व गंभीर अशा वाणीनें त्याच्याशीं बोलूं लागला १७, हनूमान् ह्मणतो:- हे आजानुबाहो भरतकुलोत्पन्ना भीमसेना, तूं ह्मणतोस त्याप्रमाणें खरोखरच तो राक्षसाधम रावण माझ्याबरोबर युद्ध करण्यास असमर्थ होता १८. लोकांना (डोळ्यांमध्यें) कांट्याप्रमाणें सलणाऱ्या त्या रावणाचा जर मीं वध केला असतां तर रघुकुलोत्पन्न रामचंद्राची कीर्ति झाली नसती ह्मणून मी त्याची उपेक्षा केली १९. त्या वीर रामचंद्राकडून भृत्यांसहवर्तमान त्या राक्षसाचा नाश करवून ऱ्यां सीता आपल्या नगरीला आणिली आणि लोकांमध्यें त्याची कीर्ति प्रख्यात केली २०. तस्मात् , हे बुद्धिमानांमध्यें श्रेष्ठ भीमसेना, आपल्या प्रिय बंधूचें हित करण्याकरितां

न्धिकवनाय ते । द्रक्ष्यसे धनदोद्यानं रक्षितं यक्षराक्षसैः २२ न च ते तरसा कार्यः कुसुमावचयः स्वयम् । दैवतानि हि मान्यानि पुरुषेण विशेषतः २३ बलिहोमनमस्कारैर्मन्त्रैश्च भरतर्षभ । दैवतानि प्रसादं हि भक्त्या कुर्वन्ति भारत २४ मा तात साहसं कार्षीः स्वधर्म परिपालय । स्वधर्मस्थः परं धर्मं बुध्यस्व गमयस्व च २५ न हि धर्ममविज्ञाय वृद्धाननुपसेव्य च । धर्मार्थौ वेदितुं शक्यौ बृहस्पतिसमैरपि २६ अधर्मो यत्र धर्माख्यो धर्मश्चाधर्मसंज्ञितः । स विज्ञेयो विभागेन यत्र मुह्यन्त्यबुद्धयः २७ आचारसंभवो धर्मो धर्मे वेदाः प्रतिष्ठिताः । वेदैर्यज्ञाः समुत्पन्ना यज्ञैर्देवाः प्रतिष्ठिताः २८ वेदाचारविधानोक्तैर्यज्ञैर्धार्यन्ति देवताः । बृहस्पत्युशनःप्रोक्तैर्नयैर्धार्यन्ति मानवाः २९ पण्याकरवणिज्याभिः कृष्यागोजाविपोषणैः । वार्तया धार्यते सर्वं धर्मैरेतैर्द्विजा-

---

ह्या भयंकर मार्गांतून वायूनें रक्षण केल्यामुळें तूं खुशाल गमन कर २१. हे कुरुवंशश्रेष्ठा, सौगंधिक वनाला जाण्याचा हाच मार्ग आहे. (ह्या रस्त्यानें तूं गेलास म्हणजे) यक्ष आणि राक्षस ह्यांनीं रक्षण केलेलें कुबेराचें उपवन तूं अवलोकन करशील २२. बा वत्सा भीमसेना, तेथें गेल्याबरोबर तू तत्काल पुष्पें गोळा करूं नकोस. कारण, विशेषेंकरून पुरुषांनीं देवतांना मान दिलाच पाहिजे २३. हे भरतकुलश्रेष्ठा भीमसेना, बली, होम, नमस्कार आणि मंत्र ह्यांनीं भक्तिपूर्वक देवतांचें आराधन केलें असतां त्या प्रसन्न होतात २४. तस्मात्, बा वत्सा, स्वधर्माचें पालन कर; साहस करूं नकोस व बुद्धिपूर्वक स्वधर्माचे ठिकाणीं स्थित होऊन मार्गक्रमण कर २५. तात्पर्य, धर्माला न जाणतां आणि वृद्धांची सेवा न करितां बृहस्पतीसारख्यांनाही धर्म व अर्थ ह्यांची प्राप्ति करून घेतां येत नाहीं २६. कारण, वध करणें हा अधर्म आहे; तथापि तो (दुर्जनांचा केला असतां) धर्म होतो आणि सत्य हा धर्म आहे; परंतु, (त्या सत्यापासून जर दुसऱ्याचा घात होत असेल तर) तो अधर्म होतो. अशा ह्या विचाराविषयीं कोत्या बुद्धीचे लोक मूढ होतात. ह्यास्तव, शहाणे लोकांनींच हा विचार करावा २७. शुचिर्भूतपणाप्रभृति आचारांपासून धर्म उत्पन्न होतो; धर्मावरच अवलंबून वेद आहेत; वेदांपासून यज्ञ उत्पन्न होतात आणि यज्ञांपासून देवांना हविर्भाग मिळतात २८. वेदांमध्यें सांगितलेल्या आचारांचें विधिपूर्वक अवलंबन केलें असतां यज्ञादिक क्रियांच्या योगानें देवतांचें परिपालन होतें आणि बृहस्पति व शुक्राचार्य ह्यांनीं सांगितलेल्या नीतींच्या योगानें मनुष्यांचें परिपालन होतें २९. व्यापार करणें, पगार घेऊन चाकरी करणें, कर वसूल करून त्यावर उपजीविका करणें, शेतकी

तिभिः ३० त्रयी वार्ता दण्डनीतिस्तिस्रो विद्या विजानताम् । ताभिः सम्यक्प्रयुक्ताभिर्लोकयात्रा विधीयते ३१ सा चेद्धर्मक्रिया न स्यात्त्रयीधर्ममृते भुवि । दण्डनीतिमृते चापि निर्मर्यादमिदं भवेत् ३२ वार्ताधर्मे ह्यवर्तिन्या विनश्येयुरिमाः प्रजाः । सुप्रवृत्तैस्त्रिभिर्ह्येतैर्धर्मैः सूयन्ति वै प्रजाः ३३ द्विजातीनामृतं धर्मो ह्येकश्चैवैकवर्णिकः । यज्ञाध्ययनदानानि त्रयः साधारणाः स्मृताः ३४ याजनाध्यापनं विप्रे धर्मश्चैव प्रतिग्रहः । पालनं क्षत्रियाणां वै वैश्यधर्मश्च पोषणम् ३५ शुश्रूषा च द्विजातीनां शूद्राणां धर्म उच्यते । भैक्ष्यहोमव्रतैर्हीनास्तथैव गुरुवासिताः ३६ क्षत्रधर्मात्र कौन्तेय तव धर्मोऽत्र रक्षणम् । स्वधर्मं प्रतिपद्यस्व विनीतो नियतेन्द्रियः ३७ वृद्धैः संमन्त्र्य सद्भिश्च बुद्धिमद्भिः श्रुतान्वितैः । आस्थितः शास्ति दण्डेन व्यसनी परिभूयते ३८ निग्रहानुग्रहैः सम्यग्यदा राजा

करणें आणि गाई, शेळ्या व मेंढ्या यांना पाळून त्यांच्यावर उपजीविका करणें हे उपजीविकेला साधन ह्मणून करून ठेविलेले धर्म आहेत. ह्यांचें ब्राह्मणांनीं अवलंबन केलें असतां त्यांचा निर्वाह होतो ३०. सारांश, शास्त्राध्ययन, व्यापार व राजनीति ह्या तीन विद्याच जाणत्या लोकांना उपजीविकेचें साधन आहेत; परंतु, इतरांनींही त्याचा योग्य रीतीनें उपयोग केला असतां त्यांचेंही उपजीवन होतें ३१. हाच लोकांच्या निर्वाहाचा उपाय धर्मशास्त्र, वेद आणि राजनीति ह्यांना जर धरून नसेल तर ह्या जगतामध्यें मर्यादा सुटेल ३२. अर्थात् जे लोक शास्त्रांनीं सांगितलेल्या व्यापारप्रभृति आपआपल्या धर्मानें चालत नाहींत त्यांचा नाश होतो; परंतु, हे पूर्वी सांगितलेले उपजीवनाचे उपाय जे योग्य रीतीनें उपयोगांत आणितात त्यांचें कल्याण होऊन धर्मही वाढतो ३३. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य ह्या तिघांना यज्ञ, अध्ययन आणि दान हे धर्म साधारण आहेत; परंतु, आत्मज्ञानसंज्ञक योग करणें हें मुख्य साधन आहे ३४. यज्ञ करणें, विद्या शिकविणें आणि दान घेणें हा ब्राह्मणांचा धर्म असून प्रजांचें पालन करणें हा क्षत्रियांचा धर्म आहे. त्याचप्रमाणें शेतकी, गोरक्षण व व्यापार हा वैश्यांचा धर्म आहे ३५ व भिक्षा, होम आणि व्रत हीं न करितां ब्राह्मणादिकांची सेवा करणें हाच शूद्रांचा मुख्य धर्म आहे ३६. हे कुंतीपुत्रा भीमसेना, सांप्रत तुला क्षात्रधर्मच कथन करणें मला उचित आहे. करितां, तो कोणता ह्मणशील तर रक्षण करणें हाच होय. ह्यास्तव, हे भीमसेना, इंद्रियांचें दमन करून नम्रतापूर्वक आपल्या धर्माचें अवलंबन कर ३७. सद्वर्तनी, बुद्धिमान्, विद्वान् आणि वृद्ध ह्यांसह सल्लामसलत करून त्यांच्या कृपेनें जो कोणी राज्य करितो तोच लोकमान्य होतो आणि जो

प्रवर्तते। तदा भवन्ति लोकस्य मर्यादाः सुव्यवस्थिताः ३९ तस्माद्देशे च दुर्गे च शत्रुमित्रबलेषु च। नित्यं चारेण बोद्धव्यं स्थानं वृद्धिः क्षयस्तथा ४० राज्ञामुपायश्चारश्च बुद्धिमन्त्रपराक्रमाः। विग्रहप्रग्रहौ चैव दाक्ष्यं वै कार्यसाधकम् ४१ साम्ना दानेन भेदेन दण्डेनोपेक्षणेन च। साधनीयानि कर्माणि समासव्यासयोगतः ४२ मन्त्रमूला नया सर्वे चाराश्च भरतर्षभ। सुमन्त्रितैर्नया सिद्धिस्तां द्विजैः सह मन्त्रयेत् ४३ स्त्रिया मूढेन बालेन लुब्धेन लघुनापि वा। न मन्त्रयीत गुह्यानि येषु चोन्मादलक्षणम् ४४ मन्त्रयेत्सह विद्वद्भिः शक्तैः कर्माणि कारयेत्। स्निग्धैश्च नीतिविन्यासान्मूर्खान्सर्वत्र वर्जयेत् ४५ धार्मिकान्धर्मकार्येषु अर्थकार्येषु पण्डितान्। स्त्रीषु क्लीबान्नियुञ्जीत क्रूरान्क्रूरेषु कर्मसु ४६ स्वेभ्यश्चैव परेभ्यश्च कार्याकार्यसमुद्भवा। बुद्धिः कर्मसु विज्ञेया रिपूणां

व्यसनी होऊन अव्यवहार करितो तो पदच्युत होतो ३८. राजा जेव्हां अपराध्यास दंड आणि सत्कर्म करणाऱ्यास उत्तेजन देणारा होतो तेव्हांच लोकांच्या मर्यादा जेथल्या तेथें असतात ३९. तस्मात् , स्वदेशामध्ये व किल्यावर असलेल्या आपल्या शत्रूच्या व मित्राच्या सैन्यांची वृद्धि आणि क्षय अथवा त्यांचा तळ कोठें आहे हें नेहमीं गुप्त हेरांकडून राजानें समजून घेत जावें ४०. गुप्त हेर, बुद्धि, मसलत, पराक्रम, युक्ति, युद्ध, निग्रह आणि दक्षता ह्यांच्याच योगानें राजाचीं सर्व कार्यें सिद्धीस जातात ४१. साम, दान, भेद आणि उपेक्षा ह्या उपायांनीं राजांनीं आपलीं कार्यें साधीत जावीं. सारांश, जेथें जसा प्रसंग पडेल त्या ठिकाणीं त्या त्या उपायांची योजना करावी ४२. गुप्त हेर आणि राजनीति ह्यांचें मूळ मुत्सद्दी लोकांच्या विचारांत आहे व, हे भरतवंशजश्रेष्ठा भीमसेना, चांगल्या विचारानेंच कार्यसिद्धि होते. करितां, तो विचार ब्राह्मणांसहवर्तमान करीत असावा ४३. गुप्त कार्यांचा विचार स्त्री, मूर्ख, बालक, लोभी आणि हलकट ह्यांच्या सहवर्तमान करूं नये. कारण, ते (अज्ञानी असल्यामुळें आपण थोर असें समजून हलकटपणानें झालेली) मसलत बाहेर फोडतात ४४. मसलत करणें ती विद्वानांसहवर्तमान करावी. कामें करण्यांत कुशल असलेल्या लोकांकडून कामें करवावींत, मित्रांकडून नीतीची स्थापना करावी आणि मूर्खांना सर्व कृत्यांमध्यें वगळावें ४५. धर्म कृत्यांत धार्मिकांची योजना करावी, द्रव्यसंबंधीं व्यवस्थेंत पंडितांची योजना करावी, स्त्रियांमध्यें षंढांची योजना करावी आणि क्रूर कर्में करण्याविषयीं क्रूर लोकांचीच योजना करावी ४६. आपल्या शत्रुसैन्यांतील लोकांचे कार्य किंवा अकार्य करण्याविषयींचे विचार आपल्या गुप्त हेरांकडून अथवा त्यांच्याच

च बलाबलम् ४७ बुद्ध्या स्वप्रतिपन्नेषु कुर्यात्साधुष्वनुग्रहम् । निग्रहं चाप्यशिष्टेषु निर्मर्यादेषु कारयेत् ४८ निग्रहे प्रग्रहे सम्यग्यदा राजा प्रवर्तते । तदा भवति लोकस्य मर्यादा सुव्यवस्थिता ४९ एष तेभिहितः पार्थ घोरो धर्मो दुरन्वयः । तं स्वधर्मविभागेन विनयस्थानुपालय ५० तपोधर्मदमज्याभिर्विप्रा यान्ति यथा दिवम् । दानातिथ्यक्रियाधर्मैर्यान्ति वैश्याश्च सद्गतिम् । क्षत्रं याति तथा स्वर्गं भुवि निग्रहपालनैः ५१ सम्यक्प्रणीतदण्डा हि कामद्वेषविवर्जिताः । अलुब्धा विगतक्रोधाः सतां यान्ति सलोकताम् ५२ [५८१६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थयात्रायां हनूमद्भीमसेनसंवादे पञ्चाशदधिकशततमोध्यायः ॥ १५० ॥

वैशंपायन उवाच ॥ ततः संहृत्य विपुलं तद्वपुः कामतः कृतम् । भीमसेनं पुनर्दोर्भ्यां पर्यष्वजत वानरः १ परिष्वक्तस्य तस्याशु भ्रात्रा भीमस्य भारत । श्रमो नाशमुपागच्छत्सर्वं चासीत्प्रदक्षिणम् २ बलं

सैन्यांतील लांच देऊन फितूर केलेल्या लोकांकडून जाणून घेऊन त्यांचें बलाबलही समजून घ्यावें ४७. आपल्याला शरण आलेल्या सज्जनांवर अनुग्रह करावा आणि मर्यादा सोडून वर्तन करणाऱ्या दुष्टांचा निग्रह करावा हेंच राजाचें कर्तव्य होय ४८. शासन करणें आणि अनुग्रह करणें ह्यांसबंधानें जेव्हां राजा आपलें योग्य वर्तन ठेवितो तेव्हांच लोक आपआपल्या मर्यादेनें वागूं लागतात ४९. असो. हे पृथानंदना भीमसेना, ह्याप्रमाणें हा समजण्यास कठिण असा घोर धर्म मीं तुला कथन केला आहे. तस्मात्, आपल्या जातीच्या वाट्याला आलेला हा धर्म तूं पालन कर ५०. सारांश, ज्याप्रमाणें तप, धर्म, इंद्रियदमन आणि यज्ञयागादि क्रिया ह्याच्या योगानें ब्राह्मण स्वर्गाला जातात व दान आणि अतिथींची सेवा व स्वधर्माचरण ह्याच्या योगानें वैश्यांना सद्गति प्राप्त होते त्याप्रमाणें क्षत्रियही ह्या भूतलावर निग्रह आणि अनुग्रह करून स्वर्गाला जातात ५१. तात्पर्य, काम व द्वेष ह्यांनीं रहित, निर्लोभी, क्रोध नाहींसा झालेले आणि योग्य रीतीनेंच दंड करणारे असे क्षत्रियही, साधु ज्या लोकाला जातात, त्याच लोकाला जातात ५२. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं लोमशतीर्थयात्रेसबंधीं हनूमान् व भीमसेन ह्यांच्या संवादाविषयीं एकशें पन्नासावा अध्याय समाप्त झाला॥१५०॥

वैशंपायन सांगतातः—तदनंतर त्या वानरश्रेष्ठ मारुतीनें आपल्या इच्छेनें धारण केलेलें तें आपलें प्रचंड रूप गुप्त करून पुनरपि भीमसेनाला आपल्या बाहूंनीं आलिंगन दिलें १. तेव्हां, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, भ्रात्या मारुतीनें आलिंगन देतांच त्या

चातिबलो मेने न मेऽस्ति सदृशो महान् ३ ततः पुनरथोवाच पर्यश्रुन-यनो हरिः। भीममाभाष्य सौहार्दाद्बाष्पगद्गदया गिरा ॥ गच्छ वीर स्वमावासं स्मर्तव्योऽस्मि कथान्तरे ४ इहस्थश्च कुरुश्रेष्ठ न निवेद्योऽस्मि कर्हिचित्। धनदस्यालयाच्चापि विसृष्टानां महाबल ५ देशकाल इहायातुं देवगन्धर्वयोषिताम्। ममापि सफलं चक्षुः स्मारितश्चास्मि राघवम् ६ रामाभिधानं विष्णुं हि जगद्धृदयनन्दनम्। सीतावक्त्रारविन्दार्कं दशास्यध्वान्तभास्करम् ७ मानुषं गात्रसंस्पर्शं गत्वा भीम त्वया सह। तदस्मद्दर्शनं वीर कौन्तेयामोघमस्तु ते ८ भ्रातृत्वं त्वं पुरस्कृत्य वरं वरय भारत। यदि तावन्मया क्षुद्रा गत्वा वारणसाह्वयम् ९ धार्तराष्ट्रा निहन्तव्या यावदेतत्करोम्यहम्। शिलया नगरं वापि मर्दितव्यं मया यदि १० बध्वा दुर्योधनं चाद्य आनयामि तवान्तिकम्। यावदेतत्करोम्यद्य कामं तव महाबल ११ वैशंपायन उवाच ॥ भीमसेनस्तु तद्वाक्यं श्रुत्वा तस्य महा-

---

भीमसेनाचे श्रम नाहीसे होऊन त्याला सर्व कांहीं मंगलकारक दिसलें २ आणि मी महाबलाढ्य आहें व माझ्या बरोबरीचा कोणी नाही असें त्याला वाटूं लागलें ३. तदनंतर ज्याच्या नेत्रांतून आनंदाश्रू वाहत आहेत असा मारुती भीमसेनाला सप्रेम अंतःकरणानें कंठ सद्गदित होऊन पुनरपि ह्मणाला " हे वीरा, आतां तूं आपल्या वसतिस्थानाचे ठिकाणी गमन कर आणि इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत असतांना माझें स्मरण करीत जा ४. हे कुरुवंशजश्रेष्ठा, मी येथें आहें हें कधीही कोणाला कळवूं नकोस. हे महाबलाढ्य भीमसेना, कुबेराच्या घरून परत फिरलेल्या ५ देव व गंधर्व यांच्या स्त्रियांची ह्या ठिकाणीं येण्याची आतां वेळ झाली आहे. तुझ्या दर्शनानें माझ्या नेत्रांचें साफल्य होऊन तूं मला ज्या रामचंद्राचें स्मरण करविलेंस ६ तो रामचंद्र सीतेच्या मुखरूपी कमलाला सूर्याप्रमाणें विकसित करणारा, रावणरूपी अंधकाराला सूर्यासारिखा नाहींसा करणारा व जगांतील लोकांच्या ह्रदयाला आनंद देणारा असा महाविष्णूच आहे ७. हे भीमसेना, माझें दर्शन होऊन मनुष्यरूपी तुझ्या गात्रांचा मला स्पर्श झाल्यामुळें तें आतां सफल होवो ८. हे भरतकुलोत्पन्ना भीमसेना, तूं आपल्या बंधुत्वाच्या नात्याला पुढें करून माझ्यापाशीं वर माग; जर तुझ्या मनामध्यें असेल तर मी हस्तिनापुरामध्यें जाऊन ९ क्षुद्र अशा धृतराष्ट्राच्या मुलांचा नाश करीन; मोठ्या थोरल्या पर्वताच्या शिलेनें त्या नगराचा चुराडा करीन १० अथवा, दुर्योधनाला बांधून तुझ्याजवळ आणीन. हे महाबलाढ्य भीमसेना, ह्यांपैकीं तुला जें रुचत असेल तें मीं करीन ११. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें ह्या महात्म्या

त्मनः । प्रत्युवाच हनूमन्तं प्रहृष्टेनान्तरात्मना १२ कृतमेव त्वया सर्वं मम वानरपुंगव । स्वस्ति तेऽस्तु महाबाहो कामये त्वां प्रसीद मे १३ सनाथाः पाण्डवाः सर्वे त्वया नाथेन वीर्यवन् । तवैव तेजसा सर्वान्विजेष्यामो वयं परान् १४ एवमुक्तस्तु हनुमान्भीमसेनमभाषत । भ्रातृत्वात्सौहृदाच्चैव करिष्यामि प्रियं तव १५ चमूं विगाह्य शत्रूणां परशक्तिसमाकुलाम् । यदा सिंहरवं वीर करिष्यसि महाबल १६ तदाहं बृंहयिष्यामि स्वरवेण रवं तव । विजयस्य ध्वजस्थश्च नादान्मोक्ष्यामि दारुणान् १७ शत्रूणां ये प्राणहराः सुखं येन हनिष्यथ । एवमाभाष्य हनुमांस्तदा पाण्डवनन्दनम् १८ मार्गमाख्याय भीमाय तत्रैवान्तरधीयत १९ [५८६५] इति श्रीमहाभारते॰ मारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थ॰ गन्धमा॰ हनूमद्भीमसंवादे एकपञ्चाशदधिकशततमोऽध्यायः॥१५१॥

वैशंपायन उवाच ॥ गते तस्मिन्हरिवरे भीमोऽपि बलिनां वरः । तेन मार्गेण विपुलं व्यचरद्गन्धमादनम् १ अनुस्मरन्वपुस्तस्य श्रियं चाप्रतिमां

हनुमताचें वाक्य भीमसेनानें श्रवण केल्यावर तो अतिशय आनंदित होऊन त्याला ह्मणाला १२ "हे वानरश्रेष्ठा, आपण माझें सर्व कांहीं केल्याप्रमाणें झालें. हे आजानुबाहो मारुते, आपण स्वस्थ असावें; आतां 'आपण माझ्यावर प्रसन्न व्हा' हाच मी आपल्याला वर मागतों १३. हे महापराक्रमी वानरश्रेष्ठा, आपण पालन करणारे असल्यामुळें आज आह्मी सर्व पांडव सनाथ झालों आणि आपल्याच बलावर आह्मी सर्व शत्रूंना जिंकून टाकूं १४. ह्याप्रमाणें भीमसेनाचें भाषण श्रवण केल्यावर हनूमान् त्याला ह्मणाला "तूं माझा भ्राता आणि सुहृद असल्यामुळें मी तुझें प्रियच करीन १५. हे महाबलाढ्य वीरा भीमसेना, जेव्हां तूं अत्यंत शक्तीनें युक्त असलेल्या आपल्या शत्रूंच्या सैन्यामध्यें प्रवेश करून सिंहनाद करशील १६ तेव्हां मी तुझा तो सिंहनाद आपल्या स्वतःच्या शब्दानें वृद्धिंगत करीन आणि अर्जुनाच्या ध्वजावर बसून वारंवार भयंकर सिंहनाद केला असतां १७ त्याच्या योगानें शत्रूंचें बल कमी झालें ह्मणजे तुह्मी त्यांचा सहज नाश कराल" १८ ह्याप्रमाणें पांडुतनय भीमसेनाशीं मारुतीनें भाषण करून व त्याला पुढें जाण्याचा मार्ग दाखवून तो मारुती त्याच ठिकाणीं अंतर्धान पावला १९. ह्याप्रमाणें॰ वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वांपैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं हनूमान् व भीम ह्यांच्या संवादाविषयीं एकशें एकावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥१५१॥

वैशंपायन सांगतात:—तो महापराक्रमी हनूमान् अंतर्धान पावला असतां बलवानांमध्यें श्रेष्ठ असलेला भीमसेन त्याच मार्गानें भव्य अशा गंधमादनपर्वताकडे निघाला १.

भुवि । माहात्म्यमनुभावं च स्मरन्दाशरथेर्ययौ २ स तानि रमणीयानि वनान्युपवनानि च । विलोकयामास तदा सौगन्धिकवनेप्सया ३ फुल्लद्रुमविचित्राणि सरांसि सरितस्तथा । नानाकुसुमचित्राणि पुष्पितानि वनानि च ४ मत्तवारणयूथानि पङ्कदिग्धानि भारत । वर्षतामिव मेघानां वृन्दानि ददृशे तदा ५ हरिणैश्चपलापाङ्गैर्हरिणीसहितैर्वनम् । सशष्पकवलैः श्रीमान्पथि दृष्ट्वा द्रुतं ययौ ६ महिषैश्च वराहैश्च शार्दूलैश्च निषेवितम् । व्यपेतभीर्गिरिं शौर्याद्भीमसेनो व्यगाहत ७ कुसुमानन्तगन्धैश्च ताम्रपल्लवकोमलैः । याच्यमान इवारण्ये द्रुमैर्मारुतकम्पितैः ८ कृतपद्माञ्जलिपुटा मत्तषट्पदसेविताः । प्रियतीर्थवना मार्गे पद्मिनीः समतिक्रमन् ९ मज्जमानमनोदृष्टिः फुल्लेषु गिरिसानुषु । द्रौपदीवाक्यपाथेयो भीमः शीघ्रतरं ययौ १० परिवृत्तेऽहनि ततः प्रकीर्णहरिणे वने । काञ्च-

---

जातांना मारुतीच्या शरीराचें, त्याच्या त्या अप्रतिम कांतीचें आणि दशरथनंदन रामचंद्राच्या महात्म्याचें व प्रभावाचें स्मरण करीत करीत चालला २. तो सौगंधिक वन अवलोकन करण्याच्या इच्छेनें चालला असतां रमणीय वनें आणि उपवनें त्याच्या दृष्टीं पडलीं ३. प्रफुल्लित झालेल्या चित्र विचित्र वृक्षांनीं वेष्टित अशीं सरोवरें, नद्या व नानाप्रकारच्या पुष्पांनीं शोभिवंत दिसणारीं वनें त्यानें अवलोकन केलीं ४ आणि, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, चिखलानीं भरलेले व आतांच पर्जन्य पडेल कीं काय असें भासणाऱ्या मेघाप्रमाणें दिसणारे मत्त हत्तींचे कळप त्यानें अवलोकन केले ५. चंचल नेत्रकटाक्ष असलेले हरिण आपल्या हरिणींसहवर्तमान मुखामध्यें गवताचा ग्रास घेऊन वनामध्यें हिंडत आहेत असें त्या श्रीमान् भीमसेनानें अवलोकन केलें आणि तो सत्वर मार्ग आक्रमण करूं लागला ६. महिष, वराह व व्याघ्र ह्यांनीं वास्तव्य केलेल्या त्या पर्वतावर तो भीमसेन मोठ्या शौर्यानें निर्भय होऊन जाऊं लागला ७. तेव्हां अतिशय सुगंध देणाऱ्या पुष्पांनीं युक्त असलेले वृक्ष वाऱ्यानें हालणाऱ्या आपल्या कोमल अशा ताम्रवर्ण पल्लवांनीं त्याला अरण्याचे ठिकाणीं बोलावीत आहेत कीं काय असें भासलें ८. ज्यांनीं आपले हस्त जोडिले आहेत, मत्त झालेल्या भ्रमरांनीं ज्या सेवित आहेत व ज्यांना तीर्थें व वनें प्रिय आहेत अशा मार्गामध्यें लागलेल्या कमलिनी त्यानें उल्लंघन केल्या ९. नंतर प्रफुल्लित झालेल्या पर्वताच्या शिखराकडे मन आणि दृष्टि वेधून गेलेला आणि द्रौपदीची वाक्यरूपी शिदोरी घेतलेला तो भीमसेन पहिल्यापेक्षां जास्त वेगानें चालूं लागला १०. दिवस कलून गेला असतां हरिणांनीं गजबजून गेलेल्या वनामध्यें सुवर्णाच्या स्वच्छ अशा कमलांनीं परि-

नैर्विमलैः पद्मैर्ददर्श विपुलां नदीम् ११ हंसकारण्डवयुतां चक्रवाकोपशोभिताम् । रचितामिव तस्याद्रेर्मालां विमलपङ्कजाम् १२ तस्यां नद्यां महासत्त्वः सौगन्धिकवनं महत् । अपश्यत्प्रीतिजननं बालार्कसदृशद्युति १३ तद्दृष्ट्वा लब्धकामः स मनसा पाण्डुनन्दनः । वनवासपरिक्लिष्टां जगाम मनसा प्रियाम् १४ [५८४९] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थयात्रायां सौगन्धिकाहरणे द्विपञ्चाशदधिकशततमोऽध्यायः ॥ १५२ ॥

वैशम्पायन उवाच ॥ स गत्वा नलिनीं रम्यां राक्षसैरभिरक्षिताम् । कैलासशिखराभ्याशे ददर्श शुभकाननाम् १ कुबेरभुवनाभ्याशे जातां पर्वतनिर्झरैः । सुरम्यां विपुलच्छायां नानाद्रुमलताकुलाम् २ हरिताम्बुजसंछन्नां दिव्यां कनकपुष्कराम् । नानापक्षिजनाकीर्णां सुपतीर्थामकर्दमाम् ३ अतीव रम्यां सुजलां जातां पर्वतसानुषु । विचित्रभूतां लोकस्य शुभामद्भुतदर्शनाम् ४ तत्रामृतरसं शीतं लघु कुन्तीसुतः

पूर्ण झालेली एक प्रचंड नदी त्यानें अवलोकन केली ११. ती हंस, कारंडव व चक्रवाक पक्ष्यांनीं सुशोभित असून त्या पर्वतानें ती कमलांची स्वच्छ मालाच धारण केली आहे कीं काय अशी दिसत होती १२. त्या नदीमध्यें महासत्वशील भीमसेनानें प्रेम उत्पन्न करणारें व नुकताच उदय पावलेल्या सूर्याप्रमाणें दिसणारें असें एक मोठें सौगंधिक नांवाचें वन अवलोकन केलें १३. तें अवलोकन करितांक्षणीं पांडुनंदन भीमसेनाला "मी कृतकृत्य झालों" असें वाटून वनवाससंबंधीं क्लेशांनीं पीडित झालेल्या प्रिया द्रौपदीचें मनामध्यें एकाएकीं स्मरण झालें १४. ह्याप्रमाणें • वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं सौगंधिकाहरणाविषयीं एकशें बावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ १५२ ॥

वैशंपायन सांगतातः—तेथें गेल्यानंतर राक्षसांनीं रक्षण केलेलें, कैलासाच्या शिखराजवळ असलेलें व उत्कृष्ट प्रकारच्या वनांनीं शोभित झालेलें असें एक कमलांनीं युक्त असलेलें सरोवर त्याच्या दृष्टीं पडलें १. तें कुबेराच्या घराजवळ असून पर्वतावरून खालीं वहात येणाऱ्या झऱ्यांचें झालेलें होतें. त्याच्या सभोंवतीं नानाप्रकारचे वृक्ष आणि लता ह्यांची विपुल छाया पडल्यामुळें तें शोभिवंत दिसत होतें २. तें हिरव्या व सुवर्णासारिख्या रंगांच्या कमलांनीं आच्छादिलेलें असून नानाप्रकारच्या पक्षिगणांनीं व्याप्त, कर्दमरहित, दिव्य आणि तीर्थांनीं वेष्टित असें होतें ३. पर्वतसंबंधीं शिखरांवरून खालीं येणारें उत्कृष्ट जल त्यामध्यें असून तें अवलोकन करणाऱ्या लोकांना विचित्र आणि शुभ असें भासत होतें ४. त्याचें अमृतासारखें मधुर, शीतल, शुभ आणि स्वच्छ

शुभम् । ददर्श विमलं तोयं पिबंश्च बहु पाण्डवः ५ तां तु पुष्करिणीं रम्यां दिव्यसौगन्धिकावृताम् । जातरूपमयैः पद्मैश्छन्नां परमगन्धिभिः ६ वैदूर्यवरनालैश्च बहुचित्रैर्मनोरमैः । हंसकारण्डवोद्धूतैः सृजद्भिरमलं रजः ७ आक्रीडं राजराजस्य कुबेरस्य महात्मनः । गन्धर्वैरप्सरोभिश्च देवैश्च परमार्चिताम् ८ सेवितामृषिभिर्दिव्यैर्यक्षैः किंपुरुषैस्तथा । राक्षसैः किंनरैश्चापि गुप्तां वैश्रवणेन च ९ तां च दृष्ट्वैव कौन्तेयो भीमसेनो महाबलः । बभूव परमप्रीतो दिव्यं संप्रेक्ष्य तत्सरः १० तच्च क्रोधवशा नाम राक्षसा राजशासनात् । रक्षन्ति शतसाहस्राश्चित्रायुधपरिच्छदाः ११ ते तु दृष्ट्वैव कौन्तेयमजिनैः प्रतिवासितम् । रुक्माङ्गदधरं वीरं भीमं भीमपराक्रमम् १२ सायुधं बद्धनिस्त्रिंशमशंकितमरिन्दमम् । पुष्करेप्सुमुपायान्तमन्योन्यमभिचुक्रुशुः १३ अयं पुरुषशार्दूलः सायुधोऽजिनसंवृतः । यच्चिकीर्षुरिह प्राप्तस्तत्संप्रष्टुमिहार्हथ १४ ततः सर्वे महाबाहुं समासाद्य वृकोदरम् । तेजोयुक्तमपृच्छन्त कस्त्वमाख्यातुमर्हसि १५ मुनिवेषधरश्चैव

असें उदक कुंतीपुत्र भीमसेनानें अवलोकन करून तें त्या पांडुपुत्रानें यथेच्छ प्राशन केलें ५. दिव्य सौगंधिक वनानें परिवेष्टित असें तें रम्य सरोवर अत्यंत सुगंधि आणि सुवर्णमय कमलांनीं आच्छादित झालेलें होतें ६. ज्यांतील कमलाला वैदूर्यमण्याचे देंठ होते व जें चित्रविचित्र व मनोहर अशा हंस व कारंडव पक्ष्यांनीं उडवलेल्या स्वच्छ कमलपरागानें आच्छादित झालेलें होतें ७ तें राजाधिराज महात्म्या कुबेराचें क्रीडास्थान असून गंधर्व, अप्सरा व देवता ह्यांनीं त्याचें अर्चन केलेलें होतें ८. ऋषि, दिव्य यक्ष, किंपुरुष, राक्षस व त्याचप्रमाणें किन्नर ह्यांनीं तें सेवित असून वैश्रवणानें त्याचें रक्षण केलेलें होतें ९. अशाप्रकारचें तें दिव्य सरोवर कुंतीपुत्र महाबलाढ्य भीमसेनानें अवलोकन करून तो अत्यंत आनंदित झाला १०. हे राजा, त्या ठिकाणीं क्रोधवश नांवाचे एक लक्ष राक्षस नानाप्रकारचीं आयुधें व कवचें धारण करून राजाच्या आज्ञेवरून त्या सरोवराचें रक्षण करीत होते ११. वल्कलें परिधान केलेल्या व सोन्याचीं बाहुभूषणें धारण केलेल्या, भीमपराक्रमी, हातामध्यें आयुधें घेतलेल्या, कवच घातलेल्या व शत्रुदमन करणाऱ्या अशा निःशंक कुंतीपुत्र वीर भीमसेनाला पुष्पें आणण्याकरितां आलेला अवलोकन करून ते एकमेकांशीं बोलूं लागले १२,१३. (ते ह्मणाले) " हा अजिनें परिधान केलेला पुरुषश्रेष्ठ आयुधें घेऊन येथें काय करण्याकरितां प्राप्त झाला आहे तें आपण सर्वांनीं त्याला विचारावें " १४. हें ऐकून ते सर्व तेजानें युक्त असलेल्या आजानुबाहु वृकोदर भीमसेनाकडे आले आणि " तूं कोण

सायुधश्चैव लक्ष्यसे । यदर्थमभिसंप्राप्तस्तदाचक्ष्व महामते १६ [५८६५]
इति श्रीमहाभारते०भारण्यके पर्वाणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थयात्रायां सौगान्धिकाहरणे त्रिपञ्चाशदधिकशततमोध्यायः ॥ १५३ ॥

भीम उवाच ॥ पाण्डवो भीमसेनोहं धर्मराजादनन्तरः । विशालां बदरीं प्राप्तो भ्रातृभिः सह राक्षसाः १ अपश्यचत्र पाञ्चाली सौगन्धिकमनुत्तमम् । अनिलोढमितो नूनं सा बहूनि परीप्सति २ तस्या मामनवद्याङ्ग्या धर्मपत्न्याः प्रिये स्थितम् । पुष्पाहारमिह प्राप्तं निबोधत निशाचराः ३ राक्षसा ऊचुः ॥ आक्रीडोयं कुबेरस्य दयितः पुरुषर्षभ । नेह शक्यं मनुष्येण विहर्तुं मर्त्यधर्मणा ४ देवर्षयस्तथा यक्षा देवाश्चात्र वृकोदर । आमन्त्र्य यक्षप्रवरं पिबन्ति रमयन्ति च । गन्धर्वाप्सरसश्चैव विहरन्त्यत्र पाण्डव ५ अन्यायेनेह यः कश्चिदवमन्य धनेश्वरम् । विहर्तुमिच्छेद्दुर्वृत्तः स विनश्येन्न संशयः ६ तमनादृत्य पद्मानि जिहीर्षसि बला-

---

आहेस हें आह्मांला सांग " असें त्याला विचारूं लागले १५. (आणखी ते ह्मणाले) " हे महाविचारी पुरुषा, तुझा वेष मुनीसारिखा असून तूं आयुधें धारण केलीं आहेस. तस्मात्, तूं ज्याकरितां येथें आला आहेस तें आह्मांला कथन कर " १६. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं सौगंधिकाहरणाविषयीं एकशें त्रेपन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ १५३ ॥

भीमसेन ह्मणतोः—हे राक्षसहो, मी धर्मराजाच्या मागून झालेला भीमसेन नांवाचा पांडुतनय आहें. मी आपल्या भ्रात्यांसहवर्तमान (वनामध्यें फिरत फिरत) बदरिकाश्रमाला प्राप्त झालों १. तेथें वाऱ्यानें वाहून आणिलेलें सौगंधिकसंज्ञक एक उत्कृष्ट कमल पांचालराजकन्या द्रौपदीनें अवलोकन केलें व ह्याप्रमाणेंच आणखी पुष्कळ कमलें आपणाला असावीं अशी तिला इच्छा उत्पन्न झाली २. हे निशाचरहो, त्या सुंदर अंगांनीं युक्त असलेल्या धर्मपत्नी द्रौपदीचें प्रिय करण्याविषयीं तयार असलेला मी तीं पुष्पें नेण्याकरितां येथें आलों आहें असें आपण समजा ३. राक्षस ह्मणतातः—हे पुरुषश्रेष्ठा, मरणधर्मी मनुष्यानें येथें विहार करणें शक्य नाहीं. कारण, हें कुबेराला अत्यंत प्रिय असलेलें त्याचें क्रीडास्थान आहे ४. हे वृकोदरा, देवर्षि, यक्ष त्याचप्रमाणें देवही यक्षश्रेष्ठ कुबेराला विचारूनच येथें क्रीडा करीत असतात व ह्या सरोवराचें उदक प्राशन करितात. तसेच गंधर्व व अप्सरा ह्याही येथें क्रीडा करीत असतात ५. दुष्ट वर्तन करणारा जो कोणी पुरुष अन्यायानें धनेश्वर कुबेराचा अवमान करून येथें विहार करण्याची इच्छा करितो त्याचा निःसंशय नाश होतो ६. आतां

हृतः । धर्मराजस्य चात्मानं ब्रवीषि भ्रातरं कथम् ७ आमन्त्र्य यक्षराजं वै ततः पिब हरस्व च । नातोन्यथा त्वया शक्यं किंचित्पुष्करमीक्षितुम् ८ भीमसेन उवाच ॥ राक्षसास्तं न पश्यामि धनेश्वरमिहान्तिके । दृष्ट्वापि च महाराजं नाहं याचितुमुत्सहे ९ न हि याचन्ति राजान एष धर्मः सनातनः । न चाहं हातुमिच्छामि क्षात्रधर्मं कथञ्चन १० इयं च नलिनी रम्या जाता पर्वतनिर्झरैः । नेयं भवनमासाद्य कुबेरस्य महात्मनः ११ तुल्या हि सर्वभूतानामियं वैश्रवणस्य च । एवं गतेषु द्रव्येषु कः कं याचितुमर्हति १२ वैशम्पायन उवाच ॥ इत्युक्त्वा राक्षसान्सर्वान्भीमसेनो ह्यमर्षणः । व्यगाहत महाबाहुर्नलिनीं तां महाबलः १३ ततः स राक्षसैर्वाचा प्रतिषिद्धः प्रतापवान् । मामैवमिति सक्रोधैर्भर्त्सयद्भिः समन्ततः १४ कदर्थीकृत्य तु स तान्राक्षसान्भीमविक्रमः । व्यगाहत महातेजास्ते तं सर्वे न्यवारयन् १५ गृह्णीत बध्नीत निकृन्ततेमं पचाम खादाम च भीम-

---

तूं " मी धर्मराजाचा बंधु आहें " असें ह्मणत असून आपल्या शक्तीच्या जोरावर (अन्यायानें) कुबेराचा अनादर करून कमलें हरण करीत आहेस हें कमें ? ७. ह्यास्तव. हे भीमसेना, यक्षराज कुबेराला विचारून नतर तूं खुशाल ह्या उदकाचें प्राशन कर आणि कमलेंही ने; त्याच्या आज्ञेवाचून मात्र तुला एकाद्या सुद्धां कमलाकडे अवलोकन करितां यावयाचें नाहीं ८. भीमसेन ह्मणतो:—हे राक्षसहो, तो धनेश्वर कुबेर जवळ आहे असें मला वाटत नाहीं. कदाचित् जरी त्याची माझी गांठ पडली तथापि " हे महाराजा, तूं मला कमले दे " अशी याचना करण्यास मात्र मी प्रवृत्त होणार नाही ९ राजे लोकांनीं याचना करूं नये हा त्यांचा सनातन धर्म आहे आणि तो मी केव्हांही सोडण्याविषयीं इच्छा करीत नाहीं १०. हें रम्य सरोवर ह्या पर्वतावरील झऱ्यांच्या योगानें बनलेलें असून तें महात्म्या कुबेराच्या घराजवळचेंही नाहीं ११. ह्यास्तव, कुबेर आणि सर्व प्राणी ह्यांची ह्या सरोवराचे ठिकाणी सारखीच सत्ता आहे ह्मणून असल्या ह्या गोष्टीविषयीं कोणी कोणाची याचना करावी ? १२. वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें त्या सर्व राक्षसांशीं, ज्याच्या जवळही जाणें अशक्य आहे अशा महाबलाढ्य भीमसेनानें भाषण केल्यावर तो आजानुबाहु भीमसेन त्या सरोवरामध्यें प्रविष्ट होऊन स्नान करू लागला १३. तेव्हां क्रुद्ध होऊन निर्भर्त्सना करणाऱ्या राक्षसांनीं आपल्या मुखानें " असें करू नको; असें करू नको " असें सभोंवतालच्या प्रदेशावर उभे राहून, प्रतापी भीमसेनाला सांगितलें असतांही त्या भीमपराक्रमी व महातेजस्वी भीमसेनानें त्या सर्व राक्षसांचा तिरस्कार करून स्नान करण्यास आरंभ केला.

सेनम् । क्रुद्धा ब्रुवन्तोभिययुर्द्रुतं ते शस्त्राणि चोद्यम्य विवृत्तनेत्राः १६
ततः स गुर्वीं यमदण्डकल्पां महागदां काञ्चनपट्टनद्धाम् । प्रगृह्य तान-
भ्यपतत्तरस्वी ततोऽब्रवीत्तिष्ठत तिष्ठतेति १७ ते तं तदा तोमरपट्टिशा-
द्यैर्व्याविद्धशस्त्रैः सहसा निपेतुः । जिघांसवः क्रोधवशाः सुभीमा भीमं
समन्तात्परिवव्रुरुग्राः १८ वातेन कुन्त्यां बलवान्सुजातः शूरस्तरस्वी
द्विषतां निहन्ता । सत्ये च धर्मे च रतः स चैव पराक्रमे शत्रुभिरप्र-
धृष्यः १९ तेषां स मार्गान्विविधान्महात्मा विहन्य शस्त्राणि च शात्र-
वाणाम् । यथा प्रवीरान्निजघान भीमः परं शतं पुष्करिणीसमीपे २० ते
तस्य वीर्यं च बलं च दृष्ट्वा विद्याबलं बाहुबलं तथैव । अशक्नुवन्तः स
हितं समंताद्द्रुतं प्रवीराः सहसा निवृत्ताः २१ विदीर्यमाणस्तत एव हन्तु-
माकाशमास्थाय विमूढसंज्ञाः । कैलासशृङ्गाण्यभिदुद्रुवुस्ते भीमार्दिताः
क्रोधवशाः प्रभग्नाः २२ स शक्रवद्दानवदैत्यसंघान्विक्रम्य जित्वा च रणे-

---

तेव्हां त्या राक्षसांनीं त्याचें निवारण केलें १५ आणि " धरा, बांधा, कापा, अरे, ह्या भीमसेनाला शिजवून खा " अशा प्रकारचें भाषण करीत करीत क्रुद्ध झालेले ते राक्षस हातांतील शस्त्रें उगारून आणि डोळे वटारून त्याजकडे धांवले १६ तेव्हां जड असलेली, यमाच्या दंडासारिखी व सोन्याच्या पट्ट्या बसविलेली अशी एक अतिशय मोठी गदा घेऊन तो वेगवान् भीमसेन त्यांजकडे धांवला आणि " उभे रहा, उभे रहा" असें म्हणत असतां १७ ते अत्यंत भयकर मुद्रा धारण करणारे व प्राण्यांचा नाश करणारे क्रोधवश नांवाचे उग्र राक्षस तोमर व पट्टिशप्रभृति वध करणारीं शस्त्रें हस्तामध्यें धारण करून एकाएकीं त्याजकडे आले आणि त्याला गराडा देऊन उभे राहिले १८. तो भीमसेन वायूपासून कुंतीचे ठिकाणीं उत्पन्न झाला असून शूर, वेगवान् , शत्रूचा नाश करणारा, सत्य व धर्म ह्यांचे ठिकाणीं रत आणि पराक्रमामध्यें शत्रूला हार न जाणारा असा होता १९. त्या आपल्या शत्रूंचे नानाप्रकारचे बाण आणि निरनिराळीं शस्त्रें त्या महात्म्या भीमसेनानें तोडून टाकून त्याच पुष्करणीच्या समीप शंभर राक्षसांना त्यानें मारून टाकिले २०. तेव्हां त्या राक्षसांनीं त्याचा पराक्रम, बल, विद्येचें सामर्थ्य आणि त्याचप्रमाणें बाहूंची शक्ति हीं अवलोकन करून त्याच्या बरोबर युद्ध करण्यास असमर्थ झाल्यामुळें एकाएकीं ते सर्व राक्षस आसमंताद्भागीं पळून जाऊं लागले २१; कित्येक बेशुद्ध झालेले आणि बाणांच्या योगानें शरीरें विदीर्ण झालेले राक्षस आकाशामध्यें जाऊन तेथून त्याला प्रहार करूं लागले आणि कित्येक हात पाय तुटून भीमाला भ्याल्यामुळें कैलासपर्वताच्या शिखराकडे पळून गेले २२ सारांश, इंद्र ज्याप्रमाणें

रिसंघान् । विगाह्य तां पुष्करिणीं जितारिः कामाय जग्राह ततोम्बुजानि २३ ततः स पीत्वामृतकल्पमम्भो भूयो बभूवोत्तमवीर्यतेजाः । उत्पाट्य जग्राह च सोंबुजानि सौगन्धिकान्युत्तमगन्धवन्ति २४ ततस्तु ते क्रोधवशाः समेत्य धनेश्वरं भीमबलप्रणुन्नाः । भीमस्य वीर्यं च बलं च संख्ये यथावदाचख्युरतीव भीताः २५ तेषां वचस्तत्तु निशम्य देवः प्रहस्य रक्षांसि ततोभ्युवाच । गृह्णातु भीमो जलजानि कामात्कृष्णानिमित्तं विदितं ममैतत् २६ ततोभ्यनुज्ञाप्य धनेश्वरं ते जग्मुः कुरूणां प्रवरं विरोषाः । भीमं च तस्यां ददृशुर्नलिन्यां यथोपजोषं विहरन्तमेकम् २७ [५८९२] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लो॰यात्रायां सौगन्धिकाहरणे चतुष्पञ्चाशदधिकशततमोध्यायः ॥१५४॥

वैशम्पायन उवाच ॥ ततस्तानि महार्हाणि दिव्यानि भरतर्षभ । बहूनि बहुरूपाणि विरजांसि समाददे १ ततो वायुर्महाञ्शीघ्रो नीचैः शर्कर-

---

दैत्य व दानव ह्यांच्या समुदायांचा नाश करितो त्याप्रमाणें त्या भीमसेनानें आपल्या पराक्रमानें रणांगणामध्यें शत्रुसमुदायांना जिंकिलें व नंतर शत्रूंना जिंकून टाकिलेल्या त्या भीमसेनानें त्या सरोवरामध्यें स्नान करून यथेच्छ कमलें तोडिलीं २३. तदनंतर अमृताप्रमाणें मधुर असलेल्या त्या उदकाचें प्राशन केल्यावर पुनरपि तो भीमसेन उत्कृष्ट वीर्य व तेज ह्यांनीं युक्त झाला आणि उत्कृष्ट सुगंध असलेलीं तीं सौगंधक संज्ञक कमलें त्यानें उपटून घेतलीं २४. तेव्हां भीमसेनाच्या बलानें त्रस्त झालेले ते क्रोधवश राक्षस अत्यंत भयभीत झाल्यामुळें एकत्र जुळून धनेश्वर कुबेराकडे आले आणि त्याला रणांगणामध्यें भीमसेनानें केलेला पराक्रम व शौर्य हीं कथन केलीं २५. धनेश्वर कुबेर, त्यांनीं सांगितलेले तें सर्व श्रवण केल्यावर, हंसला आणि त्या सर्व राक्षसांना ह्मणाला "हे राक्षसहो, द्रौपदीकरितां भीमसेन वाटेल तितकीं कमलें खुशाल घेवो; अहो, ही गोष्ट मला पूर्वींच समजली आहे" २६. असो. ह्याप्रमाणें कुबेराला कळवून क्रोधरहित झालेले ते राक्षस कुरुश्रेष्ठ भीमसेनाकडे प्राप्त झाले आणि तो एकटाच त्या सरोवरामध्यें खुशाल क्रीडा करीत आहे असें अवलोकन केलें २७. ह्याप्रमाणें० महाभारतांतर्गत वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं सौगंधिकाहरणाविषयीं एकशें चोपन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ १५४ ॥

वैशंपायन सांगतात:—तदनंतर, हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, मौल्यवान्, दिव्य, निरनिराळ्या आकाराचीं व स्वच्छ अशीं कमलें त्या भीमसेनानें घेतलीं १. इकडे धर्मप्रभृति मंडळी ज्या ठिकाणीं बसली होती त्या ठिकाणीं आपल्या-

कर्षणः । प्रादुरासीत्खरस्पर्शः संग्राममभिचोदयन् २ पपात महती चोल्का सनिर्घाता महाभया । निष्प्रभश्चाभवत्सूर्यश्छन्नरश्मिस्ततोवृतः ३ निर्घातश्चाभवद्भीमो भीमे विक्रममास्थिते । चचाल पृथिवीचापि पांसुवर्षं पपात च ४ सलोहितादिशश्चासन्खरवाचो मृगद्विजाः । तमोवृतमभूत्सर्वं न प्राज्ञायत किञ्चन ५ अन्ये च बहवो भीमा उत्पातास्तत्र जज्ञिरे । तदद्भुतमभिप्रेक्ष्य धर्मपुत्रो युधिष्ठिरः ६ उवाच वदतां श्रेष्ठः कोस्मानभिभविष्यति । सज्जीभवत भद्रं वः पाण्डवा युद्धदुर्मदाः ७ यथारूपाणि पश्यामि स्वभ्यग्रो नः पराक्रमः । एवमुक्त्वा ततो राजा वीक्षां चक्रे समंततः ८ अपश्यमानो भीमं तु धर्मपुत्रो युधिष्ठिरः । ततः कृष्णां यमौ चापि समीपस्थावरिन्दमः ९ पप्रच्छ भ्रातरं भीमं भीमकर्माणमाहवे । कच्चित्र भीमः पाञ्चालि किञ्चित्कृत्यं चिकीर्षति १० कृतवानपि वा वीरः साहसं साहसप्रियः । इमे ह्यकस्मादुत्पाता महासमरदर्शनाः । दर्शयन्तो भयं तीव्रं प्रादुर्भूताः समंततः ११ तं तथावादिनं कृष्णा प्रत्युवाच मनस्विनी । प्रिया

बरोबर वाळू वाहून आणणारा, अतिशय शीघ्र गमन करणारा, अंगाला झोंबणारा आणि संग्रामसूचक असा प्रचंड वारा सुटला २; कडकडाट होऊन भय उत्पन्न करणारी अशी वीज पडली; सूर्य निस्तेज होऊन ढगांच्या योगानें त्याचीं किरणें आच्छादित झालीं ३; भीम पराक्रम करीत असतांना भयंकर मेघगर्जना होऊन पृथ्वी कापूं लागली; धुळीचा पाऊस पडूं लागला ४; दशदिशा आरक्तवर्ण होऊन मृग व पक्षी भयंकर शब्द करूं लागले; जिकडे तिकडे अंधेर झाल्यामुळें कांहींएक दिसेनासें झालें ५ आणि ह्याशिवायही शेंकडों उत्पात होऊं लागले. तेव्हां भाषण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ असलेल्या धर्मपुत्र युधिष्ठिरानें तो अद्भुत चमत्कार अवलोकन करून भाषण केलें कीं, " आतां आमच्यावर कोण शत्रु चालून येणार आहे ? युद्ध करण्याची रग असलेल्या हे पांडुपुत्रहो, तुमचें कल्याण असो; तुह्मी आतां युद्ध करण्याला तयार व्हा ६, ७. तुमचा पराक्रम दृष्टीं पडण्याचा काल आतां अगदीं जवळ आला आहे. " असें भाषण करून तो धर्मराज आसमंतात्भागीं अवलोकन करूं लागला असतां ८ भीमसेन दृष्टीं न पडल्यामुळें शत्रुदमन करणारा धर्मपुत्र युधिष्ठिर जवळ बसलेल्या नकुल सहदेव आणि द्रौपदी ह्यांना ह्मणाला ९ " हे पांचालि, रणांगणामध्यें भयंकर कर्म करणारा भीमसेन कोठें आहे व काय करण्याकरितां तो येथून गेला आहे? १० ज्याअर्थी अकस्मात हे रणकंदनप्रदर्शक उत्पात होत आहेत त्याअर्थी साहस करणें ज्याला प्रिय आहे अशा भीमसेनानें कांहीं तरी साहस केलें असावें व त्याचें दर्शक हे पहा पुनरपि

प्रियं चिकीर्षन्ती महिषी चारुहासिनी १२ द्रौपद्युवाच ॥ यत्तत्सौगन्धिकं राजन्नाहृतं मातरिश्वना । तन्मया भीमसेनस्य प्रीतयाद्योपपादितम् १३ अपि चोक्तो मया वीरो यदि पश्येर्बहून्यपि । तानि सर्वाण्युपादाय शीघ्रमागम्यतामिति १४ स तु नूनं महाबाहुः प्रियार्थं मम पाण्डवः । प्रागुदीचीं दिशं राजंस्तान्याहर्तुमितो गतः १५ उक्तस्त्वेवं तया राजा यमाविदमथाब्रवीत् । गच्छाम सहितास्तूर्णं येन यातो वृकोदरः १६ वहन्तु राक्षसा विप्रान्यथाश्रान्तान्यथाकृशान् । त्वमप्यमरसंकाश वह कृष्णां घटोत्कच १७ व्यक्तं दूरमितो भीमः प्रविष्ट इति मे मतिः । चिरं च तस्य कालोऽयं स च वायुसमो जवे १८ तरस्वी वैनतेयस्य सदृशो भुवि लङ्घने । उत्पतेदपि चाकाशं निपतेच्च यथेच्छकम् १९ तमन्वियाम भवतां प्रभावाद्रजनीचराः । पुरा स नापराध्नोति सिद्धानां ब्रह्मवादिनाम् २० तथेत्युक्त्वा तु ते सर्वे हैडिम्बप्रमुखास्तदा ।

मोठमोठे उत्पात होत आहेत " ११. ह्याप्रमाणें भाषण करणाऱ्या धर्मराजाला सुहास्यवदना, विचारी व प्रिय करण्याची इच्छा करणारी राज्ञी द्रौपदी ह्मणाली १२ " हे राजा, वाऱ्यानें वाहून आलेलें एक सौगंधिक नांवाचें कमल मीं मोठ्या आनंदानें भीमसेनाच्या हवाली केले १३ आणि त्या वीर भीमसेनाला 'असलीं सुवर्णासारखीं पुष्कळ कमलें मला अवलोकन करण्याकरितां सत्वर आणा ' असें ह्मणालें १४. त्यावरून तो आजानुबाहु पांडुपुत्र भीमसेन माझें प्रिय करण्याच्या इच्छेनें, हे राजा, बहुतकरून तीच कमलें आणण्याकरितां ईशान्यदिशेस गेला असावा " १५. हें तिचें वाक्य श्रवण केल्यावर धर्मराज नकुल सहदेवांना ह्मणाला " हे नकुलसहदेवहो, आपण सर्व एकत्र होऊन ज्या मार्गानें वृकोदर गेला त्याच मार्गाला जाऊं १६. हे देवाप्रमाणें कांति असलेल्या घटोत्कचा, कृष आणि दमलेल्या अशा ब्राह्मणांना राक्षसांनीं आपल्या खांद्यावर घ्यावें आणि तूं ह्या कृष्णेला आपल्या खांद्यावर घे १७. मला वाटतें वायूसारिख्या वेगवान् भीमसेनाला जाऊन बराच वेळ झाल्यामुळें आतां तो खरोखर पुष्कळ दूर गेला असेल १८. ह्या पृथ्वीतलावर जो गरुडाप्रमाणें शीघ्रगामी आणि उड्डाण करणारा असून त्याच्या मनांत आलें तर आकाशांत सुद्धां तो उड्डाण करील आणि पुनरपि खालीं उतरेल १९. हे रात्रिंचरहो, तुमच्याच प्रभावानें आह्मी त्याच्या मागून जाऊं. पूर्वीं त्यानें कधींही सिद्ध किंवा ब्रह्मवेत्ते यांचा अवमान केलेला नाहीं " २०. ह्याप्रमाणें धर्मराजानें सांगितल्यानंतर, हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, कुबेराचें सरोवर ज्या ठिकाणीं आहे तें ठिकाण जाणणाऱ्या त्या घटोत्कच-

उद्वेगज्ञाः कुबेरस्य नलिन्या भरतर्षभ २१ आदाय पांडवांश्चैव तांश्च विप्राननेकशः । लोमशेनैव सहिताः प्रययुः प्रीतमानसाः २२ ते सर्वे त्वरिता गत्वा ददृशुः शुभकाननाम् । पद्मसौगन्धिकवतीं नलिनीं सुमनोरमाम् २३ तं च भीमं महात्मानं तस्यास्तीरे मनस्विनम् । ददृशुर्निहतांश्चैव यक्षांश्च विपुलेक्षणान् २४ भिन्नकायाक्षिबाहूरून्संचूर्णितशिरोधरान् । तं च भीमं महात्मानं तस्यास्तीरे व्यवस्थितम् २५ सक्रोधं स्तब्धनयनं संदष्टदशनच्छदम् । उद्यम्य च गदां दोर्भ्यां नदीतीरेष्ववस्थितम् २६ प्रजासंक्षेपसमये दण्डहस्तमिवान्तकम् । तं दृष्ट्वा धर्मराजस्तु परिष्वज्य पुनः पुनः २७ उवाच श्लक्ष्णया वाचा कौन्तेय किमिदं कृतम् । साहसं बत भद्रं ते देवानामथचाप्रियम् २८ पुनरेवं न कर्तव्यं मम चेदिच्छसि प्रियम् । अनुशिष्य तु कौन्तेयं पद्मानि परिगृह्य च २९ तस्यामेव नलिन्यां तु विजह्रुरमरोपमाः । एतस्मिन्नेव काले तु प्रगृहीतशिलायुधाः ३० प्रादुरासन्महाकायास्तस्योद्यानस्य रक्षिणः । ते दृष्ट्वा

प्रभृति सर्व राक्षसांनी "बरं" असें ह्मणून २१ पांडवांना व शेंकडों ब्राह्मणांना घेऊन लोमशांसहवर्तमान मोठ्या आनंदानें ते मार्गक्रमण करूं लागले असतां २२ लवकरच उत्कृष्ट अरण्यानें युक्त, सौगंधिक कमलांनीं भरलेली व परम सुंदर अशी ती नलिनी त्यांनीं अवलोकन केली २३ आणि तिच्या तीरावर मोठा विचारी व महात्मा असा भीमसेन बसलेला असून शरीरें, डोळे, बाहु व मांड्या छिन्नभिन्न झालेले, मस्तकें चूर्ण झालेले व त्यामुळें मृत होऊन पडलेले असे विशालनयन शेंकडों यक्षही त्यांच्या दृष्टीं पडले २४, २५. तो भीमसेन परम क्रुद्ध झाल्यामुळें दांत ओंठ चावीत असलेला व आपल्या बाहूंच्या योगानें गदा उचलून त्या नलिनीच्या तटाकावर बसलेला असा त्यांच्या दृष्टीं पडला २६. प्रलयकालीं हातांत दंड घेतलेल्या यमाप्रमाणेंच दिसत असलेल्या अशा त्या भीमसेनाला अवलोकन करून धर्मराजानें त्याला वरचेवर वरचेवर आलिंगन दिलें २७ आणि मधुर वाणीच्या योगेंकरून तो ह्मणाला "तुझें देव बरें करो, बा कुंतीपुत्रा, हें तूं काय केलेंस ? ह्यापासून देवांना कधींही बरें वाटावयाचें नाहीं २८. असो. आतां माझें प्रिय करावें अशी जर तुझी इच्छा असेल तर असें पुन्हां करूं नकोस." ह्याप्रमाणें कुंतिपुत्र भीमसेनाला उपदेश केल्यावर धर्मराजानें तीं कमलें घेतलीं २९ आणि देवासारिखे असलेले ते पांडव त्याच सरोवरामध्यें जलक्रीडा करूं लागतात न लागतात तोंच हातामध्यें शिला हींच आयुधें घेतलेले ३० व मोठमोठालीं शरीरें असलेले त्या वनाचें रक्षण करणारे त्या ठिकाणीं प्राप्त झाले आणि

धर्मराजानं महर्षि चापि लोमशम् ३१ नकुलं सहदेवं च तथान्यान्ब्राह्म-
णर्षभान् । विनयेन नताः सर्वे प्रणिपत्य च भारत ३२ सांत्विता धर्म-
राजेन प्रसेदुः क्षणदाचराः । विदिताश्च कुबेरस्य तत्र ते कुरुपुङ्गवाः ३३
ऊषुर्नाति चिरं कालं रममाणाः कुरूद्वहाः । प्रतीक्षमाणा बीभत्सुं गन्ध-
मादनसानुषु ३४ [५९२६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहि-
तायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थयात्रायां
सौगन्धिकाहरणे पञ्चपञ्चाशदधिकशततमोऽध्यायः ॥ १५५ ॥

वैशंपायन उवाच ॥ तस्मिन्निवसमानेऽथ धर्मराजो युधिष्ठिरः । कृष्ण-
या सहितान्भ्रातॄनित्युवाच सह द्विजान् १ दृष्टानि तीर्थान्यस्माभिः पुण्यानि
च शिवानि च । मनमोह्लादनीयानि वनानि च पृथक्पृथक् २ देवैः पूर्वं
विचीर्णानि मुनिभिश्च महात्मभिः । यथाक्रमविशेषेण द्विजैः संपूजि-
तानि च ३ ऋषीणां पूर्वचरितं तथा कर्मविचेष्टितम् । राजर्षीणां च
चरितं कथाश्च विविधाः शुभाः ४ शृण्वानास्तत्र तत्र स्म आश्रमेषु शिवेषु
च । अभिषेकं द्विजैः सार्धं कृतवन्तो विशेषतः ५ अर्चिताः सततं देवाः

त्यांनीं धर्मराज, महर्षि लोमश ३१, नकुल सहदेव व आणखीही दुसरे श्रेष्ठ श्रेष्ठ ब्राह्मण ह्यांस अवलोकन करून अत्यंत नम्रतापूर्वक, हे भरतकुलोत्पन्ना, त्या सर्वांना नमस्कार केला ३२. नंतर धर्मराजांनीं त्यांचें स्तवन केलें असतां ते रात्रिंचर प्रसन्न होऊन त्यांनीं हे कुरुश्रेष्ठ पांडव तेथें प्राप्त झाल्याचें कुबेराला निवेदन केलें ३३. गंधमादन पर्वताच्या शिखरावर अर्जुनाची मार्गप्रतीक्षा करीत असलेले कुरुश्रेष्ठ धर्मप्रभृति पांडव मोठ्या आनंदानें थोडकेच दिवस तेथें रहाते झाले ३४. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वांपैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं सौगंधिकाच्या हरणाविषयीं एकशें पंचावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ १५५ ॥

वैशंपायन सांगतातः—युधिष्ठिर धर्मराज तेथें वास्तव्य करीत असतांना तो ब्राह्मण व द्रौपदी ह्यांसहवर्तमान आपल्या बंधूंना ह्मणाला १ " आपण पुण्यकारक, कल्याण करणारीं, व मनाला आनंद देणारीं अशीं निरनिराळीं तीर्थें व वनें अवलोकन केलीं आहेत २. हीं तीर्थें पूर्वी देव, महात्मे मुनि व विशेषेंकरून ब्राह्मण ह्यांनीं क्रमाक्रमानें पूजन करून अवलोकन केलेलीं आहेत ३; (ह्या ठिकाणीं) ऋषींनीं पूर्वी केलेलीं चरित्रें, त्यांचीं कर्मे, राजर्षींचे वर्तनक्रम, व त्यांच्या शुभकारक नानाप्रकारच्या कथा श्रवण करीत करीत आणि कल्याणप्रद अशा आश्रमांत ब्राह्मणांसहवर्तमान स्नानें करीत करीत आपण प्राप्त झालों आहोंत ५. आपण पुष्पें, उदक ह्यांच्या योगेंकरून निरंतर देवांचें पूजन करून

पुष्पैरद्भिः सदा च वः । यथा लब्धैर्मूलफलैः पितरश्चापि तर्पिताः ६
पर्वतेषु च रम्येषु सर्वेषु च सरस्सु च । उदधौ च महापुण्ये सुपस्पृष्टं
महात्मभिः ७ इला सरस्वती सिंधुर्यमुना नर्मदा तथा । नाना तीर्थेषु
रम्येषु सुपस्पृष्टं सह द्विजैः ८ गङ्गाद्वारमतिक्रम्य बहवः पर्वताः शुभाः ।
हिमवान्पर्वतश्चैव नानाद्विजगणायुतः ९ विशाला बदरी दृष्टा नरनाराय-
णाश्रमः । दिव्य पुष्करिणी दृष्टा सिद्धदेवर्षिपूजिता १० यथाक्रमविशे-
षेण सर्वाण्यायतनानि च । दर्शितानि द्विजश्रेष्ठा लोमशेन महात्मना ११
इमं वैश्रवणावासं पुण्यं सिद्धनिषेवितम् । कथं भीम गमिष्यामो गति-
रन्तरधीयताम् १२ वैशंपायन उवाच ॥ एवं ब्रुवति राजेन्द्रे वागुवाचा-
शरीरिणी । न शक्यो दुर्गमो गन्तुमितो वैश्रवणाश्रमात् १३ अनेनैव
पथा राजन्प्रतिगच्छ यथागतम् । नरनारायणस्थानं बदरीत्यभिविश्रु-
तम् १४ तस्माद्यास्यसि कौन्तेय सिद्धचारणसेवितम् । बहुपुष्पफलं रम्य-
माश्रमं वृषपर्वणः १५ अतिक्रम्य च तं पार्थ त्वार्ष्टिषेणाश्रमे वसेः । ततो

ज्या ज्या वेळीं जीं जीं कंदमूल मिळालीं त्यांच्या योगानें पितरांना तृप्त केलें आहे ६ आणि रम्य पर्वतावरील सर्व सरोवरांमध्यें व पुण्यकारक समुद्रांमध्यें ह्या महात्म्यासहवर्तमान स्नानें केलीं आहेत ७. इला, सरस्वति, सिंधु, यमुना व त्याचप्रमाणें नर्मदा आणि नानाप्रकारचीं दुसरीही रम्य तीर्थें ह्यांच्या उदकांना ब्राह्मणासहवर्तमान स्पर्श केला आहे ८ व गंगाद्वाराचें अतिक्रमण करून शेंकडों ब्राह्मणांनीं युक्त असा हिमाचल पर्वत व दुसरेही शेकडों शुभ पर्वत ९ विशाल बदरी, नरनारायणांचा आश्रम आणि सिद्ध, देव व ऋषि ह्यांनीं पूजन केलेली दिव्य पुष्करणीही अवलोकन केली आहे १०. हे द्विजश्रेष्ठ हो, ह्या महात्म्या लोमशऋषींनीं आपल्याला सर्व स्थलें क्रमाक्रमानें दाखविलीं आहेत ११. हे भीमसेना, सिद्धांनीं सेवन केलेलें पुण्यकारक असें हें वैश्रवणाचें वसतिस्थान अवलोकन कर. येथें आतां आपणाला कसें जातां येईल ह्याचा विचार कर १२. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें नृपश्रेष्ठ धर्मराज बोलत आहे तोंच आकाशवाणी झाली कीं, " ह्याच्या पलीकडे असलेल्या दुर्गम प्रदेशाचे ठिकाणीं जाण्याला तू समर्थ नाहींस ह्मणून ह्या कुबेराच्या आश्रमापासून १३ ज्या रस्त्यानें आलास त्याच रस्त्यानें नरनारायणांचें वसतिस्थान जो प्रसिद्ध बदरिकाश्रम त्याकडे जा १४. तेथून, हे कुंतीपुत्रा धर्मराजा, सिद्ध व चारण ह्यांनीं सेवित, पुष्पें व फळें ह्यांनीं भरलेल्या वृषपर्व्याच्या रम्य आश्रमाकडे जा १५. हे पृथानंदना, तो ओलांडून जाऊन आर्ष्टिषेणाच्या आश्रमामध्यें रहा व नंतर कुबेराचा आश्रम तूं

द्रक्ष्यसि कौन्तेय निवेशं धनदस्य च १६ एतस्मिन्नन्तरे वायुर्दिव्यगन्धवहः शुचिः । सुखप्रह्लादनः शीतः पुष्पवर्षं ववर्ष च १७ श्रुत्वा तु दिव्यामाकाशाद्वाचं सर्वे विसिस्मियुः । ऋषीणां ब्राह्मणानां च पार्थिवानां विशेषतः १८ श्रुत्वा तन्महदाश्चर्यं द्विजो धौम्योऽब्रवीत्तदा । न शक्यमुत्तरं वक्तुमेवं भवतु भारत १९ ततो युधिष्ठिरो राजा प्रतिजग्राह तद्वचः । प्रत्यागम्य पुनस्तं तु नरनारायणाश्रमम् २० भीमसेनादिभिः सर्वैर्भ्रातृभिः परिवारितः । पांचाल्या ब्राह्मणाश्चैव न्यवसंत सुखं तदा २१ [५९४७]

इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थयात्रायां पुनर्नारायणाश्रमागमने षट्पञ्चाशदधिकशततमोऽध्यायः ॥ १५६ ॥

समाप्तं चेदं तीर्थयात्रापर्व ।

अथ जटासुरवधपर्व । वैशंपायन उवाच ॥ ततस्तान्परिविश्वस्तान्वसतस्तत्र पाण्डवान् । पर्वतेन्द्रे द्विजैः सार्धं पार्थागमनकाङ्क्षया १ गतेषु तेषु रक्षःसु भीमसेनात्मजेऽपि च । रहितान्भीमसेनेन कदाचित्तान्यदृच्छया २ जहार धर्मराजानं यमौ कृष्णां च राक्षसः । ब्राह्मणो मन्त्रकु-

---

अवलोकन कर " १६. ह्याप्रमाणें आकाशवाणी झाल्यावर दिव्य सुगंधाला वाहून आणणारा, शुद्ध व सुख देणारा असा गार वारा सुटला आणि लागलीच पुष्पवृष्टिही झाली १७. ह्याप्रमाणें ती दिव्य आकाशवाणी श्रवण करितांच सर्वांना मोठें कौतुक वाटून ऋषि, ब्राह्मण व विशेषेंकरून पार्थिव १८ याना मोठें आश्चर्य वाटलें. तेव्हा धौम्य ह्मणाले कीं, हे धर्मराजा, ह्यापुढ बोलणें शक्य नसल्यामुळें, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, आकाशवाणीनें सांगितल्याप्रमाणेंच करावें १९. ह्याप्रमाणें धौम्य मुनींचें भाषण श्रवण केल्यानंतर धर्मराजानें " बरें " असें ह्मणून नरनारायणांच्या बदरिकाश्रमाप्रत पुनरपि आगमन केलें २० आणि भीमसेनप्रभृति सर्व भ्रात्यानीं परिवेष्टित झालेला तो धर्मराज पांचालराजतनया द्रौपदी व ब्राह्मण ह्यांसहवर्तमान तेथें सुखानें वास्तव्य करूं लागला २१. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं धर्मराजाचें बदरिकाश्रमामध्यें पुनरपि आगमन झाल्याविषयीं एकशें छप्पन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ १५६ ॥ येथें तीर्थयात्रापर्वही समाप्त झालें.

येथून जटासुरवधपर्वाला आरंभ झाला. वैशंपायन सांगतात:—नंतर त्या श्रेष्ठ पर्वताचे ठिकाणीं अर्जुनाच्या येण्याच्या इच्छेनें ब्राह्मणांसहवर्तमान निर्भय रीतीनें वास्तव्य करणाऱ्या पांडुपुत्रांना १ कोणे एके वेळीं, ते सर्व राक्षस व भीमसेनाचा मुलगा घटोत्कच गेला असतांना व भीमसेनही कोठें गेला असतांना सहज रीतीनें २ एका राक्षसानें द्रौपदी,

शलः सर्वशास्त्रविदुत्तमः ३ इति ब्रुवन्पाण्डवेयान्पर्युपास्ते स्म नित्यदा । परीप्समानः पार्थानां कलापानि धनूंषि च ४ अन्तरं संपरिप्रेप्सुर्द्रौपद्याहरणं प्रति । दुष्टात्मा पापबुद्धिः स नाम्ना ख्यातो जटासुरः ५ पोषणं तस्य राजेन्द्र चक्रे पाण्डवनन्दनः । बुबुधे न च तं पापं भस्मच्छन्नमिवानलम् ६ स भीमसेने निष्क्रान्ते मृगयार्थमरिन्दम । घटोत्कचं सानुचरं दृष्ट्वा विप्रद्रुतं दिशः ७ लोमशप्रभृतींस्तांस्तु महर्षींश्च समाहितान् । स्नातुं विनिर्गतान्दृष्ट्वा पुष्पार्थं च तपोधनान् ८ रूपमन्यत्समास्थाय विकृतं भैरवं महत् । गृहीत्वा सर्वशस्त्राणि द्रौपदीं परिगृह्य च ९ प्रातिष्ठत स दुष्टात्मा त्रीन्गृहीत्वा च पाण्डवान् । सहदेवस्तु यत्नेन ततोपक्रम्य पाण्डवः १० विक्रम्य कौशिकं खड्गं मोक्षयित्वा ग्रहं रिपोः । आक्रन्दद्भीमसेनं वै येन यातो महाबलः ११ तमब्रवीद्धर्मराजो ह्रियमाणो युधिष्ठिरः । धर्मस्ते हीयते मूढ न तत्त्वं समवेक्षसे १२ येन्ये कचिन्मनुष्येषु तिर्यग्योनिगताश्च ये । धर्मं ते सम-

---

नकुल, सहदेव व धर्मराजा, ह्यांसहवर्तमान आपलेसें करून सोडिलें. तो राक्षस "मी सर्व शास्त्रवेत्त्यांमध्यें थोर, ममलत करण्यांमध्यें मोठा कुशल असा ब्राह्मण आहें" ३ असें सांगून आजपर्यंत नित्य पांडुपुत्रांची सेवा करून त्यांचे भाते व धनुष्यें हीं केव्हां आपल्याला सांपडतील ४ व द्रौपदीचें हरण करण्यास आपणाला केव्हां वेळ सांपडेल अशी वाट पहात होता. त्या दुष्टात्म्या पापबुद्धीचें जटासुर ह्मणून नांव होतें ५. पांडुपुत्र राजश्रेष्ठ धर्मराजानें, भस्मानें आच्छादिलेल्या अग्नीचें, ज्ञान न होऊन, जसें पालन करावें त्याप्रमाणें, ह्याचें न जाणून पोषण केलें ६. नंतर एके दिवशीं, हे शत्रुनाशका जनमेजया, भीमसेन मृगयेला निघून गेला असतां, घटोत्कच आपल्या चाकरमाणसांसुद्धां जिकडच्या तिकडे गेला असतां ७, लोमशप्रभृति महर्षि स्वस्थांतःकरणपूर्वक स्नानें करण्याकरितां गेलें असतां व तपस्वी ऋषी पुष्पें आणण्याकरितां गेले असता ८, त्या राक्षसानें अकाळविक्राळ व प्रचंड असें रूप धारण करून सर्व शस्त्रें, द्रौपदी, नकुल, सहदेव व धर्मराजप्रभृति त्रिवर्ग पांडुपुत्र ह्यांना घेऊन तो दुष्टात्मा मोठ्या वेगानें निघाला व नंतर सहदेवानें मोठ्या प्रयत्नानें त्याच्या हातून आपली सुटका करून घेतली ९, १०. त्याच्या हातून आपली सुटका करून घेतांक्षणींच तो सहदेव, म्यानांतून तरवार काढून महाबलाढ्य भीमसेन ज्या रस्त्यानें गेला होता त्या रस्त्याकडे पाहून ओरडूं लागला ११. तेव्हां राक्षस आपल्याला वाहून नेत आहे असें अवलोकन करितांच धर्मराज ह्मणाला "हे मूर्खा, तुझा धर्म नाहींसा होत आहे, तूं धर्मतत्त्वाकडे

वेक्षन्ते रक्षांसि च विशेषतः १३ धर्मस्य राक्षसा मूलं धर्मं ते विदुरुत्तमम् । एतत्परीक्ष्य सर्वं त्वं समीपे स्थातुमर्हसि १४ देवाश्च ऋषयः सिद्धाः पितरश्चापि राक्षस । गन्धर्वोरगरक्षांसि वयांसि पशवस्तथा १५ तिर्यग्योनिगताश्चैव अपि कीटपिपीलिकाः । मनुष्यानुपजीवन्ति ततस्त्वमपि जीवसि १६ समृद्ध्या यस्य लोकस्य लोको युष्माकमृध्यति । इमं च लोकं शोचन्तमनुशोचन्ति देवताः १७ पूज्यमानाश्च वर्धन्ते हव्यकव्यैर्यथाविधि । वयं राष्ट्रस्य गोप्तारो रक्षितारश्च राक्षस १८ राष्ट्रस्यारक्ष्यमाणस्य कुतो भूतिः कुतः सुखम् । न च राजावमन्तव्यो रक्षसा जात्वनागसि १९ अणुरप्यपचारश्च नास्त्यस्माकं नराशन । विघसाशा यथाशक्त्या कुर्मेह देवतादिषु २० गुरूंश्च ब्राह्मणांश्चैव प्रमाणप्रवणाः सदा । द्रोग्धव्यं न च मित्रेषु न विश्वस्तेषु कर्हिचित् २१ येषां चान्नानि भुञ्जीत यत्र च

कसें अवलोकन करीत नाहींस ? १२. मनुष्य व तिर्यग्योनीमध्यें जन्माला प्राप्त झालेले प्राणी हे प्रसंगविशेषीं धर्माचा विचार करितात; परंतु, विशेषेंकरून राक्षस तर निरंतर धर्माचें अवलंबन करितातच १३. राक्षस धर्माचें मूळ असून त्यांना तो चांगला समजतो. तस्मात्, ह्या सर्व गोष्टींचा विचार कर आणि मला घेऊन जाऊं नकोस १४. देव, ऋषि, सिद्ध, पितर, राक्षस, गंधर्व, उरग, पक्षी, पशु, १५, तिर्यग्योनीमध्यें जन्माला आलेले प्राणी व त्याचप्रमाणें किडे, मुंग्या हीं सर्व मनुष्यावरच उपजीवन पावतात व तूंही आजपर्यंत त्यांच्यावरच उपजीवन पावला आहेस १६; शिवाय ह्याच लोकांचा अभ्युदय असला ह्मणजे तुमच्याही लोकांचा अभ्युदय असतो व हा लोक शोकाक्रांत झाला असतांना देवताही शोकाक्रांत होतात १७. त्याचप्रमाणें हव्यकव्यांच्या योगानें विधिपूर्वक देवतांचें पूजन केलें ह्मणजे त्या वाढतात; करितां, हे राक्षसा, आह्मी राज्याचें पालन करणारे व पोषण करणारे आहोंत ह्मणून आमचा नाश करूं नकोस १८. राष्ट्राचें रक्षण झालें नाहीं ह्मणजे ऐश्वर्य कोठून व सुख तरी कोठून ? करितां निरपराधी अशा राजाचा राक्षसांनीं अवमान करूं नये १९. हे नरमांसभक्षका, आह्मी, एक तिळभरसुद्धां कोणाचा अपराध केला नसून यथाशक्ति देवतादिकांचें आराधन करून देव व ब्राह्मण ह्यांना समर्पण केल्यावर, राहिलेलें अन्न भक्षण करणारे आहोंत २०. गुरु व ब्राह्मण ह्यांच्याशीं आह्मी निरंतर नम्र भावानें वागत असतों. तात्पर्य, आपले मित्र व ज्यांचा आपल्यावर विश्वास आहे त्यांचा कधींही द्रोह करूं नये २१. ज्यांचें अन्न आपण भक्षण करितों व जेथें आपल्याला वास करण्याला आश्रय मिळाला आहे, त्यांचाही द्वेष करूं नये. असें असतां आम-

स्यामतिथयः । स त्वं प्रतिश्रयेस्माकं पूज्यमानः सुखोषितः २२ भुक्त्वा चान्नानि दुष्प्रज्ञ कथमस्माञ्जिहीर्षसि । एवमेव वृथाचारो वृथावृद्धो वृथामतिः २३ वृथामरणमर्हश्च वृथाद्य न भविष्यसि । अथ चेद्दुष्टबुद्धिस्त्वं सर्वैर्धर्मैर्विवर्जितः २४ प्रदाय शस्त्राण्यस्माकं युद्धेन द्रौपदीं हर । अथ चेत्त्वमविज्ञानादिदं कर्म करिष्यसि २५ अधर्मं चाप्यकीर्तिं च लोके प्राप्स्यसि केवलम् । एतामद्य परामृश्य स्त्रियं राक्षस मानुषीम् २६ विषमेतत्समालोड्य कुम्भेन प्राशितं त्वया । ततो युधिष्ठिरस्तस्य गुरुकः समपद्यत २७ स तु भाराभिभूतात्मा न तथा शीघ्रगोभवत् । अथाब्रवीद्द्रौपदीं च नकुलं च युधिष्ठिरः २८ मा भैष्ट राक्षसान्मूढाद्गतिरस्य मया हृता । नातिदूरे महाबाहुर्भविता पवनात्मजः २९ अस्मिन्मुहूर्ते संप्राप्ते न भविष्यति राक्षसः । सहदेवस्तु तं दृष्ट्वा राक्षसं मूढचेतसम् ३० उवाच वचनं राजन्कुन्तीपुत्रं युधिष्ठिरम् । राजन्किंनाम सत्कृत्यं क्षत्रियस्यास्त्यतोधिकम् ॥ यद्युद्धेभिमुखः प्राणांस्त्यजेच्छत्रुं जयेत वा ३१ एष

त्याच घरीं सुखकरून राहून व आह्मीं केलेल्या पूजेचा स्वीकार करून २२, हे दुष्टबुद्धे, आमचेंच अन्न भक्षण करून आह्मांलाच हरण करितोस. तस्मात्, तुझा आचार, तुझें वार्धक्य व तुझी बुद्धिमत्ता हीं सर्व व्यर्थ आहेत २३. ज्याअर्थी तूं अशी दुष्टबुद्धि धारण करितोस त्याअर्थी तुझ्या सर्व धर्मांचा लोप होऊन व्यर्थ मरण पावून फुकट वाया जाशील २४. आमचीं शस्त्रें आह्मांला दे आणि युद्ध करून द्रौपदीचें हरण कर. आतां जर न जाणून तूं हें कर्म करीत असशील तर २५ केवळ अधर्म व अपकीर्ति ह्यांचाच ह्या लोकामध्यें आपणाला लाभ करून घेशील. हे राक्षसा, ह्या मानवी स्त्रियेच्या अंगाला तूं स्पर्श केलास, तो स्पर्श केला नाहींस तर २६ हें विष कालवून तें एक तांब्याभर तूं प्राशन केलें आहेस. असें भाषण केल्यानंतर धर्मराज जड जड होऊं लागला २७ व त्या भारामुळें त्या राक्षसाला पूर्वीप्रमाणें जलद चालतां येईना. तेव्हां द्रौपदी आणि नकुल ह्यांना युधिष्ठिर ह्मणाला "ह्या मूर्ख राक्षसाला तुह्मी भिऊं नका; मीं ह्याची गति कुंठित केली आहे आणि वायुतनय भीमसेन हाही येथें कोठें तरी जवळच असेल २९ आणि तो आतांच येथें येऊन पोंचला ह्मणजे ह्या राक्षसाला समूळ नाहींसें करून टाकील. नंतर सहदेवानें मंदगति झालेल्या त्या राक्षसाला अवलोकन केल्यावर, हे राजा जनमेजया, तो कुंतीपुत्र युधिष्ठिराला ह्मणाला "हे धर्मराजा, युद्धामध्यें शत्रूसमोर उभे राहून आपल्या प्राणांचा त्याग करावा अथवा त्याला जिंकावें ह्यापेक्षां अधिक चांगलें असें कोणतें

चास्मान्वयं चैनं युध्यमानाः परन्तप ३२ सुदयेम महाबाहो देशकालो ह्ययं नृप। क्षत्रधर्मस्य संप्राप्तः कालः सत्यपराक्रमः ३३ जयन्तो हन्यमाना वा प्राप्तुमर्हाम सद्गतिम्। राक्षसे जीवमानेद्य रविरस्तमियाद्यदि ३४ नाहं ब्रूयां पुनर्जातु क्षत्रियोस्मीति भारत। भो भो राक्षस तिष्ठस्व सहदेवोस्मि पाण्डवः ३५ हत्वा वा मां नयस्वैनां हतो वाद्येह स्वप्स्यसि। तदा ब्रुवति माद्रेये भीमसेनो यदृच्छया ३६ प्रत्यदृश्यद्गदाहस्तः सवज्र इव वासवः। सोपश्यद्भ्रातरौ तत्र द्रौपदीं च यशस्विनीम् ३७ क्षितिस्थं सहदेवं च क्षिपन्तं राक्षसं तदा। मार्गाच्च राक्षसं मूढं कालोपहतचेतसम् ३८ भ्रमन्तं तत्र तत्रैव दैवेन विनिवारितम्। भ्रातॄंस्तान्ह्रियतो दृष्ट्वा द्रौपदीं च महाबलः ३९ क्रोधमाहारयद्भीमो राक्षसं चेदमब्रवीत्। विज्ञातोसि मया पूर्वं पाप शस्त्रपरीक्षणे ४० आस्था तु त्वयि मे नास्ति यतोसि न हतस्तदा। ब्रह्मरूपप्रतिच्छन्नो न नो वदसि चाप्रियम् ४१

सत्कृत्य क्षत्रियाला करावयास योग्य आहे? ३०,३१. हे शत्रुतापना धर्मराजा, ह्यानें आह्मांस युद्ध करिताना मारून टाकावें व आह्मीं त्यास मारावें असाच हा देशकालाला योग्य असा प्रसंग आला आहे आणि क्षात्रधर्मानें वागणाऱ्या क्षत्रियाचा सत्य पराक्रम दिसण्याचीही हीच वेळ आहे ३२,३३. आज आह्मी जयशाली झालों अथवा आमचा नाश झाला तर आह्मांला सद्गतिच मिळेल. आज हा राक्षस जिवत असताना जर सूर्यास्त झाला तर ३४, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, मी आपणाला क्षत्रिय ह्मणवून घेणार नाहीं. अरे, हे राक्षसा, उभा रहा; हा मी पांडुपुत्र सहदेव तुझ्याकडे येत आहें ३५. मला मारून तू हिचें हरण कर किंवा मीं तुला मारिलें ह्मणजे मग तूं ह्या धरणीवर पड. ह्याप्रमाणें माद्रीतनयाचें त्याच्याशीं भाषण चाललें आहे तोंच सहजरीतीनें ३६ भीमसेन वज्र धारण केलेल्या इंद्राप्रमाणें हातामध्यें गदा घेतलेला त्यांच्या दृष्टी पडला. त्यानें आपले दोघे बंधू व यशस्विनी द्रौपदी ह्यांना ३६ आणि भूमीवर उभा राहून राक्षसांशीं झटपट करणारा सहदेव ह्यांना अवलोकन केलें आणि कालानें ज्याच्या अंतःकरणाला मोह उत्पन्न केला आहे असा राक्षस आपल्या मार्गाला सोडून दैवाच्या फेऱ्यामध्यें सांपडल्यामुळें गरगर फिरत आपल्या भ्रात्यांना आणि त्या द्रौपदीला नेत आहे असें त्या महाबलाढ्य भीमानें अवलोकन केलें ३८,३९. तेव्हां अत्यंत क्रुद्ध झालेला भीमसेन त्या राक्षसाला ह्मणाला "हे पाप्या, शस्त्रपरीक्षणप्रसंगामध्यच मीं तुला पूर्वीं ओळखिलें होतें ४०; परतु, तुझ्या प्राणहानीकडे मीं दुर्लक्ष्य केल्यामुळें व तूं ब्राह्मणाचा वेष घेऊन आह्माला अप्रिय असें कोणतेंही भाषण न केल्यामुळें आजपर्यंत

प्रियेषु रममाणं त्वां न चैवाप्रियकारिणम् । अतिथिं ब्रह्मरूपं च कथं
हन्यामनागसम् ४२ राक्षसं जानमानोऽपि यो हन्यान्नरकं व्रजेत् । अप-
क्वस्य च कालेन वधस्तव न विद्यते ४३ नूनमद्यासि संपक्वो यथा ते मति-
रीदृशी । दत्ता कृष्णापहरणे कालेनाद्भुतकर्मणा ४४ बडिशोऽयं त्वया ग्रस्तः
कालसूत्रेण लम्बितः । मत्स्योऽम्भसीव स्यूतास्यः कथमद्य भविष्यसि ४५
यं चासि प्रस्थितो देशं मनः पूर्वं गतं च ते । न तं गन्तासि गन्तासि
मार्गं बकहिडिम्बयोः ४६ एवमुक्तस्तु भीमेन राक्षसः कालचोदितः ।
भीत उत्सृज्य तान्सर्वान्युद्धाय समुपस्थितः ४७ अब्रवीच्च पुनर्भीमं रोषा-
त्प्रस्फुरिताधरः । न मे मूढा दिशः पाप त्वदर्थं मे विलम्बितम् ४८ श्रुता
मे राक्षसा ये ये त्वया विनिहिता रणे । तेषामद्य करिष्यामि तवास्रेणो-
दकक्रियाम् ४९ एवमुक्तस्ततो भीमः सृक्किणीपरिसंलिहन् । स्मयमान
इव क्रोधात्साक्षात्कालान्तकोपमः ५० बाहुसंरम्भमेवेक्षन्नभिदुद्राव राक्ष-

---

मीं तुला मारिलें नाहीं ४१. कारण, तूं आह्मांला जें प्रिय तेंच करीत असून आमचें कोणतेंही अप्रिय केलें नाहींस; व ब्रह्मरूप धारण करून अतिथिरूप धारण केल्यामुळें व निरपराधी असल्यामुळें तुझा मीं वध केला नाहीं ४२; राक्षस आहे असें समजून जो निरपराधी असतां त्याचा वध करितो तो नरकाला जातो. इतके दिवस-पर्यंत तुझा काळ न भरल्यामुळें तुझा वध केला नाहीं ४३; परंतु, आतां मात्र ज्याअर्थी हें अद्भुत कर्म करण्याची तुला वासना झाली आहे त्याअर्थी सांप्रत तुझे आयुष्याचे दिवस भरले आहेत असें मला वाटतें ४४. कालरूपी जें कालसूत्र त्यानें आज हा तुला मार-ण्याकरितां गळ सोडिला आहे व तो तूं गिळिला आहेस त्यामुळें गळ गिळलेल्या माशा-सारिखी तुझी स्थिति झाली असतां आतां तूं कसें करशील ? ४५. ज्या प्रदेशाला जाण्याचें तू मनांत आणिलें आहेस व जेथें अगोदरच तुझें मन गेलें आहे त्या प्रदेशाला आतां न जातां बक व हिडिंब ज्या मार्गानें गेले तोच मार्ग तुला धरावा लागेल ४६. ह्याप्रमाणें भीमसेनाचें वाक्य श्रवण करितांच कालानें प्रेरणा केलेला तो राक्षस भय-भीत होऊन व त्या सर्वांना खांद्यावरून खालीं उतरून युद्ध करण्याला तयार झाला ४७ आणि क्रोधानें ओष्ठ स्फुरण पावत असल्यामुळें भीमसेनाला ह्मणाला "हे पाप्या, भीमसेना, मला दिशाभूल झाली नसून मी तुझ्या येण्याचीच वाट पहात इतका वेळ थांबलों ४८. आजपर्यंत ज्या ज्या राक्षसांचा तूं रणांगणाचे ठिकाणीं वध केलास त्या सर्व राक्षसांचें तुझ्या रक्तानें मी आज तर्पण करीन " ४९. हें श्रवण करून भीमसेन आपले ओष्ठ-प्रांत चाटूं लागला आणि क्रोधावेशानें दुसरा काळच कीं काय असा पुढें सरसावून व

सम् । राक्षसोपि तदा भीमं युद्धार्थिनमवस्थितम् ५१ मुहुर्मुहुर्व्याददानः सृक्किणी परिसंलिहन् । अभिदुद्राव संरब्धो बलिर्वज्रधरं यथा ५२ वर्तमाने तदा ताभ्यां बाहुयुद्धे सुदारुणे । माद्रीपुत्रावतिक्रुद्धावुभावप्यभ्यधावताम् ५३ न्यवारयत्तौ प्रहसन्कुन्तीपुत्रो वृकोदरः । शक्तोहं राक्षसस्येति प्रेक्षध्वमिति चाब्रवीत् ५४ आत्मना भ्रातृभिश्चैव धर्मेण सुकृतेन च । इष्टेन च शपे राजन्सूदयिष्यामि राक्षसम् ५५ इत्येवमुक्त्वा तौ वीरौ स्पर्धमानौ परस्परम् । बाहुभ्यां समसज्जेतामुभौ रक्षोवृकोदरौ ५६ तयोरासीत्संप्रहारः क्रुद्धयोर्भीमरक्षसोः । अमृष्यमाणयोः संख्ये देवदानवयोरिव ५७ आरुज्यारुज्य तौ वृक्षानन्योन्यमभिजघ्नतुः । जीमूताविव गर्जन्तौ निनदन्तौ महाबलौ ५८ बभञ्जतुर्महावृक्षानूरुभिर्बलिनां वरौ । अन्योन्येनाभिसंरब्धौ परस्परवधैषिणौ ५९ तद्वृक्षयुद्धमभवन्महीरुहविनाशनम् । वालिसुग्रीवयोर्भ्रात्रोः पुरा स्त्रीकांक्षिणोर्यथा ६० आविध्याविध्य तौ वृक्षान्मुहूर्तमितरेतरम् । ताडयामासतुरुभौ विनदन्तौ मुहुर्मुहुः ६१ तस्मि-

---

दंड थोपटून त्या राक्षसाच्या अंगावर धांवला. तेव्हां तो राक्षसही— भीमसेन युद्धाकरितां उभा राहिला आहे असें अवलोकन केल्यावर ५०,५१ वारवार आपले ओष्ठप्रांत चाटीत चाटीत वज्र धारण करणाऱ्या इंद्रावर ज्याप्रमाणें बली धांवला त्याप्रमाणें— त्याच्या अंगावर धांवला ५२. नंतर त्या उभयतांचें दारुण बाहुयुद्ध होऊं लागलें असतां माद्रीपुत्र नकुलसहदेवही रुष्ट होऊन त्या राक्षसाच्या अंगावर धांवले ५३. तेव्हां कुंतीपुत्र वृकोदर हंसल्यासारिखें करून ह्मणाला " ह्या राक्षसाचा वध करण्याला मी समर्थ आहें. तस्मात् माझा हा युद्धप्रसंग तुह्मी अवलोकन करा ह्मणजे झालें ५४. हे राजा, मी आपल्या शरीराची, भ्रात्यांची, धर्माची, पुण्याची व इष्टांची शपथ वाहून सांगतों कीं, ह्या राक्षसाचा वध करीन " ५५. ह्याप्रमाणें भाषण केल्यावर एकमेकांची स्पर्धा करणारे ते वृकोदर व राक्षस परस्परांचे बाहु धरून युद्ध करूं लागले ५६. त्या क्रुद्ध झालेल्या भीमराक्षसांचे प्रहार, रणांगणामध्यें एकमेकांचा उत्कर्ष सहन न झाल्यामुळें देवदानवांच्या प्रहारांप्रमाणें होऊं लागले ५७. ते महाबलाढ्य वीर मेघाप्रमाणें गर्जना करीत करीत मोठमोठाले वृक्ष उपटून एकमेकाला प्रहार करूं लागले ५८. त्या बलवानांमध्यें श्रेष्ठ असलेल्या उभयतां योध्यांनीं आपल्या मांड्यांच्या योगेंकरून मोठमोठाले वृक्ष पृथ्वीवर पाडून एकमेकाचा वध करण्याच्या इच्छेनें ते वृक्षच एकमेकाला मारूं लागले ५९. पूर्वीं स्त्रीची इच्छा करणाऱ्या वालिसुग्रीवसंज्ञक भ्रात्यांचें जसें युद्ध झालें, तसेंच हें वृक्षांना नाहींसें करणारें असें युद्ध झालें ६०. एक

न्देशे यदा वृक्षाः सर्व एव निपातिताः । मुञ्जिकनाश्च शतशः परस्पर-
वधेप्सया ६२ ततः शिलाः समादाय मुहूर्तमिव भारत । महाभ्रैरिव
शैलेन्द्रौ युयुधाते महाबलौ ६३ शिलाभिरुग्ररूपाभिर्बृहतीभिः परस्प-
रम् । वज्रैरिव महावेगैराजघ्नतुरमर्षणौ ६४ अभिद्रुत्य च भुयस्तावन्योन्य-
बलदर्पितौ । भुजाभ्यां परिगृह्याथ चकर्षाते गजाविव ६५ मुष्टिभिश्च
महाघोरैरन्योन्यमभिजघ्नतुः । ततः कटकटाशब्दो बभूव सुमहात्मनोः ६६
ततः संहृत्य मुष्टिं तु पञ्चशीर्षमिवोरगम् । वेगेनाभ्यहनद्भीमो राक्षसस्य
शिरोधराम् ६७ ततः श्रान्तं तु तद्रक्षो भीमसेनभुजाहतम् । सुपरि-
श्रान्तमालक्ष्य भीमसेनोऽभ्यवर्तत ६८ तत एनं महाबाहुर्बाहुभ्याममरोपमः ।
समुत्क्षिप्य बलाद्भीमो विनिष्पिष्य महीतले ६९ तस्य गात्राणि स-
र्वाणि चूर्णयामास पाण्डवः । अरत्निना चाभिहत्य शिरः कायादपाहरत् ७०
संदष्टौष्ठं विवृत्ताक्षं फलं वृक्षादिव च्युतम् । जटासुरस्य तु शिरो

मुहूर्तपर्यंत त्या उभयतांनींही एकमेकाला प्रहार करून वरचेवर वरचेवर सिंहनाद कर-
ण्याला आरंभ केला ६१. ह्याप्रमाणें एकमेकांचा वध करण्याकरितां त्या प्रदेशांतील
सर्व वृक्ष त्यानीं नाहींसे केले आणि बाकी राहिलेले जर्जर करून टाकिले ६२. नतर, हे
भरतकुलोत्पन्ना, मोठ्या अभ्राच्या योगेंकरून ज्याप्रमाणें पर्वतश्रेष्ठ शैलेंद्र युद्ध करितो
त्याप्रमाणें त्या महाबलाढ्य वीरानींही शिलांच्या योगेंकरून युद्ध करण्यास आरंभ
केला ६३. ते अतिशय क्रुद्ध झालेले वीर मोठमोठाल्या व भयंकर अशा शिलांच्या
योगानें महावेगवान् वज्राप्रमाणें एकमेकाला प्रहार करूं लागले ६४. नंतर पुनरपि
बलसंबंधी गर्वानें गर्विष्ठ झालेले ते उभयतां एकमेकांचे भुज धरून हत्ती हत्तीला
ज्याप्रमाणें ओढतो त्याप्रमाणें ओढूं लागले असतां ६५. अत्यंत भयं-
कर अशा त्या मुष्टीनीं एकमेकाला प्रहर करूं लागतांच त्या महात्म्यांच्या
मुष्टींचा कटकट असा शब्द होऊं लागला ६६. नंतर मुष्टि मारण्याचें बंद करून
पांच फणा असलेल्या सर्पाला ज्याप्रमाणें धरतात त्याप्रमाणें भीमसेनानें अत्यत जोरानें
त्या राक्षसाला धरून त्याचें मस्तक पृथ्वीतलावर आपटलें ६७. तदनंतर अगोदरच
दमला असून त्यांत आपल्या भुजप्रहारानें अतिशयच दमलेल्या त्या राक्षसाला अव-
लोकन करून भीमसेनाला जास्त वीरश्री उत्पन्न झाली ६८ आणि देवासारिखा
असलेल्या महाबाहु भीमसेनानें आपल्या बाहुबलानें त्याला वर उचलून मोठ्या
सपाट्यानें जमीनीवर आदळलें असतां ६९ त्याचीं सर्व गात्रें त्या पांडुपुत्र भीमसेनानें
मोकळीं करून सोडिलीं. नंतर आपल्या हाताच्या तळव्यानें त्याच्या मानेवर प्रहार

भीमसेनबलाद्धृतम् ७१ पपात रुधिरादिग्धं संदष्टदशनच्छदम् । तं निहत्य महेष्वासो युधिष्ठिरमुपागमत् । स्तूयमानो द्विजाग्र्यैस्तु मरुद्भिरिव वासवः ७२ [६०१९] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि जटासुरवधपर्वणि सप्तपञ्चाशदधिकशततमोध्यायः ॥ १५७ ॥ समाप्तं च जटासुरवधपर्व ॥

अथ यक्षयुद्धपर्व ॥ वैशंपायन उवाच ॥ निहते राक्षसे तस्मिन्पुनर्नारायणाश्रमम् ॥ अभ्येत्य राजा कौन्तेयो निवासमकरोत्प्रभुः १ स समानीय तान्सर्वान्भ्रातॄनित्यब्रवीद्वचः । द्रौपद्या सहितान्काले संस्मरन्भ्रातरं जयम् २ समाश्चतस्रोभिगताः शिवेन चरतां वने । कृतोद्देशः स बीभत्सुः पञ्चमीमभितः समाम् ३ प्राप्य पर्वतराजानं श्वेतं शिखरिणां वरम् । पुष्पितैर्द्रुमषण्डैश्च मत्तकोकिलषट्पदैः ४ मयूरैश्चातकैश्चापि नित्योत्सवविभूषितम् । व्याघ्रैर्वराहैर्महिषैर्गवयैर्हरिणैस्तथा ५ श्वापदैर्व्यालरूपैश्च रुरुभिश्च निषे-

करून त्याचें मस्तक शरीरापासून तोडून टाकिलें ७०. तें जटासुराचें मस्तक भीमसेनाच्या बलाच्या योगानें तुटून पडलें असून दांत, ओंठ खात असलेलें, डोळे वटारिलेलें व वृक्षापासून च्युत झालेल्या फळाप्रमाणें पडलेलें दिसत होतें ७१. दांत, ओंठ चावणारें व रुधिरानें भरलेलें असें त्याचें मस्तक तोडल्यावर तो मोठें धनुष्य धारण करणारा भीमसेन युधिष्ठिराकडे प्राप्त झाला असतां मरुतांनीं स्तवन केलेल्या इंद्राप्रमाणें सर्व ब्राह्मणश्रेष्ठ त्याचें स्तवन करूं लागले ७२. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील जटासुरवधपर्वापैकीं एकशें सत्तावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ १५७ ॥ येथें जटासुरवधपर्वही समाप्त झालें.

येथून पुढें यक्षयुद्धपर्वाला आरंभ झाला. वैशंपायन सांगतात:— त्या राक्षसाचा नाश केल्यावर पुनरपि प्रभु कुंतीपुत्र धर्मराज नरनारायणाच्या आश्रमाला येऊन वास्तव्य करूं लागला असतां १ कोणे एके प्रसंगीं द्रौपदीसहवर्तमान सर्व भ्रात्यांना आपल्या जवळ बोलावून भ्रात्या अर्जुनाचें स्मरण झाल्यामुळें तो त्यांच्याशीं भाषण करूं लागला कीं २, ह्या वनाचे ठिकाणीं कुशल रीतीनें संचार करितां करितां आपल्याला चार वर्षें लोटलीं. आतां " पांचव्या वर्षीं मी तुम्हांला अवश्य येऊन भेटेन " असें अर्जुनानें आपल्याला सांगितलें आहे ३. करितां आपण पर्वतांमध्यें श्रेष्ठ असलेल्या, प्रफुल्लित झालेल्या पुष्पांच्या वृक्षांनीं युक्त आणि मत्त कोकिलांच्या व मधुकरांच्या नादानें नादित अशा ह्या श्वेतपर्वतावर जाऊन त्याची मार्गप्रतीक्षा करूं ४. ह्या पर्वत निरंतर मयूर व चातकपक्षी ह्यांच्या क्रीडेनें विभूषित असून व्याघ्र, वराह महिष, गवे, हरिण ५ व ह्यांशिवायही

वितम् ॥ फुल्लैः सहस्रपत्रैश्च शतपत्रैस्तथोत्पलैः ६ प्रफुल्लैः कमलैश्चैव तथा नीलोत्पलैरपि । महापुण्यं पवित्रं च सुरासुरनिषेवितम् ७ तत्रापि च कृतोद्देशः समागमदिदृक्षुभिः । कृतश्च समयस्तेन पार्थेनामिततेजसा ८ पञ्च वर्षाणि वत्स्यामि विद्यार्थीति पुरा मयि । अत्र गाण्डीवधन्वानमवाप्तास्त्रमरिन्दमम् ९ देवलोकादिमं लोकं द्रक्ष्यामः पुनरागतम् । इत्युक्त्वा ब्राह्मणान्सर्वानामन्त्रयत पाण्डवः १० कारणं चैव तत्तेषामाचचक्षे तपस्विनाम् । तानुग्रतपसः प्रीतान्कृत्वा पार्थाः प्रदक्षिणाम् ११ ब्राह्मणास्तेन्वमोदन्त शिवेन कुशलेन च । सुखोदर्कमिमं क्लेशमचिराद्भरतर्षभ १२ क्षत्रधर्मेण धर्मज्ञ तीर्त्वा गां पालयिष्यसि । तत्तु राजा वचस्तेषां प्रतिगृह्य तपस्विनाम् १३ प्रतस्थे सह विप्रैस्तैर्भ्रातृभिश्च परंतपः । राक्षसैरनुयातो वै लोमशेनाभिरक्षितः १४ क्वचित्पद्भ्यां ततोगच्छद्राक्षसैरुह्यते क्वचित् । तत्र तत्र महातेजा भ्रातृभिः सह सुव्रतः १५ ततो युधिष्ठिरो राजा बहून्क्लेशान्विचिन्तयन् ।

इतर श्वापदें व सर्पांचीं रूपें धारण केलेले रुरुसंज्ञक प्राणी ह्यांनीं सेवित असून विकसित झालेलीं सहस्रपत्र कमलें, शतपत्र कमलें, उत्पलें ६, प्रफुल्लित कमलें व त्याचप्रमाणें नीलवर्ण कमलें, ह्यांनीं भरलेला आहे आणि ह्या महापुण्यकारक पवित्र पर्वतावर देव दानवांचें वास्तव्य आहे ७. ह्मणून ह्याच ठिकाणीं येऊन भेटण्याचें अत्यंत तेजस्वी अर्जुनानें कबूल केलें असल्यामुळें आपणही त्याला भेटण्याच्या इच्छेनें येथेच राहूं ८. पूर्वीं गांडीव धनुष्य धारण करणाऱ्या व शत्रुदमन करणाऱ्या अर्जुनानें "विद्यार्थीअवस्थेमध्यें मी पांच वर्षे काढून अस्त्रें प्राप्त करून घेतल्यावर ९ देवलोकांतून पुनरपि ह्या श्वेतपर्वतावर येऊन तुह्मांला भेटेन" असें सांगितलें आहे. ह्याप्रमाणें त्या ब्राह्मणांना (श्वेतपर्वतावर जाण्याचें) कारण सांगून धर्मप्रभृति सर्व पांडवांनीं त्यांना प्रदक्षिणा केल्या १०, ११. तेव्हां ते ब्राह्मण "तुझें देव बरें करील, तुझें कल्याण होईल व, हे भरतवंशजश्रेष्ठा, तुझ्या ह्या क्लेशांचा परिणामही लवकरच सुखकर अशा प्रकारचा होईल १२. हे धर्म जाणणाऱ्या धर्मराजा, क्षत्र धर्माच्या योगेंकरून वर्तन केलें असतां तूं लवकरच संकटांतून मुक्त होऊन पृथ्वीचें पालन करशील १३." ह्याप्रमाणें त्या तपस्व्यांचें भाषण श्रवण करितांच धर्मराजानें "तथास्तु" असें ह्मटलें आणि लोमश ऋषींनीं रक्षण केलेला व ज्याच्या मागून राक्षस जात आहेत असा तो शत्रुदमन करणारा धर्मराज भ्राते व ब्राह्मण ह्यांसहवर्तमान मार्गक्रमण करूं लागला असतां १४ कोठें कोठें पायीं व कोठें कोठें त्या राक्षसांच्या खांद्यावर बसून तो महातेजस्वी व्रतस्थ धर्मराज भ्रात्यांसहवर्त-

सिंहव्याघ्रगजाकीर्णामुदीचीं प्रययौ दिशम् १६ अवेक्षमाणः कैलासं मैनाकं चैव पर्वतम् । गन्धमादनपादांश्च श्वेतं चापि शिलोच्चयम् १७ उपर्युपरि शैलस्य बह्वीश्च सरितः शिवाः । पृष्ठं हिमवतः पुण्यं ययौ सप्तदशेऽहनि १८ ददृशुः पाण्डवा राजन्गन्धमादनमन्तिकात् । पृष्ठे हिमवतः पुण्ये नानाद्रुमलतावृते १९ सलिलावर्तसंजातैः पुष्पितैश्च महीरुहैः । समावृतं पुण्यतममाश्रमं वृषपर्वणः २० तमुपागम्य राजर्षिं धर्मात्मानमरिन्दमाः । पाण्डवा वृषपर्वाणमवन्दत गतक्लमाः २१ अभ्यनन्दत्स राजर्षिः पुत्रवद्भरतर्षभान् । पूजिताश्चावसंस्तत्र सप्तरात्रमरिन्दमाः २२ अष्टमेऽहनि संप्राप्ते तमृषिं लोकविश्रुतम् । आमन्त्र्य वृषपर्वाणं प्रस्थानं प्रत्यरोचयन् २३ एकैकशश्च तान्विप्रान्निवेद्य वृषपर्वणि । न्यासभूतान्यथाकालं बंधूनिव सुसत्कृतान् २४ पारिबर्हं च तं शेषं परिदाय महात्मने । ततस्ते यज्ञपात्राणि रत्नान्याभरणानि च २५ न्यदधुः पाण्डवा राजन्नाश्रमे

मान जाऊं लागला १५. तदनंतर हजारों क्लेशांचें मनामध्यें चिंतन करीत करीत सिंह, व्याघ्र व गज ह्यानीं भरून गेलेल्या उत्तर दिशेकडे वळून १६ तो धर्मराज कैलास, मैनाकपर्वत, गंधमादन पर्वताच्या पायथ्याच्या टेकड्या, श्वेतपर्वत आणि मोठमोठाल्या दगडांच्या राशी पहात पहात चालला १७. ह्याप्रमाणें पर्वताच्या शिखरावर असलेल्या पुण्यकारक शेंकडों नद्या अवलोकन करीत करीत तो सतरावे दिवशीं पुण्यकारक अशा हिमाचलाच्या पृष्ठभागावर येऊन पोंचला १८. हे राजा, तेथें येतांच त्या पांडवांनीं गंधमादनपर्वताच्या जवळ पुण्यकारक व नानाप्रकारचे वृक्ष आणि लता ह्यांनीं वेष्टित अशा हिमाचलाच्या पृष्ठभागावर १९ पाण्याच्या भोंवऱ्यांनीं व प्रफुल्लित झालेल्या पुष्पांच्या वृक्षांनीं परिवेष्टित असा पुण्यकारक वृषपर्व्याचा आश्रम अवलोकन केला २०. नंतर शत्रुदमन करणारे ते पांडव त्या धर्मात्म्या वृषपर्वानामक राजर्षीच्या जवळ आल्यावर गतश्रम होऊन त्यांनीं त्याला नमस्कार केला २१ तेव्हां त्या राजर्षीनेंही त्या भरतश्रेष्ठ पांडवांचें पुत्रांप्रमाणें अभिनंदन करून त्यांचें पूजन केलें असतां ते शत्रुदमन करणारे पांडव त्या ठिकाणी सात रात्री राहिले २२. आठव्या दिवशीं लोकांमध्यें प्रख्यात असलेल्या त्या वृषपर्वा मुनींचा निरोप घेऊन ते पांडव, पुढें जाण्याचा विचार करू लागले २३. तेव्हां योग्य वेळीं सत्काराला योग्य अशा बंधूंना जसें आपण वृद्धांच्या स्वाधीन करून ही आमची ठेव ह्मणून सांगतों तसें त्या वृषपर्व्यालाही हा अमका ब्राह्मण तो तमका ब्राह्मण असें त्यांनीं कथन केलें (व त्यांस संभाळण्यास सांगितलें.) २४ आणि आपले राहिलेले पारिबर्ह, यज्ञपात्रें, रत्नें व आभरणें २५

वृषपर्वणः । अतीतानागते विद्वान्कुशलः सर्वधर्मवित् २६ अन्वशा-
सत्सधर्मज्ञः पुत्रवद्भरतर्षभान् । तेनुज्ञाता महात्मानः प्रययुर्दिशमुत्तराम् २७
तान्प्रस्थितानभ्यगच्छद्वृषपर्वा महीपतिः । उपन्यस्य महातेजा
विप्रेभ्यः पाण्डवांस्तदा २८ अनुसंमार्य कौन्तेयानाशीर्भिरभिनंद्य च ।
वृषपर्वा निववृते पन्थानमुपदिश्य च २९ नानामृगगणैर्जुष्टं कौन्तेयः
सत्यविक्रमः । पदातिर्भ्रातृभिः सार्धं प्रातिष्ठत युधिष्ठिरः ३० नानाद्रुम-
निरोधेषु वसंतः शैलसानुषु । पर्वतं विविशुस्ते तं चतुर्थेहनि पाण्डवाः ३१
महाभ्रघनसंकाशं सलिलोपहितं शुभम् । मणिकाञ्चनरूपस्य
शिलानां च समुच्चयान् ३२ ते समासाद्य पन्थानं यथोक्तं वृषपर्वणा ।
अनुमप्रुर्यथोद्देशं पश्यन्तो विविधान्नगान् ३३ उपर्युपरि शैलस्य गुहाः
परमदुर्गमाः । सुदुर्गमांस्ते सुबहून्सुखेनैवाविचक्रमुः ३४ धौम्यः कृष्णा
च पार्थाश्च लोमशश्च महानृषिः । अगच्छन्सहितास्तत्र न कश्चिद्हीयत
यंत ३५ ते मृगद्विजसंघुष्टं नानाद्रुमलतायुतम् । शाखामृगगणैश्चैव सेवितं

ही त्या पांडुतनयांनें त्याच्याजवळ रक्षण करण्याकरिता ठेविलीं व तेव्हां भूत-
भविष्यक्रिया जाणण्यांत कुशल असलेल्या सर्व धर्मवेत्त्या वृषपर्व्यानें त्या भर-
तवशजश्रेष्ठांनाही पुत्राप्रमाणें लेखून पुढें कसें करावें हें सर्व सांगितलें. नंतर त्या
महात्म्यानें जाण्यास अनुज्ञा दिलेले ते पांडव उत्तरदिशेकडे निघाले असतां २७ त्या
महातेजस्वी पृथ्वीपति राजर्षि वृषपर्व्यानेंही त्या पांडवांना पोंचवावयाला जाऊन त्यांचें
रक्षण करण्यास ब्राह्मणांना सांगितलें २८. नंतर कुंतीपुत्रांनीं नमस्कार केला असतां
आशीर्वाद देऊन पुढें ज्या रस्त्यानें जावयाचें तो रस्ता दाखविल्यावर वृषपर्वा माघारा
आला २९. सत्य पराक्रम करणारा कुंतीपुत्र युधिष्ठिर आपल्या बंधूंसहवर्तमान
नानाप्रकारच्या मृगांच्या समुदायांनीं सेवित अशा मार्गानें जाऊं लागला ३० आणि
तऱ्हतऱ्हेच्या वृक्षानीं गुरफटून गेलेल्या पर्वताच्या शिखरावर वास्तव्य करीत करीत
चौथ्या दिवशीं ते पांडव त्या पर्वतावर गेले ३१. तो पर्वत मेघाप्रमाणें दिसत असून
शुभकारक अशा जलानें आच्छादिलेला असून मणी व कांचन ह्यांच्या शिलांचे
ढीगच्या ढीग त्याच्यावर पडले होते ३२. वृषपर्व्यानें सांगितलेल्या रस्त्याला धरून ते
पांडव नानाप्रकारच्या वृक्षांना अवलोकन करीत करीत पुढें चालले ३३ व ह्याप्रमाणें
जों जों पर्वताच्या वर वर ते जाऊं लागले तों तों परम दुर्गम अशा गुहा त्यांना आढळूं
लागल्या व त्यांचेंही मोठ्या सुखानें अतिक्रमण करून ते जाऊं लागले ३४. धौम्य ऋषि,
द्रौपदी, धर्मप्रभृति पृथातनय व लोमश ऋषि हे सर्व बरोबर चालत असून ह्यांपैकीं मार्गा-

सुमनोरमम् ३६ पुण्यं पद्मसरोयुक्तं सपल्वलमहावनम्। उपतस्थुर्महा-
भागा माल्यवन्तं महागिरिम् ३७ ततः किंपुरुषावासं सिद्धचारणसे-
वितम्। ददृशुर्हृष्टरोमाणः पर्वतं गन्धमादनम् ३८ विद्याधरानुचरितं
किन्नरीभिस्तथैव च। गजसंघसमावासं सिंहव्याघ्रगणायुतम् ३९ शर-
भोन्नादसंघुष्टं नानामृगनिषेवितम्। ते गन्धमादनवनं तन्नन्दनवनोपमम् ४०
मुदिताः पाण्डुतनया मनोहृदयनन्दनम्। विविशुः क्रमशो वीराः शरण्य
शुभकाननम् ४१ द्रौपदीसहिता वीरास्तैश्च विप्रैर्महात्मभिः। शृण्वन्तः
प्रीतिजननान्वल्गून्मदकलाञ्शुभान् ४२ श्रोत्ररम्यान्सुमधुरान् शब्दा-
न्खगमुखेरितान्। सर्वर्तुफलभाराढ्यान्सर्वर्तुकुसुमोज्ज्वलान् ४३
पश्यन्तः पादपांश्चापि फलभारावनामितान्। आम्रानाम्रातकान्भव्या-
न्नारिकेलान्सतिन्दुकान् ४४ मुञ्जातकांस्तथांजीरान् दाडिमान्बीजपूर-
कान्। पनसाँल्लकुचान्मोचान्खर्जूरानाम्लवेतसान् ४५ पारावतां-

मध्यें कोणीही मागें राहिला नाहीं ३५. नंतर मृग व पक्षी ह्यांच्या शब्दानें नादित, नानाप्रकारचे वृक्ष व लता ह्यांनीं युक्त, वानरांच्या झुडींनीं सेवित, अत्यंत मनोरम, पुण्यकारक, कमलयुक्त सरोवरानें भरलेल्या व डबक्यांनीं युक्त अशा महावनानें शोभिवंत असलेल्या माल्यवान् नांवाच्या श्रेष्ठ पर्वतावर ते महाभाग्यवान् पांडव प्राप्त झाले ३६, ३७. तेथून किंपुरुषांचें वसतिस्थान असलेला व सिद्ध चारणांनीं सेवित अशा गंधमादन पर्वताला अंगावर रोमांच उभे राहिलेल्या पांडवांनीं अवलोकन केलें ३८ आणि विद्याधर व किन्नरी ह्यांचें संचार करण्याचें स्थल, हत्तींच्या कळपांचें वसतिस्थान, सिंह व व्याघ्र ह्यांच्या समुदायांचें आगर ३९, शरभांच्या ओरडण्याच्या ध्वनींनीं नादित, नानाप्रकारच्या मृगांनीं सेवित व नंदनवनाप्रमाणें असलेलें तें गंधमादन पर्वतावरचें वन अवलोकन करून मन व हृदय ह्यांना आनंद झाल्यामुळें अत्यंत प्रमुदित झालेले ते वीर पांडव क्रमाक्रमानें त्या आश्रय करण्यास योग्य असलेल्या शुभकाननामध्यें प्रविष्ट झाले ४१. ते वीर, महात्मे ब्राह्मण व द्रौपदी ह्यांसहवर्तमान प्रवेश करीत असतां मंद मंद, शुभ व श्रवण करितांच प्रीति उत्पन्न करणारे असे कानाला गोड लागणारे पक्ष्यांच्या मुखांतून निघालेले शब्द श्रवण करीत करीत सर्व ऋतूंत उत्पन्न होणाऱ्या फलांच्या भारानें वाकलेले व सर्व ऋतूंत उत्पन्न होणाऱ्या कुसुमांच्या गुच्छांनीं लटकलेले ४३ पादप अवलोकन करीत करीत व फळभारानें लवलेले आंबे, आंबाडे व टेंभुरणीसहवर्तमान भव्य नारळांचीं झाडें ४४, मुंजातक, अंजीर, डाळिंबाचीं झाडें, बेलाचीं झाडें, ओंठ, सांवरी, खजूरीचीं झाडें, आम्लवेतस् ४५, पारावत, लहान लहान

स्तथा क्षौद्रान्नीपांश्चापि मनोरमान् । बिल्वान्कपित्थाञ्जम्बूंश्च काश्मरीर्बदरीस्तथा ४६ प्लक्षानुदुम्बरवटानश्वत्थान्क्षीरिकास्तथा । भल्लातकानामलकीर्हरीतकबिभीतकान् ४७ इंगुदान्करमर्दांश्च तिन्दुकांश्च महाबलान् । एतानन्यांश्च विविधान्गन्धमादनसानुषु ४८ फलैरमृतकल्पैस्तानाचितान्स्वादुभिस्तरून् । तथैव चम्पकाशोकान्केतकान्बकुलांस्तथा ४९ पुन्नागान्सप्तपर्णांश्च कर्णिकारान्सकेतकान् । पाटलान्कुटजान्रम्यान्मन्दारेन्दीवरांस्तथा ५० पारिजातान्कोविदारान्देवदारुद्रुमांस्तथा । शालांस्तालांस्तमालांश्च पिप्पलान्हिङ्गुकांस्तथा ५१ शाल्मलीः किंशुकाशोकाञ्शिंशपाः सरलांस्तथा । चकोरैः शतपत्रैश्च भृङ्गराजैस्तथाशुकैः ५२ कोकिलैः कलविंकैश्च हारितैर्जीवजीवकैः । प्रियकैश्चातकैश्चैव तथान्यैर्विविधैः खगैः ५३ श्रोत्ररम्यं सुमधुरं कूजद्भिश्चाप्यधिष्ठितान् । सरांसि च मनोज्ञानि समंताज्जलचारिभिः ५४ कुमुदैः पुण्डरीकैश्च तथा कोकनदोत्पलैः । कल्हारैः कमलैश्चैव आचितानि समंततः ५५ कादम्बैश्चक्रवाकैश्च कुररैर्जलकुक्कुटैः । कारण्डवैः

नीप, मनोरम बेलांचीं झाडें, कवठीचीं झाडें, जांभळीचीं झाडें, काश्मरीचीं झाडें, बोरीचीं झाडें ४६, उंबर, वड, पिंपळ, अतिशय चीक गळणारीं झाडें, बिब्यांचीं झाडें, आंवळीचीं झाड, हिरडयांचीं झाडें, बिभीतक ४७, हिंगणबेटाचीं झाडें, करमर्द आणि टेंभुरणी व ह्यांखेरीजही दुसरीं नानाप्रकारचीं झाडें गंधमादन पर्वतावर अवलोकन करीत करीत चालले ४८. अमृतासारिख्या व मधुर अशा फळांनीं भरलेलीं झाडें अवलोकन करून चपक, अशोक, केतक, बकुल ४९, पुन्नाग, सप्तपर्ण, त्यांसहवर्तमान केतक, चंदन, कुड्याचीं झाडें, रम्य मंदार वृक्ष, त्याचप्रमाणें इंदीवर ५०, पारिजात, कोविदार, देवदारु, इत्यादि वृक्ष, साग, ताड, तमाल, पिंपळ व (ज्यांच्या चिकापासून हिंग उत्पन्न होतो ते) हिंगुक वृक्ष ५१, शाल्मली, किंशुक, अशोक, शिंशिप व सरलप्रभृति वृक्ष अवलोकन केल्यावर चकोर, शतपत्रसंज्ञक पक्षी, भृंगराज, आशुक ५२, कोकिळा, चिमण्या, हिरव्या रंगाचे पक्षी, जीवजीव करणारे पक्षी, प्रियक, चातक व आणखीही निरनिराळ्या प्रकारच्या पक्ष्यांचे ५३ कर्णाला मधुर लागणारे शब्द श्रवण करीत करीत ते चालले असतां चोहोंकडून ज्यांच्यांतील जल बाहेर जात आहे अशीं सुंदर ५४ कुमुद, पुंडरीक, कोकनद, उत्पल, कल्हार, कमल वगैरे जातींच्या कमलांनीं चोहींकडून व्याप्त झालेलीं ५५, कादंब, चक्रवाक, कुरर, पाणकोंबडे, कारंडव, प्लव, हंस, बगळे, मद्गुसंज्ञक प्राणी व आणखीही दुसरे जलचर प्राणी ह्यांनीं भरलेलीं, कमलांचें रसरूपी

प्लवैर्हंसैर्बकैर्मद्गुभिरेव च ५६ एतैश्चान्यैश्च कीर्णानि समंताज्जलचारिभिः ।
हृष्टैस्तथा तामरसरसासवमदालसैः ५७ पद्मोदरच्युतरजःकिंजल्कारुण-
रञ्जितैः । मञ्जुस्वरैर्मधुकरैर्विरुतान्कमलाकरान् ५८ अपश्यंस्ते नरव्याघ्रा
गन्धमादनसानुषु । तथैव पद्मषण्डैश्च मण्डितांश्च समंततः ५९ शिख-
ण्डिनीभिः सहितॉंल्लतामण्डलकेषु च । मेघतूर्यरवोद्दाममदनाकुलिता-
न्भृशम् ६० कृत्वैव केकामधुरं संगीतं मधुरस्वरम् । चित्रान्कलापान्वि-
स्तीर्य सविलासान्मदालसान् ६१ मयूरान्ददृशुर्हृष्टान्नृत्यतो वनलालसान् ।
कांश्चित्प्रियाभिः सहितान्रममाणान्कलापिनः ६२ वल्लीलतासंकटेषु कुट-
जेषु स्थितांस्तथा । कांश्चिच्च कुटजानां तु विटपेषूत्कटानिव ६३ कला-
परुचिराटोपनिचितान्मुकुटानिव । विवरेषु तरूणां च रुचिरान्ददृशुश्च
ते ६४ सिंधुवारांस्तथोदारान्मन्मथस्येव तोमरान् । सुवर्णवर्णकुसुमान्गि-
रीणां शिखरेषु च ६५ कर्णिकारान्विकसितान्कर्णपूरानिवोत्तमान् ।
तथापश्यन्कुरबकान्वनराजिषु पुष्पितान् ६६ कामवश्यौत्सुक्यकरान्का-

---

आसव पडून मदयुक्त व प्रमुदित झालेलीं ५६,५७ पद्माच्या पोटांतील रक्तवर्ण परागानें तांबुस वर्णाचें उदक झालेलीं व ज्यांच्या तटाकीं मधुकर ५८ मंजुलस्वरानें गायन करीत आहेत अशीं सरोवरें अवलोकन करीत करीत ते पुरुषश्रेष्ठ पांडव कमलांच्या देंठांनीं चोहींकडून सुशोभित असलेल्या त्या गंधमादनपर्वताच्या शिखरावर संचार करूं लागले ५९. तेथें मंडलाकृति असलेल्या लतांच्या समुदायांत मेघगर्जनारूपी सनयांचे शब्द एकतांच मदनबाणानें व्याप्त झालेले, ६० संगीताच्या धर्तीवर मधुर मधुर असा आपल्या जातीचा शब्द करणारे, मदनानें धुंद झाल्यामुळें चित्रविचित्र पिसारा पसरून आणि वनशोभा पाहून ६१ लांडोरींसहवर्तमान नृत्य करणारे व कांहीं आपल्या प्रिय पत्नीसहवर्तमान क्रीडा करणारें मोर त्यांनीं अवलोकन केले ६२. कांहीं झाडें आणि लता ह्यांची गुंतागुंत होऊन झालेल्या कुंजांत, व कांहीं कुड्याच्या झाडांच्या फांद्यांवर ६३ मोराच्या पिसांचा टोपच घातला आहे कीं काय अशा प्रकारचे दिसणारे मोर झाडांच्या ढोलींतून बसलेले त्यांच्या दृष्टीं पडले ६४. मदनाच्या हातांत असलेल्या तोमराप्रमाणें उत्कृष्ट सिंधुवार आणि पर्वतांच्या शिखरावर असलेलीं सुवर्णवर्ण कुसुमें ६५, प्रफुल्लित झालेलीं कर्णिकार, उत्कृष्ट उत्कृष्ट कर्णपूर त्याचप्रमाणें वनसंबंधीं झाडांच्या ओळींतून प्रफुल्लित झालेलीं कोरांटयांचीं झाडेंही त्यांनीं अवलोकन केलीं ६६. सकाम झालेल्या लोकांना कामाची उत्सुकता देण्याविषयीं मदनाच्या बाणाप्रमाणें असलेले व वनपंक्तीला आपल्या रचनेच्या योगेंकरून

मस्येव शरीत्करान् । तथैव वनराजीनामुदारान्रचितानिव ६७ विराजमानांस्तेपश्यंस्तिलकांस्तिलकानिव । तथानङ्गशराकारान्सहकारान्मनोरमान् ६८ अपश्यन्भ्रमरारावान्मञ्जरीभिर्विराजितान् । हिरण्यसदृशैः पुष्पैर्दावाग्निसदृशैरपि ६९ लोहितैरञ्जनाभैश्च वैदूर्यसदृशैरपि । अतीव वृक्षा राजन्ते पुष्पिताः शैलसानुषु ७० तथा शालांस्तमालांश्च पाटलान्बकुलानपि । माला इव समासक्ताः शैलानां शिखरेषु च ७१ विमलस्फाटिकाभानि पाण्डुरच्छदनैर्द्विजैः । कलहंसैरुपेतानि सारसाभिरुतानि च ७२ सरांसि बहुशः पार्थाः पश्यन्तः शैलसानुषु । पद्मोत्पलविमिश्राणि सुखशीतजलानि च ७३ एवं क्रमेणते वीरा वीक्षमाणाः समंततः । गन्धवन्त्यथ माल्यानि रसवन्ति फलानि च ७४ सरांसि च मनोज्ञानि वृक्षांश्चातिमनोरमान् । विविशुः पाण्डवाः सर्वे विस्मयोत्फुल्लोचनाः ७५ कमलोत्पलकह्लारपुण्डरीकसुगन्धिना । सेव्यमाना वने तस्मिन्सुखस्पर्शेन वायुना ७६ ततो युधिष्ठिरो भीममाहेदं प्रीतिमद्वचः । अहो श्रीमदिदं भीम गन्धमादनकाननम् ७७ वने ह्यस्मिन्मनोरम्ये दिव्याः

शोभा देणारे ६७, तिलकाचेपरी असलेले व शोभिवंत होणारे तिलकवृक्ष अवलोकन करून मदनबाणाच्या आकाराचे, सुंदर ६८, ज्यावर भ्रमर गुंजारव करीत आहेत, ज्यांना मोहोर आला आहे, ज्याना सुवर्णाप्रमाणें लकलकणारीं आणि वणव्याप्रमाणें चमकणारीं पुष्पें आलेलीं आहेत आणि जे आळित्याप्रमाणें व वैडूर्यमण्याप्रमाणें पुष्पित झाले आहेत असे हजारों वृक्ष त्यांनीं त्या पर्वताच्या शिखरावर अवलोकन केले ६९, ७०. साल, तमाल, चंदन व बकुल ह्या वृक्षांच्या त्या पर्वताला मालाच घातल्या आहेत कीं काय असें दिसत होतें ७१. स्वच्छ स्फटिकाप्रमाणें असणारीं, श्वेतवर्ण पक्ष्यांनीं वेष्टित, कलहंसांनीं सेवित व सारसांच्या शब्दांनीं नादित ७२ अशीं शेंकडों सरोवरें त्या पृथानंदनांनीं पर्वतशिखरावर अवलोकन केलीं. तीं पद्म व उत्पल ह्यांनीं मिश्रित असून त्यांचें जल सुख व गारवा देणारें होतें ७३. ह्याप्रमाणें क्रमाक्रमानें आसमंतात् भागीं अवलोकन करून, सुगंधी पुष्पें, रसभरित फळें ७४, सुंदर सरोवरें आणि अत्यंत मनोरम वृक्ष ह्यांचें अतिक्रमण केल्यावर विस्मयानें विकसित नेत्र झालेले ते पांडव मार्गक्रमण करूं लागले ७५. ते पांडव त्या वनांतून चालले असतांना कमलें, उत्पलें, कल्हार आणि पुंडरीक ह्यांच्या सुगंधाला वाहून नेणारा वारा वाहत येत असल्यामुळें त्यांना अतिशय सुख होऊं लागलें ७६. तदनंतर युधिष्ठिर मोठ्या प्रेमानें भीमसेनाला ह्मणाला " अरे, हे गंधमादनसंबंधीं कानन फारच रमणीय व शोभिवंत आहे ७७. ह्या रमणीय वनामध्यें दिव्य प्रकारचे पादप असून पत्रें, पुष्पें

काननजा द्रुमाः । लताश्च विविधाकाराः पत्रपुष्पफलोपगाः ७८ भान्त्येते पुष्पविकचाः पुंस्कोकिलकुलाकुलाः । नात्र कण्टकिनः केचिन्न च विद्यन्त्यपुष्पिताः ७९ स्निग्धपत्रफला वृक्षा गन्धमादनसानुषु । भ्रमरारावमधुरा नलिनीः फुल्लपङ्कजाः ८० विलोड्यमानाः पश्येमाः करिभिः सकरेणुभिः । पश्येमां नलिनीं चान्यां कमलोत्पलमालिनीम् ८१ स्रग्धरां विग्रहवतीं साक्षाच्छ्रियमिवापराम् । नानाकुसुमगन्धाढ्यास्तस्येमाः काननोत्तमे ८२ उपगीयमाना भ्रमरै राजन्ते वनराजयः । पश्य भीम शुभान्देशान्देवाक्रीडान्समन्ततः ८३ अमानुषगतिं प्राप्ताः संसिद्धाः स्म वृकोदर । लताभिः पुष्पिताग्राभिः पुष्पिताः पादपोत्तमाः ८४ संश्लिष्टाः पार्थ शोभन्ते गन्धमादनसानुषु । शिखण्डिनीभिश्चरतां सहितानां शिखण्डिनाम् ८५ नदतां शृणु निर्घोषं भीम पर्वतसानुषु । चकोराः शतपत्राश्च मत्तकोकिलसारिकाः ८६ पत्रिणः पुष्पिता-

---

व फलें ह्यानीं भरलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या लताही आहेत ७८. ह्या ठिकाणीं कोकिलांतील नरांच्या समुदायांच्या शब्दांनीं नादित झालेले व प्रफुल्लित झालेल्या पुष्पांनीं भरलेले असे हे वृक्ष दिसत आहेत. येथें पुष्पें न येणारीं व कांटे असलेलीं अशीं झाडें मुळींच नाहींत ७९. ह्या गंधमादन पर्वताच्या शिखरावर मृदु पत्रें व पुष्पें असलेले वृक्ष असून भ्रमरांच्या गुंजारवानें रमणीय दिसत असलेल्या कमलांनीं प्रफुल्लित झालेलीं सरोवरें ८० हत्तिणीसहवर्तमान हत्तींनीं खडूळ करून टाकिलेलीं दिसत आहेत. हे भीमसेना, कमलें व उत्पलें ह्यांच्या परंपरेनें भरून गेलेलें हें दुसरें सरोवर तूं अवलोकन कर ८१. हें कमलाची माला धारण केलेलें सरोवर मूर्तिमंत दुसरी लक्ष्मीच आहे कीं काय असें दिसत असून ह्या पर्वताच्या उत्कृष्ट काननामध्यें नानाप्रकारच्या कुसुमांच्या गंधांनीं युक्त ८२, व ज्यामध्यें भ्रमर गुंजारव करीत आहेत अशा वनपंक्ती अवलोकन कर. त्याचप्रमाणें हे भीमसेना, देवांचें क्रीडास्थान होऊन बसलेले व आसमंतात भागीं असलेले हे शुभ देश तूं अवलोकन कर ८३. हे वृकोदरा, खरोखर आपण सिद्धांप्रमाणें समर्थ असल्यामुळेंच मनुष्यांना जेथें जातां येत नाहीं तेथें येऊन पोंचलों आहों. ज्यांच्या अग्राला पुष्पें आलीं आहेत अशा लतांनीं परिवेष्टित व पुष्पित झालेले उत्कृष्ट वृक्ष ८४, हे पार्था, ह्या गंधमादन पर्वतावर एकमेकाला लागलेले असे दिसत आहेत व लांडोरीसहवर्तमान संचार करणाऱ्या मोरांचे ओरडण्याचे शब्द ह्या पर्वतशिखरावर होत आहेत तें तूं श्रवण कर ८५. चकोर, शतपत्र, मत्त झालेल्या कोकिला आणि साळुंक्याप्रभृति पक्षी पुष्पित झालेल्या ह्या मोठमोठ्या वृक्षावर इकडून तिकडे व तिकडून इकडे जात असून ८६, तांबड, पिंवळे, अरुणवर्ण व जीवजीवसंज्ञक पक्षी,

नेतान्संपतन्ति महाद्रुमान् । रक्तपीतारुणाः पार्थ पादपाग्रगताः खगाः ८७ परम्परमुदीक्षन्ते बहवो जीवजीवकाः । हरितारुणवर्णानां शाद्वलानां समीपतः ८८ सारसाः प्रतिदृश्यन्ते शैलप्रस्रवणेष्वपि । वदन्ति मधुरा वाचः सर्वभूतमनोरमाः ८९ भृङ्गराजोपचक्राश्च लोहपृष्ठाः पतत्रिणः । चतुर्विषाणाः पद्माभाः कुञ्जराः सकरेणवः ९० एते वैदूर्यवर्णाभं क्षोभयन्ति महत्सरः । बहुतालसमुत्सेधाः शैलशृङ्गात्परिच्युताः ९१ नानाप्रस्रवणेभ्यश्च वारिधाराःपतन्ति च । भास्कराभप्रभा भीमाः शारदाभ्रघनोपमाः ९२ शोभयन्ति महाशैलं नानारजतधातवः । क्वचिदञ्जनवर्णाभाः क्वचित्काञ्चनसंनिभाः ९३ धातवो हरितालस्य क्वचिद्धिङ्गुलकस्य च । मनःशिलागुहाश्चैव संध्याभ्रनिकरोपमाः ९४ शशलोहिततवर्णाभाः क्वचिद्गैरिकधातवः । सितासिताभ्रप्रतिमा बालसूर्यसमप्रभाः ९५ एते बहुविधाः शैलं शोभयन्ति महाप्रभाः । गन्धर्वाः सह कान्ताभिर्यथोक्तं वृषपर्वणा ९६ दृश्यन्ते शैलशृङ्गेषु पार्थ किंपुरुषैः सह । गीतानां

हे पृथानंदना भीमसेना, वृक्षांच्या शेंड्यावर बसून एकमेकाकडे अवलोकन करीत आहेत ८७. हे भीमसेना, ह्या हिरव्याचार व अरुणवर्ण दिसणाऱ्या जमीनीच्या जवळ पर्वतसंबधीं झऱ्याचे ठिकाणीं बसलेले हे सारसपक्षी अवलोकन कर ८८. हे सर्व प्राणिमात्राच्या मनाला आनंद देणारे असे मधुर मधुर शब्द करीत आहेत ८९. हे येथें आणि लोखंडाप्रमाणे मजबूत पाठ असलेले भृंगराज व उपचक्रसंज्ञक पक्षी संचार करीत असून चार दंत असलेले पांढरे हत्ती आपल्या हत्तिणींसहवर्तमान ९० वैडूर्य मण्याच्या कांतिप्रमाणें प्रभा असलेल्या ह्या मोठ्या सरोवरामध्यें प्रवेश करून त्याची नासाडी करीत आहेत. त्याचप्रमाणें पुष्कळ ताड उंचीच्या प्रदेशांतून व पर्वतांच्या शिखरांपासून च्युत झालेल्या ९१ ह्या नानाप्रकारच्या झऱ्यांच्या धारा पतन पावत आहेत त्या तूं अवलोकन कर. सूर्याप्रमाणे कांति असलेले, शरदृतूतील अभ्राप्रमाणें वर्ण असलेले ९२ व भयंकर असे रजतादि धातु ह्या महाशैलाला अत्यंत शोभा देत आहेत. कोठें काजळाच्या वर्णाचे व कोठें सुवर्णाप्रमाणें पीतवर्ण ९३ असे धातु असून कोठें हरताळ, कोठें हिंगूळ आणि कोठें मनशीळ यांच्या गुहा संध्याकाळीं आकाशांत येणाऱ्या अभ्राच्या समूहाप्रमाणें दिसत आहेत ९४. कोठें कोठें गैरिकादिक धातु, ससासारिखे तांबुस वर्णाचे असून काळ्या पांढऱ्या अभ्राप्रमाणें व नुकत्याच उदयाला येणाऱ्या सूर्याप्रमाणें दिसत आहेत ९५. सारांश, अत्यंत तेजस्वी असलेली हीं सर्व ह्या पर्वताला शोभा आणीत आहेत. वृषपर्व्यानें सांगितल्याप्रमाणें गंधर्व आपल्या स्त्रियांसहवर्तमान ९६ किंपुरुषांना बरोबर घेऊन

समतालानां तथा साम्नां च निःस्वनः । श्रूयते बहुधा भीम सर्वभूत-
मनोहरः ९७ महागङ्गामुदीक्षस्व पुण्यां देवनदीं शुभाम् । कलहंसगणै-
र्जुष्टामृषिकिन्नरसेविताम् ९८ धातुभिश्च सरिद्भिश्च किन्नरैर्मृगपक्षिभिः ।
गन्धर्वैरप्सरोभिश्च काननैश्च मनोरमैः ९९ व्यालैश्च विविधाकारैः शत-
शीर्षैः समन्ततः । उपेतं पश्य कौन्तेय शैलराजमरिन्दम १०० वैशंपायन
उवाच ॥ ते प्रीतमनसः शूराः प्राप्ता गतिमनुत्तमाम् । नातृप्यन्पर्व-
तेन्द्रस्य दर्शनेन परन्तपाः १०१ उपेतमथ माल्यैश्च फलवद्भिश्च पादपैः ।
आर्ष्टिषेणस्य राजर्षेराश्रमं ददृशुस्तदा १०२ ततस्ते तिग्मतपसं कृशं धमनि-
संततम् । पारगं सर्वधर्माणामार्ष्टिषेणमुपागमन् १०३ [६१२२] इति
श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि यक्ष-
युद्धपर्वणि गन्धमादनप्रवेशेऽष्टपञ्चाशदधिकशततमोऽध्यायः ॥ १५८ ॥

वैशंपायन उवाच ॥ युधिष्ठिरस्तमासाद्य तपसा दग्धकिल्बिषम् ।
अभ्यवादयत प्रीतः शिरसा नाम कीर्तयन् १ ततः कृष्णा च भीमश्च

हिंडतांना ह्या पर्वतशिखरावर दिसत आहेत. हे भीमसेना, समताल असलेलीं गीतें आणि सामें ह्यांचे सर्व भूतांच्या मनाला हरण करणार असे ध्वनि ऐकू येत आहेत ९७. कल्याणकारक व पुण्यकारक अशा देवनदीरूपी गंगेला, हे भीमसेना, तूं अवलोकन कर. तिचें जल कलहंसांच्या समुदायानें व ऋषि आणि किन्नर ह्यांनीं सेवन केलें आहे ९८. धातू, नद्या, किन्नर, मृग, पक्षी, गंधर्व, अप्सरा व मनोरम अशीं काननें, आणि निरनिराळ्या आकारांचे शंभर शंभर फणा असलेले सर्प ह्यांनीं चोहोंकडून परिवेष्टित असलेल्या ह्या शैलराजाला, हे शत्रुदमन करणाऱ्या भीमसेना, तूं अवलोकन कर ९९, १००. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें उत्कृष्ट रीतीनें गमन करणारे व सुप्रसन्न अंतःकरण असलेले ते शूर शत्रुदमन करणारे पांडव त्या पर्वतश्रेष्ठाची शोभा पुष्कळ वेळ पहात असतांही त्यांची तृप्ति झाली नाहीं १०१. नंतर फळें व पुष्पें ह्यांनीं भरलेला आणि वृक्षांनीं युक्त असलेला आर्ष्टिषेण राजर्षीचा आश्रम त्यांनीं अवलोकन केल्यावर १०२ अत्यंत तेजस्वी, कृश, अस्थिशेष राहिलेल्या व सर्व धर्मांमध्यें पारंगत असलेल्या अशा त्या आर्ष्टिषेणाकडे ते पांडव प्राप्त झाले १०३. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील यक्षयुद्धपर्वापैकीं, गंधमादनप्रवेशाविषयीं एकशें अठ्ठावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ १५८ ॥

वैशंपायन सांगतातः—तपश्चर्येच्या योगानें आपल्या पातकांचें दहन करून टाकिलेल्या त्या आर्ष्टिषेणाकडे आल्यावर प्रसन्न झालेल्या युधिष्ठिरानें आपलें नांव सांगून मस्तकानें त्यांना प्रणाम केला १. नंतर द्रौपदी, भीमसेन व उत्कृष्ट तप करणारे

यमौ च सुतपस्विनौ । शिरोभिः प्राप्य राजर्षिं परिवार्योपतस्थिरे २
तथैव धौम्यो धर्मज्ञः पाण्डवानां पुरोहितः । यथान्यायमुपाक्रान्तस्त-
मृषिं संशितव्रतम् ३ अन्वजानात्स धर्मज्ञो मुनिर्दिव्येन चक्षुषा । पाण्डोः
पुत्रान्कुरुश्रेष्ठानास्यतामिति चाब्रवीत् ४ कुरूणामृषभं पार्थं पूजयित्वा
महातपाः । सह भ्रातृभिरासीनं पर्यपृच्छदनामयम् ५ नानृते कुरुषे भावं
कच्चिद्धर्मे प्रवर्तसे । मातापित्रोश्च ते वृत्तिः कच्चित्पार्थ न सीदति ६
कच्चित्ते गुरवः सर्वे वृद्धा वैद्याश्च पूजिताः । कच्चिन्न कुरुषे भावं पार्थ
पापेषु कर्मसु ७ सुकृतं प्रतिकर्तुं च कच्चिद्धातुं च दुष्कृतम् । यथा-
न्यायं कुरुश्रेष्ठ जानासि न विकत्थसे ८ यथार्हं मानिताः कच्चित्त्वया
नन्दन्ति साधवः । वनेष्वपि वसन्कच्चिद्धर्ममेवानुवर्तसे ९ कच्चिद्धौम्य-
स्त्वदाचारैर्न पार्थ परितप्यते । दानधर्मतपःशौचैरार्जवेन तितिक्षया १०
पितृपैतामहं वृत्तं कच्चित्पार्थानुवर्तसे । कच्चिद्राजर्षियातेन पथा गच्छसि
पाण्डव ११ स्वे स्वे किल कुले जाते पुत्रे नप्तरि वा पुनः । पितरः

नकुलसहदेव त्या राजर्षीकडे येऊन त्याला नमस्कार केल्यावर त्याच्या सभोवतीं उभे राहिले २. त्याप्रमाणें धर्म जाणणारे पांडवांचे उपाध्याय धौम्यही व्रताचरणाविषयीं प्रख्यात असलेल्या त्या ऋषीला न्यायपूर्वक नमस्कार करून त्यांचे समीप बसले ३. नंतर त्या धर्मज्ञ आर्ष्टिषेणमुनींनें दिव्य दृष्टीच्या योगानें हे कुरुश्रेष्ठ पांडुराजाचे मुलगे आहेत असें जाणून त्यांना " बसा " ह्मणून सांगितलें ४ आणि त्या महातपस्वी ऋषीनें कौरवांमध्यें श्रेष्ठ असलेल्या धर्मराजाचें पूजन करून भ्रात्यांसहवर्तमान बसलेल्या त्याला कुशल प्रश्न विचारिला कीं ५, हे पार्था, असत्याचे ठिकाणीं तुझ्या अंतःकरणाची प्रवृत्ति न होऊन तूं धर्मानें वागत आहेस नां ? आईबापाच्या आज्ञापालनरूप व्रताचा तुझ्या हातून भंग होत नाहीं नां ? ६ गुरु, सर्व वृद्ध व विद्वान् लोक ह्यांचें तूं पूजन करितोस नां? हे पृथातनया धर्मराजा, पापकर्मांचे ठिकाणीं तुझ्या अंतःकरणाची प्रवृत्ति होत नाहीं नां? ७. पुण्यसंपादन करून दुष्कृत्यांचा त्याग करावा असें न्यायपूर्वक समजून घेऊन, हे कुरुवंशजश्रेष्ठा, त्याविषयीं तूं बडबड करीत नाहींस नां ? ८. साधुजनांचें योग्य रीतीनें संमानन केलें असतां ते आनंदित होतात नां? आणि वनामध्यें राहूनही तूं धर्मानेंच वर्तन करितोस नां? ९. दान, धर्म, तप, शुद्धता, सरळपणा आणि द्वंद्वसहिष्णुत्वप्रभृति तुझ्या आचारांच्या योगानें, हे धर्मराजा, धौम्य ऋषींना ताप होत नाहीं नां ? १० तुझा पिता व पितामहप्रभृति पूर्वजांनीं केलेल्या वर्तनाप्रमाणेंच तूं वर्तन करितोस नां ? आणि, हे पांडुत-

पितृलोकस्थाः शोचन्ति च हसन्ति च १२ किं तस्य दुष्कृतेस्माभिः संप्राप्तव्यं भविष्यति । किंचास्य सुकृतेस्माभिः प्राप्तव्यमिति शोभनम् १३ पिता माता तथैवाग्निर्गुरुरात्मा च पञ्चमः । यस्यैते पूजिताः पार्थ तस्य लोकावुभौ जितौ १४ युधिष्ठिर उवाच ॥ भगवान्नार्य माहैतद्यथावद्धर्मनिश्चयम् । यथाशक्ति यथान्यायं क्रियते विधिवन्मया १५ आर्ष्टिषेण उवाच ॥ अब्भक्षा वायुभक्षाश्च प्लवमाना विहायसा । जुषन्ते पर्वतश्रेष्ठमृषयः पर्वसंधिषु १६ कामिनः सह कान्ताभिः परस्परमनुव्रताः । दृश्यन्त शैलशृङ्गस्था यथा किंपुरुषा नृप १७ अरजांसि च वासांसि वसानाः कौशिकानि च । दृश्यन्ते बहवः पार्थ गन्धर्वाप्सरसां गणाः १८ विद्याधरगणाश्चैव स्रग्विणः प्रियदर्शनाः । महोरगगणाश्चैव सुपर्णाश्चोरगादयः १९ अस्य चोपरि शैलस्य श्रूयते पर्वसंधिषु । भेरीपणवशङ्खानां मृदङ्गानां च निःस्वनः २० इहस्थैरेव तत्सर्वं श्रोतव्यं भरतर्षभाः । न कार्या वः कथंचित्स्यात्तत्राभिगमने मतिः २१

नया, राजर्षि ज्या मार्गानें गेले त्याच मार्गानें तंही जातोस नां? ११. पितृलोकामध्यें असलेले पितर आपआपल्या कुलामध्यें पुत्र किंवा नातु वाईट झाला असतां शोक व चांगला झाला असतां हर्ष पावतात १२ आणि (ह्मणतात कीं,) त्याच्या दुष्कर्माचरणानें आह्मांस काय भोगावें लागेल आणि त्याच्या पुण्यकर्माच्या योगानें कोणतें सुख प्राप्त होईल ! ! १३. हे धर्मराजा, पिता, माता, अग्नि, गुरु व त्याचप्रमाणें पांचवा आत्मा ह्यांचें ज्यानें पूजन केलें त्यानेंच उभय लोक प्राप्त करून घेतले असें होतें १४. युधिष्ठिर ह्मणतो:—हे आर्या, हे भगवन्, आपण सांगितल्याप्रमाणें यथाशक्ति, यथान्याय व विधिपूर्वक असें मी धर्माचरण करितों १५. आर्ष्टिषेण ह्मणतात:—हे धर्मराजा, उदकाचें प्राशन करून रहाणारे, वायुभक्षण करून राहणारे व आकाशमार्गानें संचार करणारे श्रेष्ठ ऋषि ह्या पर्वतश्रेष्ठाचे ठिकाणीं अमावास्या व पौर्णिमेला येत असतात १६. परस्परांवर प्रेम करणारे कामीजन आपल्या स्त्रियांसहवर्तमान ह्या पर्वतशृंगावर बसलेले तुझ्या दृष्टीस पडतील व त्याचप्रमाणें १७ मलरहित वस्त्रें परिधान केलेले व रेशमीं वस्त्रें नेसलेले असे किंपुरुष, गंधर्व आणि अप्सरा ह्यांचे शेंकडों समुदाय तूं अवलोकन करशील १८. कंठामध्यें माला धारण करणारे व दर्शन होतांच प्रेम उत्पन्न करणारे विद्याधरांचें समुदाय, मोठमोठे उरगांचे समुदाय आणि सुपर्ण व सर्पादिक तुझ्या दृष्टीस पडतील १९. ह्या पर्वताचे ठिकाणीं पर्वसंधीला भेरी, पणव, शंख व मृदंग ह्यांचा ध्वनि ऐकूं येतो २०. परंतु, तो, हे

न चाप्यतः परं शक्यं गन्तुं भरतसत्तमाः । विहारो ह्यत्र देवाना-
ममानुषगतिस्तु सा २२ ईषच्चपलकर्माणं मनुष्यमिह भारत । द्विषन्ति
सर्वभूतानि ताडयन्ति च राक्षसाः २३ अस्यातिक्रम्य शिखरं कैलासस्य
युधिष्ठिर । गतिः परमसिद्धानां देवर्षीणां प्रकाशते २४ चापलादिह
गच्छन्तं पार्थ यानमितः परम् । अयःशूलादिभिर्घ्नन्ति राक्षसाः शत्रुसू-
दन २५ अप्सरोभिः परिवृतः समृद्ध्या नरवाहनः । इह वैश्रवणस्तात
पर्वसंधिषु दृश्यते २६ शिखरस्थं समासीनमधिपं यक्षरक्षसाम् । प्रेक्षन्ते
सर्वभूतानि भानुमन्तमिवोदितम् २७ देवदानवसिद्धानां तथा वैश्रवणस्य
च । गिरेः शिखरमुद्यानमिदं भरतसत्तम २८ उपासीनस्य धनदं तुम्बुरोः
पर्वसंधिषु । गीतसामस्वनस्तात श्रूयते गन्धमादने २९ एतदेवंविधं चित्र-
मिह तात युधिष्ठिर । प्रेक्षन्ते सर्वभूतानि बहुशः पर्वसंधिषु ३० भुञ्जाना
मुनिभोज्यानि रसवन्ति फलानि च । वसध्वं पाण्डवश्रेष्ठा यावदर्जुनदर्श-
नात् ३१ न तात चपलैर्भाव्यमिहप्राप्तैः कथञ्चन । उषित्वेह यथाकामं

भरतश्रेष्ठा, येथें असूनच सर्वांनीं श्रवण करावा; तेथें जाण्याचें मनामध्यें केव्हाही कोणीं आणू नये २१. हे भरतश्रेष्ठहो, आतां ह्या पलीकडे जाण्याला तुह्मी समर्थ नाहीं. कारण, त्याच्या पलीकडे देवांचें क्रीडास्थान असल्यामुळें मनुष्यांना त्या ठिकाणीं जातां यावयाचें नाहीं २२. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, राक्षस व त्याचप्रमाणें सर्व प्राणी चंचल मनुष्याचा द्वेष करितात २३. हे युधिष्ठिरा, ह्या कैलासाचें हें शिखर ओलांडून गेलास ह्मणजे परमसिद्ध व देवर्षि ह्यांचा प्रकाशित होणारा मार्ग तुला दिसूं लागेल २४. हे शत्रुदमन करणाऱ्या धर्मराजा, जो कोणी मनुष्य आपल्या स्वभावाच्या चंचलतेमुळे ह्यापुढें मार्गक्रमण करून जातो त्याला राक्षस लोखंडाच्या शूलांनीं प्रहार करितात २५. बा धर्मराजा, पालखीमध्यें बसणारा, अप्सरांनीं परिवेष्टित झालेला व अतिशय संपन्न असलेला कुबेर पर्वकाली येथें येत असतां २६ आणि त्या यक्षराक्षसांच्या अधिपतीला सर्व प्राणी उदय पावलेल्या सूर्याप्रमाणें ह्या पर्वतशिखरावर बसलेला अवलोकन करितात २७. हे भरतवंशजश्रेष्ठा धर्मराजा, देव, दानव, सिद्ध व त्याचप्रमाणें कुबेर ह्या सर्वांचें हें पर्वताचें शिखर क्रीडास्थान आहे २८. पर्वकालीं धनदाची उपासना करणाऱ्या तुंबरूच्या गाण्याचा व साम ह्मणण्याचा ध्वनि, बा धर्मराजा, ह्या गंधमादन पर्वतावर ऐकूं येतो. २९. बा युधिष्ठिरा, पर्वसंधीला हें आणि ह्यासारिखीं दुसरीं शेंकडों अद्भुत कृत्यें ह्याठिकाणीं सर्व प्राणी अवलोकन करितात ३०. हे पांडवश्रेष्ठा, अर्जुन येईतोंपर्यंत मुनींना भक्षण करण्यास योग्य व रसभरित अशीं फळें भक्षण

यथाश्रद्धं विहृत्य च। ततःशस्त्रजितां तात पृथिवीं पालयिष्यसि ३२
[६१५४] इति श्रीमहाभारते०मारण्यके पर्वणि यक्षयुद्धपर्वणि आर्ष्टिषेण-
युधिष्ठिरसंवादे ऊनषष्ठ्यधिकशततमोऽध्यायः॥ १५९ ॥

जनमेजय उवाच॥ आर्ष्टिषेणाश्रमे तस्मिन्मम पूर्वपितामहाः। पाण्डोः
पुत्रा महात्मानः सर्वे दिव्यपराक्रमाः १ कियन्तं कालमवसन्पर्वते गन्ध-
मादने। किं च चक्रुर्महावीर्याः सर्वेऽतिबलपौरुषाः २ कानि चाभ्यवहा-
र्याणि तत्र तेषां महात्मनाम्। वसतां लोकवीराणामासंस्तद्ब्रूहि सत्तम ३
विस्तरेण च मे शंस भीमसेनपराक्रमम्। यद्यच्चक्रे महाबाहुस्तस्मिन्हैम-
वते गिरौ ४ न खल्वासीत्पुनर्युद्धं तस्य यक्षैर्द्विजोत्तम। कच्चित्समागम-
स्तेषामासीद्वैश्रवणस्य च ५ तत्र ह्यायाति धनद आर्ष्टिषेणो यथाब्रवीत्।
एतदिच्छाम्यहं श्रोतुं विस्तरेण तपोधन। न हि मे शृण्वतस्तृप्तिरस्ति तेषां
विचेष्टितम् ६ वैशंपायन उवाच॥ एतदात्महितं श्रुत्वा तस्याप्रतिमते-
जसः। शासनं सततं चक्रुस्तथैव भरतर्षभाः ७ भुञ्जाना मुनिभोज्यानि

करून तुह्मी येथेंच रहा ३१. बा वत्सा, येथें आलल्या मनुष्यानं चापल्य कधींही धारण करूं नये. ह्यास्तव, हे धर्मराजा, वाटेल तितके दिवस येथें राहून यथेच्छ विहार केल्यानंतर शस्त्राच्या बलावर जिंकिलेल्या पृथ्वीचें तूं पालन करशील ३२. ह्याप्रमाणें०वन०यक्षयुद्ध० आर्ष्टिषेणयुधिष्ठिरसंवादाविषयीं एकशें एकुणसाठावा अध्याय समाप्त झाला ॥ १५९ ॥

जनमेजय ह्मणतोः—त्या गंधमादन पर्वतावर आर्ष्टिषेण ऋषीच्या आश्रमामध्ये पंडुराजाचे मुलगे दिव्य पराक्रम करणारे महात्मे माझे पितामह १ त्या गंधमादनपर्वतावर किती दिवस राहिले आणि त्या अत्यंत बलवान् व पराक्रमी महावीरांनीं तेथें काय केलें? २. त्याचप्रमाणें हे पुरुषश्रेष्ठा, ह्या लोकामध्यें महावीर असलेल्या त्या महात्म्यांनीं वास्तव्य करण्याकरितां कोणकोणत्या ठिकाणीं पर्णकुटिका केल्या (हें मला आपण कथन करा)३ आणि त्या हैमवतपर्वतावर असतांना आजानुबाहु भीमसेनानें जो जो पराक्रम केला त्याचेंही वृत्त विस्तारेंकरून मला निवेदन करा ४. हे द्विजश्रेष्ठा, आर्ष्टिषेणाच्या सांगण्याप्रमाणें कुबेर तर तेथें येतच होता. परंतु पुनरपि यक्षाचें आणि त्याचें युद्ध झालें किंवा नाहीं व त्यांची आणि विश्रवणाचा मुलगा कुबेर ह्याची गांठ पडली किंवा नाहीं ५ हें सर्व सविस्तर श्रवण करण्याची, हे तपोधना, माझी इच्छा आहे. त्यांचें चरित्र श्रवण करितां करितां माझी तृप्ति होत नाहीं ६. वैशंपायन सांगतातः—पूर्वीं सांगितल्याप्रमाणें आपलें हित करणाऱ्या अप्रतिम तेजस्वी आर्ष्टिषेणाचें भाषण श्रवण करून ते भरतश्रेष्ठ पांडवही त्याच्याच आज्ञेप्रमाणें वर्तन करीत असत ७. मुनींनीं भक्षण करण्यास योग्य

रसवन्ति फलानि च। शुद्धबाणहतानां च मृगाणां पिशितान्यपि ८ मेध्यानि
हिमवत्पृष्ठे मधूनि विविधानि च। एवं ते न्यवसंस्तत्र पाण्डवा भरतर्षभाः ९
तथा निवसतां तेषां पञ्चमं वर्षमभ्यगात्। शृण्वतां लोमशोक्तानि वाक्यानि
विविधान्युत १० कृत्यकाल उपस्थास्य इति चोक्त्वा घटोत्कचः। राक्षसैः
सह सर्वैश्च पूर्वमेव गतः प्रभो ११ आर्ष्टिषेणाश्रमे तेषां वसतां वै महा-
त्मनाम्। अगच्छन्बहवो मासाः पश्यतां महदद्भुतम् १२ तैस्तत्र विह-
रद्भिश्च रममाणैश्च पाण्डवैः। प्रीतिमन्तो महाभागा मुनयश्चारणास्तथा १३
आजग्मुः पाण्डवान्द्रष्टुं शुद्धात्मानो यतव्रताः। ते तैः सह कथां चक्रु-
र्दिव्यां भरतसत्तमाः १४ ततः कतिपयाहस्य महाह्रदनिवासिनम्।
ऋद्धिमन्तं महानागं सुपर्णः सहसाहरत् १५ प्राकम्पत महाशैलः प्रामृ-
द्यन्त महाद्रुमाः। ददृशुः सर्वभूतानि पाण्डवाश्च तदद्भुतम् १६ ततः
शैलोत्तमस्याग्रात्पाण्डवान्प्रति मारुतः। अवहत्सर्वमाल्यानि गन्धवन्ति
शुभानि च १७ तत्र पुष्पाणि दिव्यानि सुहृद्भिः सह पाण्डवाः। ददृशुः

असलेली रसभरित अशी फळें आणि शुद्ध (विषरहित) बाणानीं मारलेल्या मृगांचीं मांसें आणि हिमाचलाच्या पृष्ठभागावर असलेले शुद्ध मद हीं भक्षण करून ते भरतवंशजश्रेष्ठ पांडव त्या ठिकाणीं वास्तव्य करीत होते ८,९. ह्याप्रमाणें लोमशानीं सांगितलेल्या नानाप्रकारच्या कथा श्रवण करीत असतां त्यांचीं चार वर्षें भरून पांचवें वर्ष सुरू झालें १०. प्रसंग पडला असतां मी आपल्या सेवेला येईन असें सांगून घटोत्कच त्या सर्व राक्षसांसहवर्तमान, हे प्रभो, पूर्वींच निघून गेला होता ११. ह्याप्रमाणें महात्मे पांडव त्या आर्ष्टिषेणाच्या आश्रमाचे ठिकाणीं वास्तव्य करीत असतां पर्वतावरील अद्भुत चमत्कार अवलोकन करितां करितां त्यांचे बरेच महिने निघून गेले १२. ते पांडव, त्या ठिकाणीं विहार करून आपल्या बंधूसहवर्तमान रमत असल्यामुळें महाभाग्यवान् मुनि व चारण ह्यांना अत्यंत आनंद होत असे १३ आणि ते शुद्धात्मे व दृढ व्रत धारण करणारे त्या पांडवांकडे येऊन त्यांना दिव्य कथा सांगत असत १४. तदनंतर एके वेळीं शेंकडों दिवसपर्यंत महाह्रदामध्यें रहाणाऱ्या ऋद्धिमंत नांवाच्या मोठ्या नागाचें गरुडानें एकाएकीं हरण केलें १५. तेव्हां तो मोठा पर्वत थरथर कांपूं लागला आणि वृक्षही कांपूं लागले असतां तो अद्भुत प्रकार पांडव व सर्व प्राणी ह्यांनीं अवलोकन केला १६. नंतर त्या पर्वतश्रेष्ठाच्या शिखरापासून सुगंधयुक्त व शुभकारक अशीं सर्व प्रकारचीं पुष्पें त्या पांडवांकडे वाऱ्यानें वाहून आणिलीं १७. तीं दिव्य व पंचरंगीं असलेलीं पुष्पें सुहृदांसहवर्तमान पांडव व यशस्विनी द्रौपदी ह्यांनीं

पञ्चवर्णानि द्रौपदी च यशस्विनी १८ भीमसेनं ततः कृष्णा काले वच-
नमब्रवीत् । विविक्ते पर्वतोद्देशे सुखासीनं महाभुजम् १९ सुपर्णानिल-
वेगेन श्वसनेन महाबलात् । पञ्चवर्णानि पात्यन्ते पुष्पाणि भरतर्षभ २०
प्रत्यक्षं सर्वभूतानां नदीमश्वरथां प्रति । खाण्डवे सत्यसंधेन भ्रात्रा तव
महात्मना २१ गन्धर्वोरगरक्षांसि वासवश्च निवारितः । हता माया-
विनश्चोग्रा धनुः प्राप्तं च गाण्डिवम् २२ तवापि सुमहत्तेजो महद्बाहु-
बलं च ते । अविषह्यमनाधृष्यं शक्रतुल्यपराक्रम २३ त्वद्बाहुबलवेगेन
त्रासिताः सर्वराक्षसाः । हित्वा शैलं प्रपद्यन्तां भीमसेन दिशो दश २४
ततः शैलोत्तमस्याग्रं चित्रमाल्यधरं शिवम् । व्यपेतभयसंमोहाः पश्यन्तु
सुहृदस्तव २५ एवं प्रणिहितं भीम चिरात्प्रभृति मे मनः । द्रष्टुमिच्छामि
शैलाग्रं त्वद्बाहुबलपालिता २६ ततः क्षिप्तमिवात्मानं द्रौपद्या स परन्तपः ।
नामृष्यत महाबाहुः प्रहारमिव सद्गवः २७ सिंहर्षभगतिः श्रीमानुदारः

अवलोकन करून १८ पर्वताचे ठिकाणीं एकांतामध्यें स्वस्थ रीतीनें बसलेल्या आजानु-
बाहु भीमसेनाला द्रौपदी—ही बोलण्याची वेळ आहे असें समजून—ह्मणाली १९ " हे
भरतवंशजश्रेष्ठा भीमसेना, गरुडाच्या पंखापासून उत्पन्न झालेल्या वाऱ्यानें मोठ्या
वेगानें हीं पांच वर्णांचीं फुलें झाडांवरून पाडून आणिलीं आहेत २०. पूर्वीं अश्वरथा-
नदीचे तटाकीं खांडव वनामध्यें सर्व प्राण्यांचे समक्ष महात्म्या सत्यप्रतिज्ञ भ्रात्या
अर्जुनानें २१ गंधर्व, उरग, राक्षस व प्रत्यक्ष इंद्र ह्यांचें निवारण करून व भयंकर अशा
मायावी राक्षसांचा नाश करून गांडीव नांवाचें धनुष्य प्राप्त करून घेतलें २२. हे
इंद्राप्रमाणें पराक्रम करणाऱ्या भीमसेना, तूंही सहन करण्यास व युद्ध करण्यास
कठिण असून तुझें तेज व बाहुबलही अतुल आहे २३. तस्मात्, तुझ्या बाहुबलाच्या
वेगानें त्रस्त झालेले सर्व राक्षस त्या पर्वताचा त्याग करून, हे भीमसेना, दशदिशेला
जावोत २४ व नंतर ते गेले असतां चित्रविचित्र पुष्पांना धारण करणाऱ्या व कल्याण-
प्रद अशा ह्या पर्वतश्रेष्ठाच्या शिखराला, भीति आणि मोह नाहींसा झाल्यामुळें,
तुझे सुहृद् अवलोकन करोत २५. हे भीमसेना, ही गोष्ट पुष्कळ दिवसांपासून
माझ्या मनांत घोळत आहे. तस्मात्, तुझ्या बाहुबलानें रक्षित असलेली मी ह्या पर्वत-
शिखराला अवलोकन करण्याची इच्छा करितें २६. ह्याप्रमाणें शत्रुदमन करणाऱ्या
भीमसेनानें आपल्याला टोंचून केलेलें द्रौपदीचें भाषण श्रवण केल्यावर पाणीदार
बैलाला जसा प्रहार सहन होत नाहीं त्याप्रमाणें त्या महाबाहूला तें सहन न होऊन२७
सिंहगतीनें चालणारा, श्रीमान्, उदार, सुवर्णवर्ण, विचारी, बलवान्, गर्विष्ठ, मानी,

कनकप्रभः । मनस्वी बलवान्हृष्टो मानी शूरश्च पाण्डवः २८ लोहि-
ताक्षः पृथुव्यंसो मत्तवारणविक्रमः । सिंहदंष्ट्रो बृहत्स्कन्धः शालपोत
इवोद्गतः २९ महात्मा चारुसर्वाङ्गः कंबुग्रीवो महाभुजः । रुक्मपृष्ठं धनुः
खड्गं तूणांश्चापि परामृशत् ३० स केसरीव चोत्सिक्तः प्रभिन्न इव
वारणः । व्यपेतभयसंमोहः शैलमभ्यपतद्बली ३१ तं मृगेन्द्रमिवायान्तं
प्रभिन्नमिव वारणम् । ददृशुः सर्वभूतानि बाणकार्मुकधारिणम् ३२
द्रौपद्या वर्धयन्हर्षं गदामादाय पाण्डवः । व्यपेतभयसंमोहः शैलराजं समा-
श्रितः ३३ न ग्लानिर्न च कातर्यं न वैक्लव्यं न मत्सरः । कदाचिज्जुषते
पार्थमात्मजं मातरिश्वनः ३४ तदेकायनमासाद्य विषमं भीमदर्शनम् ।
बहुतालोच्छ्रयं शृङ्गमारुरोह महाबलः ३५ सकिन्नरमहानागमुनिगन्धर्व-
राक्षसान् । हर्षयन्पर्वतस्याग्रमारुह्य स महाबलः ३६ ततो वैश्रवणावासं ददर्श
भरतर्षभः । काञ्चनैः स्फाटिकैश्चैव वेश्मभिः समलंकृतम् ३७ प्राकारेण

शूर, २८ रक्तवर्ण नेत्र असलेला, उंच उच खांदे असलेला, मत्त झालेल्या हत्तीप्रमाणें पराक्रम करणारा, सिंहाप्रमाणें दाढा असलेला, खांदे मोठे असलेला व शालवृक्षाच्या जोमांत असलेल्या रोपट्याप्रमाणें असलेला २९, सर्व अवयवांनीं सुंदर असलेला, कंबुग्रीव, व अजानुबाहु महात्म्या भीमसेनानें सोन्याच्या पाठीचें धनुष्य, खड्ग आणि भाते हातांमध्यें धारण केले ३० आणि त्या भाषणानें क्रुद्ध झाल्यामुळें सिंहासारिखा व गंड-स्थलांतून मदस्राव होणाऱ्या गजासारिखा असलेला तो भीमसेन निर्भय अंतःकरणानें मनांत कशाचीही दर्द न बाळगितां त्या पर्वतावर चढला ३१. तेव्हां हातामध्यें धनुष्य व बाण धारण केलला तो भीमसेन गंडस्थलांतून मदस्राव होणाऱ्या हत्तीसारिखा व सिंहासारिखा सर्व प्राण्यांना दिसला ३२. द्रौपदीच्या आनंदाची वृद्धी करणारा तो पांडुनंदन भीम-सेन भय व मोह ह्यांनीं रहित असल्यामुळें त्या पर्वतावर खुशाल चढला ३३. अशा रीतीनें पर्वतावर चढत असतां त्या पवनात्मज भीमसेनाला थकवा, भीति, उदासीनता आणि मत्सर हीं मुळींच उत्पन्न झालीं नाहींत ३४. नंतर डावीकडे व उजवीकडे पा-ऊलही टाकण्याला जागा नसलेल्या अशा भयंकर पाऊलवाटेनें मार्गक्रमण करीत करीत शेंकडों ताड उंच असलेल्या त्या महापर्वताच्या शिखरावर तो महाबलाढ्य भीमसेन चढला ३५. तो अतिसामर्थ्यवान् भीमसेन किन्नर, महानाग, मुनि, गंधर्व व राक्षस ह्यांना आनंद देत देत त्या पर्वताच्या शिखरावर चढला ३६ आणि तेथून सुवर्णाच्या व स्फटिकाच्या गृहांनीं शोभिवंत असलेलें वैश्रवणाचें वसतिस्थान त्या भरतवंशज भीमसेनानें अवलोकन केलें ३७. त्याला चोहोंकडून सुवर्णाचा कोट

परिक्षिप्तं सौवर्णेन समंततः। सर्वरत्नद्युतिमता सर्वोद्यानवता तथा ३८
शैलादभ्युच्छ्रयवता चयाट्टालकशोभिना। द्वारतोरणनिर्व्यूहध्वजसंवाहशो-
भिना ३९ विलासिनीभिरत्यर्थं नृत्यन्तीभिः समन्ततः। वायुना धूयमा-
नाभिः पताकाभिरलंकृतम् ४० धनुष्कोटिमवष्टभ्य वक्रभावेन बाहुना।
पश्यमानः स खेदेन द्रविणाधिपतेः पुरम् ४१ मोदयन्सर्वभूतानि गन्ध-
मादनसंभवः। सर्वगन्धवहस्तत्र मारुतः सुसुखो ववौ ४२ चित्रा विवि-
धवर्णाभाश्चित्रमञ्जरिधारिणः। अचिन्त्या विविधास्तत्र द्रुमाः परमशो-
भिनः ४३ रत्नजालपरिक्षिप्तं चित्रमाल्यविभूषितम्। राक्षसाधिपतेः
स्थानं ददृशे भरतर्षभः ४४ गदाखड्गधनुष्पाणिः समभित्यक्तजीवितः।
भीमसेनो महाबाहुस्तस्थौ गिरिरिवाचलः ४५ ततः शंखमुपाध्मासी-
द्द्विषतां लोमहर्षणम्। ज्याघोषतलशब्दं च कृत्वा भूतान्यमोहयत् ४६
ततः प्रहृष्टरोमाणस्तं शब्दमभिदुद्रुवुः। यक्षराक्षसगन्धर्वाः पाण्डवस्य समी-
पतः ४७ गदापरिघनिस्त्रिंशशूलशक्तिपरश्वधाः। प्रगृहीता व्यरोचंत

असून उत्कृष्ट उत्कृष्ट उपवनें व उत्तम प्रकारचा प्रकाश पाडणारीं रत्नें ह्यांनीं तें शोभिवंत झालेलें होतें ३८. त्या पर्वतावरून त्या वैश्रवणाच्या वसतिस्थानाच्या कोटाचा पायथा व शोभा देणाऱ्या उंच उंच गच्च्या दिसत असून दरवाज्यावर लाविलेलीं तोरणें व हस्तिदंताचे ध्वज ह्यांनीं तें शोभिवत झालेलें होतें ३९. तेथें आसमंताद्भागीं विलासिनींचे नाच चाललेले असून वायूनें फडफडणाऱ्या पताकांनीं तें सुशोभित झालें होतें ४०. धनुष्याचें एक टोक जमीनीवर टेकल्यामुळें थोडासा वांकडा होऊन (आपल्या संपत्तीचें स्मरण झाल्यामुळें) खिन्न झालेला भीमसेन त्या धनाधिपति कुबेराच्या भुवनाकडे अवलोकन करूं लागला असतां ४१ सर्व भूतांना आनंद देणारा, गंधमादन पर्वतावर उत्पन्न झालेला व सर्व प्रकारच्या सुगंधाला वाहून आणणारा असा वारा सुटला ४२. तेथें चमत्कारिक व निरनिराळ्या वर्णांचे, चित्रविचित्र मंजिऱ्या आलेले व चिंतन करितां न येणारे असे तऱ्हेतऱ्हेचे शेंकडों वृक्ष शोभायमान होत होते ४३. ह्याप्रमाणें रत्नांच्या झालरी लाविलेलें व सुगंधयुक्त पुष्पांच्या माला अडकविलेलें असें त्या राक्षसाधिपतीचें वसतिस्थान त्यानें अवलोकन केलें ४४ आणि गदा, खड्ग व धनुष्य हातांमध्यें घेतलेला व जिवावर उदार झालेला आजानुबाहु भीमसेन तेथें पर्वताप्रमाणें अचल उभा राहिला ४५. नंतर शत्रूच्या अंगावर रोमांच उभे करणारा असा शंखाचा ध्वनि करून सर्व प्राणिमात्र गांगरून जातील अशा रीतीनें तो प्रत्यंचेचा टणत्कार करूं लागला ४६ तेव्हां तो ध्वनि श्रवण करितांच आनंदानें अंगावर रोमांच उभे राहिलेले यक्ष,

यक्षराक्षसबाहुभिः ४८ ततः प्रववृते युद्धं तेषां तस्य च भारत । तैः प्रयुक्तान्महामायैः शूलशक्तिपरश्वधान् ४९ भल्लैर्भीमः प्रचिच्छेद भीमवेगतरैस्ततः । अंतरिक्षगतानां च भूमिष्ठानां च गर्जताम् ५० शरैर्विव्याध गात्राणि राक्षसानां महाबलः । सा लोहितमहावृष्टिरभ्यवर्षन्महाबलम् ५१ गदापरिघपाणीनां रक्षसां कायसंभवाम् । कायेभ्यः प्रच्युता धारा राक्षसानां समन्ततः ५२ भीमबाहुबलोत्सृष्टैरायुधैर्यक्षरक्षसाम् । विनिकृत्तानि दृश्यन्ते शरीराणि शिरांसि च ५३ प्रच्छाद्यमानं रक्षोभिः पाण्डवं प्रियदर्शनम् । ददृशुः सर्वभूतानि सूर्यमभ्रगणैरिव ५४ स रश्मिभिरिवादित्यः शरैररिनिघातिभिः सर्वानाच्छन्महाबाहुर्बलवान्सत्यविक्रमः ५५ अभितर्जयमानाश्च रुवन्तश्च महारवान् । न मोहं भीमसेनस्य ददृशुः सर्वराक्षसाः ५६ यक्षा विकृतसर्वाङ्गा भीमसेनभयार्दिताः । भीममार्तस्वरं चक्रुर्विप्रकीर्णमहायुधाः ५७ उत्सृज्यंत गदाशूलानसिशक्तिपरश्वधान् ।

राक्षस व गधर्व हे धावत धांवत त्या भीमसेनाच्या जवळ आले ४७. ते यक्ष व राक्षस, आपल्या हातांमध्ये गदा, अडसर, निस्त्रिंश, शूल, शक्ति व परश्वधप्रभृति आयुधें धारण केल्यामुळें, फारच शोभत होते ४८. हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, नंतर त्या राक्षसांचें व भीमसेनाचें युद्ध सुरू होऊन त्या महामायावी असुरांनीं सोडिलेलीं शूल, शक्ति व परश्वध ह्यांना ४९ भीमसेनानें आपल्या वेगवान् असलेल्या बाणांनीं तोडून टाकिलं आणि क्षणांत आकाशामध्ये व क्षणांत पृथ्वीतलावर गर्जना करणाऱ्या ५० राक्षसांना महाबलाढ्य भीमसेनानें मर्माचे ठिकाणीं प्रहार केला असतां त्या पराक्रमी भीमसेनाच्या अंगावर ५१ गदा व परिघ धारण केलेल्या राक्षसांच्या शरीरांतील रुधिराची वृष्टि झाली व त्यामुळें चोहोंकडील प्रदेश भिजून गेला ५२. भीमाच्या बाहुबलानें सुटलेल्या आयुधांच्या योगेंकरून यक्ष व राक्षस ह्यांचीं शरीरें व मस्तकें तुटून पडलेलीं दिसूं लागलीं ५३. तों इतक्यात सुंदर असलेल्या भीमसेनाला राक्षसांनीं एकाएकीं शस्त्रवृष्टीनें दिसेनासें केलें व त्यामुळें अभ्रगणांनीं आच्छादित झालेल्या सूर्याप्रमाणें तो सर्वांना दिसूं लागला ५४. नंतर किरणांनीं युक्त असलेल्या सूर्याप्रमाणें दिसणाऱ्या, सत्यपराक्रमी, आजानुबाहु व बलाढ्य भीमसेनानें शत्रुवध करण्याला समर्थ अशा आपल्या बाणांनीं त्या राक्षसांना आच्छादित करून सोडिलें ५५. तेव्हां भीमसेनानें भिववून सोडिलेल्या व म्हणूनच मोठ्यानें ओरडूं लागलेल्या त्या सर्व राक्षसांनीं, भीमसेनाला मोह झाला नाहीं असें अवलोकन करून ५६ भीमसेनाच्या भयानें गाळण उडालेले, सर्व गात्रें तुटून गेलेले व मोठमोठालीं शस्त्रें

दक्षिणां दिशमाजग्मुस्त्रासिता दृढधन्वना ५८ तत्र शूलगदापाणिर्व्यूढोरस्को महाभुजः । सखा वैश्रवणस्यासीन्मणिमान्नाम राक्षसः ५९ अदर्शयदधीकारं पौरुषं च महाबलः । स तान्दृष्ट्वा परावृत्तान्स्मयमान इवाब्रवीत् ६० एकेन बहवः संख्ये मानुषेण पराजिताः । प्राप्य वैश्रवणावासं किं वक्ष्यथ धनेश्वरम् ६१ एवमाभाष्य तान्सर्वानभ्यवर्तत राक्षसः । शक्तिशूलगदापाणिरभ्यधावत्स पाण्डवम् ६२ तमापतन्तं वेगेन प्रभिन्नमिव वारणम् । वत्सदन्तैस्त्रिभिः पार्श्वे भीमसेनः समार्दयत् ६३ मणिमानपि संक्रुद्धः प्रगृह्य महतीं गदाम् । प्राहिणोद्भीमसेनाय परिगृह्य महाबलः ६४ विद्युद्रूपां महाघोरामाकाशे महतीं गदाम् । शरैर्बहुभिरानर्च्छद्भीमसेनः शिलाशितैः ६५ प्रत्यहन्यन्त ते सर्वे गदामासाद्य सायकाः । न वेगं धारयामासुर्गदावेगस्य वेगिताः ६६ गदायुद्धसमाचारं बुध्यमानः स वीर्यवान् । व्यंसयामास तं तस्य प्रहारं भीमविक्रमः ६७ ततः शक्तिं महाघोरां रुक्मद-

---

धारण करणारे ते राक्षस भयंकर व आर्त अशा स्वरानें ओरडूं लागले ५७ ह्याप्रमाणें दृढ धनुष्य धारण करणाऱ्या भीमसेनानें त्यांना त्रास दिला असतां ते गदा, शूल, खड्ग, शक्ति व परश्वधप्रभृति आयुधें टाकून देऊन दक्षिण दिशेकडे पळून जाऊं लागले ५८. कारण, तेथें महाभुज, विशाल वक्षस्थल असलेला, शूल व गदा हस्तामध्यें धारण करणारा मणिमान् नामक राक्षस कुबेराचा मित्र राहत होता ५९. त्या महाबलाढ्य मणिमानाचा अधिकार त्या राक्षसांना माहीत असल्यामुळें ते राक्षस त्याजकडे गेले असतां परावृत्त झालेल्या त्यांना पाहून तो गर्वानें त्यांना ह्मणाला ६० "एकट्या मनुष्यानें रणांगणामध्यें पराजित केलेले तुह्मी कुबेराच्या घरीं जाऊन त्या धनाधिपतीला काय सांगाल ?" ६१ ह्याप्रमाणें त्या सर्वांशीं भाषण केल्यावर शक्ति, शूल व गदा हीं आयुधें हातांमध्यें धारण करून तो पांडवांशीं युद्ध करण्याकरितां प्राप्त झाला असतां ६२ मदोन्मत्त झालेल्या हत्तीप्रमाणें वेगानें धांवत येणाऱ्या त्या राक्षसाला भीमसेनानें वत्सदंतसंज्ञक तीन बाणांनीं प्रहार केला ६३. तेव्हां क्रुद्ध झालेल्या मणिमानानें हातामध्यें मोठी थोरली गदा घेऊन भीमसेनाच्या अंगावर फेंकिली असतां ६४ विद्युल्लतेसारिखीं चमकणाऱ्या व आकाशांतून जाणाऱ्या त्या प्रचंड गदेला निष्णावर घासून तयार केलेल्या बाणांनीं भीमसेनानें प्रहार केला ६५ तेव्हां गदेला स्पर्श होतांच त्यांचा वेग कमी होऊन त्या गदेच्या वेगापुढें त्यांचें कांहीं एक चालेनासें झालें ६६. नंतर त्या वीर्यवान् भीमसेनानें गदायुद्धाला आरंभ करून त्या भयंकर पराक्रम करणाऱ्या मणिमानाच्या गदेचा प्रहार व्यर्थ करून टाकिला ६७. इतक्यात्, सोन्याची मूठ असलेली लोखं-

ह्यामयस्मयीम् । तस्मिन्नेवान्तरे भीमामत्रजहाराथ राक्षसः ६८ सा भुजं भीमनिर्ह्लादा भित्त्वा भीमस्य दक्षिणम् । साग्निज्वाला महारौद्रा पपात सहसा भुवि ६९ सोतिविद्धो महेष्वासः शक्त्यामितपराक्रमः । गदां जग्राह कौन्तेयः क्रोधपर्याकुलेक्षणः ७० रुक्मपट्टपिनद्धां तां शत्रूणां भयवर्धिनीम् । प्रगृह्याथ नदन्भीमः शैक्यां सर्वायसीं गदाम् ७१ तरसा चाभिदुद्राव मणिमन्तं महाबलम् । दीप्यमानं महाशूलं प्रगृह्य मणिमानपि ७२ प्राहिणोद्भीमसेनाय वेगेन महता नदन् । भंक्त्वा शूलं गदाग्रेण गदायुद्धविशारदः ७३ अभिदुद्राव तं हन्तुं गरुत्मानिव पन्नगम् । सोन्तरिक्षमवप्लुत्य विधूय महसा गदाम् ७४ प्रचिक्षेप महाबाहुर्विनद्य रणमूर्धनि । सेन्द्राशनिरिवेन्द्रेण विसृष्टा वातरंहसः ७५ हत्वा रक्षः क्षितिं प्राप्य कृत्येव निपपात ह । तं राक्षसं भीमबलं भीमसेनेन पातितम् । ददृशुः सर्वभूतानि सिंहेनेव गवां पतिम् ७६ तं प्रेक्ष्य निहतं भूमौ हतशेषा

डाची महाघोर शक्ति हातामध्यें घेऊन त्या राक्षसांनीं भीमसेनाच्या अंगावर टाकिली असतां ६८ भयकर शब्द करणाऱ्या त्या शक्तीनें भीमसेनाच्या उजव्या बाहूला प्रहार करून अग्नीच्या ज्वालेप्रमाणें असलेली ती महाभयंकर शक्ति एकाएकीं पृथ्वीवर पडली ६९. मोठें धनुष्य धारण करणाऱ्या व अतुल पराक्रमी भीमसेनाला त्या गदेचा जबरदस्त तडाका लागतांच क्रोधानें आरक्तवर्ण नेत्र झालेल्या त्या भीमसेनानें तत्काल आपली गदा हातामध्यें घेतली ७०. तिला सोन्याच्या पट्या बसविलेल्या असून ती शत्रूला भीति उत्पन्न करणारी होती. ह्याप्रमाणें शत्रूला पराजित करणारी लोखंडाची गदा हातामध्यें घेऊन भीमसेन ७१ महाबलाढ्य मणिमानाच्या अंगावर धांवला. तेव्हां मणिमानानेंही लकलकणारा असा मोठा शूल आपल्या हातामध्यें घेऊन ७२ सिंहाप्रमाणें गर्जना करीत करीत तो भीमसेनाच्या अंगावर सोडिला असतां गदायुद्धांत कुशल असलेल्या भीमसेनानें आपल्या गदेच्या टोंकानें तो मोडून टाकिला ७३ आणि गरुड ज्याप्रमाणें पन्नगांना मारण्याकरितां जातो त्याप्रमाणें त्याला मारण्याला हातामध्यें गदा घेऊन त्यानें आकाशामध्यें उड्डाण केलें ७४ व नंतर रणांगणाचे ठिकाणीं मोठ्यानें गर्जना करून इंद्रानें टाकिलेल्या वज्राप्रमाणें विद्युल्लतेप्रमाणें चमकणाऱ्या वेगवान् गदेनें त्याला प्रहार करून त्याचा वध केल्यावर आपण पृथ्वीतलावर आला व त्याचें मागून तो दुष्ट राक्षसही पृथ्वीवर पडला असतां ७५ भीमसेनानें मारून पाडिलेला तो राक्षस सिंहानें मारून टाकिलेल्या बैलाप्रमाणें सर्व प्राणिमात्रांच्या दृष्टीं पडला ७६. भूमितलावर पडलेल्या त्या राक्षसाला अवलोकन

निशाचराः । भीममार्तस्वरं कृत्वा जग्मुः प्राचीं दिशं प्रति ७७[६२३१]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि यक्षयुद्धपर्वणि मणिमद्वधे षष्ट्याधिकशततमोध्यायः ॥ १६० ॥

वैशंपायन उवाच ॥ श्रुत्वा बहुविधैः शब्दैर्नाद्यमानां गिरेर्गुहाम् । अजातशत्रुः कौन्तेयो माद्रीपुत्रावुभावपि १ धौम्यः कृष्णा च विप्राश्च सर्वे च सुहृदस्तथा । भीमसेनमपश्यन्तः सर्वे विमनसोभवन् २ द्रौपदीमार्ष्टिषेणाय संप्रधार्य महारथाः । सहिताः सायुधाः शूराः शैलमारुरुहुस्तदा ३ ततः संप्राप्य शैलाग्रं वीक्षमाणा महारथाः । ददृशुस्ते महेष्वासा भीमसेनमरिन्दमाः ४ स्फुरतश्च महाकायान्गतसत्वांश्च राक्षसान् । महाबलान्महासत्वान्भीमसेनेन पातितान् ५ शुशुभे स महाबाहुर्गदाखड्गधनुर्धरः । निहत्य समरे सर्वान्दानवान्मघवानिव ६ ततस्ते भ्रातरं दृष्ट्वा परिष्वज्य महारथाः । तत्रोपविविशुः पार्थाः प्राप्ता गतिमनुत्तमाम् ७ तैश्चतुर्भिर्महेष्वासैर्गिरिशृङ्गमशोभत । लोकपा-

---

केल्यानंतर बाकी राहिलेले निशाचर भयंकर व केविलवाणा असा शब्द करून पूर्व दिशेकडे निघून गेले ७७. ह्याप्रमाणें वनपर्वांतील यक्षयुद्धपर्वांपैकीं मणिमानाच्या वधाविषयीं एकशें साठावा अध्याय समाप्त झाला ॥ १६० ॥

वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें नानाप्रकारच्या शब्दांनीं पर्वताची गुहा दुमदुमून गेली आहे असें अजातशत्रु धर्मराज, माद्रीतनय नकुलसहदेव १, धौम्य, द्रौपदी, ब्राह्मण व ते सर्व सुहृद् ह्यांनी श्रवण केल्यावर त्या सर्वांना भीमसेन न दिसल्यामुळे चैन पडनासें झालें २. नंतर त्या महारथ्यांनीं आर्ष्टिषेणाला द्रौपदीचें रक्षण करण्यास सांगितलें आणि हातामध्यें आयुधें घेऊन ते शूर पांडव पर्वतावर चढू लागले ३. तेव्हां थोड्याच वेळानें त्या पर्वताच्या शिखरावर आल्यावर ते शत्रुदमन करणारे व मोठमोठालीं धनुष्यें धारण करणारे महारथि पांडव भीमसेनाला अवलोकन करूं लागले असतां ४ तेजस्वी, मोठमोठालीं शरीरें असलेले व महाबलाढ्य असे पराक्रमी राक्षस भीमसेनानें मारून पाडिलेले त्यांच्या दृष्टीं पडले ५ आणि रणांगणामध्यें सर्व दानवांचा नाश करून शोभणाऱ्या इंद्राप्रमाणें गदा, खड्ग व धनुष्य धारण करून उभा राहिल्यामुळें शोभणारा भीमसेन त्यांच्या दृष्टीं पडला ६. तदनंतर त्या महारथ्यांनीं आपल्या बंधूला अवलोकन केल्यावर त्याला आलिंगन दिलें आणि उत्कृष्ट स्थलाचे ठिकाणीं गेलेले ते सर्व त्या ठिकाणीं स्वस्थ बसले ७. त्या मोठमोठालीं धनुष्यें धारण करणाऱ्या चौघांच्या योगानें तें पर्वतशृंग, महाभाग्यवान् लोकपालांनीं शोभिवंत होणाऱ्या स्वर्गा-

लैर्महाभागैर्दिवं देववरैरिव ८ कुबेरसदनं दृष्ट्वा राक्षसांश्च निपातितान् ।
भ्राता भ्रातरमासीनमब्रवीत्पृथिवीपतिः ९ युधिष्ठिर उवाच ॥ साहसा-
द्यदि वा मोहाद्भीम पापमिदं कृतं । नैतत्ते सदृशं वीर मुनेरिव मृषा-
वधः १० राजद्विष्टं न कर्तव्यमिति धर्मविदो विदुः । त्रिदशानामिदं द्विष्टं
भीमसेन त्वया कृतम् ११ अर्थधर्मावनादृत्य यः पापे कुरुते मनः । कर्मणां
पार्थ पापानां स फलं विन्दते ध्रुवम् ॥ पुनरेवं न कर्तव्यं मम चेदिच्छसि
प्रियम् १२ वैशंपायन उवाच ॥ एवमुक्त्वा स धर्मात्मा भ्राता भ्रातरमच्यु-
तम् । अर्थतत्त्वविभागज्ञः कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः १३ विरराम महातेजास्तमे-
वार्थं विचिन्तयन् । ततस्ते हतशिष्टा ये भीमसेनेन राक्षसाः १४ सहिताः
प्रत्यपद्यन्त कुबेरसदनं प्रति । ते जवेन महावेगाः प्राप्य वैश्रवणाल-
यम् १५ भीममार्तस्वरं चक्रुर्भीमसेनभयार्दिताः । न्यस्तशस्त्रायुधाः
क्लान्ताः शोणिताक्ततनुच्छदाः १६ प्रकीर्णमूर्धजा राजन्यक्षाधिपतिमब्रु-
वन् । गदापरिघनिस्त्रिंशतोमरप्रासयोधिनः १७ राक्षसा निहताः सर्वे

प्रमाणें दिसूं लागलें ८. नंतर कुबेराचें गृह व पृथ्वीतलावर पडलेले राक्षस ह्यांना अवलोकन करून पृथ्वीचें पालन करणारा भ्राता धर्मराज भीमसेनाला ह्मणाला ९ " हे भीमसेना, मोहानें अथवा साहसानें तूं केलेलें हें पापरूप कृत्य बरोबर नाहीं. कारण, " मुनिव्रत धारण केलेल्यानें निमित्तावांचून कोणाचाही वध करूं नये १० व राजाचा द्वेष उत्पन्न होईल असें कर्म करूं नये " असें धर्मवेत्त्यांनीं सांगितलें आहे व तूं हें देवांचा द्वेष उत्पन्न करणारें असें कर्म केलें आहेस ११. जो कोणी धर्म व अर्थ ह्यांचा अनादर करून पातक करण्याविषयीं मनाला प्रवृत्त करितो त्याला, हे पृथानंदना, त्या पापरूप कर्मांचें फल निःसंशय भोगावें लागतें. असो. आतां माझें प्रिय करण्याची तुझी इच्छा असेल तर पुनरपि असें करूं नकोस १२. वैशंपायन सांगतातः—अर्थ-तत्त्वाच्या विभागाला जाणणाऱ्या धर्मात्म्या कुंतीपुत्र भ्रात्या युधिष्ठिरानें अच्युत अशा आपल्या बंधू भीमसेनाला असें सांगितल्यावर १३ तो महातेजस्वी धर्मराज त्याच गोष्टीचें चिंतन करीत स्वस्थ बसला. इकडे भीमसेनानें मारून शिलक राहिलेले महावेगवान् राक्षस १४ एकत्र होऊन वैश्रवणाच्या गृहरूपी कुबेराच्या वसतिस्थानाकडे मोठ्या लगब-गीनें प्राप्त झाले १५ आणि भीमसेनाच्या भयानें पीडित झालेले ते भयंकर शब्द करून ओरडूं लागले. त्यांनीं दमल्यामुळें आपल्या हातांतील शस्त्रास्त्रांचा त्याग केला असून त्यांच्या शरीरांवरील कवचें रुधिरानें भरून गेलीं होतीं १६. गदा, परिघ, निस्त्रिंश, तोमर व गोफण वगैरे आयुधांनीं युद्ध करणारे व मस्तकावरील केश मोकळ सुटलेले

तव देव पुरःसराः । प्रमृथ तरसा शैलं मानुषेण धनेश्वर १८ एकेन सहिताः संख्ये रणे क्रोधवशा गणाः । प्रवरा राक्षसेन्द्राणां यक्षाणां च नराधिप १९ शेरते निहता देव गतसत्वाः परासवः । लब्धशेषा वयं मुक्ता मणिमांस्ते सखा हतः २० मानुषेण कृतं कर्म विधत्स्व यदनन्तरम् । स तच्छ्रुत्वा तु संक्रुद्धः सर्वयक्षगणाधिपः २१ कोपसंरक्तनयनः कथमित्यब्रवीद्वचः । द्वितीयमपराध्यन्तं भीमं श्रुत्वा धनेश्वरः २२ चुक्रोध यक्षाधिपतिर्युज्यतामिति चाब्रवीत् । अथाभ्रघनसंकाशं गिरिशृङ्गमिवोच्छ्रितम् २३ रथं संयोजयामासुर्गन्धर्वैर्हेममालिभिः । तस्य सर्वगुणोपेता विमलाक्षा हयोत्तमाः २४ तेजोबलगुणोपेता नानारत्नविभूषिताः । शोभमाना रथे युक्तास्तरिष्यन्त इवाशुगाः २५ ह्रेषयामासुरन्योन्यं ह्रेषितैर्विजयावहैः । स तमास्थाय भगवान्राजराजो महारथम् २६ प्रययौ देवगन्धर्वैः स्तूयमानो महाद्युतिः । तं प्रयान्तं महात्मानं

ते राक्षस, हे राजा, यक्षाधिपति कुबेराला ह्मणाले १७ " हे धनाधिपते कुबेरा, एका मनुष्यानें तुझ्या पर्वतावर चढून तो तुडवून टाकिला आहे आणि तुझ्या अग्रभागीं चालणारे सर्व राक्षसही मारून पाडिले आहेत १८. हे नराधिपते, यक्ष व राक्षसश्रेष्ठामध्येंही मुख्य मुख्य असे क्रोधवशसंज्ञक राक्षसांचे समुदाय त्यांचाही त्यानें एकट्यानेंच नाश करून टाकिल्यामुळें १९, हे देव, ते गतसत्व व गतप्राण होऊन जमीनीवर मरून पडले आहेत. त्यांपैकीं बाकी राहिलेले आह्मी (शेषप्रसादेंकरून) मुक्त झाल्यामुळें येथें आलों आहों. तुझा सखा मणिमानही त्याच प्रसंगांत मारला गेला २०. हा एकट्याच मनुष्यानें केलेला प्रकार आह्मीं तुला कथन केला; यानतर काय करावयाचें असेल तें तूं कथन कर. ह्याप्रमाणें सर्व यक्षगणांच्या अधिपतीनें श्रवण करून त्याला क्रोध आला आणि त्याचे डोळे आरक्तवर्ण होऊन व आपला अपराध करणारा भीमसेन आहे असें ऐकून तो ' काय ' असें ह्मणाला २१,२२. नंतर थोडक्याच वेळानें रुष्ट झालेल्या त्या अधिपतीनें अभ्राप्रमाणें कांति असलेला व पर्वतशिखराप्रमाणें उच असलेला माझा रथ जोडा ह्मणून त्यांना सांगितलें २३. तेव्हां सुवर्णाच्या माला कंठामध्यें धारण करणाऱ्या गंधर्वांनीं त्याचा रथ जोडला. त्या रथाला सर्व गुणांनीं युक्त, स्वच्छ नेत्र असलेले २४, कांति व बल ह्यांनीं युक्त, नानाप्रकारच्या रत्नांनीं शोभिवंत केलेले व शीघ्र गमन करणारे असे अश्व जोडिले असून ते आकाशांत तरून जात आहेत कीं काय असे दिसत होते २५. ते अश्व विजयसूचक खेंखाळत असून आपल्याबरोबर दुसऱ्यालाही खेंखाळण्यास लावीत होते. अशा प्रकारच्या महारथामध्यें बसून तो

सर्वे यक्षा धनाधिपम् २७ रक्ताक्षा हेमसंकाशा महाकाया महाबलाः ।
सायुधा बद्धनिस्त्रिंशा यक्षा दशशतावराः २८ ते जवेन महावेगाः प्लव-
माना विहायसा । गन्धमादनमाजग्मुः प्रकर्षन्त इवाम्बरम् २९ तत्के-
सरिमहाजालं धनाधिपतिपालितम् । कुबेरं च महात्मानं यक्षरक्षोगणा-
वृतम् ३० ददृशुर्हृष्टरोमाणः पाण्डवाः प्रियदर्शनम् । कुबेरस्तु महास-
त्वान्पाण्डोः पुत्रान्महारथान् ३१ आत्तकार्मुकनिस्त्रिंशान्दृष्ट्वा प्रीतो-
भवत्तदा । देवकार्यं चिकीर्षन्स हृदयेन तुतोष ह ३२ ते पक्षिण इवा-
पेतुर्गिरिशृङ्गं महाजवाः । तस्थुस्तेषां समभ्याशे धनेश्वरपुरःसराः ३३
ततस्तं हृष्टमनसं पाण्डवान्प्रति भारत । समीक्ष्य यक्षगन्धर्वा निर्विकार-
मवस्थिताः ३४ पाण्डवाश्च महात्मानः प्रणम्य धनदं प्रभुम् । नकुलः
सहदेवश्च धर्मपुत्रश्च धर्मवित् ३५ अपराद्धमिवात्मानं मन्यमाना महा-
रथाः । तस्थुः प्राञ्जलयः सर्वे परिवार्य धनेश्वरम् ३६ स ह्यासनवरं

राजांचाही राजा भगवान् कुबेर २६ देव व गंधर्व ह्यांनीं स्तुति केली असतां प्रकाश पाडीत चालला. ह्याप्रमाणें तो महात्मा धनाधिपति जाऊं लागला असतां २७ रक्तवर्ण नेत्र असलेले, सुवर्णवर्ण, मोठे धिप्पाड, महाबलाढ्य, आयुधें धारण केलेले व अंगामध्यें कवचादिक घातलेले असे एक हजार यक्ष २८ आकाशामध्यें मोठ्या वेगानें गमन करीत करीत आपल्या गतीनें आकाशाला ओढीतच आहेत कीं काय अशा रीतीनें गंधमादन पर्वतावर जाऊं लागले २९. तेव्हां तो, धनाधिपति कुबेरानें पालन केलेला, अश्वांचा समुदाय आणि यक्षराक्षसांच्या गणांनीं वेष्टित असलेला महात्मा कुबेर ३० ह्यांना अवलोकन करितांच त्याच्या प्रिय दर्शनानें त्या पांडवांच्या अंगावर रोमांच उभे राहिले आणि महारथ व महापराक्रमी पांडुपुत्रांना हातामध्यें धनुष्यें व निस्त्रिंश धारण करून सज्ज झालेले अवलोकन करितांच देवांचें कार्य करण्याचें त्याच्या मनांत असल्यामुळें तो कुबेरही अतिशय संतुष्ट झाला ३१, ३२. ते यक्षराक्षस पक्ष्याप्रमाणे मोठ्या वेगानें त्या पर्वतशिखरावर आले आणि धनेश्वर ज्यांमध्यें प्रमुख आहे असे ते त्या पांडवांच्या जवळ बसले ३३. नंतर, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, त्या पांडवांच्या संबधानें कुबेराला क्रोध न येतां उलट आनंद झालेला पाहून यक्ष आणि गंधर्व हेही निर्विकार होऊनच तेथें स्वस्थ बसले ३४. तेव्हां महात्म्या पांडवांनीं प्रभु कुबेराला नमस्कार केल्यावर नकुल, सहदेव व धर्म जाणणाऱ्या धर्मराजप्रभृति महारथ्यांनाही आपण त्याचा अपराध केला असें वाटून व ते त्या कुबेराच्या भोंवतीं गराडा घालून हात जोडून बसले ३५,३६. नंतर, हे महात्म्या जनमेजया, तो कुबेरही विश्व-

भीमत्पुष्पकं विश्वकर्मणा । विहितं चित्रपर्यन्तमातिष्ठत धनाधिपः ३७ तमासीनं महाकायाः शंकुकर्णा महाजवाः । उपोपविविशुर्यक्षा राक्षसाश्च सहस्रशः ३८ शतशश्चापि गन्धर्वास्तथैवाप्सरसां गणाः । परिवार्योपतिष्ठन्त यथा देवाः शतक्रतुम् ३९ काञ्चनीं शिरसा बिभ्रद्भीमसेनः स्रजं शुभाम् । पाशखड्गधनुष्पाणिरुदैक्षत धनाधिपम् ४० भीमसेनस्य न ग्लानिर्विक्षतस्यापि राक्षसैः । आसीत्तस्यामवस्थायां कुबेरमपि पश्यतः ४१ आददानं शितान्बाणान्योद्धुकाममवस्थितम् । दृष्ट्वा भीमं धर्मसुतमब्रवीन्नरवाहनः ४२ विदुस्त्वां सर्वभूतानि पार्थ भूतहिते रतम् । निर्भयश्चापि शैलाग्रे वस त्वं भ्रातृभिः सह ४३ न च मन्युस्त्वया कार्यो भीमसेनस्य पाण्डव । कालेनैते हताः पूर्वं निमित्तमनुजस्तव ४४ व्रीडा चात्र न कर्तव्या साहसं यदिदं कृतम् । दृष्टश्चापि सुरैः पूर्वं विनाशो यक्षरक्षसाम् ४५ न भीमसेने कोपो मे प्रीतोऽस्मि भरतर्षभ । कर्मणा भीमसेनस्य मम तुष्टिरभूत्पुरा ४६ वैशंपायन उवाच ॥ एवमुक्त्वा तु राजानं भीमसेनमभाषत । नैतन्मनसि मे तात वर्तते कुरु-

---

कर्म्याने निर्माण केलेल्या पुष्पकविमानांतील चित्रविचित्र आसनावर बसला ३७. त्याला बसलेला पाहून शंक्वाकृति कर्ण असलेले अत्यंत वेगवान् असे ते महाकाय हजारों यक्षराक्षसही वेढा घालून बसले ३८. त्याचप्रमाणें शेंकडों गंधर्व व अप्सरांचे समुदायही, देव इंद्राला ज्याप्रमाणें वेढा घालून बसतात त्याप्रमाणें, वेढा घालून बसले ३९. नंतर हातामध्यें पाश, खड्ग व धनुष्य धारण केलेल्या भीमसेनानें ज्यानें आपल्या मस्तकावर सुवर्णाची माला धारण केली आहे अशा कुबेराला अवलोकन केलें ४०. त्यावेळीं राक्षस त्याच्याकडे अवलोकन करीत असतांना व तो कुबेराकडे पहात असतांना त्या भीमसेनाला भीति वाटली नाहीं ४१. हातामध्यें तीक्ष्ण बाण घेऊन युद्धाविषयीं तयार असलेल्या भीमसेनाला अवलोकन केल्यावर नरवाहन धर्मराजाला ह्मणाला ४२ "हे पार्था, सर्व प्राणी तुला आपला कल्याण करणारा असें समजतात. करितां तूं ह्या शैलाग्राचे ठिकाणीं आपल्या बंधूंसहवर्तमान निर्भयरीतीनें वास्तव्य कर ४३. हे पांडुतनया, भीमसेनावर क्रोध करूं नकोस. कारण, कालानें ह्यांचा पूर्वींच नाश केला असल्यामुळें तुझा बंधु हा निमित्तमात्र आहे ४४. हें माझ्या हातून साहस झालें ह्मणून तुला लज्जा वाटूं देऊं नकोस. यक्षराक्षसांचा ह्याप्रमाणें नाश होईल ह्मणून देवांना पूर्वींच समजलें होतें ४५. हे भरतवंशजश्रेष्ठा, मी भीमसेनावर रागावलों नाहीं; इतकेंच नाहीं परंतु, मी त्याच्यावर संतुष्ट झालों आहें ४६. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें धर्म-

सत्तम ४७ यदिदं साहसं भीम कृष्णार्थे कृतवानसि । मामनादृत्य देवांश्च विनाशं यक्षरक्षसाम् ४८ स्वबाहुबलमाश्रित्य तेनाहं प्रीतिमांस्त्वयि । शापादद्य विनिर्मुक्तो घोरादस्मि वृकोदर ४९ अहं पूर्वमगस्त्येन क्रुद्धेन परमर्षिणा । शप्तोपराधे कस्मिंश्चित्तस्यैषा निष्कृतिः कृता ५० दृष्टो हि मम संक्लेशः पुरा पाण्डवनन्दन । न तवात्रापराधोऽस्ति कथञ्चिदपि पाण्डव ५१ युधिष्ठिर उवाच ॥ कथं शप्तोऽसि भगवन्नगस्त्येन महात्मना । श्रोतुमिच्छाम्यहं देव तवैतच्छापकारणम् ५२ इदं चाश्चर्यभूतं मे यत्क्रोधात्तस्य धीमतः। तदैव त्वं न निर्दग्धः सबलः सपदानुगः ५३ धनेश्वर उवाच ॥ देवतानामभून्मन्त्रः कुशवत्यां नरेश्वर । वृतस्तत्राहमगमं महापद्मशतैस्त्रिभिः ५४ यक्षाणां घोररूपाणां विविधायुधधारिणाम् । अध्वन्यहमथापश्यमगस्त्यमृषिसत्तमम् ५५ उग्रं तपस्तप्यमानं यमुनातीरमाश्रितम् । नानापक्षिगणाकीर्णं पुष्पितद्रुमशोभितम् ५६ तमूर्ध्वबाहुं दृष्ट्वैव सूर्यस्याभिमुखे स्थितम् । तेजोराशिं दीप्यमानं हुताशनमिवैधितम् ५७ राक्षसाधिपतिः

राजाशीं भाषण केल्यावर तो कुबेर कुरुश्रेष्ठ भीमसेनाला ह्मणाला कीं ४७, "हे भीमसेना, माझा अनादर करून यक्षराक्षसांचा विनाशरूप जें साहसकृत्य तूं अर्जुनाकरितां केलेंस तें आपल्या बाहुबलावरच केलें असल्यामुळें मी तुझ्यावर अत्यंत प्रसन्न झालों आहें आणि, हे वृकोदरा, घोर अशा शापापासूनही मी आजच मुक्त झालों आहें ४८,४९. पूर्वी क्रुद्ध झालेल्या ऋषिश्रेष्ठ अगस्त्यांनीं कांहीं अपराध घडल्यामुळें मला शाप दिला होता त्याचें हें मी आज प्रायश्चित्त केलें आहें ५०. हे पांडुतनया, ह्याप्रमाणें मला दुःख होईल असें पूर्वींच ठरलें असल्यामुळें ह्यांत तुझा तिळभर सुद्धां अपराध नाहीं "५१. युधिष्ठिर ह्मणतोः—हे भगवन्, त्या महात्म्या अगस्त्य मुनीनें तुला शाप कसा दिला आणि त्या शापाचें कारण काय हें श्रवण करण्याची मी इच्छा करितों ५२. मला हेंही एक मोठें आश्चर्य वाटत आहे कीं, त्या बुद्धिमान् अगस्त्य ऋषींच्या क्रोधानें तूं आपलें बल आणि चाकरमाणसें ह्यांसहवर्तमान त्याचवेळीं दग्ध कसा झाला नाहींस ? ५३. कुबेर ह्मणतोः– हे नराधिपा, कुशवतीचे ठिकाणीं देवतांची मसलत करण्याची सभा भरली असतां घोर रूप धारण केलेले व निरनिराळ्या प्रकारचीं आयुधें हातांत घेतलेले असे तीनशें पद्म यक्ष बरोबर घेऊन निघालों असतां मार्गामध्यें ऋषिश्रेष्ठ अगस्तीला मीं अवलोकन केलें ५४, ५५. ते मुनि नानाप्रकारच्या पक्षिसमुदायांनीं व्याप्त व प्रफुल्लित झालेल्या वृक्षांनीं शोभिवंत झालेल्या अशा यमुनातीरावर उग्र तपश्चर्या करीत होते ५६. ते तेजाच्या राशीप्रमाणें

श्रीमान्मणिमान्नाम मे सखा । मौर्ख्यादज्ञानभावाच्च दर्पान्मोहाच्च पार्थिव ५८ न्यष्ठीवदाकाशगतो महर्षेस्तस्य मूर्धनि । स कोपान्मामुवाचेदं दिशः सर्वा दहन्निव ५९ मामवज्ञाय दुष्टात्मा यस्मादेष सखा तव । धर्षणां कृतवानेतां पश्यतस्ते धनेश्वर ६० तस्मात्सहैभिः सैन्यैस्ते वधं प्राप्स्यति मानुषात् । त्वं चाप्येभिर्हतैः सैन्यैः क्लेशं प्राप्येह दुर्मतिः । तमेव मानुषं दृष्ट्वा किल्बिषाद्विप्रमोक्ष्यसे ६१ सैन्यानां तु तवैतेषां पुत्रपौत्रबलान्वितम् । न शापं प्राप्स्यते घोरं यत्तवाज्ञां करिष्यति ६२ एष शापो मया प्राप्तः प्राक्तस्मादृषिसत्तमात् । स भीमेन महाराज भ्रात्रा तव विमोक्षितः ६३ [६०९४] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि यक्षयुद्धपर्वणि कुबेरदर्शने एकषष्ट्यधिकशततमोऽध्यायः ॥ १६१॥

धनद उवाच ॥ युधिष्ठिर धृतिर्दाक्ष्यं देशकालपराक्रमाः । लोकतन्त्रविधानानामेष पञ्चविधो विधिः १ धृतिमन्तश्च दक्षाश्च स्वे स्वे कर्मणि

प्रकाश पाडीत असून त्यांनी आपलें मुख सूर्याकडे केलें होतें व बाहु वर केले होते ५७. तेव्हां, हे पृथ्वीपते, राक्षसांचा अधिपति व माझा सखा जो मणिमान् यानें मूर्खपणानें गर्व व मोह ह्यांनीं युक्त असल्यामुळें न जाणून ५८ आकाशांतून जात असतां त्या महात्म्याच्या मस्तकावर आपली थुंकी टाकिली. हें अवलोकन करितांच क्रोधानें दशदिशा जाळीतच आहे कीं काय अशा रीतीनें ते मला ह्मणाले ५९ " हे धनेश्वरा, ज्याअर्थी ह्या तुझ्या दुष्टात्म्या मित्रानें माझी अवज्ञा करून तुझ्या समक्ष माझा हा छल केला आहे ६० त्याअर्थी ह्या तुझ्या सैन्यासहवर्तमान तो मनुष्याच्या हातून वध पावेल आणि, हे दुर्मते, तूंही त्या सैन्याचा नाश झाला असतां क्लेश पावशील; परंतु, त्याच मनुष्याला अवलोकन केलें असतां तूंही ह्या शापापासून मुक्त होशील ६१. आतां राहिलेल्या ह्या तुझ्या सैन्यापैकीं जे कोणी तुझ्या आज्ञेचें अवलंबन करितील त्यांना पुत्रपौत्रांसहवर्तमान हा शाप लागणार नाहीं ६२. हे महाराज धर्मराजा, पूर्वी ह्याप्रमाणें त्या ऋषिश्रेष्ठ अगस्त्यापासून मला शाप झाला असतां सांप्रत तुझा बंधू जो भीमसेन यानें तो नाहींसा करून टाकिला ६३. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील यक्षयुद्धपर्वापैकीं कुबेराच्या दर्शनाविषयीं एकशें एकसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ १६१ ॥

धनद ह्मणतोः– हे युधिष्ठिरा, संकटांमध्यें घाबरून न जाणें, उद्योगी स्वभाव असणें व पराक्रम, देश आणि काल ह्यांची अनुकूलता असणें हीं पांच लक्षणें ह्या लोकांतील निरनिराळ्या प्रकारच्या कार्यांच्या अभ्युदयाला कारण आहेत १. हे भरतकुलोत्पन्ना,

भारत । पराक्रमविधानज्ञा नराः कृतयुगेऽभवन् २ धृतिमान्देशकालज्ञः सर्वधर्मविधानवित् । क्षत्रियः क्षत्रियश्रेष्ठ प्रशास्ति पृथिवीं चिरम् ३ य एवं वर्तते पार्थ पुरुषः सर्वकर्मसु । स लोके लभते वीर यशः प्रेत्य च सद्गतिम् ४ देशकालान्तरप्रेप्सुः कृत्वा शक्रः पराक्रमम् । संप्राप्त स्त्रिदिवे राज्यं वृत्रहा वसुभिः सह ५ यस्तु केवलसंरम्भात्प्रपातं न निरीक्षते । पापात्मा पापबुद्धिर्यः पापमेवानुवर्तते ६ कर्मणामविभागज्ञः प्रेत्य चेह विनश्यति । अकालज्ञः सुदुर्मेधाः कार्याणामविशेषवित् ॥ वृथाचारसमारम्भः प्रेत्य चेह विनश्यति ७ साहसे वर्तमानानां निकृतीनां दुरात्मनाम् । सर्वसामर्थ्यलिप्सूनां पापो भवति निश्चयः ८ अधर्मज्ञोवलिप्तश्च बालबुद्धिरमर्षणः । निर्भयो भीमसेनोयं तं शाधि पुरुषर्षभ ९ आर्ष्टिषेणस्य राजर्षेः प्राप्य भूयस्त्वमाश्रमम् । तामिस्रं प्रथमं पक्षं वीतशोकभयो

कृतयुगामध्यें लोक धैर्यवान् व आपआपल्या कामामध्यें दक्ष असून पराक्रम करण्यामध्यें कुशल होते २. देश, काल व सर्व प्रकारच्या धर्माचरणाला जाणणारा आणि धैर्यवान् असाच क्षत्रिय, हे क्षत्रियश्रेष्ठा, ह्या पृथ्वीचें चिरकाल पालन करितो ३. हे पृथानंदना, जो कोणी पुरुष ह्याप्रमाणें सर्व कार्यांमध्यें तत्पर राहून वर्तन करितो त्याचीच ह्या लोकांमध्यें कीर्ति होऊन तो मृत झाला असतां त्याला उत्तम गति मिळते ४. योग्य देश व योग्य काल येण्याची वाट पाहून इंद्रानें पराक्रम केला व त्यामुळेंच त्या वृत्रासुराचा वध करणाऱ्या इंद्राला वसूसहवर्तमान स्वर्गाचें राज्य प्राप्त झालें ५. जो कोणी पुरुष केवल क्रोधानेंच पुढें होणाऱ्या अनर्थाकडे लक्ष्य देत नाहीं त्या पापबुद्धि व पापात्म्याला पातकच लागतें ६ आणि कोणतें कार्य करावें कोणतें न करावें हें न जाणणाऱ्या पुरुषाचा ह्या लोकांत नाश होऊन तो परलोकाला मुकतो. त्याचप्रमाणें कोणतें कार्य प्रथम करावें व कोणतें मागाहून करावें हेंही ज्याला समजत नाहीं त्याचेही सर्व उद्योग व्यर्थ होऊन तो ह्या लोकाला व परलोकाला मुकतो ७. तात्पर्य, साहस करण्याविषयीं एका पायावर तयार असलेल्या, फसवाफसवी करणाऱ्या व सर्व प्रकारचें सामर्थ्य आपलेच ठिकाणीं असावें अशी इच्छा करणाऱ्या दुरात्म्यांना निश्चयेंकरून पापच लागतें ८. करितां धर्म न जाणणाऱ्या, गर्विष्ठ, पोरकट बुद्धि असलेल्या, रागीट व कशाचीही भीति न बाळगणाऱ्या ह्या तुझ्या भीमसेनाला, हे पुरुषश्रेष्ठा धर्मराजा, तूं चांगल्या मार्गानें जाण्याविषयीं वळण लाव ९. हे धर्मराजा, आतां तूं पुनरपि आर्ष्टिषेण राजर्षीच्या आश्रमाला गेल्यावर शोक व भय ह्यांनीं रहित होऊन कृष्णपक्षाचे पंधरा दिवस तेथेंच वास्तव्य कर १०. ह्या

वस १० अलकाः सहगन्धर्वैर्यक्षाश्च सह किंनरैः ११ मन्नियुक्ता मनुष्येन्द्र सर्वे च गिरिवासिनः । रक्षिष्यन्ति महाबाहो सहितं द्विजसत्तमैः १२ साहसाद्नुसंप्राप्तः प्रतिबुध्य वृकोदरः । वार्यतां साध्वयं राजंस्त्वया धर्मभृतां वर १३ अतः परं च वो राजन्द्रक्ष्यन्ति वनगोचराः । उपस्थास्यन्ति वो राजन्रक्षिष्यन्ते च वः सदा १४ तथैव चान्नपानानि स्वादूनि च बहूनि च । आहरिष्यन्ति मत्प्रेष्याः सदा वः पुरुषर्षभाः १५ यथा जिष्णुर्महेन्द्रस्य यथा वायोर्वृकोदरः । धर्मस्य त्वं यथा तात योगोत्पन्नो निजः सुतः १६ आत्मजावात्मसंपन्नौ यमौ चोभौ यथाश्विनोः । रक्ष्यास्तद्वन्ममापीह यूयं सर्वे युधिष्ठिर १७ अर्थतत्त्वविधानज्ञः सर्वधर्मविधानवित् । भीमसेनादवरजः फाल्गुनः कुशली दिवि १८ याः काश्चन मता लोके स्वर्ग्याः परमसंपदः । जन्मप्रभृति ताः सर्वाः स्थितास्तात धनञ्जये १९ दमो दानं बलं बुद्धिर्ह्रीर्धृतिस्तेज उत्तमम् । एतान्यपि महासत्त्वे स्थितान्यमिततेजसि २० न मोहा-

---

ठिकाणीं अलकानामक नगरीमध्यें रहाणारे लोक यक्ष, गंधर्व व किन्नर ह्यांसहवर्तमान, हे नरश्रेष्ठा, माझ्या आज्ञेवरून तुझें रक्षण करतील व त्याचप्रमाणें सर्व पर्वतावर रहाणारे लोकही, हे आजानुबाहो, ब्राह्मणांसहवर्तमान तुझा सांभाळ करतील ११, १२. हे धर्म जाणणाऱ्यांमध्यें श्रेष्ठा युधिष्ठिरा, जेव्हां जेव्हां ह्या वृकोदराच्या मनांत साहस करण्याचें येईल तेव्हां तेव्हां तूं त्याची समजूत करून त्याला त्यापासून परावृत्त करीत जा १३. हे राजा, ह्यापुढें वनामध्यें संचार करणारे माझे दूत तुह्मांला अवलोकन करून तुमच्याकडे येतील आणि निरंतर तुमचें रक्षण करण्यास तत्पर रहातील १४. त्याचप्रमाणें, हे पुरुषश्रेष्ठहो, माझीं चाकरमाणसें मधुर मधुर अन्नें व प्राशन करण्याचे पदार्थ तुह्मांला विपुल आणून देतील १५. ज्याप्रमाणें महेंद्राला अर्जुन, वायूला वृकोदर, धर्माला योगसामर्थ्यानें उत्पन्न झालेला स्वपुत्ररूपी तूं १६ व अश्विनीकुमारांना त्यांच्याचपासून उत्पन्न झालेले हे नकुलसहदेव रक्षण करण्यास योग्य आहेत त्याचप्रमाणें, हे युधिष्ठिरा, ह्या ठिकाणीं मलाही तुह्मी सर्वजण रक्षण करण्यास योग्य आहांत १७. अर्थतत्त्वाला जाणणारा, सर्वधर्मांचीं रहस्यें जाणणारा व भीमसेनापेक्षां कनिष्ठ असलेला अर्जुन स्वर्गलोकामध्यें खुशाल आहे १८. बा धर्मराजा, स्वर्गामध्यें ज्या संपत्तींची मान्यता आहे अशा सर्व संपत्ति जन्मापासून अर्जुनाचे ठिकाणीं वास्तव्य करीत आहेत १९. इंद्रियनिग्रह, दातृत्वशक्ति, सामर्थ्य, बुद्धि, पापकर्म करण्याविषयीं लज्जा, धैर्य, आणि उत्कृष्ट प्रकारचें शौर्य हीं सर्व अत्यंत तेजस्वी व महाबलाढ्य अशा अर्जुनाचे ठिकाणीं आहेत २०. हे पांडुतनया,

त्कुरुते जिष्णुः कर्म पाण्डव गर्हितम् । न पार्थस्य मृषोक्तानि कथयन्ति
नरा नृप २१ स देवपितृगन्धर्वैः कुरूणां कीर्तिवर्धनः । मानितः कुरुते-
स्त्राणि शक्रसद्मनि भारत २२ यो सौ सर्वान्महीपालान्धर्मेण वशमान-
यत् । स शांतनुर्महातेजाः पितुस्तव पितामहः २३ प्रीयते पार्थ पार्थेन
दिवि गाण्डीवधन्वना । सम्यक्चासौ महावीर्यः कुलधुर्येण पार्थिवः २४
पितॄन्देवानृषीन्विप्रान्पूजयित्वा महातपाः । सप्तमुख्यान्महामेधानाहर-
द्यमुनां प्रति २५ अधिराजः स राजंस्त्वां शांतनुः प्रपितामहः । स्वर्ग-
जिच्छक्रलोकस्थः कुशलं परिपृच्छति २६ वैशंपायन उवाच ॥ एत-
च्छ्रुत्वा तु वचनं धनदेन प्रभाषितम् । पाण्डवाश्च ततस्तेन बभूवुः संप्रह-
र्षिताः २७ ततः शक्तिं गदां खड्गं धनुश्च भरतर्षभः । प्राध्वं कृत्वा नम-
श्चक्रे कुबेराय वृकोदरः २८ ततोऽब्रवीद्धनाध्यक्षः शरण्यः शरणागतम् ।
मानहा भव शत्रूणां सुहृदां नन्दिवर्धनः २९ स्वेषु वेश्मसु रम्येषु वसना-
मित्रतापनाः । कामान्न परिहास्यन्ति यक्षा वो भरतर्षभाः ३० शीघ्रमेव

तो अर्जुन मोहानें कधींही निंद्य कर्म करीत नसून त्यानें केलेल्या मिथ्या भाषणाच्या संबंधानेंही लोक कधीं उद्गार काढीत नाहीत २१. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, कौरवांच्या कीर्तीला वाढविणारा तो अर्जुन देव, पितर व गंधर्व ह्यांनी मान दिल्यामुळें इंद्रलोकामध्यें शस्त्रांचा अभ्यास करीत आहे २२. ज्यानें धर्मानेंच सर्व पृथ्वीपतींना आपल्या स्वाधीन करून घेतलें तो महातेजस्वी तुझ्या पित्याचा आजा शांतनुही २३. हे पृथानंदना, स्वर्गामध्यें गांडीव धनुष्य धारण करणाऱ्या अर्जुनाच्या वर्तनामुळें आनंद पावत आहे. आपल्या कुलांत प्रख्यात असलेल्या त्या महावीर्यवान् पृथ्वीपतीनें उत्कृष्ट रीतीनें २४ पितर, देव, ऋषि व ब्राह्मण ह्यांचें पूजन करून यमुनेच्या तटाकावर मोठमोठाले सात अश्वमेध यज्ञ केले २५ हे राजा, त्या तुझ्या सार्वभौम व स्वपराक्रमानें स्वर्ग जिंकून इंद्रलोकामध्यें वास्तव्य करणाऱ्या शांतनु पणजानें तुला कुशल विचारिलें आहे २६. वैशंपायन सांगतात:— ह्याप्रमाणें कुबेरानें केलेलें भाषण श्रवण करून त्या पांडवांना मोठा आनंद झाला २७. नंतर शक्ति, गदा, खड्ग व धनुष्य ह्यांना गवसण्या घालून भरतवंशजश्रेष्ठ वृकोदरानें त्या कुबेराला नमस्कार केला २८ तेव्हां शरण आलेल्याचें रक्षण करणारा धनाध्यक्ष कुबेर त्या भीमसेनाला ह्मणाला कीं, "हे भीमसेना, तूं शत्रूंचा गर्व नाहींसा करणारा व सुहृदांना आनंद देणारा हो २९. हे शत्रुदमन करणारे पांडवहो, रम्य रम्य गृहाचे ठिकाणीं वास्तव्य करीत असतांना हे माझे राक्षस तुमचे सर्व मनोरथ परिपूर्ण करतील ३०. आतां साक्षात् देवेंद्रानें परत पाठविलेला

गुडाकेशः कृतास्त्रः पुनरेष्यति । साक्षान्मघवता सृष्टः संप्राप्स्यति धनंजयः ३१ एवमुत्तमकर्माणमनुशिष्य युधिष्ठिरम् । अस्तं गिरिवरश्रेष्ठं प्रययौ गुह्यकाधिपः ३२ तं परिस्तोमसंकीर्णैर्नानारत्नविभूषितैः । यानैरनुययुर्यक्षा राक्षसाश्च सहस्रशः ३३ पक्षिणामिव निर्घोषः कुबेरभवनं प्रति । बभूव परमाश्वानामैरावतपथे यथा ३४ ते जग्मुस्तूर्णमाकाशं धनाधिपतिवाजिनः । प्रकर्षन्त इवाभ्राणि पिबन्त इव मारुतम् ३५ ततस्तानि शरीराणि गतसत्वानि रक्षसाम् । अपाकृष्यन्त शैलाग्राद्धनाधिपतिशासनात् ३६ तेषां हि शापकालः स कृतोगस्त्येन धीमता । समरे निहतास्तस्माच्छापस्यान्तोभवत्तदा ३७ पाण्डवाश्च महात्मानस्तेषु वेश्मसु ताः क्षपाः । सुखमूषुर्गतोद्वेगाः पूजिताः सर्वराक्षसैः ३८ [६३३२] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैय्यासिक्यामारण्यके पर्वणि यक्षयुद्धपर्वणि कुबेरवाक्यं द्विषष्ट्यधिकशततमोध्यायः ॥१६२॥

वैशंपायन उवाच ॥ ततः सूर्योदये धौम्यः कृत्वाह्निकमरिन्दम । आर्ष्टि-

---

गुडाकेश धनंजय अस्त्रें प्राप्त करून घेऊन लवकरच येथे तुम्हांला येऊन भेटेल " ३१. ह्याप्रमाणें उत्कृष्ट कर्म करणाऱ्या युधिष्ठिराशीं भाषण केल्यावर तो गुह्यकांचा अधिपति कुबेर गिरिवरश्रेष्ठावर असलेल्या आपल्या गृहाकडे निघून गेला ३२ आणि नानाप्रकारच्या रत्नांचीं भूषणें धारण केलेले व चित्रविचित्र बनाती पांघरलेले हजारों यक्ष व राक्षसही आपआपल्या विमानांत बसून त्याचे मागोमाग गेले ३३. तेव्हां इंद्राच्या नगरीजवळ असलेल्या प्रदेशांमध्यें घोड्यांचा शब्द व पक्ष्यांचा किलबिलाट होतो त्याप्रमाणें कुबेराच्या घराजवळ शब्द झाला ३४. नंतर धनाधिपति कुबेराचे घोडे आकाशमार्गानें जात असतांना अभ्रांना आपल्या बरोबर ओढीत आहेत व वायूच प्राशन करीत आहेत कीं काय असें दिसलें ३५. तदनंतर धनाधिपति कुबेराच्या आज्ञेवरून गतजीवित झालेलीं तीं राक्षसांचीं शरीरें त्या पर्वताच्या शिखरावरून त्याच्या दूतांनीं खालीं ढकलून दिलीं ३६. महाविचारी अगस्त्य मुनीनीं त्यांना शाप दिला असल्यामुळें त्यांचा रणांगणाचे ठिकाणीं भीमसेनानें नाश केला व त्यामुळें त्यांच्या शापाचाही अंत झाला ३७. सारांश, त्या रात्री त्या गृहांचे ठिकाणीं सर्व राक्षसांनीं वेळच्यावेळीं पूजन केलेल्या त्या महात्म्या पांडवांनीं कोणत्याही प्रकारचा उद्वेग न पावतां आनंदानें काढिल्या ३८. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील यक्षयुद्धपर्वांपैकीं कुबेराच्या संभाषणाविषयीं एकशें बासष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ १६२ ॥

वैशंपायन सांगतातः—हे शत्रुदमन करणाऱ्या जनमेजया, तदनंतर सूर्योदय झाल्या-

षेणेन सहितः पाण्डवानभ्यवर्तत १ तेभिवाद्यार्ष्टिषेणस्य पादौ धौम्यस्य
चैव ह। ततः प्राञ्जलयः सर्वे ब्राह्मणांस्तानपूजयन् २ ततो युधिष्ठिरं धौम्यो
गृहीत्वा दक्षिणे करे। प्राचीं दिशमभिप्रेक्ष्य महर्षिरिदमब्रवीत् ३ असौ
सागरपर्यन्तां भूमिमावृत्य तिष्ठति। शैलराजो महाराज मन्दरोतिविरा-
जते ४ इन्द्रवैश्रवणावेतां दिशं पाण्डव रक्षतः। पर्वतैश्च वनान्तैश्च कान-
नैश्चैव शोभिताम् ५ एतदाहुर्महेन्द्रस्य राज्ञो वैश्रवणस्य च। ऋषयः सर्व-
धर्मज्ञाः सद्म तात मनीषिणः ६ अतश्चोद्यन्तमादित्यमुपतिष्ठन्ति वै प्रजाः
ऋषयश्चापि धर्मज्ञाः सिद्धाः साध्याश्च देवताः ७ यमस्तु राजा धर्मज्ञः
सर्वप्राणभृतां प्रभुः। प्रेतसत्वगतिं ह्येनां दक्षिणामाश्रितो दिशम् ८ एतत्सं-
यमनं पुण्यमतीवाद्भुतदर्शनम्। प्रेतराजस्य भवनमृद्ध्या परमया युतम् ९
तं प्राप्य सविता राजन्सत्येन प्रतितिष्ठति। अस्तं पर्वतराजानमेतमाहुर्म-
नीषिणः १० एतं पर्वतराजानं समुद्रं च महोदधिम्। आवसन्वरुणो
राजा भूतानि परिरक्षति ११ उदीचीं दीपयन्नेष दिशं तिष्ठति वीर्यवान्।

वर स्नान संध्या आटोपून धौम्य ऋषि आर्ष्टिषेणासहवर्तमान पांडवांकडे प्राप्त झाले १.
तेव्हां त्यांनीं आर्ष्टिषेण व धौम्य ह्यांच्या चरणांप्रत नमस्कार केल्यावर हात जोडून
त्या सर्वांनीं ब्राह्मणांचें पूजन केलें २. नंतर धौम्य ऋषींनीं धर्मराजाचा उजवा हात
धरून पूर्वदिशेकडे अवलोकन केलें आणि ते महर्षि त्याला ह्मणाले ३ " हे महाराज,
समुद्रापर्यंत भूमीला व्यापून असलेला हा शैलराज मंदरपर्वत विराजमान होत
आहे ४. पर्वत, वनें आणि नानाप्रकारचीं अरण्यें सुशोभित असलेल्या ह्या
दिशेचें रक्षण, हे पांडुतनया धर्मराजा, इंद्र व कुबेर मिळून करीत असतात ५.
बा धर्मराजा, धर्म जाणणारे व महाविचारी असे ऋषि, " हें त्या महेंद्राचें व वैश्रव-
णाच्या पुत्राचें वसतिस्थान आहे " असें ह्मणतात ६. ऋषि, धर्म जाणणारे सिद्ध,
साध्य, देवता आणि सर्व प्रजा ह्याच दिशेचे ठिकाणीं उदयाला येणाऱ्या सूर्याचें उप-
स्थान करीत असतात ७. सर्व प्राणिमात्रांचा प्रभु धर्म जाणणारा राजा यम मृत
झालेल्या प्राण्यांचें जिकडे गमन होतें त्या ह्या दक्षिण दिशेचा आश्रय करून असतो ८
आणि परम शोभेनें युक्त, पुण्यकारक व अवलोकन करितांच आश्चर्य उत्पन्न करणारें
असें हें संयमनसंज्ञक त्या प्रेतराजाचें गृह होय ९. हे राजा, ह्या ठिकाणीं येतांच सूर्य
सत्याचें अवलंबन करितो. विचारी लोक ज्याला अस्ताचल ह्मणतात तोच हा पर्वत-
राज होय. १०. हा पर्वतराज आणि महोदधि समुद्र ह्यांचे ठिकाणीं वास्तव्य करून
राजा वरुण सर्व भूतांचें रक्षण करितो ११. हा वीर्यवान् महामेरु, हे महाभाग्यवान्

महामेरुर्महाभाग शिवो ब्रह्मविदां गतिः १२ यस्मिन्ब्रह्मसदश्चैव भूतात्मा चावतिष्ठते । प्रजापतिः सृजन्सर्वं यत्किंचिज्जङ्गमागमम् १३ यानाहुर्ब्रह्मणः पुत्रान्मानसान्दक्षसप्तमान् । तेषामपि महामेरुः शिवं स्थानमनामयम् १४ अत्रैव प्रतितिष्ठन्ति पुनरेवोदयन्ति च । सप्त देवर्षयस्तात वसिष्ठप्रमुखास्तदा १५ देशं विरजमं पश्य मेरोः शिखरमुत्तमम् । यत्रात्मतृप्तैरध्यास्ते देवैः सह पितामहः १६ यमाहुः सर्वभूतानां प्रकृतेः प्रकृतिं ध्रुवम् । अनादिनिधनं देवं प्रभुं नारायणं परम् १७ ब्रह्मणः सदनात्तस्य परं स्थानं प्रकाशते । देवापि यं न पश्यन्ति सर्वतेजोमयं शुभम् १८ अत्यर्कानलदीप्तं तत्स्थानं विष्णोर्महात्मनः । स्वयैव प्रभया राजन्दुष्प्रेक्ष्यं देवदानवैः १९ प्राच्यां नारायणस्थानं मेरावति विराजते । यत्र भूतेश्वरस्तात सर्वप्रकृतिरात्मभूः २० भासयन्सर्वभूतानि सुश्रियाभिविराजते । नात्र ब्रह्मर्षयस्तात कुत एव महर्षयः २१ प्राप्नुवन्ति गतिं ह्येतां यतीनां

धर्मराजा, उत्तर दिशेला प्रकाशित करीत ब्रह्मवेत्त्यांची गति होऊन बसलेला आहे १२. ह्याच पर्वतावर ब्रह्मदेवाची सभा असून सर्व प्राणिमात्रांचा आत्मा असा प्रजापति स्थावरजंगमात्मक जगताची उत्पत्ति करीत येथेंच वास्तव्य करितो १३. ज्यांच्यामध्यें दक्षप्रजापति सातवा आहे व ज्यांना ब्रह्मदेवाचे मानसपुत्र असें ह्मणतात त्यांचेंही हा मेरूच निरुपद्रवी व कल्याणप्रद असें वसतिस्थान आहे १४. बा धर्मराजा, वसिष्ठप्रमुख सात देवर्षिही येथेंच रहातात आणि पुनरपि येथूनच उदयाला पावतात १५. हे धर्मराजा, मेरुपर्वताच्या शिखरावर असलेला हा उत्कृष्ट व मलरहित असा प्रदेश तूं अवलोकन कर. येथें आत्मलाभानें तृप्त असलेल्या देवांसहवर्तमान ब्रह्मदेव वास्तव्य करित असतो १६. ज्याला पंचमहाभूतांचें उपादानकारण, ध्रुव, जन्ममरणातीत, देव, प्रभु, नारायण व पर ह्मणून ह्मणतात १७ त्याचें ब्रह्मदेवाच्या सदनापलीकडे असलेलें हें वसतिस्थान प्रकाशित होत आहे. त्या अत्यंत तेजस्वी व शुभ अशा प्रभूला देवही अवलोकन करूं शकत नाहींत १८. तें महात्म्या विष्णूचें स्थान सूर्य व अग्नि यांच्याही तेजाला मागें टाकणारें असून अत्यंत तेजस्वी आहे. ह्मणूनच, हे राजा, देव व दानव ह्यांना त्याच्याकडे पहावत नाहीं १९. ह्या मेरुपर्वतावर पूर्व दिशेला असलेलें हें नारायणाचें स्थान विराजमान होत आहे. येथें, बा धर्मराजा, भूतांचा अधिपति व पंचमहाभूतांना उत्पन्न करणारा २० प्रभु सर्व भूतांना प्रकाशित करीत असून आपल्या स्वतःच्या कांतीनें अत्यंत शोभिवंत दिसत आहे. ह्या ठिकाणीं ब्रह्मर्षींला सुद्धां येण्याचें सामर्थ्य नाहीं; मग महर्षींना तर कोठून असणार ? २१; परंतु, हे कुरु-

कुरुसत्तम । न तं ज्योतींषि सर्वाणि प्राप्य भासन्ति पाण्डव २२ स्वयं प्रभुरचिन्त्यात्मा तत्र ह्यातिविराजते । यतयस्तत्र गच्छन्ति भक्त्या नारायणं हरिम् २३ परेण तपसा युक्ता भाविताः कर्मभिः शुभैः । योगसिद्धा महात्मानस्तमोमोहविवर्जिताः २४ तत्र गत्वा पुनर्नेमं लोकमायान्ति भारत । स्वयंभुवं महात्मानं देवदेवं सनातनम् २५ स्थानमेतन्महाभाग ध्रुवमक्षयमव्ययम् । ईश्वरस्य सदा ह्येतत्प्रणमात्र युधिष्ठिर २६ एनं त्वहरहर्मेरुं सूर्याचन्द्रमसौ ध्रुवम् । प्रदक्षिणमुपावृत्य कुरुतः कुरुनन्दन २७ ज्योतींषि चाप्यशेषेण सर्वाण्यनघ सर्वतः । परियान्ति महाराज गिरिराजं प्रदक्षिणम् २८ एतं ज्योतींषि सर्वाणि प्रकर्षन्भगवानपि । कुरुते वितमस्कर्मा आदित्योभिप्रदक्षिणम् २९ अस्तं प्राप्य ततः संध्यामतिक्रम्य दिवाकरः । उदीचीं भजते काष्ठां दिशमेष विभावसुः ३० स मेरुमनुवृत्तः सन्पुनर्गच्छति पाण्डव । प्राङ्मुखः सविता देवः सर्वभूतहिते रतः ३१ स मासान्विभजन्काले बहुधा पर्वसंधिषु । तथैव भगवान्सोमो नक्षत्रैः सह गच्छति ३२ एवमेतं त्वतिक्रम्य महा-

---

कुलश्रेष्ठा, यतींना मात्र येथे जातां येतें. हे पांडुतनया, ह्या स्थलाचे ठिकाणीं नक्षत्रगणाचेंही तेज लोपून जातें २२. येथें अचिंत्य शक्ति प्रभु आत्मा स्वतः प्रकाशित होत असल्यामुळें यति मात्र भक्तीच्या योगानें त्या हरीरूपी नारायणाकडे जातात २३. परम तपश्चर्येच्या योगेंकरून युक्त, शुभ कर्मेंकरून शुद्धान्तःकरण झालेले, योगामध्यें पारंगत असलेले व अज्ञान आणि मोह ह्यांनीं रहित असलेले महात्मे २४ त्या लोकाला जाऊन, त्या स्वयंभू, महात्म्या व सनातन देवाधिदेवाला प्राप्त झाल्यावर पुनरपि, हे भरतकुलोत्पन्ना, ह्या लोकाला प्राप्त होत नाहींत २५. हे महाभाग्यवान् युधिष्ठिरा, हें ईश्वराचें ध्रुव, क्षय न पावणारें व अव्यय असें स्थान आहे. तस्मात् , तूं ह्याला निरंतर नमस्कार कर २६. हे कुरुनंदना, ह्या मेरुपर्वताला सूर्य व चंद्र हे उभयतां प्रत्येक दिवशीं प्रदक्षिणा करीत असतात २७. हे निष्पापा महाराजा, ह्या पर्वतश्रेष्ठ मेरूला सर्व नक्षत्रेंही निरंतर प्रदक्षिणा घालीत असून २८ त्या सर्व नक्षत्रांना आपल्याबरोबर ओढीत ओढीत अंधकार नाहींसा करणारा भगवान् सूर्यही निरंतर प्रदक्षिणा करीत असतो २९. हा दिवाकर संध्याकाळीं अस्ताला प्राप्त झाल्यानंतर प्रातःकाल होतांच उत्तरदिशेचा आश्रय करितो ३०. हे पंडुतनया, पुनरपि मेरुपर्वताचा आश्रय करून सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणाचे ठिकाणीं रत असलेला तो प्राङ्मुख होऊन गमन करितो ३१. त्याच-

मेरुमतन्द्रितः । भावयन्सर्वभूतानि पुनर्गच्छति मन्दरम् ३३ तथा तमिस्रहा
देवो मयूखैर्भावयञ्जगत् । मार्गमेतदसंबाधमादित्यः परिवर्तते ३४ सिसृक्षुः
शिशिराण्येव दक्षिणां भजते दिशम् । ततः सर्वाणि भूतानि कालोऽभ्य-
र्च्छति शैशिरः ३५ स्थावराणां च भूतानां जङ्गमानां च तेजसा । तेजांसि
समुपादत्ते निवृत्तः स विभावसुः ३६ ततः स्वेदक्लमौ तन्द्री ग्लानिश्च
भजते नरान् । प्राणिभिः सततं स्वप्नो ह्यभीक्ष्णं च निषेव्यते ३७ एवमेतद्
निर्देश्यं मार्गमावृत्य भानुमान् । पुनः सृजति वर्षाणि भगवान्भाव-
यन्प्रजाः ३८ वृष्टिमारुतसन्तापैः सुखैः स्थावरजङ्गमान् । वर्धयन्सुमहा-
तेजाः पुनः प्रतिनिवर्तते ३९ एवमेष चरन्पार्थ कालचक्रमतन्द्रितः । प्रकर्ष-
न्सर्वभूतानि सविता परिवर्तते ४० सन्तता गतिरेतस्य नैष तिष्ठति पाण्डव ।
आदायैव तु भूतानां तेजो विसृजते पुनः ४१ विभजन्सर्वभूतानामायुः कर्म
च भारत । अहोरात्रं कलाः काष्ठाः सृजत्येष सदा विभुः ४२ [६३७४]
इति०यक्षयुद्धपर्वणि मेरुदर्शने त्रिषष्ट्यधिकशततमोऽध्यायः ॥ १६३ ॥

प्रमाणें प्रत्येक पर्वणीला चांद्रमानानें मासांचा विभाग करून भगवान् चंद्रही नक्षत्रा-
सहवर्तमान त्याचप्रमाणें गमन करितो ३२. ह्याप्रमाणें निरलस झालेला चंद्र त्या मेरु-
पर्वताला प्रदक्षिणा घालून सर्व भूतांचें रक्षण करीत करीत त्या मंदरपर्वताला जातो ३३.
त्याचप्रमाणें आकाशांतील अंधकाराला नाहींसा करणारा सूर्य आपल्या किरणांनीं
जगत् प्रकाशित करीत करीत अकुंठित गतीनें या मार्गानें गमन करितो ३४. नंतर
गारवा उत्पन्न करण्याकरितांच तो दक्षिणदिशेचें अवलंबन करितो व त्यामुळें
सर्व लोकांना हिवाळ्याचे दिवस प्राप्त होतात ३५. तदनंतर स्थावर व जंगम भूतांचें
तेज तो सूर्य (ग्रीष्मऋतूंमध्यें) आपल्या तेजानें आकर्षण करून घेतो ३६ आणि
ह्मणून लोकांना घर्म, थकवा, आळस व शीण येऊन ते वरचेवर निद्रेचें अवलंबन
करितात ३७. ह्याप्रमाणें अंतरिक्ष मार्गाचें अवलंबन केलेला भगवान् सूर्य मार्गक्रमण
करून पुनरपि प्रजांच्या कल्याणाकरितां पर्जन्यवृष्टि करितो ३८. त्या वृष्टीच्या योगानें
व वाऱ्याच्या सोसाट्यानें स्थावरजंगमांना आनंदित करून तो महातेजस्वी सूर्य पुन-
रपि परावृत्त होतो ३९. हे पृथानंदना धर्मराजा, ह्याप्रमाणें सूर्य सर्व प्राण्यांना आप-
ल्याबरोबर आकर्षण करून ह्या कालचक्राला फिरवितो ४०. अशा रीतीनें ह्या काल-
चक्राची गति निरंतर चाललेली असून तो सूर्य भूतांचें तेज आकर्षण करून पुनरपि तें
टाकून देतो ४१. सारांश, हा प्रभु सूर्यनारायण दिवस, रात्रीं, कला व काष्ठा ह्यांना
उत्पन्न करून त्याच्या योगानें सर्व भूतांच्या आयुष्याचा विभाग करितो ४२. ह्या०
यक्षयुद्धपर्वांपैकीं मेरुपर्वतदर्शनाविषयीं एकशें त्रेसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ १६३ ॥

वैशंपायन उवाच ॥ तस्मिन्नगेन्द्रे वसतां तु तेषां महात्मनां सद्व्रतमास्थितानाम् । रतिः प्रमोदश्च बभूव तेषामाकाङ्क्षतां दर्शनमर्जुनस्य १ तान्वीर्ययुक्तान्सुविशुद्धकामांस्तेजस्विनः सत्यधृतिप्रधानान् । संप्रीयमाणा बहवोऽभिजग्मुर्गन्धर्वसंघाश्च महर्षयश्च २ तं पादपैः पुष्पधरैरुपेतं नगोत्तमं प्राप्य महारथानाम् । मनःप्रसादः परमो बभूव यथा दिवं प्राप्य मरुद्गणानाम् ३ मयूरहंसस्वननादितानि पुष्पोपकीर्णानि महाचलस्य । शृङ्गाणि सानूनि च पश्यमाना गिरेः परं हर्षमवाप्य तस्थुः ४ साक्षात्कुबेरेण कृताश्च तस्मिन्नगोत्तमे संवृतकूलरोधसः । कादम्बकारण्डवहंसजुष्टाः पद्माकुलाः पुष्करिणीरपश्यन् ५ क्रीडाप्रदेशांश्च समृद्धरूपान्सुचित्रमाल्यावृतजातशोभान् । मणिप्रकीर्णांश्च मनोरमांश्च यथा भवेयुर्धनदस्य राज्ञः ६ अनेकवर्णैश्च सुगंधिभिश्च महाद्रुमैः संततमभ्रजालैः । तपः-

---

वैशंपायन सांगतात:—अर्जुनाच्या भेटीची इच्छा करणारे ते सदाचरणसंपन्न महात्मे पांडव त्या श्रेष्ठ पर्वतावर वास्तव्य करूं लागले असतांना त्यांचें मन तेथे रमूं लागलें आणि त्यांना आनंदही होऊं लागला १. तदनंतर वीर्य, अत्यंत शुद्ध इच्छा आणि तेज ह्यांनी युक्त व मुख्यतः सत्य आणि धैर्य ह्यांचें अवलंबन करणाऱ्या त्या पांडवांकडे अनेक गंधर्वगण आणि महर्षि आनंदित होऊन येऊं लागले २. स्वर्गामध्यें गमन झालें असतां मरुद्गणांच्या अंतःकरणाला ज्याप्रमाणें मोठा उल्लास वाटूं लागतो त्याप्रमाणें प्रफुल्लित वृक्षांनी युक्त असलेला तो श्रेष्ठ पर्वत प्राप्त झाल्यामुळें त्या महारथि पांडवांच्या अंतःकरणाला अतिशय उल्लास वाटूं लागला ३. मयूर व हंस यांच्या स्वरांनीं नादित, पुष्पांनीं आच्छादित व अत्यंत सुशोभित अशा त्या पर्वताचीं शिखरें व उभे सुळके ते अवलोकन करूं लागले असतां त्यांना पराकाष्ठेचा हर्ष झाला ४. नंतर त्या उत्कृष्ट पर्वतावर प्रत्यक्ष कुबेरानें बांधिलेल्या पुष्करिणी त्यांनीं अवलोकन केल्या. त्यांचीं तीरें शेवाळ्यानें वगैरे आच्छादित झालेलीं होतीं; कादंब, कारंडव आणि हंसपक्षी त्यांचा आश्रय करून राहिले होते आणि त्या कमलांनीं व्याप्त झालेल्या होत्या ५. तदनंतर राजा कुबेरालाच उपभोग घेण्यास योग्य होतील अशा प्रकारचीं क्रीडास्थानें त्यांनीं अवलोकन केलीं. त्या क्रीडास्थानांमध्यें सर्व प्रकारची समृद्धि होती; फारच चमत्कारिक पुष्पांनीं व्याप्त झाल्यामुळें त्यांना शोभा आलेली होती व ठिकठिकाणीं रत्नें पडलेलीं असून तीं मनोहर दिसत होतीं ६. मुख्यतः तपाचेंच अवलंबन केलेले ते पांडव तेथें एकसारिखे संचार करूं लागले असतां त्या पर्वताचीं शिखरें रंगी बेरंगी अशा मोठमोठ्या सुगंधी वृक्षांनीं आणि मेघसमुदायांनीं

प्रधानाः सततं चरन्तः शृङ्गं गिरेश्चिन्तयितुं न शेकुः ७ स्वतेजसा तस्य नगोत्तमस्य महौषधीनां च तथा प्रभावात् । विभक्तभावो न बभूव कश्चिदहोनिशानां पुरुषप्रवीर ८ यमास्थितः स्थावरजङ्गमानि विभावसुर्भावयतेऽमितौजाः । तस्योदयं चास्तमनं च वीरास्तत्र स्थितास्ते ददृशुर्नृसिंहाः ९ रवेस्तमिस्रागमनिर्गमांस्ते तथोदयं चास्तमनं च वीराः । समावृताः प्रेक्ष्य तमोनुदस्य गभस्तिजालैः प्रदिशो दिशश्च १० स्वाध्यायवन्तः सततक्रियाश्च धर्मप्रधानाश्च शुचिव्रताश्च । सत्ये स्थितास्तस्य महारथस्य सत्यव्रतस्यागमनप्रतीक्षाः ११ इहैव हर्षोऽस्तु समागतानां क्षिप्रं कृतास्त्रेण धनञ्जयेन । इति ब्रुवन्तः परमाशिषस्ते पार्थास्तपोयोगपरा बभूवुः १२ दृष्ट्वा विचित्राणि गिरौ वनानि किरीटिनं चिन्तयतामभीक्ष्णम् । बभूव रात्रिर्दिवसश्च तेषां संवत्सरेणैव समानरूपः १३ यदैव

व्याप्त झाली असल्यामुळें त्या (वर काय काय आहे या) विषयीं कल्पना करण्यास ते समर्थ झाले नाहींत ७. हे पुरुषश्रेष्ठा (जनमेजया), त्या उत्कृष्ट पर्वताच्या स्वतःच्या तेजाच्या योगानें आणि त्या ठिकाणीं असलेल्या महौषधींच्या प्रभावानें (एकसारिखा प्रकाश कायम असल्यामुळें) दिवस आणि रात्र ह्यांमध्यें कांहीं भेदच राहिला नव्हता ८. रात्रीं ज्याचा आश्रय करून महाबलाढ्य अग्नि स्थावर व जंगम पदार्थांना प्रकाशित करितो त्या सूर्याचा उदय आणि अस्त त्या ठिकाणीं राहिलेले पुरुषश्रेष्ठ वीर पांडव अवलोकन करूं लागले ९. रात्रीचा आगम आणि निर्गम, सूर्याचीं अस्तास जाण्याचीं व उदयास येण्याचीं स्थानें आणि त्या तमोनाशक सूर्याच्या किरणसमूहांनीं व्याप्त झालेल्या दिशा व उपदिशा ते पांडव अवलोकन करूं लागले १०. वेदाध्ययन करणारे, नेहमीं विहित कर्माचें आचरण करणारे, मुख्यतः धर्माचेंच अवलंबन करणारे व शुद्ध आचरण ठेवणारे ते सत्यावलंबी पांडव महारथी सत्यनिष्ठ अर्जुनाच्या आगमनाची प्रतीक्षा करीत तेथें राहिले ११ "आणि अस्त्रप्राप्ति झालेल्या अर्जुनाची ह्याच ठिकाणीं भेट होऊन आपणांला हर्ष होण्याचा प्रसंग यावा" अशा प्रकारच्या शुभ इच्छा व्यक्त करणारे ते पांडव तपश्चर्या करूं लागले १२. ह्याप्रमाणें त्या पर्वतावरील चमत्कारिक वनें अवलोकन करून ते पांडव एकसारिखें अर्जुनाचें चिंतन करूं लागले असतां त्यांना अहोरात्र संवत्सराप्रमाणें भासूं लागले १३. ज्यावेळीं धौम्य मुनींच्या अनुमतानें तो महात्मा अर्जुन जटा धारण करून

---

१ सूर्य सायंकालीं अग्नीमध्यें प्रविष्ट होतो असें "अग्निं वावादित्यः सायं प्रविशति" ह्या तैत्तिरीयब्राह्मणांतर्गत श्रुतामध्ये सांगितलें आहे.

धौम्यानुमते महात्मा कृत्वा जटां प्रव्रजितः स जिष्णुः । तदैव तेषां न
बभूव हर्षः कुतो रतिस्तद्गतमानसानाम् १४ भ्रातुर्नियोगात्तु युधिष्ठिरस्य
वनादसौ वारणमत्तगामी । यत्काम्यकात्प्रव्रजितः स जिष्णुस्तदैव ते शोक-
हता बभूवुः १५ तथैव तं चिन्तयतां सिताश्वमस्त्रार्थिनं वासवमभ्युपे-
तम् । मासोथ कृच्छ्रेण तदा व्यतीतस्तस्मिन्नगे भारत भारतानाम् १६
उषित्वा पञ्चवर्षाणि सहस्राक्षनिवेशने । अवाप्य दिव्यान्यस्त्राणि सर्वाणि
विबुधेश्वरात् १७ आग्नेयं वारुणं सौम्यं वायव्यमथ वैष्णवम् । ऐन्द्रं
पाशुपतं ब्राह्मं पारमेष्ठ्यं प्रजापतेः १८ यमस्य धातुः सवितुस्त्वष्टुर्वैश्रव-
णस्य च । तानि प्राप्य सहस्राक्षादभिवाद्य शतक्रतुम् १९ अनुज्ञात-
स्तदा तेन कृत्वा चापि प्रदक्षिणम् । आगच्छदर्जुनः प्रीतः प्रहृष्टो गन्ध-
मादनम् २० [६३९४] इति० मारण्यके पर्वणि यक्षयुद्धपर्वण्यर्जुना-
भिगमने चतुःषष्ट्यधिकशततमोध्यायः॥ १६४ ॥ समाप्तं च यक्षयुद्धपर्व ॥

अथ निवातकवचयुद्धपर्व ॥ वैशंपायन उवाच ॥ ततः कदाचिद्ध-
रिसंप्रयुक्तं महेन्द्रवाहं महसोपयातम् । विद्युत्प्रभं प्रेक्ष्य महारथानां

वनांत चालता झाला त्यावेळीं त्याचा निदिध्यास घेतलल्या त्या पांडवांचा हर्ष
नाहींसा झाला; तेव्हां त्यांना चैन कोठून पडणार ? १४. सारांश, ज्या वेळीं
भ्रात्या युधिष्ठिराची आज्ञा घेऊन तो मत्त गजाप्रमाणें चालणारा अर्जुन
काम्यक वनांतून चालता झाला त्याचवेळीं ते पांडव शोकग्रस्त झाले १५. हे भरत-
कुलोत्पन्ना जनमेजया, अस्त्रप्राप्तीची इच्छा धरून इंद्राकडे गेलेल्या त्या अर्जुनाची
त्याचप्रमाणें काळजी करितां करितां त्या भरतवंशज पांडवांचा त्या पर्वतावर मोठ्या
कष्टानें एक महिना लोटला १६. असो. अर्जुनानें इंद्राच्या घरीं पांच वर्षे वास्तव्य
केलें व त्याला त्या देवराजापासून सर्व दिव्य अस्त्रें प्राप्त झालीं १७. त्याचप्रमाणें
आग्नेय, वारुण, सौम्य, वायव्य, वैष्णव, ऐंद्र, पाशुपत, ब्राह्म, आणि प्रजापतीचें पारमेष्ठ्य
हीं अस्त्रें १८ व तशींच यम, धाता, सविता, त्वष्टा आणि कुबेर यांचीं अस्त्रें, हीं सर्व
त्यानें इंद्रापासून प्राप्त करून घेतलीं. नंतर त्या इंद्राला अभिवंदन व प्रदक्षिणा
करून त्याची अनुज्ञा झाल्यावर तो अर्जुन आनंदित व हर्षयुक्त झाला आणि गंधमाद-
नपर्वतावर परत आला १९,२०. ह्याप्रमाणें० महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीम-
हाभारतांतर्गत वनपर्वांतील यक्षयुद्धपर्वापैकीं अर्जुनाच्या आगमनाविषयीं एकशें
चौसष्टावा अध्याय समाप्त झाला॥ १६४ ॥ ह्या ठिकाणीं यक्षयुद्धपर्वेही संपूर्ण झालें
येथून पुढें निवातकवचयुद्धनामकपर्वाला आरंभ झाला. वैशंपायन सांगतात:- तदनंतर

हर्षोर्जुनं चिन्तयतां बभूव १ स दीप्यमानः सहसान्तरिक्षं प्रकाशयन्मातलिसंगृहीतः । बभौ महोल्केव घनान्तरस्था शिखेव चाग्नेर्ज्वलिता विधूमा २ तमास्थितः संददृशे किरीटी स्रग्वी नवान्याभरणानि बिभ्रत् । धनंजयो वज्रधरप्रभावः श्रिया ज्वलन्पर्वतमाजगाम ३ स शैलमासाद्य किरीटमाली महेन्द्रवाहादवरुह्य तस्मात् । धौम्यस्य पादावभिवाद्य धीमानजातशत्रोस्तदनन्तरं च ४ वृकोदरस्यापि च वन्द्य पादौ माद्रीसुताभ्यामभिवादितश्च । समेत्य कृष्णां परिसान्त्व्य चैनां प्रह्वोभवद्भ्रातुरुपह्वरे सः ५ बभूव तेषां परमः प्रहर्षस्तेनाप्रमेयेण समागतानाम् । स चापि तान्प्रेक्ष्य किरीटमाली ननन्द राजानमभिप्रशंसन् ७ यमास्थितः सप्त जघान पूगान्दितेः सुतानां नमुचेर्निहन्ता । तमिन्द्रवाहं समुपेत्य पार्थाः प्रदक्षिणं चक्रुरदीनसत्त्वाः ७ ते मातलेश्चक्रुरतीव हृष्टाः सत्कारमग्र्यं सुरराजतुल्यम् । सर्वान्यथावच्च दिवौकसस्ते पप्रच्छुरेनं कुरुराज-

---

महारथी पांडव अर्जुनाविषयीं काळजी करीत बसले असतांना एकदा विद्युल्लतेप्रमाणें तेजस्वी आणि अश्व जोडिलेला असा एकाएकीं समीप आलेला इंद्राचा रथ त्यांनीं अवलोकन केला व त्यामुळें त्यांना हर्ष झाला १. मातलीच्या ताब्यांत असलेला तो देदीप्यमान रथ एकाएकीं आकाश प्रकाशित करूं लागला असतां मेघामध्यें असलेली मोठी उल्काच कीं काय अथवा अग्नीची प्रज्वलित व धूमरहित ज्वालाच कीं काय असा दिसूं लागला २. नंतर माला व नूतन भूषणें धारण करणारा अर्जुन त्या रथांत बसलेला दृष्टीं पडूं लागला व लगेच तो इंद्रतुल्यपराक्रमी अर्जुन वैभवानें झळकत झळकत त्या पर्वताकर आला ३. किरीट व माला धारण केलेला तो बुद्धिमान् अर्जुन पर्वतावर येतांक्षणींच त्या इंद्राच्या रथांतून खालीं उतरला आणि प्रथमतः धौम्य मुनींच्या पायांचें अभिवंदन करून तदनंतर धर्मराजाच्या पायांना त्यानें अभिवंदन केलें ४. नंतर भीमसेनाच्याही चरणांना त्यानें वंदन केल्यावर नकुलसहदेवांनीं त्याला अभिवंदन केलें आणि तदनंतर द्रौपदीला भेटून व तिचें सांत्वन करून आपल्या ज्येष्ठ भ्रात्यासमीप तो अर्जुन नम्र होऊन उभा राहिला ५. ह्याप्रमाणें त्या अतर्क्य अर्जुनाचा समागम झाल्यामुळें पांडवांना पराकाष्ठेचा हर्ष झाला आणि किरीट व माला धारण केलेल्या आणि धर्मराजाची प्रशंसा करूं लागलेल्या त्या अर्जुनाला अवलोकन करून त्यांना आनंद झाला ६. ज्यावर आरूढ होऊन इंद्रानें सात दैत्यसमुदायांचा वध केला त्या इंद्राच्या रथाला, उदार अंतःकरणानें युक्त असलेल्या पांडवांनीं समीप जाऊन, प्रदक्षिणा केली ७. इतकेंच नव्हे; परतु, अत्यंत

पुत्राः ८ तानप्यसौ मातलिरभ्यनन्दत्पितेव पुत्राननुशिष्य पार्थान् । ययौ रथेनाप्रतिमप्रभेण पुनः सकाशं त्रिदिवेश्वरस्य ९ गते तु तस्मिन्नरदेववर्यः शक्रात्मजः शक्ररिपुप्रमाथी । शक्रेण दत्तानि ददौ महात्मा महाधनान्युत्तमरूपवन्ति १० दिवाकराभाणि विभूषणानि प्रियः प्रियायै सुतसोममात्रे ११ ततः स तेषां कुरुपुङ्गवानां तेषां च सूर्याग्निसमप्रभाणाम् । विप्रर्षभाणामुपविश्य मध्ये सर्वं यथावत्कथयाम्बभूव १२ एवं मयास्त्राण्युपशिक्षितानि शक्राच्च वाताच्च शिवाच्च साक्षात् । तथैव शीलेन समाधिनाथ प्रीताः सुरा मे सहिताः महेन्द्राः १३ संक्षेपतो वै स विशुद्धकर्मा तेभ्यः समाख्याय दिवि प्रवासम् । माद्रीसुताभ्यां सहितः किरीटी सुष्वाप तामावसतिं प्रतीतः १४ [६४०८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि निवातकवचयुद्धपर्वण्यर्जुनसमागमे पञ्चषष्टयधिकशततमोऽध्यायः ॥ १६५ ॥

वैशंपायन उवाच ॥ ततो रजन्यां व्युष्टायां धर्मराजं युधिष्ठिरम् ।

आनंदित झालेल्या पांडवांनीं त्या इंद्रतुल्य मातलीचा उत्कृष्ट सत्कार केला आणि नंतर त्या कुरुवंशजांनीं सर्व देवांसबधानं यथास्थित हकीकत त्याला विचारिली ८. तेव्हां मातलीनेंही त्यांचें अभिनंदन केलें आणि पुत्रांना उपदेश करणाऱ्या पित्याप्रमाणें त्या पांडवांना उपदेश करून व त्या अप्रतिम तेजस्वी रथावर आरूढ होऊन तो मातलि पुनरपि इंद्राचे समीप परत गेला ९. असो. तो मातलि गेल्यावर इंद्रशत्रुनाशक, इंद्रपुत्र, द्रौपदीला प्रिय आणि नृपश्रेष्ठ अशा महात्म्या अर्जुनानें सूर्याप्रमाणें उज्ज्वल, बहुमोल आणि आकारानेंही उत्कृष्ट अशीं इंद्रानें दिलेली भूषणें प्रिय द्रौपदीला दिलीं १०,११ व नंतर त्या कुरुवंशजश्रेष्ठ पांडवांमध्यें आणि सूर्य व अग्नि ह्यांप्रमाणें तेजस्वी असलेल्या श्रेष्ठ विप्रांमध्यें बसून अर्जुनानें सर्व इत्थंभूत वर्तमान निवेदन केलें १२. सारांश, "ह्याप्रमाणें इंद्र, वायु आणि साक्षात् शिव ह्यांपासून मला अस्त्रांचा उपदेश झाला आहे आणि त्याचप्रमाणें शील आणि तत्परता ह्यांच्या योगानें इंद्रासहवर्तमान एकत्र असलेले सर्व देव माझ्यावर संतुष्ट झाले आहेत " १३ असें त्या शुद्ध आचरणानें वागणाऱ्या अर्जुनानें आपलें स्वर्गासंबंधीं प्रवासवृत्त त्यांना थोडक्यांत सांगितलें आणि नकुलसहदेवांसहवर्तमान आनंदानें तो त्या रात्रीं निद्रिस्थ झाला १४. ह्याप्रमाणें० महाभारतांतर्गत वनपर्वांतील निवातकवचयुद्धपर्वांपैकीं अर्जुनसमागमासंबंधीं एकशें पासष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ १६५ ॥

वैशंपायन सांगतातः—नंतर रात्र उजाडल्यावर सर्व भ्रात्यांसहवर्तमान असलेल्या

भ्रातृभिः सहितः सर्वैरवन्दत धनञ्जयः १ एतस्मिन्नेव काले तु सर्ववादित्रनिःस्वनः । बभूव तुमुलः शब्दस्त्वन्तरिक्षे दिवौकसाम् २ रथनेमिस्वनश्चैव घण्टाशब्दश्च भारत । पृथग्व्यालमृगाणां च पक्षिणामिव सर्वशः ३ ते समन्तादनुययुर्गन्धर्वाप्सरसां गणाः । विमानैः सूर्यसंकाशैर्देवराजमरिन्दमम् ४ ततः स हरिभिर्युक्तं जाम्बूनदपरिष्कृतम् । मेघनादिनमारुह्य श्रिया परमया ज्वलन् ५ पार्थानभ्याजगामाथ देवराजः पुरन्दरः । आगत्य च सहस्राक्षो रथादवरुरोह वै ६ तं दृष्ट्वैव महात्मानं धर्मराजो युधिष्ठिरः । भ्रातृभिः सहितः श्रीमान्देवराजमुपागमत् ७ पूजयामास चैवाथ विधिवद्भूरिदक्षिणः । यथार्हममितात्मानं विधिदृष्टेन कर्मणा ८ धनञ्जयश्च तेजस्वी प्रणिपत्य पुरन्दरम् । भृत्यवत्प्रणतस्तस्थौ देवराजसमीपतः ९ आघ्राय तं महातेजाः कुन्तीपुत्रो युधिष्ठिर । धनञ्जयमभिप्रेक्ष्य विनीतं स्थितमान्तिके ॥ जटिलं देवराजस्य तपोयुक्तमकल्मषम् १० हर्षेण महताविष्टः फाल्गुनस्याथ दर्शनात् । बभूव परमप्रीतो देवराजं च पूजयन् ११

धनंजयानें धर्मराज युधिष्ठिराला वंदन केलें १. ह्याचवेळीं स्वर्गवासीजनांचा आकाशामध्यें सर्व प्रकारच्या वाद्यस्वरांनीं युक्त असा तुमुल शब्द होऊं लागला २ व हे भरतवंशजा जनमेजया, रथचक्रांचा ध्वनि, घंटांचा नाद व श्वापदें आणि पक्षी ह्यांचाही ध्वनि सर्व प्रकारें पृथक् पृथक् होऊं लागला ३. प्रथमतः गंधर्वगण आणि अप्सरांचे समुदाय सूर्यासारिख्या तेजस्वी विमानामध्यें आरूढ होऊन व शत्रुनाशक देवराज इंद्राच्या सभोंवतीं राहून त्याच्याबरोबर जाऊं लागले ४. तदनंतर सुवर्णाचें सामान व मेघासारिखा गंभीर नाद ह्यांनीं युक्त असलेल्या व अश्व जोडिलेल्या आपल्या रथावर आरूढ होऊन उत्कृष्ट कांतीनें झळकत झळकत देवराज इंद्र पांडवांसमीप आला आणि येतांक्षणीं रथांतून खालीं उतरला ५, ६. तेव्हां त्या महात्म्याला अवलोकन करितांक्षणीं वैभवशाली धर्मराज युधिष्ठिर भ्रात्यांसहवर्तमान त्याचे समीप गेला ७ आणि अनेक नजराणे बरोबर घेऊन त्या युधिष्ठिरानें शास्त्रोक्त प्रकारानें त्या महात्म्या इंद्राचें यथाविधि पूजन केलें ८. नंतर तेजस्वी अर्जुनानें इंद्राला साष्टांग नमस्कार घातला आणि सेवकाप्रमाणें नम्र होऊन तो त्या देवराजासमीप उभा राहिला ९. तेव्हां तपस्वी, निष्पाप, विनयसपन्न आणि जटा धारण केलेल्या अर्जुनाला देवराजाचे समीप उभा राहिलेला अवलोकन करून महातेजस्वी कुंतीपुत्र युधिष्ठिरानें त्याचें अवघ्राण केलें १०. अर्जुनाची भेट झाल्यामुळें अतिशय हर्ष झालेला तो युधिष्ठिर अत्यंत आनंदित होऊन इंद्राची प्रशंसा करूं लागला ११.

तं तथादीनमनसं राजानं हर्षसंप्लुतम् । उवाच वचनं धीमा-
न्देवराजः पुरन्दरः १२ त्वमिमां पृथिवीं राजन्प्रशासिष्यसि पाण्डव । स्वस्ति
प्राप्नुहि कौन्तेय काम्यकं पुनराश्रमम् १३ अस्त्राणि लब्धानि च पाण्ड-
वेन सर्वाणि मत्तः प्रयतेन राजन् । कृतप्रियश्चास्मि धनंजयेन जेतुं न
शक्यस्त्रिभिरेष लोकैः १४ एवमुक्त्वा सहस्राक्षः कुन्तीपुत्रं युधिष्ठिरम् ।
जगाम त्रिदिवं हृष्टः स्तूयमानो महर्षिभिः १५ धनेश्वरगृहस्थानां पाण्ड-
वानां समागमम् । शक्रेण य इदं विद्वानधीयीत समाहितः १६ संव-
त्सरं ब्रह्मचारी नियतः संशितव्रतः । स जीवेद्धि निराबाधः सुसुखी
शरदां शतम् १७ [६४२५] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि निवा-
तकवचयुद्धपर्वणीन्द्रागमने षट्षष्ट्यधिकशततमोऽध्यायः ॥ १६६ ॥

वैशंपायन उवाच ॥ यथागतं गते शक्रे भ्रातृभिः सह संगतः । कृष्णया
चैव बीभत्सुर्धर्मपुत्रमपूजयत् १ अभिवादयमानं तं मूर्ध्न्युपाघ्राय पाण्ड-
वम् । हर्षगद्गदया वाचा प्रहृष्टार्जुनमब्रवीत् २ कथमर्जुन कालोऽयं स्वर्गे

तेव्हां आनदांत निमग्न झालेल्या त्या उदार धर्मराजाला अवलोकन करून बुद्धिमान्
देवराज इंद्र त्याला ह्मणाला १२ " हे पांडुपुत्रा धर्मराजा, तूं ह्या पृथ्वीचें राज्य
करशील. आतां, हे कौंतेया, तूं पुनरपि काम्यक आश्रमामध्यें सुखरूप जा १३. हे
राजा, जितेंद्रिय पांडुपुत्र धनंजयाला माझ्यापासून सर्व अस्त्रें प्राप्त झालीं असून त्यानें
माझा मनोरथही परिपूर्ण केला आहे. ह्यामुळं त्रैलोक्य जरी एकत्र जुळलें तरी ह्याचा
पराजय होणें शक्य नाहीं " १४. ह्याप्रमाणें इंद्रानें कुंतीपुत्र युधिष्ठिराला सांगितलें व
महर्षि त्याचें स्तवन करीत असतांना तो इंद्र आनदित होऊन स्वर्गाला गेला १५.
असो. कुबेराच्या गृहामध्यें राहिलेल्या पांडवांचा इंद्राशीं झालेला हा समागम स्वस्थांतः-
करणानें युक्त असलेला, ब्रह्मचर्य पाळणारा, इंद्रियदमन करणारा आणि आरंभिलेलें व्रत
शेवटास नेणारा असा जो पुरुष एक वर्षपर्यंत पठण करील तो कांहीं एक बाधा न होतां
शंभर वर्षेपर्यंत अतिशय सुखी राहील १६,१७. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील निवातकवच-
युद्धपर्वापैकीं इंद्राच्या आगमनासंबंधीं एकशें सहासष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ १६६ ॥

वैशंपायन सांगतातः—इंद्र आल्या मार्गानें परत गेल्यावर भ्राते आणि द्रौपदी
ह्यांसहवर्तमान असलेल्या अर्जुनानें धर्मराजाचें पूजन केलें १. तेव्हां तो पांडुपुत्र अर्जुन
अभिवंदन करूं लागला असतां धर्मराजानें त्याचें मस्तकीं अवघ्राण केलें आणि आनं-
दित झालेला तो धर्मराज हर्षामुळें अस्पष्ट उमटणाऱ्या शब्दांनीं त्याला ह्मणाला २
" हे अर्जुना, स्वर्गामध्यें हा तुझा काळ कसा गेला, अस्त्रें तुला कशीं प्राप्त झालीं,

व्यतिगतस्तव । कथं चास्त्राण्यवाप्तानि देवराजश्च तोषितः ३ सम्यग्वा ते गृहीतानि कच्चिदस्त्राणि पाण्डव । कच्चित्सुराधिपः प्रीतो रुद्रो वास्त्राण्यदात्तव ४ यथा दृष्टश्च ते शक्रो भगवान्वा पिनाकधृक् । यथैवास्त्राण्यवाप्तानि यथैवाराधितश्च ते ५ यथोक्तवांस्त्वां भगवाञ्शतक्रतुररिन्दम । कृतप्रियस्त्वयास्मीति तस्य ते किं प्रियं कृतम् ६ एतदिच्छाम्यहं श्रोतुं विस्तरेण महाद्युते । यथा तुष्टो महादेवो देवराजस्तथानघ ७ यच्चापि वज्रपाणेस्तु प्रियं कृतमरिन्दम । एतदाख्याहि मे सर्वमखिलेन धनञ्जय ८ अर्जुन उवाच ॥ शृणु हन्त महाराज विधिना येन दृष्टवान् । शतक्रतुमहं देवं भगवन्तं च शंकरम् ९ विद्यामधीत्य तां राजंस्त्वयोक्तामरिमर्दन । भवता च समादिष्टस्तपसे प्रस्थितो वनम् १० भृगुतुङ्गमथो गत्वा काम्यकादास्थितस्तपः । एकरात्रोषितः कंचिदपश्यं ब्राह्मणं पथि ११ स मामपृच्छत्कौन्तेय क्वासि गन्ता ब्रवीहि मे । तस्मा अवितथं सर्वमब्रुवं कुरुनन्दन १२ स तथ्यं मम तच्छ्रुत्वा ब्राह्मणो राजसत्तम । अपू-

---

व देवराज इंद्र तूं कसा प्रसन्न करून घेतलास ? (हें मला कथन कर) ३. हे पांडुपुत्रा, तुला अस्त्रांचा उपदेश चांगला यथाविधि झाला आहे नां ? आणि त्याचप्रमाणें देवाधिपति रुद्रानें प्रसन्न होऊन तुला अस्त्रं दिलीं आहेत नां ४ ? असो. इंद्राचें अथवा भगवान् पिनाकपाणि शंकराचें दर्शन तुला कसें झालें, तुला अस्त्रें कशीं प्राप्त झालीं, शंकराचें आराधन तूं कसें केलेस ? ५, हे शत्रुदमना अर्जुना, ' तूं माझा मनोरथ परिपूर्ण केला आहेस ' ह्मणून भगवान् इंद्रानें सांगितलें आहे; परंतु, तूं त्याचा कोणता मनोरथ परिपूर्ण केलास ? हें सविस्तर श्रवण करण्याची, हे महातेजस्वी अर्जुना, मला इच्छा आहे. हे निष्पापा धनंजया, महादेव संतुष्ट कसा झाला (हें मला कथन कर) ६,७. त्याचप्रमाणें हे शत्रुदमना, धनंजया, वज्रपाणि इंद्राचें जें कांहीं तूं प्रिय केलेंस तें सर्व पूर्णपणें मला कथन कर " ८. अर्जुन ह्मणतो:—हे महाराजा, देवेंद्राचें आणि भगवान् शंकराचें मला कसें दर्शन झालें हें आपण श्रवण करा ९. हे शत्रुनाशका धर्मराजा, आपण सांगितलेली ती विद्या पढून आपली आज्ञा झाल्यावर मी तपश्चर्या करण्याकरितां वनामध्यें चालता झालों १०. प्रथम काम्यकवनापासून भृगुतुंगपर्वतावर जाऊन मीं तपश्चर्येला आरंभ केला आणि तेथें एक रात्र राहिल्यावर मार्गामध्यें कोणीएक ब्राह्मण माझ्या दृष्टीं पडला ११. तो मला ह्मणाला " हे कुंतीपुत्रा, तूं कोठें जाणार आहेस हें मला सांग. " ह्याप्रमाणें त्यानें विचारिल्यावर, हे कुरुनंदना धर्मराजा, मीं सर्व त्याला खरें खरें निवेदन केलें १२. तेव्हां हे नृपश्रेष्ठा धर्मराजा, माझें तें तथ्य

जयत मां राजन्प्रीतिमांश्चाभवन्मयि १३ ततो मामब्रवीत्प्रीतस्तप आतिष्ठ
भारत । तपस्वी न चिरेण त्वं द्रक्ष्यसे विबुधाधिपम् १४ ततोहं वचना-
त्तस्य गिरिमारुह्य शैशिरम् । तपोतप्यं महाराज मास मूलफलाशनः १५
द्वितीयश्चापि मे मासो जलं भक्षयतो गतः । निराहारस्तृतीयेथ मासे
पाण्डवनन्दन १६ ऊर्ध्वबाहुश्चतुर्थं तु मासमस्मि स्थितस्तदा । न च मे
हीयते प्राणस्तदद्भुतमिवाभवत् १७ पञ्चमे त्वथ संप्राप्ते प्रथमे दिवसे गते।
वराहसंस्थितं भूतमत्समीपं समागमत् १८ निघ्नन्प्रोथेन पृथिवीं विलिखं-
श्चरणैरपि । संमार्जञ्जठरेणोर्वीं विवर्तंश्च मुहुर्मुहुः १९ अनु तस्यापरं भूतं
महत्कैरातसंस्थितम् । धनुर्बाणासिमत्प्राप्तं स्त्रीगणानुगतं तदा २० ततोहं
धनुरादाय तथाक्षय्ये महेषुधी । अताडयं शरेणाथ तद्भूतं लोमहर्षणम् २१
युगपत्तं किरातस्तु विकृष्य बलवद्धनुः । अभ्याजघ्ने दृढतरं कम्पयन्निव
मे मनः २२ स तु मामब्रवीद्राजन्मम पूर्वपरिग्रहः । मृगयाधर्ममुत्सृज्य

भाषण श्रवण केल्यावर तो ब्राह्मण माझी प्रशंसा करू लागला आणि माझ्यावर प्रसन्न झाला १३. नंतर, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, प्रसन्न झालेला तो ब्राह्मण मला ह्मणाला " तपश्चर्या कर; तूं तपस्वी बनलास ह्मणजे लवकरच तुला देवाधिपति इंद्राचें दर्शन होईल " १४. ह्याप्रमाणें त्यानें सांगितल्यानंतर, हे महाराजा, त्याच्या सांगण्यावरून मी हिमालयपर्वतावर गेलों आणि एक महिनाभर फलमूलांवर उपजीविका करून मीं तपश्चर्या केली १५. हे पांडवनंदना धर्मराजा, जलपानावर माझा दुसरा महिना लोटला आणि तिसऱ्या महिन्यामध्यें मीं कांहींच सेवन केलें नाहीं १६. संपूर्ण चवथा महिना मी हात वर करून उभा राहिलों होतों; तथापि, माझी शक्ति कमी झाली नाहीं हें एक आश्चर्यच झालें १७. नंतर पांचवा महिना लागून एक दिवस लोटल्यावर वराहासारिखा एक प्राणी माझ्या समीप आला १८. तो प्राणी आपल्या तोंडानें पृथ्वीला हुदडीत असून पायांनीं ओरखडीत होता आणि उदरानें भूमि झाडीत असून वारंवार इकडे तिकडे वेडावांकडा हिंडत होता १९. त्याच्या मागोमाग किरातवेष धारण केलेला असा दुसरा एक मोठा पुरुष होता. त्याचेजवळ धनुष्य, बाण आणि खड्ग असून स्त्रियांचा समुदायही त्याचे बरोबर होता २०. असें अवलोकन केल्यानंतर मीं धनुष्य व मोठे अक्षय्य भाते जवळ घेतले आणि शरीरावर रोमांच उठविणाऱ्या त्या प्राण्याला एक बाण मारिला २१. परंतु त्याच वळेला प्रचंड धनुष्य ओढून त्या किरातानेंही त्याच्यावर बाण टाकिला आणि माझ्या मनामध्यें त्यानें अतिशय भीति उत्पन्न केली २२. नंतर, हे राजा, तो मला ह्मणाला " मी झाला

किमर्थं ताडितस्त्वया २३ एष ते निशितैर्बाणैर्दर्पं हन्मि स्थिरो भव । स धनुष्मान्महाकायस्ततो मामभ्यभाषत २४ ततो गिरिमिवात्यर्थमावृणोन्मां महाशरैः । तं चाहं शरवर्षेण महता समवाकिरम् २५ ततः शरैर्दीप्तमुखैर्यन्त्रितैरनुमन्त्रितैः । प्रत्यविध्यमहं तं तु वज्रैरिव शिलोच्चयम् २६ तस्य तच्छतधा रूपमभवच्च सहस्रधा । तानि चास्य शरीराणि शरैरहमताडयम् २७ पुनस्तानि शरीराणि एकीभूतानि भारत । अदृश्यन्त महाराज तान्यहं व्यधमं पुनः २८ अणुर्बृहच्छिरा भूत्वा बृहच्चाणुशिराः पुनः । एकीभूतस्तदा राजन्सोऽभ्यवर्तत मां युधि २९ यदाभिभवितुं बाणैर्न च शक्नोमि तं रणे । ततो महास्त्रमातिष्ठं वायव्यं भरतर्षभ ३० न चैनमशकं हन्तुं तदद्भुतमिवाभवत् । तस्मिन्प्रतिहते चास्त्रे विस्मयो मे महानभूत् ३१ भूय एव महाराज सविशेषमहं ततः । अस्त्रपूगेन महता रणे भूतमवाकिरम् ३२ स्थूणाकर्णमथो जालं शरवर्षमथोल्बणम् । शलभास्त्रमश्मवर्षं समास्थायाहमभ्ययाम् ३३ जग्रास प्रसभं तानि सर्वाण्यस्त्राणि मे नृप ।

प्रथम रोखिलें होतें. तस्मात् , मृगयाधर्म सोडून देऊन तूं कशाकरितां ह्याला बाणानें ताडण केलेंस ? २३. (कांहीं चिंता नाहीं !) जरा धीर धर; हा मी तीक्ष्ण बाणांनीं आतां तुझा गर्व नाहींसा करितों ". असें तो धनुर्धारी धिप्पाड पुरुष मला ह्मणाला २४. तदनंतर मोठमोठ्या बाणांनीं त्यानें मला पर्वताप्रमाणें अतिशय आच्छादित करून टाकिलें असतां मीही त्याला मोठ्या बाणवृष्टीनें भरून काढिला २५. नंतर वज्राच्या योगानें ज्याप्रमाणें पर्वताला वेध करावा त्याचप्रमाणें देदीप्यमान मुखांनीं युक्त, अभिमंत्रित आणि धनुष्याला लाविलेल्या अशा बाणांनीं मीं त्याला उलट वेध केला २६. तेव्हां त्याच्या त्या एका शरीराचीं शेंकडो हजारों शरीरें झालीं; तथापि त्या सर्व शरीरांना मीं बाणांनीं वेध केला २७. हे भरतकुलोत्पन्न महाराजा, तीं शरीरें पुनरपि जेव्हां एकत्र झालेलीं दिसूं लागलीं तेव्हां मींही पुनरपि त्यांची दाणादाण करून दिली २८. नंतर, हे राजा, लहानाचा मोठा व मोठ्याचा लहान होऊन आणि एकच शरीर धारण करून त्यानें संग्रामामध्यें माझ्यावर हल्ला केला २९. हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, जेव्हां संग्रामामध्यें बाणांच्या योगानें मला त्याचा पराभव करितां येईना तेव्हां मीं मोठें वायव्यास्त्र सोडिलें ३०. तथापि, त्याचा वध करण्यास मी समर्थ झालों नाहीं हें एक आश्चर्यच झालें आणि तें अस्त्र कुंठित झाल्यावर तर मला मोठा विस्मय वाटला ३१. हे महाराजा, तदनंतर मीं पुनरपि संग्रामामध्यें त्याच्यावर कांहीं विशेषप्रकारानें मोठ्या, अस्त्रसमुदायाचा वर्षाव केला ३२. स्थूणाकर्णनामक अस्त्र, वारुणास्त्र, भयंकर असें शरवर्षास्त्र,

तेषु सर्वेषु जग्धेषु ब्रह्मास्त्रं महदादिशम् ३४ ततः प्रज्वलितैर्बाणैः सर्वतः
सोपचीयते । उपचीयमानश्च मया महास्त्रेण व्यवर्धयत् ३५ ततः संतापिता
लोका मत्प्रसूतेन तेजसा । क्षणेन हि दिशः खं च सर्वतो हि विदीपितम् ३६
तदप्यस्त्रं महातेजाः क्षणेनैव व्यशातयत् । ब्रह्मास्त्रे तु हते राजन्भयं मां
महदाविशत् ३७ ततोहं धनुरादाय तथाक्षय्ये महेषुधी । सहसाभ्यहनं
भूतं तान्यप्यस्त्राण्यभक्षयत् ३८ हतेष्वस्त्रेषु सर्वेषु भक्षितेष्वायुधेषु च । मम
तस्य च भूतस्य बाहुयुद्धमवर्तत ३९ व्यायामं मुष्टिभिः कृत्वा तलैरपि
समागतैः । अपारयंश्च तद्भूतं निश्चेष्टमगमं महीम् ४० ततः प्रहस्य तद्भूतं
तत्रैवान्तरधीयत । सह स्त्रीभिर्महाराज पश्यतो मेद्भुतोपमम् ४१ एवं
कृत्वा स भगवांस्ततोन्यद्रूपमास्थितः । दिव्यमेव महाराज वसानोद्भुतम-
म्बरम् ४२ हित्वा किरातरूपं च भगवांस्त्रिदशेश्वरः । स्वरूपं दिव्यमा-
स्थाय तस्थौ तत्र महेश्वरः ४३ अदृश्यत ततः साक्षाद्भगवान्गोवृषध्वजः ।

पाषाणवर्षास्त्र आणि शलभास्त्र ह्यांचें अवलंबन करून मीं त्याच्यावर हल्ला केला ३३. तथापि, हे राजा, तीं सर्व अस्त्रें त्यानें जोराजोरानें ग्रस्त करून टाकिलीं आणि ह्याप्रमाणें तीं सर्व ग्रस्त झाल्यावर मी महाब्रह्मास्त्राचा प्रयोग केला ३४. तेव्हां प्रज्वलित बाणांच्या योगानें सर्व बाजूंनीं त्याच्या शरीराला भरच पडूं लागली आणि मीं सोडिलेल्या महास्त्रानें शरीरामध्यें भर पडूं लागल्यामुळें तो वृद्धिंगत होऊं लागला ३५. तदनंतर, माझ्यापासून उत्पन्न झालेल्या तेजानें (ह्मणजे अर्थात् मीं सोडिलेल्या ब्रह्मास्त्राच्या तेजाच्या योगानें) एका क्षणांत, दिशांसहवर्तमान सर्व आकाश सर्व बाजूंनीं प्रदीप्त झालें ३६. तथापि, तेंहीं अस्त्र त्या महातेजस्वी पुरुषानें एका क्षणांतच तोडून टाकिलें, आणि, हे राजा, ह्याप्रमाणें ब्रह्मास्त्राचा नाश झाल्यावर मीं फारच भयभीत झालों ३७. तदनंतर धनुष्य व अक्षय्य भाते घेऊन मीं एकदम त्या प्राण्यावर (अस्त्रांच्या योगानें) प्रहार केला; तथापि, तींही अस्त्रें त्यानें भक्षण करून टाकिलीं ३८. ह्याप्रमाणें सर्व अस्त्रें आणि आयुधें गट्ट झालीं असतां माझें व त्या प्राण्याचें बाहुयुद्ध सुरू झालें ३९. मुष्टि आणि चपरका ह्यांच्या योगानें मी जरी बरीच धक्काबुक्की केली तरी त्या प्राण्याशीं झगडण्यास असमर्थ झाल्यामुळें मी निश्चेष्ट होऊन भूमीवर पडलों ४०. तेव्हां, हे महाराजा, स्त्रियांसहवर्तमान असलेला तो आश्चर्यकारक प्राणी किंचित् हास्य करून माझ्या समक्ष तेथेंच गुप्त झाला ४१. ह्याप्रमाणें गुप्त झाल्यावर, हे महाराजा, आश्चर्यकारक दिव्य वस्त्र परिधान करणाऱ्या त्या भगवानानें दुसरेंच रूप धारण केलें ४२. सारांश, तो देवाधिपति महेश्वर किरातरूपाचा त्याग करून आणि स्वतःचें दिव्य रूप धारण करून

उमामहायो व्यालधृग्बहुरूपः पिनाकधृक् ४४ स मामभ्येत्य समरे तथैवाभिमुखं स्थितम् । शूलपाणिरथोवाच तुष्टोस्मीति परन्तप ४५ ततस्तद्धनुरादाय तूणौ चाक्षय्यसायकौ । प्रादान्ममैव भगवान्वरयस्वेति चाब्रवीत् ४६ तुष्टोस्मि तव कौन्तेय ब्रूहि किं करवाणि ते । मनोगतं वीर यत्ते तद्ब्रूहि वितराम्यहम् ४७ अमरत्वमपाहाय ब्रूहि यत्ते मनोगतम् । ततः प्राञ्जलिरेवाहमस्त्रेषु गतमानसः ४८ प्रणम्य मनसा शर्वं ततो वचनमाददे । भगवान्मे प्रसन्नश्चेदीप्सितोयं वरो मम ४९ अस्त्राणीच्छाम्यहं ज्ञातुं यानि देवेषु कानिचित् । ददानीत्येव भगवानब्रवीत्त्र्यम्बकश्च माम् ५० रौद्रमस्त्रं मदीयं त्वामुपस्थास्यति पाण्डव । प्रददौ च मम प्रीतः सोस्त्रं पाशुपतं महत् ५१ उवाच च महादेवो दत्त्वा मेस्त्रं सनातनम् । न प्रयोज्यं भवेदेतन्मानुषेषु कथंचन ५२ जगद्विनिर्दहेदेवमल्पतेजसि पातितम् । पीड्यमानेन बलवत्प्रयोज्यं स्याद्धनञ्जय ॥

तेथें उभा राहिला ४३ आणि सर्प व पिनाकधनुष्य धारण करून उमेसहवर्तमान असलेला तो बहुरूपी भगवान् शंकर मला प्रत्यक्ष दिसू लागला ४४. इतकेंच नव्हे; परंतु, हे शत्रुतापना, तो शूलपाणि शंकर संग्रामामध्यें मी तसाच संमुख उभा राहिलो असतांना माझ्याकडे आला आणि "मी संतुष्ट झालों आहें" असें मला ह्मणाला ४५. तदनंतर तें धनुष्य आणि अक्षय्य भाते त्यानें मलाच दिले आणि वर माग ह्मणून त्यानें मला सांगितलें ४६. (तो ह्मणाला) "हे कुंतीपुत्रा, मी तुझ्यावर संतुष्ट झालो आहें; मीं तुझे काय शेवटास न्यावे तें सांग. हे वीरा, तुझ्या मनामध्यें जें असेल तें सांग ह्मणजे मी तें तुला देईन ४७. ह्याकरितां एक अमरत्व सोडून जें कांहीं तुझ्या मनांत असेल तें सांग". तदनंतर अस्त्रांविषयीं उत्सुक असलेला मी लगेच हात जोडूनच उभा राहिलो ४८ आणि मनानें त्या शंकराला प्रणाम करून ह्मणालों "—मजवर जर भगवान् प्रसन्न असतील तर देवांपाशीं जीं कांहीं अस्त्रें असतील तीं जाणण्याची माझी इच्छा आहे—हा वर मला इष्ट आहे". ह्यावर भगवान् त्र्यंबक 'देईन' असेंच मला ह्मणाले ४९,५० आणि "हे पांडुपुत्रा अर्जुना, माझें रौद्रास्त्रही तुला प्राप्त होईल" (असें ही त्यांनीं सांगितलें). तदनंतर प्रसन्न झालेल्या त्या शंकरानें मला महापाशुपतास्त्र दिलें ५१ आणि तें सनातन अस्त्र दिल्यावर भगवान् महादेव मला ह्मणाला "मनुष्यांवर ह्याचा कधींही प्रयोग करावयाचा नाहीं ५२. कारण, अल्पतेजाचे ठिकाणी ह्याचा प्रयोग केला असतां हें जगताला दग्ध करून टाकील. वास्तव, हे धनंजया, जेव्हां आपल्याला

अस्त्राणां प्रतिघाते च सर्वथैव प्रयोजयेत् ५३ तदप्रतिहतं दिव्यं सर्वास्त्र-प्रतिषेधनम् । मूर्तिमन्मे स्थितं पार्श्वे प्रसन्ने गोवृषध्वजे ५४ उत्सादनम-मित्राणां परसेनानिकर्तनम् । दुरासदं दुष्प्रसहं सुरदानवराक्षसैः ५५ अनुज्ञा-तस्त्वहं तेन तत्रैव समुपाविशम् । प्रेक्षतश्चैव मे देवस्तत्रैवान्तरधीयत ५६ [६४८१] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायामारण्यके पर्वणि निवात-कवचयुद्धपर्वणि युधिष्ठिरार्जुनसंवादे सप्तषष्ट्यधिकशततमोऽध्यायः ॥१६७॥

अर्जुन उवाच ॥ ततस्तामवसं प्रीतो रजनीं तत्र भारत । प्रसादा-द्देवदेवस्य त्र्यम्बकस्य महात्मनः १ व्युषितो रजनीं चाहं कृत्वा पौर्वा-ह्णिकीः क्रियाः । अपश्यं तं द्विजश्रेष्ठं दृष्टवानस्मि यं पुरा २ तस्मै चाहं यथावृत्तं सर्वमेव न्यवेदयम् । भगवन्तं महादेवं समेतोऽस्मीति भारत ३ स मामुवाच राजेन्द्र प्रीयमाणो द्विजोत्तमः । दृष्टस्त्वया महादेवो यथा नान्येन केनचित् ४ समेत्य लोकपालैस्तु सर्वैर्वैवस्वतादिभिः । द्रष्टास्य-नघ देवेन्द्रं स च तेऽस्त्राणि दास्यति ५ एवमुक्त्वा स मां राजन्नाश्लिष्य

पराकाष्ठेची पीडा होऊ लागेल तव्हांच ह्याचा प्रयोग करावा आणि शत्रूच्या अस्त्रांचें निवारण करण्याकरितां सर्वथैव ह्याचा प्रयोग करावाच ५३. असो. सर्व अस्त्रांचा निरोध करणारें, कधीही कुंठित न होणारें, शत्रूचा वध व शत्रुसेनांचा नाश करणारें, देव, दानव व राक्षस ह्यांना सहन होण्यास फारच कठीण व अजिंक्य असें तें दिव्य अस्त्र, शंकर प्रसन्न झाले असतां, मूर्तिमंत माझ्या समीप येऊन उभें राहिलें ५४,५५. तदनंतर शंकरांनीं मला अनुज्ञा दिल्यावर मी तेथेंच बसलों व माझ्या समक्षच तो देवही तेथेंच गुप्त झाला ५६. ह्याप्रमाणें०वनपर्वांतील निवातकवचवधपर्वापैकीं युधि-ष्ठिर आणि अर्जुन ह्यांच्या संवादाविषयीं एकशें सदुसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥१६७॥

अर्जुन ह्मणतो:—हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, महात्म्या देवाधिदेव त्र्यंबकाच्या प्रसादामुळें मी आनंदित होऊन ती रात्र तेथें राहिलों आणि रात्र तेथें काढिल्यानंतर सकाळची स्नानसंध्या आटोपल्यावर पूर्वीं पाहिलेला तो श्रेष्ठ ब्राह्मण माझ्या दृष्टीं पडला २. तेव्हा, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, भगवान् महादेवाचा व माझा समागम झाला वगैरे सर्व इत्थंभूत वर्तमान मीं त्याला निवेदन केलें ३. हे राजाधिराज, (माझी हकीकत ऐकतां ऐकतां) संतुष्ट होऊं लागलेला तो श्रेष्ठ ब्राह्मण मला ह्मणाला " तुझ्याप्रमाणें महादेवाचें दर्शन दुसऱ्या कोणालाही झालेलें नाहीं ४. आतां यमधर्मप्रभृति सर्व लोकपालांशीं तुझा समागम होऊन, हे निष्पापा, तुला देवराज इंद्राचें दर्शन होईल व तो तुला अस्त्रें देईल " ५. हे धर्मराजा, ह्याप्रमाणें मला

च पुनः पुनः । अगच्छत्स यथाकामं ब्राह्मणः सूर्यसंनिभः ६ अथाप-राह्णे तस्याह्नः प्रावात्पुण्यः समीरणः । पुनर्नवमिमं लोकं कुर्वन्निव सपत्नहन् ७ दिव्यानि चैव माल्यानि सुगन्धीनि नवानि च । शैशिरस्य गिरेः पादे प्रादुरासन्समीपतः ८ वादित्राणि च दिव्यानि सुघोराणि समन्ततः । स्तुतयश्चेन्द्रसंयुक्ता अश्रूयन्त मनोहराः ९ गणाश्चाप्सरसां तत्र गन्धर्वाणां तथैव च । पुरस्ताद्देवदेवस्य जगुर्गीतानि सर्वशः १० मरुतां च गणास्तत्र देवयानैरुपागमन् । महेन्द्रानुचरा ये च ये च सद्म-निवासिनः ११ ततो मरुत्वान्हरिभिर्दिव्यैर्वाहैः स्वलंकृतैः । शचीसहा-यस्तत्रायात्सह सर्वैस्तदामरैः १२ एतस्मिन्नेव काले तु कुबेरो नरवा-हनः । दर्शयामास मां राजँल्लक्ष्म्या परमया युतः १३ दक्षिणस्यां दिशि यमं प्रत्यपश्यं व्यवस्थितम् । वरुणं देवराजं च यथास्थानमवस्थितम् १४ ते मामूचुर्महाराज सान्त्वयित्वा नरर्षभ । सव्यसाचिन्निरीक्षास्माँल्लोक-पालानवस्थितान् १५ सुरकार्यार्थसिद्ध्यर्थं दृष्टवानसि शंकरम् । अस्मत्तोपि गृहाण त्वमस्त्राणीति समन्ततः १६ ततोहं प्रयतो भूत्वा

सांगून व पुनः पुनः कवटाळून तो सूर्यासारिखा तेजस्वी ब्राह्मण आपल्या इच्छेप्रमाणें चालता झाला ६. तदनंतर, हे शत्रुनाशक धर्मराजा, त्या दिवशीं अपराह्न समय झाल्यावर ह्या भूलोकाला पुनरपि नवी टवटवीच आणीत आहे कीं काय असा शुभ वारा वाहूं लागला ७. तेव्हां टवटवीत व सुगंधीं अशीं दिव्य पुष्पें हिमालय पर्वताच्या पायथ्याजवळ पडलेलीं दिसूं लागलीं ८; फारच भयंकर अशीं दिव्य वाद्यें आणि इंद्रसंबंधीं मनोहर स्तवनें चोहोंकडून कानावर येऊं लागलीं ९; अप्सरांचें आणि त्याचप्रमाणें गंधर्वांचे समुदाय त्या देवाधिदेवापुढें सर्व प्रकारचें गायन करूं लागले १० आणि इंद्रसेवक, घरीं रहाणारे स्त्रीपुत्र वगैरे व मरुद्गण त्या ठिकाणीं विमानांत बसून आले ११. तदनंतर उत्तम प्रकारें अलंकार घातलेले हरिसंज्ञक दिव्य अश्व ज्याला जोडिले आहेत अशा रथामध्यें शचीसहवर्तमान आरूढ होऊन इंद्र सर्व देवांना घेऊन तेथें आला १२ आणि, हे राजा, सर्वोत्कृष्ट वैभवानें युक्त असलेल्या नरवाहन कुबेरा-नेंही ह्याच वेळीं मला दर्शन दिलें १३. त्याचप्रमाणें दक्षिण दिशेस स्थित असलेल्या यमाला मीं अवलोकन केलें आणि वरुण व देवराज इंद्र हेही आपआपल्या स्थानीं (ह्मणजे अनुक्रमें पश्चिमेस व पूर्वेस) असलेले माझ्या दृष्टीं पडले १४. नंतर हे पुरु-षश्रेष्ठा महाराजा, सांत्वनपूर्वक ते मला ह्मणाले " हे अर्जुना, येथें स्थित असलेल्या आह्मा लोकपालांना तूं अवलोकन कर १५, अरे, देवकार्यसिद्ध्यर्थ तुला शंकराचें

प्रणिपत्य सुरर्षभान् । प्रत्यगृह्णं तदास्त्राणि महान्ति विधिवद्विभो १७
गृहीतास्त्रस्ततो देवैरनुज्ञातोस्मि भारत । अथ देवा ययुः सर्वे यथागतमरि-
न्दम १८ मघवानपि देवेशो रथमारुह्य सुप्रभम् । उवाच भगवान्स्वर्गो
गन्तव्यं फाल्गुन त्वया १९ पुरैवागमनादस्माद्वेदाहं त्वां धनञ्जय । अतः
परं त्वहं वै त्वां दर्शये भरतर्षभ २० त्वया हि तीर्थेषु पुरा समाप्लावः
कृतोसकृत् । तपश्चेदं महत्तप्तं स्वर्गं गन्तासि पाण्डव २१ भूयश्चैव च
तप्तव्यं तपश्चरणमुत्तमम् । स्वर्गं त्ववश्यं गन्तव्यं त्वया शत्रुनिषूदन २२
मातलिर्मन्नियोगात्त्वां त्रिदिवं प्रापयिष्यति । विदितस्त्वं हि देवानां
मुनीनां च महात्मनाम् २३ ततोहमब्रुवं शक्रं प्रसीद भगवन्मम ।
आचार्यं वरयेयं त्वामस्त्रार्थं त्रिदशेश्वर २४ इन्द्र उवाच ॥ क्रूरकर्मा-
स्त्रवित्तात भविष्यसि परन्तप । यदर्थमस्त्राणीप्सुस्त्वं तं कामं पाण्डवा-
प्नुहि २५ ततोहमब्रुवं नाहं दिव्यान्यस्त्राणि शत्रुहन् । मानुषेषु प्रयोक्ष्यामि

दर्शन झालें आहे. तेव्हां आह्मांपासूनही तूं पूर्णपणें अस्त्रें ग्रहण कर " १६. हे प्रभो धर्मराजा, ह्याप्रमाणें लोकपालांनीं सांगितल्यानंतर शुचि होऊन मीं त्या सुरश्रेष्ठांना प्रणिपात केला आणि मोठमोठीं अस्त्रें त्यांच्यापासून यथाविधि ग्रहण केलीं १७. मीं अस्त्रें ग्रहण केल्यानंतर, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, देवांनीं मला जाण्याची अनुज्ञा दिली व नंतर, हे शत्रुदमना, ते सर्व देव आल्या मार्गानें चालते झाले १८. नंतर भगवान् देवराज इंद्रही आपल्या अत्यंत तेजस्वी रथावर आरूढ होऊन मला ह्मणाला " हे अर्जुना, तुला स्वर्गाला गेलें पाहिजे १९. हे धनंजया, ह्या आगमनाच्या पूर्वीपासूनच मी तुला जाणीत आहें आणि अतःपर तर, हे भरतवंशजश्रेष्ठा अर्जुना, मी तुला दर्शन देत जाईन २०. पूर्वी तीर्थांचे ठिकाणीं तूं अनेकवेळां स्नानें केलेलीं आहेस आणि ही मोठी तपश्चर्याही तूं केली आहेस; ह्यास्तव, हे पांडवा, स्वर्गामध्यें तुझें गमन होईल २१. हे शत्रुनाशका अर्जुना, अद्यापिही फिरून तुला उत्कृष्ट तपश्चर्या केली पाहिजे आणि स्वर्गाला तर अवश्य गेलेंच पाहिजे २२. माझ्या आज्ञेवरून मातलि तुला स्वर्गास घेऊन जाईल. तू महात्म्या मुनींना व देवांना विदित आहेस " २३. ह्याप्रमाणें इंद्रानें सांगितल्यानंतर मी त्याला ह्मणालों " हे भगवन् , आपण प्रसन्न व्हा; हे देवराज, अस्त्रांकरितां आपण माझे आचार्य व्हावें हा वर मी आपणांपाशीं मागत आहें " २४. ह्यावर इंद्र ह्मणाला " बा शत्रुतापना अर्जुना, तूं क्रूरकर्मी व अस्त्रवेत्ता होशील आणि ज्याकरितां तूं अस्त्रांची इच्छा करित आहेस तो तुझा मनोरथ परिपूर्ण होईल " २५. ह्याप्रमाणें इंद्रानें सांगितल्यानंतर मी त्याला ह्मणालों

विनास्त्रप्रतिघातनात् २६ तानि दिव्यानि मेऽस्त्राणि प्रयच्छ विबुधाधिप । लोकांश्चास्त्रजितान्पश्चाल्लभेयं सुरपुङ्गव २७ इन्द्र उवाच ॥ परीक्षार्थं मयैतत्ते वाक्यमुक्तं धनञ्जय । ममात्मजस्य वचनं सूपपन्नमिदं तव २८ शिक्ष मे भवनं गत्वा सर्वाण्यस्त्राणि भारत । वायोरग्नेर्वसुभ्योपि वरुणात्समरुद्गणात् २९ साध्यं पैतामहं चैव गन्धर्वोरगरक्षसाम् । वैष्णवानि च सर्वाणि नैर्ऋतानि तथैव च ३० मद्गतानि च जानीहि सर्वास्त्राणि कुरूद्वह । एवमुक्त्वा तु मां शक्रस्तत्रैवान्तरधीयत ३१ अथापश्यं हरियुजं रथमैन्द्रमुपस्थितम् । दिव्यं मायामयं पुण्यं यत्तं मातलिना नृप ३२ लोकपालेषु यातेषु मामुवाचाथ मातलिः । द्रष्टुमिच्छति शक्रस्त्वां देवराजो महाद्युते ३३ संसिध्यस्व महाबाहो कुरु कार्यमनन्तरम् । पश्य पुण्यकृताँल्लोकान्सशरीरो दिवं व्रज ३४ देवराजः सहस्राक्षस्त्वां दिदृक्षति भारत ३५ इत्युक्तोऽहं मातलिना गिरिमामन्त्र्य

"हे शत्रुनाशका, मी अस्त्राच्या निवारणावांचून दिव्य अस्त्रांचा प्रयोग कधींही मनुष्यांवर करणार नाहीं २६. तस्मात्, हे देवराज, आपण मला तीं दिव्य अस्त्रें द्या, ह्मणजे, हे सुरश्रेष्ठ, अस्त्रांच्या योगानें संपादित झालेले लोक मला प्राप्त होतील"२७. इंद्र ह्मणतोः—हे धनंजया, तुझी परीक्षा पहाण्याकरितां मीं तुझ्याशी हें भाषण केलें आहे आणि तूं माझा पुत्र असल्यामूळें तुलाही असें भाषण करणें फारच योग्य आहे २८. आतां, हे भरतकुलोत्पन्ना अर्जुना, माझ्या घरीं जाऊन वायु, अग्नि, अष्टवसु आणि मरुद्गणासहवर्तमान वरुण ह्यांपासून तूं सर्व अस्त्राचा उपदेश घे २९. इतकेंच नव्हे; परंतु, साध्यसंज्ञक देव, ब्रह्मदेव आणि गंधर्व, उरग व राक्षस ह्यांचीं अस्त्रें, सर्व प्रकारचीं वैष्णव अस्त्रें, सर्व प्रकारचीं नैर्ऋत अस्त्रें ३० आणि माझ्याजवळ असलेलीं हीं सर्व प्रकारची अस्त्रें, हे कुरुवंशजश्रेष्ठा, तूं समजून घे". ह्याप्रमाणें मला सांगून तो इंद्र तेथेंच अंतर्धान पावला ३१. तदनंतर, हे धर्मराजा, इंद्राचा रथ तेथें आलेला मीं अवलोकन केला. त्याला हरिसंज्ञक अश्व जोडिलेले होते; तो पुण्यकारक दिव्य रथ मायामय असून, हे राजा, मातलीनें अवरून धरिलेला होता ३२. असो. लोकपाल गेल्यानंतर (रथ घेऊन आलेला) मातलि मला ह्मणाला "हे महातेजस्वी अर्जुना, देवराज इंद्र तुझ्या भेटीची इच्छा करीत आहे ३३. करितां, हे महापराक्रमी अर्जुना, आधीं तयार हो आणि नंतर काय करावयाचें असेल तें कर. पुण्याच्या योगानें संपादित झालेले लोक तूं अवलोकन कर आणि शरीरासहवर्तमान स्वर्गाला चल ३४. कारण, हे भरतकुलोत्पन्ना अर्जुना, देवराज इंद्र तुला भेटण्याची

शैशिरम् । प्रदक्षिणमुपावृत्य समारोहं रथोत्तमम् ३६ चोदयामास स हया-
न्मनोमारुतरंहसः । मातलिर्हयतत्त्वज्ञो यथावद्भूरिदक्षिणः ३७ अवैक्षत च
मे वक्त्रं स्थितस्याथ स सारथिः । तथा भ्रान्ते रथे राजन्विस्मितश्चेदमब्र-
वीत् ३८ अत्यद्भुतमिदं त्वय्य विचित्रं प्रतिभाति मे । यदास्थितो रथं दिव्यं
पदान्नचलितः पदम् । देवराजोपि हि मया नित्यमत्रोपलक्षितः ३९ विच-
लन्प्रथमोत्पाते हयानां भरतर्षभ ४० त्वं पुनः स्थित एवात्र रथे भ्रान्ते
कुरूद्वह । अतिशक्रमिदं सर्वं तवेति प्रतिभाति मे ४१ इत्युक्त्वाकाश-
माविश्य मातलिर्विबुधालयान् । दर्शयामास मे राजन्विमानानि च
भारत ४२ स रथो हरिभिर्युक्तो ह्यूर्ध्वमाचक्रमे ततः । ऋषयो देवता-
श्चैव पूजयन्ति नरोत्तम ४३ ततः कामगमाँल्लोकानपश्यं वै सुरर्षिणाम् ।
गन्धर्वाप्सरसां चैव प्रभावममितौजसाम् ४४ नन्दनादीनि देवानां वना-
न्युपवनानि च । दर्शयामास मे शीघ्रं मातलिः शक्रसारथिः ४५ ततः

इच्छा करीत आहे " ३५. ह्याप्रमाणें मातलीनें मला सांगितलें असतां मीं हिमालय पर्वताचा निरोप घेतला आणि प्रदक्षिणिक वळून त्या श्रेष्ठ रथावर आरूढ झालों ३६. तेव्हां उदार व यथायोग्य रीतीनें अश्वशास्त्रांतील तत्त्व जाणणाऱ्या त्या मातलीनें वेगामध्यें मनाची अथवा वायूची बरोबरी करणाऱ्या अश्वांना इशारा केला ३७, रथांत बसलेल्या माझ्या तोंडाकडे (अनुमोदनाकरितां) त्यानें पाहिलें आणि, हे राजा, रथ सुरू झाल्यानंतर तो सारथी विस्मित होऊन मला ह्मणाला ३८ " आज हा विचित्र व अतिशय अद्भुत प्रकार माझ्या दृष्टीं पडत आहे. कारण, दिव्य रथावर आरोहण केल्यावर तूं एक पाऊलभरही स्थानापासून चळला नाहींस ३९. हे भरतवंशजश्रेष्ठा अर्जुना, अश्वांच्या पहिल्या उडीबरोबर देवराज इंद्रही स्थानापासून चलित होत असल्याचें माझ्या नेहमीं दृष्टोत्पत्तीस आलें आहे ४०; परतु, हे कुरुवंशजश्रेष्ठा, रथ चालू झाला असतां तूं आपला येथें निश्चलच बसला आहेस. ह्यामुळें हें तुझें सर्व कांहीं मला इंद्रापेक्षांही जास्त दिसत आहे " ४१. ह्याप्रमाणें मला सांगून तो मातलि आकाशामध्यें प्रविष्ट झाला आणि, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, त्यानें मला विमानें दाखविलीं ४२. हे पुरुषश्रेष्ठा धर्मराजा, नंतर तो अश्व जोडिलेला रथ वर वर जाऊं लागला असता ऋषि आणि देवता त्याला मान देऊं लागले ४३. तदनंतर देव-र्षींचीं यथेष्ट संचार करण्याचीं स्थानें मीं अवलोकन केलीं आणि अपरिमित साम-र्थ्यवान् गंधर्व व अप्सरा ह्यांचा प्रभावही माझ्या दृष्टोत्पत्तीस आला ४४. नंतर देवांचीं नंदनप्रभृति वनें आणि उपवनें इंद्रसारथी मातलीनें मला लवकरीनें दाखविलीं ४५ आणि

शक्रस्य भवनमपश्यममरावतीम् । दिव्यैः कामफलैर्वृक्षै रत्नैश्च समलंकृताम् ४६ न तत्र सूर्यस्तपति न शीतोष्णे न च क्लमः । न बाधते तत्र राजंस्त्रास्ति न जरा नृप ४७ न तत्र शोको दैन्यं वा दौर्बल्यं चोपलक्ष्यते । दिवौकसां महाराज न ग्लानिररिमर्दन ४८ न क्रोधलोभौ तत्रास्तां सुरादीनां विशांपते । नित्यतुष्टाश्च ते राजन्प्राणिनः सुरवेश्मनि ४९ नित्यपुष्पफलास्तत्र पादपा हरितच्छदाः । पुष्करिण्यश्च विविधाः पद्मसौगन्धिकायुताः ५० शीतस्तत्र ववौ वायुः सुगन्धी जीवनः शुचिः । सर्वरत्नविचित्रा च भूमिः पुष्पविभूषिता ५१ मृगद्विजाश्च बहवो रुचिरा मधुरस्वराः । विमानगामिनश्चात्र दृश्यन्ते बहवोम्बरे ५२ ततोपश्यं वसून्रुद्रान्साध्यांश्च समरुद्गणान् । आदित्यानश्विनौ चैव तान्सर्वान्प्रत्यपूजयम् ५३ ते मां वीर्येण यशसा तेजसा च बलेन च । अस्त्रैश्चाप्यन्वजानन्त संग्रामे विजयेन च ५४ प्रविश्य तां पुरीं दिव्यां देवगन्धर्वपूजिताम् । देवराजं सहस्राक्षमुपातिष्ठं कृताञ्जलिः ५५ ददावर्धासनं प्रीतः शक्रो मे

तदनंतर इंद्राचें निवासस्थान अमरावती नगरी मीं अवलोकन केली. ती नगरी इच्छेप्रमाणें फळें येणाऱ्या दिव्य वृक्षांनीं व रत्नांनीं भूषित झालेली होती ४६. त्या ठिकाणीं सूर्याचा ताप होत नाहीं, थंडी आणि उष्मा ह्यांपासून पीडा होत नाहीं, श्रम होत नाहींत आणि, हे प्रजापालका धर्मराजा, त्या ठिकाणीं जराही नाहीं ४७. हे शत्रुमर्दना महाराजा, शोक, दैन्य, अशक्तता आणि ग्लानि हींहि देवांचे ठिकाणीं तेथें कधीं दृष्टोत्पत्तीस येत नसून ४८ हे प्रजाधिपते, त्या ठिकाणीं देवादिकांना क्रोध व लोभ हेही नाहींत. हे राजा, स्वर्गामध्यें वास्तव्य करणारे ते प्राणी नेहमीं पुष्पें, फळें आणि हिरवीं गार पानें ह्यांनीं युक्त असून श्वेत व दुसऱ्या प्रकारच्या कमलांनीं युक्त असलेल्या नानाप्रकारच्या पुष्करिणीही तेथें आहेत ४९, ५०. तेथें बलप्रद, शुचि आणि सुगंधी असा शीत वायु वहात असतो आणि भूमि सर्व रत्नांच्यां योगानें रंगीबेरंगी दिसत असून पुष्पांनीं भूषित झालेली असते ५१. मनोहर आणि मधुर स्वर करणारे असे पुष्कळच पशुपक्षी तेथें आहेत आणि विमानांत बसून जाणारेही पुष्कळ लोक आकाशामध्यें तेथें दृष्टीं पडत असतात ५२. तदनंतर वसु, रुद्र, मरुद्गणासहवर्तमान साध्य, आदित्य आणि अश्विनीकुमार मीं अवलोकन केलें व त्या सर्वांचें पूजनही मीं केलें ५३. तेव्हां "वीर्य, यश, तेज, बल, अस्त्रं आणि संग्रामामध्यें विजय तुला प्राप्त होवो " म्हणून त्यांनीं मला आशीर्वाद दिले ५४. नंतर देव आणि गंधर्व ह्यांना पूज्य असलेल्या त्या दिव्य नगरीमध्यें मी प्रविष्ट झालों आणि देवराज इंद्रासमीप हात जोडून उभा राहिलों ५५. तेव्हां दात्यांमध्यें श्रेष्ठ असलेल्या

वदतां वरः । बहुमानाच्च गात्राणि पस्पर्श मम वासवः ५६ तत्राहं देव-
गन्धर्वैः सहितो भूरिदक्षिणैः । अस्त्रार्थमवसं स्वर्गे शिक्षाणोस्त्राणि भारत ५७
विश्वावसोश्च वै पुत्रश्चित्रसेनोभवत्सखा । स च गान्धर्वमखिलं ग्राहया-
मास मां नृप ५८ तत्राहमवसं राजन्गृहीतास्त्रः सुपूजितः । सुखं शक्रस्य
भवने सर्वकामसमन्वितः ५९ शृण्वन्वै गीतशब्दं च तूर्यशब्दं च पुष्क-
लम् । पश्यंश्चाप्सरसः श्रेष्ठा नृत्यन्तीर्भरतर्षभ ६० तत्सर्वमनवज्ञाय तथ्यं
विज्ञाय भारत । अत्यर्थं प्रतिगृह्याहमस्त्रेष्वेव व्यवस्थितः ६१ ततोतुष्य-
त्सहस्राक्षस्तेन कामेन मे विभुः । एवं मे वसतो राजन्नेष कालोत्यगा-
द्दिवि ६२ कृतास्त्रमतिविश्वस्तमथ मां हरिवाहनः । संस्पृश्य मूर्ध्नि पाणि-
भ्यामिदं वचनमब्रवीत् ६३ न त्वमद्य युधा जेतुं शक्यः सुरगणैरपि ।
किं पुनर्मानुषे लोके मानुषैरकृतात्मभिः ६४ अप्रमेयोप्रधृष्यश्च युद्धेष्व-
प्रतिमस्तथा । अथाब्रवीत्पुनर्देवः संप्रहृष्टतनूरुहः ६५ अस्त्रयुद्धे समो वीर

इंद्रानें प्रसन्न होऊन मला स्वतःच्या अर्ध्या आसनावर जागा दिली आणि त्या इंद्रानें बहुमानानें माझ्या अंगावरून हात फिरविला ५६. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, अस्त्राचे प्रयोग करितां यावेत एतदर्थ अस्त्रें शिकण्याकरितां मी उदार देव-गंधर्वांसहवर्तमान स्वर्गामध्यें राहिलों होतों ५७, हे राजा, विश्वावसु गंधर्वाचा पुत्र चित्रसेन तेथें माझा मित्र झाला आणि त्यानें आपली सर्व गंधर्वविद्या मला शिक-विली ५८. हे राजा, त्या ठिकाणीं मला अस्त्रप्राप्ति झाली, मला फारच मान मिळाला, हवे ते भोग्य पदार्थ मला मिळाले आणि ह्यामुळें मी तेथें सुखानें राहिलों. ५९. हे भरतवंशजश्रेष्ठा, गायनाचा व वाद्यांचा ध्वनि तेथें पुष्कळ माझ्या कानावर येत असून नृत्य करणाऱ्या श्रेष्ठ श्रेष्ठ अप्सराही माझ्या पहाण्यांत तेथें येत होत्या ६०. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, गीत, नृत्य वगैरेंची अवज्ञा न करितां तें सर्व तथ्य आहे असें समजून हाही एक चतुर्विध पुरुषार्थांपैकीं पुरुषार्थच आहे असें मी समजलों; परंतु, त्या गीतादिकाची अपेक्षा न करितां मी एकसारिखा अस्त्रांचाच अभ्यास करीत राहिलों ६१. तेव्हां माझी ती इच्छा पाहून प्रभु इंद्र संतुष्ट झाला आणि ह्याप्रमाणें, हे राजा, स्वर्गामध्यें वास्तव्य करितांना हा माझा काल निघून गेला ६२. तदनंतर अस्त्रप्राप्ति होऊन मी अतिशय विश्वासानें वागूं लागलों असतां माझ्या मस्तकीं हात ठेवून इंद्र मला म्हणाला ६३ " युद्धामध्यें देवगणांच्यानेंही आज तुझा पराभव होणें शक्य नाहीं; मग मर्त्य लोकांतील अजि-तेंद्रिय मनुष्यांचीं गोष्ट पाहिजे कशाला ! ६४. तुझें सामर्थ्य अपरिमित आहे. तूं

न ते कश्चिद्भविष्यति । अप्रमत्तः सदा दक्षः सत्यवादी जितेन्द्रियः ६६
ब्रह्मण्यश्चास्त्रविच्चासि शूरश्चासि कुरूद्वह । अस्त्राणि समवाप्तानि त्वया
दश च पञ्च च ६७ पञ्चभिर्विधिभिः पार्थ विद्यते न त्वया समः । प्रयो-
गमुपसंहारमावृत्तिं च धनञ्जय ६८ प्रायश्चित्तं च वेत्थ त्वं प्रतीघातं च
सर्वशः । ततो गुर्वर्थकालोयं समुत्पन्नः परन्तप ६९ प्रतिजानीष्व तं कर्तुं
ततो वेत्स्याम्यहं परम् । ततोहमब्रुवं राजन्देवराजमिदं वचः ७० विषह्यं
यन्मया कर्तुं कृतमेव निबोध तत् । ततो मामब्रवीद्राजन्प्रहसन्बलवृत्रहा ७१
नाविषह्यं तवाद्यास्ति त्रिषु लोकेषु किंचन । निवातकवचा नाम दानवा
मम शत्रवः ७२ समुद्रकुक्षिमाश्रित्य दुर्गे प्रतिवसन्त्युत । तिस्रः कोट्यः
समाख्यातास्तुल्यरूपबलप्रभाः ७३ तांस्तत्र जहि कौन्तेय गुर्वर्थस्ते भवि-
ष्यति । ततो मातलिसंयुक्तं मयूरसमरोमभिः ७४ हयैरुपेतं प्रादान्मे रथं

अजिंक्य आहेस आणि युद्धामध्यें तुझी बरोबरी करणारा कोणी नाहीं. ह्याप्रमाणें सांगून पुनरपि ज्याच्या अंगावर रोमांच उठले आहेत असा तो देव इंद्र मला ह्मणाला ६५ " हे वीरा, अस्त्रयुद्धामध्यें तुझी बरोबरी कोणीही करणार नाहीं. तूं कधींही बेसावध न रहातां दक्ष रहात असून, हे कुरुवंशजश्रेष्ठा तूं सत्यवादी, जितेंद्रिय, ब्राह्मणावर दया करणारा, अस्त्रवेत्ता आणि शूर आहेस व तुला पंधरा प्रकारचीं अस्त्रं प्राप्त झालीं आहेत ६६,६७. हे कुंती-पुत्रा प्रयोगप्रभृति पांचही प्रकारांमध्यें तुझी बरोबरी करणारा कोणी नाहीं. हे धनंजया, प्रयोग, उपसंहार, आवृत्ति (ह्मणजे पुनः प्रयोग) ६८, प्रायश्चित्त (ह्मणजे अस्त्रतेजानें दग्ध झालेल्या निरपराध्यांचें पुनरुज्जीवन) आणि प्रतीघात (ह्मणजे दुसऱ्यांनीं सोडिलेल्या अस्त्रांचें निवारण, हीं सर्व प्रकारें तूं जाणीत आहेस. तस्मात् , हे शत्रुतापना अर्जुना, आतां ही गुरुदक्षिणा देण्याची वेळ आली आहे ६९. ह्यास्तव, ती गुरुदक्षिणा देण्याविषयीं तूं वचन दे; ह्मणजे पुढें काय करावयाचें तें मी सांगेन " तदनंतर, हे राजा, " माझ्याकडून जें होणें शक्य असेल तें मीं केलेंच ह्मणून आपण समजा " असें भाषण मी देवराज इंद्राशीं केलें; तेव्हां, हे राजा, बल आणि वृत्रासुर ह्यांचा वध करणारा तो इंद्र हंसत हंसत मला ह्मणाला ७०,७१ " त्रैलोक्यामध्यें तुला अशक्य अशी आज कोणतीही गोष्ट नाहीं. निवातकवचनामक दानव माझे शत्रु आहेत ७२ व ते समुद्रकिनाऱ्याचा आश्रय करून किल्ल्यामध्यें रहात आहेत. ते एकंदर तीन कोट असून स्वरुपानें, बलानें व कांतीनें सर्व एकसारिखेच आहेत ७३. हे कुंतीपुत्रा, तूं त्यांचा तेथें वध कर ह्मणजे तूं गुरुदक्षिणा दिल्यासारिखें होईल ".

दिव्यं महाप्रभम् । बबन्ध चैव मे मूर्ध्नि किरीटमिदमुत्तमम् ७५ स्वरूप-
सदृशं चैव प्रादादङ्गविभूषणम् । अभेद्यं कवचं चेदं स्पर्शरूपवदुत्तमम् ७६
अजरां ज्यामिमां चापि गाण्डीवे समयोजयत् । ततः प्रायामहं तेन स्यन्द-
नेन विराजता ७७ येनाजयद्देवपतिर्बलिं वैरोचनिं पुरा । ततो देवाः सर्व एव
तेन घोषेण बोधिताः ७८ मन्वाना देवराजं मां समाजग्मुर्विशांपते । दृष्ट्वा च
मामपृच्छन्त किं करिष्यसि फाल्गुन ७९ तानब्रुवं यथाभूतमिदं कर्तास्मि
संयुगे । निवातकवचानां तु प्रस्थितं मां वधैषिणम् ८० निबोधत महाभागाः
शिवं चाशास्त मेनघाः । तुष्टुवुर्मां प्रसन्नास्ते यथा देवं पुरन्दरम् ८१
रथेनानेन मघवा जितवाञ्छम्बरं युधि । नमुचिं बलवृत्रौ च प्रह्रादन-
रकावपि ८२ बहूनि च सहस्राणि प्रयुतान्यर्बुदान्यपि । रथेनानेन
दैत्यानां जितवान्मघवा युधि ८३ त्वमप्यनेन कौन्तेय निवातकवचा-
न्रणे । विजेता युधि विक्रम्य पुरेव मघवा वशी ८४ अयं च शङ्खप्र-

तदनंतर मयूररोमांप्रमाणें ज्यांच्या शरीरावर रोम आहेत असे अश्व जोडिलेला व मात-
लीनें युक्त असलेला महातेजस्वी दिव्य रथ त्यानें मला दिला. नंतर हा उत्कृष्ट
किरीटही त्यानेंच माझ्या मस्तकीं ठेविला ७४, ७५. माझ्या स्वरूपाला शोभण्यासा-
रिखीं शरीरभूषणें त्यानें मला दिलीं; मृदु आणि मनोहर असें हें उत्कृष्ट अभेद्य कवच
त्यानें माझ्या स्वाधीन केलें ७६ आणि कधींही जीर्ण न होणारी ही दोरीही त्यानें माझ्या
गांडीव धनुष्याला लाविली. तदनंतर पूर्वी विरोचनपुत्र बलीचा ज्याच्या योगानें देव-
राज इंद्रानें पराभव केला त्या उज्ज्वल रथावर आरूढ होऊन मी निघालों. तेव्हां हा
देवराज इंद्र आहे असें त्या रथाच्या ध्वनीवरून देव समजले ७७,७८ आणि हे
प्रजाधिपते, इंद्र समजून ते माझ्याकडे आले; परंतु, मला अवलोकन केल्यावर "हे
अर्जुना, तुझा काय करण्याचा बेत आहे ?" ह्मणून त्यांनीं मला प्रश्न केला ७९. तेव्हां
मीं त्यांना खरं खरें सांगितलें कीं, हे भाग्यसंपन्न देवहो, मी युद्धामध्यें हें कृत्य करणार
आहें. सारांश, निवातकवचांचा वध करण्याच्या इच्छेनें मी निघालों आहें असें आपण
समजा आणि, हे निष्पापहो, मला मंगलकारक आशीर्वाद द्या". ह्याप्रमाणें मीं सांगि-
तल्यावर त्यांनीं प्रसन्न होऊन देवेंद्राप्रमाणें माझी स्तुति केली (आणि ते ह्मणाले)८०,८१
"ह्याच रथावर आरूढ होऊन इंद्रानें युद्धामध्यें शंबर, नमुचि, बल, वृत्र; प्रल्हाद
आणि नरक ह्यांना जिंकिलें ८२; इतकेंच नव्हे परंतु, अनेक सहस्र, किंबहुना लाखों
कोडों दैत्य ह्याच रथाच्या योगानें इंद्रानें युद्धामध्यें जिंकिले आहेत ८३. तेव्हां, हे
कुंतीपुत्रा अर्जुना, पूर्वी ज्याप्रमाणें जितेंद्रिय इंद्रानें युद्धामध्यें पराक्रम करून दैत्य

वरो येन जेतासि दानवान् । अनेन विजिता लोकाः शक्रेणापि महात्मना ८५ प्रदीयमानं देवैस्तं देवदत्तं जलोद्भवम् । प्रत्यगृह्णं जयायैनं स्तूयमानस्तदामरैः ८६ स शंखी कवची बाणी प्रगृहीतशरासनः । पर्वणि दानवालयमत्युग्रं प्रयातोस्मि युयुत्सया ८७ [६५६८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि निवातकवचयुद्धपर्वण्यर्जुनवाक्येष्टषष्ट्यधिकशततमोध्यायः ॥ १६८ ॥

अर्जुन उवाच ॥ ततोहं स्तूयमानस्तु तत्र तत्र महर्षिभिः । अपश्यमुदधिं भीममपां पतिमथाव्ययम् १ फेनवत्यः प्रकीर्णाश्च संहताश्च समुत्थिताः । ऊर्मयश्चात्र दृश्यन्ते वल्गन्त इव पर्वताः २ नावः सहस्रशस्तत्र रत्नपूर्णाः समन्ततः । तिमिङ्गिलाः कच्छपाश्च तथा तिमितिमिङ्गिलाः ३ मकराश्चात्र दृश्यन्ते जले मग्ना इवाद्रयः । शङ्खानां च सहस्राणि मग्नान्यप्सु समन्ततः ४ दृश्यन्ते स्म यथा रात्रौ तारास्तन्वभ्रसंवृताः । तथा सहस्रशस्तत्र रत्नसंघाः प्लवन्त्युत ५ वायुश्च घूर्णते भीमस्तदद्भुतमिवाभ-

जिंकिले त्याचप्रमाणं तूंही ह्या रथाच्या योगानें निवातकवचांना संग्रामामध्यें जिंकशील ८४ व ह्याच्या योगानें तूं दानवांचा पराजय करशील. महात्म्या इंद्रानेंही ह्याच्याच योगानें सर्व लोक जिंकिले आहेत ८५. ह्याप्रमाणें बोलून देव मला शंख देऊं लागले असतां मी ह्या शंखाचा जयाकरितां स्वीकार केला व स्वीकार करितेवेळीं देव माझी स्तुति करूं लागले ८६. सारांश, शंख, कवच, बाण आणि धनुष्य घेऊन युद्धाच्या इच्छेनें मी अत्यंत भयंकर अशा दानवांच्या स्थानाकडे चालता झालों ८७. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील निवातकवचयुद्धपर्वांपैकीं अर्जुनाच्या भाषणाविषयीं एकशें अडुसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥१६८॥

अर्जुन सांगतोः— तदनंतर महर्षि माझी स्तुति करूं लागले असतांना अक्षय्य आणि भयंकर असा जलाधिपति समुद्र मीं अवलोकन केला १. फेंसानें युक्त आणि केव्हां केव्हां तुरळक तुरळक व केव्हां केव्हां एकत्र जमून उसळणाऱ्या लाटा खिदळणारे पर्वतच कीं काय अशा मीं अवलोकन केल्या २. त्या ठिकाणीं रत्नांनीं भरलेल्या हजारों नावा, तिमिंगिलनामक मोठे मोठे मासे, कासवें आणि तिमिंगिलांनाही गिळणारे तिमितिमिंगिल नांवाचे मासे मीं अवलोकन केले ३. त्या ठिकाणीं जलामध्यें बुडून राहिलेले पर्वतच कीं काय असे मगर मीं अवलोकन केले आणि उदकामध्यें चोहोंकडे हजारों शंखही बुडून राहिलेले माझ्या दृष्टोत्पत्तीस आले ४. सूक्ष्म मेघांनीं आच्छादित झालेले तारे ज्याप्रमाणें रात्रीं (कधीं कधीं) दृष्टोत्पत्तीस येत

वत् । तमुदीक्ष्य महावेगं सर्वाम्भोनिधिमुत्तमम् ६ अपश्यं दानवाकीर्णं
तद्दैत्यपुरमन्तिकात् । तत्रैव मातलिस्तूर्णं निपत्य पृथिवीतले ७ रथं तं
तु समालक्ष्य प्राद्रवद्रथयोगवित् । त्रासयन्रथघोषेण तत्पुरं समुपाद्र-
वत् ८ रथघोषं तु तं श्रुत्वा स्तनयित्नोरिवाम्बरे । मन्वाना देवराजं
मामाविग्ना दानवाभवन् ९ सर्वे संभ्रान्तमनसः शरचापधराः स्थिताः ।
तथासिशूलपरशुगदामुसलपाणयः १० ततो द्वाराणि पिदधुर्दानवास्त्रस्त-
चेतसः । संविधाय पुरे रक्षां न स्म कश्चन दृश्यते ११ ततः शङ्ख-
मुपादाय देवदत्तं महास्वनम् । परमां मुदमाश्रित्य प्राधमं तं शनैर-
हम् १२ स तु शब्दो दिवं स्तब्ध्वा प्रतिशब्दमजीजनत् । वित्रेसुश्च
निलिल्युश्च भूतानि सुमहान्त्यपि १३ ततो निवातकवचाः सर्व एव
स्वलंकृताः । दंशिता विविधैस्त्राणैर्विचित्रायुधपाणयः १४ आयसैश्च महा-
शूलैर्गदाभिर्मुसलैरपि । पट्टिशैः करवालैश्च रथचक्रैश्च भारत १५

असतात त्याचप्रमाणें त्या ठिकाणीं हजारों रत्नसमुदाय तरगत होते ५. भयकर वायु वहात होता आणि तें कांहीं अद्भुतच वाटत होतें. सर्व जलांचा निधि असा तो महावेगवान् उत्कृष्ट सागर अवलोकन केल्यावर ६ दैत्यांनीं व्याप्त असलेलें तें दैत्यांचें नगर मीं जवळच पाहिलें. मातलि त्याचठिकाणीं पातालामध्यें सत्वर गेला ७ आणि रथ सर्व सामानानें युक्त आहे असें अवलोकन करून सारथ्यकर्मामध्यें चतुर असलेला तो मातलि रथाच्या घोषानें भीति उत्पन्न करीत करीत त्या नगराकडे धांवला ८. आकाशांत होणाऱ्या मेघाच्या गर्जनेप्रमाणें तो रथाचा ध्वनि श्रवण केल्यावर ते दैत्य मी देवराज इंद्र आहे असें समजून उद्विग्न झाले ९. सर्व आपआपल्या मनामध्यें गोंधळून गेले आणि धनुष्य, बाण व त्याचप्रमाणें खड्ग, शूल, परशु, गदा व मुसलें हातांत घेऊन उभे राहिले १०. तदनंतर अंतःकरणामध्यें त्रस्त झालेल्या त्या दानवांनीं नगरामध्यें रक्षणाचा बंदोबस्त करून वेशी लाऊन टाकिल्या व त्यांपैकीं एकही दिसेनासा झाला ११. नंतर प्रचंड गर्जना करणारा देवदत्त नामक शंख मीं घेतला आणि मोठ्या आनंदानें मीं तो हळू हळूं वाजविला १२. तेव्हां त्या शंखाच्या ध्वनीनें आकाश व्याप्त करून प्रतिध्वनि उत्पन्न केला व त्यामुळें अतिशय मोठेमोठेही प्राणी त्रस्त होऊन दडूं लागले १३. तदनंतर सर्वही निवातकवचनामक दैत्यांनीं उत्तम प्रकारचे अलंकार धारण केले, नानाप्रकारचीं कवचें त्यांनीं शरीरावर चढविलीं आणि चित्रविचित्र आयुधेंही आपल्या हातांमध्यें घेतलीं १४. सारांश, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, मोठे मोठे लोखंडी शूल, गदा, मुसळें, पट्टे

शतघ्नीभिर्भुशुण्डीभिः खड्गैश्चित्रैः स्वलंकृतैः । प्रगृहीतैर्दितेः पुत्राः प्रादुरासन्सहस्रशः १६ ततो विचार्य बहुशो रथमार्गेषु तान्हयान् । प्राचोदयत्समे देशे मातलिर्भरतर्षभ १७ तेन तेषां प्रणुन्नानामाशुत्वाच्छीघ्रगामिनाम् । नान्वपश्यं तदा किंचित्तन्मेऽद्भुतमिवाभवत् १८ ततस्ते दानवास्तत्र वादित्राणि सहस्रशः । विकृतस्वररूपाणि भृशं सर्वाण्यनादयन् १९ तेन शब्देन सहसा समुद्रे पर्वतोपमाः । आप्लवन्त गतैः सत्त्वैर्मत्स्याः शतसहस्रशः २० ततो वेगेन महता दानवा मामुपाद्रवन् । विमुञ्चन्तः शिताम्बाणाञ्छतशोऽथ सहस्रशः २१ स संप्रहारस्तुमुलस्तेषां च मम भारत । अवर्तत महाघोरो निवातकवचान्तकः २२ ततो देवर्षयश्चैव दानवर्षिगणाश्च ये । ब्रह्मर्षयश्च सिद्धाश्च समाजग्मुर्महामृधे २३ ते वै मामनुरूपाभिर्मधुराभिर्जयैषिणः । अस्तुवन्मुनयो वाग्भिर्यथेन्द्रं तारकामये २४ [६५९२] इति श्रीमहाभारते० आरण्यके पर्वणि निवातकवचयुद्धपर्वणि युद्धारम्भ ऊनसप्तत्यधिकशततमोऽध्यायः ॥ १६९ ॥

तरवारी, रथांचीं चाकें १५, शतघ्नी, भुशुंडी आणि उत्तम प्रकाराने सजविलेल असे चित्रविचित्र खड्ग धारण करून हजारों दैत्य तेथें प्रकट झाले १६. तदनंतर, हे भरतवंशजश्रेष्ठा धर्मराजा, रथमार्गांविषयीं पुष्कळ वेळा विचार करून मातलीनें ते अश्व सपाट प्रदेशाकडे चालविले १७; परंतु, त्या मातलीनें त्या सत्वर गमन करणाऱ्या अश्वांना इशारा केला असतां त्यांच्या जलदीमुळें माझ्या कांहींएक दृष्टीं पडेनासें झालें आणि तेंही मला एक आश्चर्यच वाटलें १८. तदनंतर ज्यांचा आकार व ध्वनि भयंकर आहे अशीं सर्व हजारों वाद्यें ते दैत्य त्या ठिकाणीं अतिशयच वाजवूं लागले असतां १९ त्या ध्वनींच्या योगानें पर्वतप्राय असे लाखों जलचर प्राणी एकाएकीं मरून जाऊन समुद्रावर तरंगूं लागले २०. तदनंतर शेंकडों हजारों तीक्ष्ण बाण टाकीत टाकीत ते दानव मोठ्या वेगानें माझ्या अंगावर धांवून आले असतां २१, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, ते व मी ह्यां उभयतांमध्यें निवातकवचांचा शेवट करणारा असा महाभयंकर तुमुल संग्राम सुरू झाला २२. तेव्हां देवर्षि, दैत्यर्षींचे समुदाय, ब्रह्मर्षि आणि सिद्ध त्या प्रचंड युद्धामध्यें आले २३ व माझ्या जयप्राप्तीची इच्छा करणाऱ्या त्या देवर्षिप्रभृति मुनींनीं, तारकारितां सुरू झालेल्या संग्रामामध्यें ज्याप्रमाणें इंद्राची स्तुति केली त्याप्रमाणें मधुर आणि योग्य अशा शब्दांनीं माझी स्तुति केली २४. ह्याप्रमाणें महामुनि व्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील निवातकवचयुद्धपर्वांपैकीं युद्धाच्या आरंभाविषयीं एकशें एकुणसत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ १६९ ॥

अर्जुन उवाच ॥ ततो निवातकवचाः सर्वे वेगेन भारत । अभ्यद्रवन्मां सहिताः प्रगृहीतायुधा रणे १ आच्छाद्य रथपन्थानमुत्क्रोशन्तो महारथाः । आवृत्य सर्वतस्ते मां शरवर्षैरवाकिरन् २ ततो परे महावीर्याः शूलपट्टिशपाणयः । शूलानि च भुशुण्डीश्च मुमुचुर्दानवा मयि ३ तच्छूलवर्षं सुमहद्गदाशक्तिसमाकुलम् । अनिशं सृज्यमानं तैरपतन्मद्रथोपरि ४ अन्ये ममाभ्यधावन्त निवातकवचा युधि । शितशस्त्रायुधा रौद्राः कालरूपाः प्रहारिणः ५ तानहं विविधैर्बाणैर्वेगवद्भिरजिह्मगैः । गाण्डीवमुक्तैरभ्यघ्नमेकैकं दशभिर्मृधे ६ ते कृता विमुखाः सर्वे मत्प्रयुक्तैः शिलाशितैः । ततो मातलिना तूर्णं हयास्ते संप्रचोदिताः ७ मार्गान्बहुविधांस्तत्र विचेरुर्वातरंहसः । सुसंयता मातलिना प्रामथ्नन्त दितेः सुतान् ८ शतं शतास्ते हरयस्तस्मिन्युक्ता महारथे । शान्ता मातलिना यत्ता व्यचरन्नल्पका इव ९ तेषां चरणपातेन रथनेमिस्वनेनच । मम बाणनिपातैश्च हतास्ते शतशोसुराः १०

अर्जुन सांगतोः— तदनतर, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, ते एकत्र जळलेले सर्वही निवातकवच हातांमध्यें आयुधें घेऊन रणामध्यें वेगान माझ्या अंगावर धांवले १; माझ्या रथाचा मार्ग त्यांनीं व्यापून टाकिला आणि सर्व बाजूंनीं मला घेरून त्या गर्जना करणाऱ्या महारथि निवातकवचांनीं बाणवृष्टींच्या योगानें मला भरून काढिलें २. तदनंतर शूल व पट्टे ज्यांनीं हातांमध्यें घतले आहेत अशा दुसऱ्या महावीर्यवान् दैत्यांनीं शूल आणि भुशुंडि हीं शस्त्रें माझ्यावर टाकिलीं ३ व मोठमोठ्या गदा आणि शक्ति ह्यांची ज्यांत गर्दी झालेली आहे असा तो त्या दानवांकडून एकसारिखा उत्पन्न होत असलेला शूलांचा वर्षाव माझ्या रथावर होऊं लागला ४. नतर, पाजळलेलीं शस्त्रें व आयुधें हातांत घेऊन प्रहार करणारे असे दुसरे कालरूप भयंकर निवातकवच दैत्य माझ्या अंगावर धांवून आले ५; परंतु, गांडीवापासून सुटलेले नानाप्रकारचे वेगवान् व सरळ जाणारे बाण एकेकावर दहा दहा टाकून मीं त्यांना प्रहार केले ६ व ह्याप्रमाणें शिळेवर घासलेले बाण मीं त्याच्यावर टाकिले असतां ते सर्वही युद्धापासून पराङ्मुख झाले. तदनंतर, मातलीनें लगेंच त्या अश्वांना इशारा केला ७; तेव्हां ते वायूप्रमाणें वेगवान् अश्व अनेक प्रकारच्या चालीं चालूं लागले आणि मातलीनें उत्तम प्रकारें आवरून धरिलेल्या त्या अश्वांनीं दैत्यांना मारून टाकिले ८. त्या प्रचंड रथाला जरी दहा हजार अश्व जोडिलेले होते तरी मातलीनें ते सर्व आवरून धरिले असल्यामुळें चालतांना ते थोडे दिसत असत ९. असो. त्या अश्वांचे पाय पडण्यानें, धावांच्या

गतासवस्तथैवान्ये प्रगृहीतशरासनाः । हतसारथयस्तत्र व्यकृष्यन्त तुरङ्गमैः ११ ते दिशो विदिशः सर्वे प्रतिरुध्य प्रहारिणः । अभ्यघ्नन्विविधैः शस्त्रैस्ततो मे व्यथितं मनः १२ ततोऽहं मातलेर्वीर्यमपश्यं परमाद्भुतम् । अश्वांस्तथावेगवतो यदयत्नादधारयत् १३ ततोऽहं लघुभिश्चित्रैरस्त्रैस्तानसुरान्रणे । चिच्छेद सायुधान्राजञ्छतशोऽथ सहस्रशः १४ एवं मे चरतस्तत्र सर्वयत्नेन शत्रुहन् । प्रीतिमानभवद्वीरो मातलिः शक्रसारथिः १५ वध्यमानास्ततस्तैस्तु हयैस्तेन रथेन च । अगमन्प्रक्षयं केचिन्न्यवर्तन्त तथापरे १६ स्पर्धमाना इवास्माभिर्निवातकवचा रणे । शरवर्षैः शरार्तं मां महद्भिः प्रत्यवारयन् १७ ततोऽहं लघुभिश्चित्रैर्ब्रह्मास्त्रपरिमन्त्रितैः । व्यधमं सायकैराशु शतशोऽथ सहस्रशः १८ ततः संपीड्यमानास्ते क्रोधाविष्टा महारथाः । अपीडयन्मां सहिताः शक्तिशूलासिवृष्टिभिः १९ ततोऽहमस्त्रमातिष्ठं परमं तिग्मतेजसम् । दयितं देवराजस्य माधवं नाम भारत २० ततः

शब्दानें आणि माझ्या बाणांच्या प्रयोगानें त्या शेकडों दैत्यांचा वध झाला १०. त्याचप्रमाणें हातांत धनुष्य घेतलेले दुसरे कांहीं दैत्य रथामध्यें गतप्राण होऊन पडले होते व सारथ्यांचा वध झाल्यामुळें अश्व त्यांना हवें तिकडे घेऊन जात होते ११. तदनंतर, माझ्यावर हल्ला करणाऱ्या त्या सर्व निवातकवचांनीं दिशा व उपदिशा रोंखून नानाप्रकारच्या शस्त्रांनीं मजवर प्रहार केले असतां माझें मन व्याकुल झालें १२. तेव्हां त्याप्रमाणें वेगानें युक्त असलेले ते अश्व मातलीनें अनायासें आवरून धरिले हें एक त्याचें अत्यंत अद्भुत वीर्य माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें १३. तदनंतर, हे राजा, आयुधांसहवर्तमान असलेले ते शेकडों हजारों दैत्य आश्चर्यकारक अशा लहान लहान अस्त्रांनीं मीं रणामध्यें तोडून टाकिले १४ आणि, हे शत्रुनाशका धर्मराजा, ह्याप्रमाणें मी हरप्रयत्न करून दैत्यांशीं त्या ठिकाणीं युद्ध करूं लागलों असतां इंद्रसारथि वीर मातलि माझ्यावर संतुष्ट झाला १५. असो. तीं अस्त्रें, ते अश्व व तो रथ ह्यांच्यायोगानें कित्येकांचा नाश झाला व दुसरे कित्येक संग्रामापासून निवृत्त झाले १६. तदनंतर, आमच्याशीं जणु स्पर्धा करीत असलेल्या कांहीं निवातकवच दैत्यांनीं बाणांनीं आधींच व्याकुल झालेल्या मला संग्रामामध्यें प्रचंड बाणवर्षावांच्या योगानें घेरून टाकिलें १७. तेव्हां ब्रह्मास्त्रानें अभिमंत्रण केलेल्या शीघ्रगामी विचित्र बाणांच्या योगानें मीं शेकडों हजारों दैत्यांना सत्वर उडवून दिलें असतां १८ अतिशय पीडा होऊं लागलेले ते महारथि निवातकवच क्रुद्ध झाले आणि एकत्र जुळून शक्ति, शूल व खड्ग ह्यांच्या वर्षावानीं मला पीडा देऊं लागले १९. तेव्हां, हे

खड्गत्रिशूलेन तोमरांश्च सहस्रशः । अस्त्रवीर्येण शतधा तैर्मुक्तानहमच्छि-
दम् २१ छित्त्वा प्रहरणान्येषां ततस्तानपि सर्वशः । प्रत्यविध्यमहं रोषा-
द्दशभिर्दशभिः शरैः २२ गाण्डीवाद्धि तदा संख्ये यथा भ्रमरपङ्क्तयः ।
निष्पतन्ति महाबाणास्तन्मातलिरपूजयत् २३ तेषामपि तु बाणास्ते बहु-
त्वाच्छलभा इव । अवाकिरन्मां बलवत्तानहं व्यधमं शरैः २४ वध्यमा-
नास्ततस्ते तु निवातकवचाः पुनः । शरवर्षैर्महद्भिर्मां समन्तात्पर्यवारयन् २५
शरवेगान्निहत्याहमस्त्रैरस्त्रविघातिभिः । ज्वलद्भिः परमैः शीघ्रैस्तानविध्यं
सहस्रशः २६ तेषां छिन्नानि गात्राणि विसृजन्ति स्म शोणितम् ।
प्रावृषीवाभिवृष्टानि शृङ्गाण्यथ धराभृताम् २७ इन्द्राशनिसमस्पर्शैर्वेगव-
द्भिरजिह्मगैः । मद्बाणैर्वध्यमानास्ते समुद्विग्नाः स्म दानवाः २८ शतधा
भिन्नदेहास्ते क्षीणप्रहरणौजसः । ततो निवातकवचा मामयुध्यन्त

भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, अत्यंत तीक्ष्ण व इंद्राला प्रिय अशा माधवनामक अस्त्राचा मीं प्रयोग केला २० व तो केल्यानंतर त्या अस्त्रापासून खड्गासहवर्तमान उत्पन्न झालेल्या शूलाच्या योगानें आणि अस्त्राच्या सामर्थ्यानें मीं त्यांनीं सोडिलेल्या हजारों तोमरांचे शंकडोंशें तुकडे केले २१.-इतकेंच नव्हे परंतु, त्यांचीं शस्त्रें तोडिल्यावर मीं क्रोधानें त्यांना सर्वांनाही दहादहा बाणांनीं वेध केला २२. त्यावेळीं युद्धामध्यें गांडीव धनुष्यापासून भ्रमरपङ्क्तीप्रमाणे मोठमोठाले बाण निघून प्रतिपक्षावर पडू लागले असतां मातलीनें त्या गोष्टीची प्रशंसा केली २३. पुढें त्यांचे बाण पुष्कळ असल्यामुळें टोळाप्रमाणें माझें शरीर चोहोंकडून अगदीं जोराजोरानें भरून काढूं लागले असतां मी आपल्या बाणांच्या योगानें त्यांना उडवून दिलें २४. नंतर, मी त्या निवातकवचाचा वध करूं लागलों असतां त्यांनीं पुनरपि मोठ्या बाणवर्षावांच्या योगानें मला चोहों-कडून घेरून टाकिलें २५. प्रथमतः बाणवेगामुळें मी त्यांचे बाण हाणून पाडिले आणि नंतर शीघ्रगामी, जाज्वल्य आणि शत्रूच्या अस्त्रांचा नाश करणाऱ्या अशा उत्कृष्ट अस्त्रांच्या योगानें मीं हजारों निवातकवचाना वेध केला २६. त्याच्या योगानें वर्षा-कालीं पर्जन्यवृष्टि वर झाली असतां ज्याप्रमाणें पर्वतांच्या शिखरांवरून पाझर सुटतात त्याप्रमाणें त्या दैत्यांच्या छिन्नभिन्न शरीरापासून रक्ताचे पाट वाहूं लागले २७ आणि इंद्राच्या वज्राप्रमाणें ज्यांचा प्रहार तीक्ष्ण आहे अशा माझ्या सरळ जाणाऱ्या वेग-वान् बाणांचे प्रहार त्यांना होऊं लागले असतां ते दैत्य फारच उद्विग्न झाले २८, त्यांच्या शरीरांना शेंकडों जखमा झाल्या आणि त्यांच्या अस्त्रांचें सामर्थ्यही नाहींसें झालें; तथापि, ते निवातकवच दैत्य तदनंतर माझ्याशीं मायेनें युद्ध करूं लागले २९.

मायया २९ [६६२१] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि निवातकवचयुद्धपर्वणि निवातकवचवधे सप्तत्यधिकशततमोऽध्यायः ॥ १७० ॥

अर्जुन उवाच ॥ ततोऽश्मवर्षं सुमहत्प्रादुरासीत्समन्ततः । नगमात्रैः शिलाखण्डैस्तन्मां दृढमपीडयत् १ तदहं वज्रसंकाशैर्महेन्द्रास्त्रप्रचोदितैः। अचूर्णयं वेगवद्भिः शरजालैर्महाहवे २ चूर्ण्यमानेऽश्मवर्षे तु पावकः समजायत । तत्राश्मचूर्णान्यपतन्पावकप्रकरा इव ३ ततोऽश्मवर्षे निहते जलवर्षं महत्तरम् । धाराभिरक्षमात्राभिः प्रादुरासीन्ममान्तिके ४ नभसः प्रच्युता धारास्तिग्मवीर्याः सहस्रशः । आवृण्वन्सर्वतो व्योम दिशश्चोपदिशस्तथा ५ धाराणां च निपातेन वायोर्विस्फूर्जितेन च । गर्जितेन च दैत्यानां न प्राज्ञायत किंचन ६ धारा दिवि च संबद्धा वसुधायां च सर्वशः । व्यामोहयन्त मां तत्र निपतन्त्योऽनिशं भुवि ७ तत्रोपदिष्टमिन्द्रेण दिव्यमस्त्रं विशोषणम् । दीप्तं प्राहिणवं घोरमशुष्यत्तेन तज्जलम् ८ हतेऽश्मवर्षे च मया जलवर्षे च शोषिते । मुमुचुर्दानवा मायामग्निं

ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील निवातकवचयुद्धपर्वांपैकीं निवातकवचवधसंबंधीं एकशें सत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ १७० ॥

अर्जुन ह्मणतो:— तदनंतर पर्वतप्राय पाषाणांनीं युक्त अशी फारच मोठी पाषाणवृष्टि माझ्या भोंवतालीं होऊं लागली व तिनें मला फारच जर्जर केलें १; परंतु त्या महासंग्रामामध्यें वज्रतुल्य व वज्रास्त्रानें अभिमंत्रित अशा वेगवान् बाणसमुदायांच्या योगानें मीं त्या पाषाणवृष्टीचें चूर्ण करून टाकिलें २. ह्याप्रमाणें पाषाणवृष्टीचें चूर्ण होऊं लागलें असतां त्यांतून अग्नि उत्पन्न झाला आणि त्या ठिकाणीं अग्नीच्या राशिच कीं काय अशा रीतीनें पाषाणसमुदायाच्या राशि पडू लागल्या ३. अशा रीतीनें पाषाणवृष्टि हाणून पडली असतां रथाच्या कण्याप्रमाणें मोठमोठ्या धारांनीं युक्त अशी पाषाणवृष्टीपेक्षांही मोठी जलवृष्टि माझेसमीप होऊं लागली ४. प्रचंड सामर्थ्यानें युक्त अशा आकाशापासून च्युत झालेल्या हजारों जलधारांनीं सर्व बाजूंनीं आकाश व्यापून टाकून दिशा व उपदिशाही व्यापून टाकिल्या ५. धारांची वृष्टि, वाऱ्याचा सोसाटा आणि दैत्यांची गर्जना ह्यांमुळें कसलाच उमज पडेनासा झाला ६ आणि आकाशामध्यें अथवा भूतलावर एकसारिख्या पडत असलेल्या जलधारांनीं मीं तर अगदीं गांगरूनच गेलों ७. तथापि, त्याप्रसंगीं इंद्रानें जें विशोषणनामक दिव्य, जाज्वल्य व घोर अस्त्र मला सांगितलें होतें तें मीं सोडिलें असतां त्याच्या योगानें तें जल शुष्क होऊन गेलें ८ आणि ह्याप्रमाणें पाषाणवृष्टीचा

वायुं च भारत ९ ततोहमग्निं व्यधमं सलिलास्त्रेण सर्वशः । शैलेन च महास्त्रेण वायोर्वेगमधारयम् १० तस्यां प्रतिहतायां ते दानवा युद्धदुर्मदाः । प्राकुर्वन्विविधां मायां यौगपद्येन भारत ११ ततो वर्षं प्रादुरभूत्सुमहल्लोमहर्षणम् । अस्त्राणां घोररूपाणामग्नेर्वायोस्तथाश्मनाम् १२ सा तु मायामयी वृष्टिः पीडयामास मां युधि । अथ घोरं तमस्तीव्रं प्रादुरासीत्समन्ततः १३ तमसा संवृते लोके घोरेण परुषेण च । हरयो विमुखाश्चासन्प्रास्खलच्चापि मातलिः १४ हस्ताद्धि रण्मयश्चास्य प्रतोदः प्रापतद्भुवि । असकृच्चाह मां भीतः क्वासीति भरतर्षभ १५ मां च भीराविशत्तीव्रा तस्मिन्विगतचेतसि । स च मां विगतज्ञानः संत्रस्तमिदमब्रवीत् १६ सुराणामसुराणां च संग्रामः सुमहानभूत् । अमृतार्थे पुरा पार्थ स च दृष्टो मयानघ १७ शम्बरस्य वधे घोरः संग्रामः सुमहानभूत् । सारथ्यं देवराजस्य तत्रापि कृतवानहम् १८ तथैव वृत्रस्य वधे संगृ-

---

नाश करून जलवृष्टिही मी शुष्क करून टाकिली असतां, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, त्या दैत्यांनी मायेचें अवलंबन करून अग्नि आणि वायु ह्यांचा माझ्यावर प्रयोग केला ९. तेव्हां जलास्त्राच्या योगानें मी अग्नि पूर्णपणें विझवून टाकिला आणि मोठ्या पर्वतास्त्राच्या योगानें वायूचा वेग कुंठित केला १०. परंतु, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, ह्याप्रमाणें ती माया ह्मणून पाडिल्यावर युद्धाविषयीं अतिशय मद चढलेले ते दैत्य नानाप्रकारची माया एकदम प्रकट करूं लागले ११. तेव्हां अग्नि, वायु व पाषाण ह्यांसंबंधीं घोर अस्त्रांचा, शरीरावर कांटा आणणारा असा, फारच मोठा वर्षाव सुरू झाला १२ व त्या मायामय वर्षावानें युद्धामध्यें मला जर्जर केलें. तदनंतर जिकडे तिकडे भयंकर व प्रचंड अंधकार उत्पन्न झाला १३ आणि त्या घोर व उग्र अंधकाराच्या योगानें जगत् व्याप्त झालें असतां रथाचे अश्व भलतीकडेच तोंड फिरवून जाऊं लागले आणि मातलीच्याही हातून प्रमाद होऊं लागला १४; इतकेंच नव्हे परंतु, हे भरतवंशजश्रेष्ठा, सोन्याचा चाबूकही त्याच्या हातांतून खालीं पडला आणि आपण भयभीत झाल्यामुळें मला वारंवार कोठें आहेस कोठें आहेस ह्मणून तो विचारूं लागला १५. तेव्हां ह्याप्रमाणें तो मातलि गांगरून गेला असतां मलाही मोठें भय वाटलें आणि मी भयभीत झालों असतां तो गांगरून गेलेला मातलि मला ह्मणाला १६ "हे निष्पापा, कुंतीपुत्रा अर्जुना, पूर्वीं अमृताकरितां देवदैत्यामध्यें फारच मोठा संग्राम झालेला मीं पाहिला १७; शंबरासुराच्या वधाचे वेळींही फारच मोठा घोर संग्राम झाला व त्या संग्रामांतही मीं देवराज इंद्राचें सारथ्य केलें होतें १८. त्याचप्रमाणें वृत्रवध-

हीता हया मया। वैरोचनेर्महायुद्धं दृष्टं चापि सुदारुणम् १९ एते मया महाघोराः संग्रामाः पर्युपासिताः । न चापिविगतज्ञानो भूतपूर्वोस्मि पाण्डव २० पितामहेन संहारः प्रजानां विहितो ध्रुवम् । न हि युद्धमिदं युक्तमन्यत्र जगतः क्षयात् २१ तस्य तद्वचनं श्रुत्वा संस्तभ्यात्मानमात्मना। मोहयिष्यन्दानवानामहं मायाबलं महत् २२ अब्रुवं मातलिं भीतं पश्य मे भुजयोर्बलम् । अस्त्राणां च प्रभावं वै धनुषो गाण्डिवस्य च २३ अद्यास्त्रमाययैतेषां मायामेतां सुदारुणाम् । निनिहन्मि तमश्चोग्रं मा भैः सूत स्थिरो भव २४ एवमुक्त्वाहमसृजमस्त्रमायां नराधिप । मोहनीं सर्वभूतानां हिताय त्रिदिवौकसाम् २५ पीड्यमानासु मायासु तासु तास्वसुरोत्तमाः। पुनर्बहुविधा मायाः प्राकुर्वन्नमितौजसः २६ पुनः प्रकाशमभवत्तमसा ग्रस्यते पुनः । भवत्यदर्शनो लोकः पुनरप्सु निमज्जति २७ सुसंगृहीतैर्हरिभिः प्रकाशे सति मातलिः। व्यचरत्स्यन्दनाग्रेण संग्रामे लोमहर्षणे २८

प्रसंगींही मीं अश्व धरिले असून विरोचनपुत्र बलीशीं झालेलें अत्यंत भयकर महायुद्धही मीं अवलोकन केलें १९. सारांश, हे पांडुपुत्रा अर्जुना, ह्या महाभयकर संग्रामांचा मला अनुभव आहे; परंतु, ह्यापूर्वीं मी कधींही असा गांगरून गेलों नाहीं २०. ब्रह्मदेवानें प्रजेचा संहारच करण्याचें निःसंशय ठरविलें आहे; कारण, जगताच्या क्षयावांचून इतर प्रसंगीं असलें युद्धही योग्य नाहीं " २१. हें त्या मातलीचें भाषण श्रवण करून मीं स्वतःच आपल्याला धीर दिला आणि दैत्यांचें तें प्रचंड मायाबल हाणून पाडण्याची इच्छा धरून २२ त्या भयभीत झालेल्या मातलीला ह्मणालों " आतां माझ्या बाहूचें बल, अस्त्रांचा प्रभाव आणि गांडीव धनुष्याचें सामर्थ्य तूं अवलोकन कर २३. मी आपल्या अस्त्रमायेच्या योगानें ह्या ह्यांच्या अतिभयकर मायेचा आज नाश करितों. हे सारथ्या, तूं भिऊं नकोस; स्वस्थ रहा " २४. ह्याप्रमाणें मातलीला सांगून, हे प्रजाधिपते धर्मराजा, देवांच्या हिताकरितां प्राणिमात्रांना मोह पाडणारी अशी अस्त्रमाया मीं उत्पन्न केली २५ आणि ह्याप्रमाणें माझ्या मोहनास्त्राच्या योगानें त्यांच्या त्या नानाप्रकारच्या माया नाश पावूं लागल्या असतां त्या अपरिमित सामर्थ्यवान् श्रेष्ठ दैत्यांनीं पुनरपि नानाप्रकारच्या माया प्रकट केल्या २६. तेव्हां एकदम चोहोंकडे प्रकाश पडूं लागला व पुनरपि लगेच चोहोंकडे अंधकार सर्व कांहीं ग्रासूं लागला. ह्यामुळें पुनरपि लोकांना कांहीं दिसेनासें होऊन ते जसे कांहीं पाण्यामध्यें बुडूं लागले २७. शरीरावर रोमांच उठविणाऱ्या त्या संग्रामामध्यें मधून मधून प्रकाश पडूं लागला ह्मणजे मात्र मातलि उत्तम रीतीनें अश्व आवरून धरून तो

ततः पर्यपतन्नुग्रा निवातकवचा मयि । तानहं विवरं दृष्ट्वा प्राहिण्वं यममादनम् २९ वर्तमाने तथा युद्धे निवातकवचान्तके । नापश्यं सहसा सर्वान्दानवान्मायया वृतान् ३० [६६५१] इति श्रीमहाभारते० मारण्यकेपर्वणि निवातकवचयुद्धपर्वणि मायायुद्धे एकसप्तत्यधिकशततमोध्यायः ॥ १७१ ॥

अर्जुन उवाच ॥ अदृश्यमानास्ते दैत्या योधयन्ति स्म मायया । अदृश्येनास्त्रवीर्येण तानप्यहमयोधयम् १ गाण्डीवमुक्ता विशिखाः सम्यगस्त्रप्रचोदिताः । अच्छिन्दन्नुत्तमाङ्गानि यत्र यत्र स्म तेभवन् २ ततो निवातकवचो वध्यमाना मया युधि । संहृत्य मायां सहसा प्राविशन्पुरमात्मनः ३ व्यपयातेषु दैत्येषु प्रादुर्भूते च दर्शने । अपश्यं दानवांस्तत्र हताञ्छतसहस्रशः ४ विनिष्पिष्टानि तत्रैषां शस्त्राण्याभरणानि च । शतशः स्म प्रदृश्यन्ते गात्राणि कवचानि च ५ हयानां नान्तरं ह्यासीत्पदाद्विचलितुं पदम् । उत्पत्य सहसा तस्थुरन्तरिक्षगमास्ततः ६ ततो निवातकवचा व्योम संछाद्य केवलम् । अदृश्या ह्यत्यवर्तन्त विसृजन्तः शिलोच्च-

---

श्रेष्ठ रथ हांकीत असे २८ असो. तदनंतर ते उग्र निवातकवच दैत्य माझ्यावर तुटून पडूं लागले असतां त्यांचें मर्म कोठें आहे हें जाणून मीं त्यांना यमसदनाला पाठवून दिलें २९ आणि नंतर निवातकवचाचा नाश करणारें असें तें युद्ध सुरू झालें असतां सर्व दैत्यांनीं मायेचें अवलंबन केल्यामुळें मला एकाएकीं कोणीच दिसेनासे झाले ३०. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील निवातकवचयुद्धपर्वांपैकीं मायायुद्धाविषयीं एकशें एकाहत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ १७१ ॥

अर्जुन सांगतो:— अदृश्य राहून ते दैत्य माझ्याशीं युद्ध करूं लागले असतां मीही अदृश्य अशा अस्त्रसामर्थ्याचें अवलंबन करून त्यांच्याशीं युद्ध करूं लागलों १. उत्कृष्ट रीतीनें अस्त्रांनीं अभिमंत्रण केलेले आणि गांडीव धनुष्यापासून सुटलेले माझे बाण जिकडे जिकडे ते राक्षस होते तिकडे तिकडे जाऊन त्यांचीं मस्तकें तोडूं लागले २. तेव्हां ह्याप्रमाणें युद्धामध्यें माझ्या हातून त्या निवातकवचांचा वध होऊं लागला असतां माया आटापून ते एकदम आपल्या नगरामध्यें प्रविष्ट झाले ३ आणि ह्याप्रमाणें ते दैत्य संग्रामांतून निघून गेल्यावर प्रकाश पडला असतां शेंकडों हजारों दैत्य तेथें मरून पडलेले मीं अवलोकन केले ४. त्याठिकाणीं तुकडे तुकडे झालेलीं त्यांचीं शेंकडों शस्त्रें, भूषणें, शरीरें आणि कवचें माझ्या दृष्टीस पडलीं ५. अश्वांचें एक पाऊलही पुढें पडण्याइतकी मोकळी जागा जेव्हां नाहींशी झाली तेव्हां ते आकाशगामी दैत्य एकाएकीं आकाशामध्यें उड्डाण करून उभे राहिले ६. तदनंतर निवातकवच दैत्य

यान् ७ अन्तर्भूमिगताश्चान्ये हयानां चरणान्यथ । व्यगृह्णन्दानवा घोरा
रथचक्रे च भारत ८ विनिगृह्य हरीनश्वान्रथं च मम युध्यतः । सर्वतो
मामविध्यन्त सरथं धरणीधरैः ९ पर्वतैरुपचीयद्भिः पतमानैस्तथापरैः ।
स देशो यत्र वर्ताम गुहेव समपद्यत १० पर्वतैश्छाद्यमानोहं निगृहीतैश्च
वाजिभिः । अगच्छं परमामार्तिं मातलिस्तदलक्षयत् ११ लक्षयित्वा च
मां भीतमिदं वचनमब्रवीत् । अर्जुनार्जुन मा भैस्त्वं वज्रमस्त्रमुदीरय १२
ततोहं तस्य तद्वाक्यं श्रुत्वा वज्रमुदीरयम् । देवराजस्य दयितं भीममस्त्रं
नराधिप १३ अचलं स्थानमासाद्य गाण्डीवमनुमन्त्र्य च । अमुञ्चं वज्र-
संस्पर्शानायसान्निशिताञ्छरान् १४ ततो मायाश्च ताः सर्वा निवातक-
वचांश्च तान् । ते वज्रचोदिता बाणा वज्रभूताः समाविशन् १५ ते वज्र-
वेगविहता दानवाः पर्वतोपमाः । इतरेतरमाश्लिष्य न्यपतन्पृथिवीतले १६
अन्तर्भूमौ च येगृह्णन्दानवा रथवाजिनः । अनुप्रविश्य तान्बाणाः प्राहि-

---

पूर्णपणें आकाश व्याप्त करून अदृश्य राहूं लागले आणि मजवर पर्वतांचा वर्षाव करूं लागले ७. त्यांच्याचपैकीं दुसरे कांहीं घोर दैत्य भूमीमध्यें प्रविष्ट झाले आणि, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, अश्वांचे पाय व रथाचीं चाकें धरूं लागले ८. इतकच नव्हे परंतु, मी युद्ध करीत असतांना ह्याप्रमाणें त्या हरिसंज्ञक अश्वांची व रथाची गति कुंठित करून ते दैत्य सर्व बाजूंनीं माझ्यावर व रथावर पर्वतांचे प्रहार करूं लागले ९. असो. ह्याप्रमाणें चोहोंकडे पर्वतांची समृद्धि होऊं लागली असता आणि दुसरेही पर्वत त्यांच्यावर येऊन पडूं लागले असतां ज्या ठिकाणीं आह्मी होतों तो प्रदेश गुहेप्रमाणें झाला १०. ह्याप्रकारें मी पर्वतांनीं आच्छादित होऊं लागलों असतां आणि अश्वांची गति कुंठित झाली असतां मला पराकाष्ठेचें भय वाटलें व तें मातलीनें पाहिलें ११ आणि मी भयभीत झालों आहें असें अवलोकन करितांक्षणीं तो मला ह्मणाला " अर्जुना, अर्जुना, भिऊं नकोस; तूं ह्या प्रसंगीं वज्रास्त्राचा प्रयोग कर " १२. ह्याप्रमाणें मातलीनें मला सांगितलें असतां तें ऐकून घेऊन, हे प्रजाधिपते धर्मराजा, इंद्राला प्रिय असलेल्या भयंकर वज्रास्त्राचा मीं प्रयोग केला १३. सारांश, निश्चल उभा राहून आणि गांडीवाचें अभिमंत्रण करून ज्यांचा प्रहार वज्रासारिखा आहे असे धार केलेले लोखंडी बाण मीं सोडिले १४. तेव्हां वज्रास्त्रानें अभिमंत्रित झाल्यामुळें वज्ररूप बनलेले ते मीं सोडिलेले बाण त्या सर्वही मायांना आणि त्या निवातकवचांना व्यापूं लागले १५. (आकाशामध्यें जे दैत्य होते) ते वज्रास्त्राच्या वेगानें वध पावले आणि वध पावूं लागलेले, ते पर्वतप्राय दैत्य

ष्वन्यमसादनम् १७ हतैर्निवातकवचैर्निरस्तैः पर्वतोपमैः । समाच्छाद्यत
देशः स विकीर्णैरिव पर्वतैः १८ न हयानां क्षतिः काचिन्न रथस्य न
मातलेः । मम चादृश्यत तदा तदद्भुतमिवाभवत् १९ ततो मां प्रहसन्राज-
न्मातलिः प्रत्यभाषत । नैतदर्जुन देवेषु त्वयि वीर्यं यदीक्ष्यते २० हतेष्व-
सुरसङ्घेषु दारास्तेषां तु सर्वशः । प्राक्रोशन्नगरे तस्मिन्यथा शरदि
सारसाः २१ ततो मातलिना सार्धमहं तत्पुरमभ्ययाम् । त्रासयन्रथघो-
षेण निवातकवचस्त्रियः २२ तान्दृष्ट्वा दशसाहस्रान्मयूरसदृशान्हयान् ।
रथं च रविसंकाशं प्राद्रवन्गणशः स्त्रियः २३ ताभिराभरणैः शब्दस्त्रासि-
ताभिः समीरितः । शिलानामिव शैलेषु पतन्तीनामभूत्तदा २४ वित्रस्ता
दैत्यनार्यस्ताः स्वानि वेश्मान्यथाविशन् । बहुरत्नविचित्राणि शातकुम्भ-
मयानि च २५ तदद्भुताकारमहं दृष्ट्वा नगरमुत्तमम् । विशिष्टं देवनगरा-

---

एकमेकाला कवटाळून धरून भूतलावर पडूं लागले १६ आणि भूमीमध्यें प्रविष्ट होऊन ज्या दैत्यांनीं रथाला व अश्वांना धरिलें होतें त्याही दैत्यांच्या शरीरामध्यें बाणांनीं प्रवेश केला आणि त्या दैत्याची यमसदनाकडे रवानगी केली १७. असो. ह्याप्रमाणें वध पावलेले ते पर्वतप्राय निवातकवचनामक दैत्य चोहोंकडे पडल्यामुळें तो प्रदेश ठिकठिकाणी पडलेल्या पर्वतांच्याच योगानें कीं काय आच्छादित होऊन गेला १८. परंतु, (इतका जरी घोर प्रसंग झाला तरी) अश्वांना, रथाला, मातलीला आणि मला मुळींच धक्का लागला नाहीं असें जेव्हां दिसून आलें तेव्हां मला तोही प्रकार एक अद्भुतच वाटला १९. तदनंतर, हे धर्मराजा, तो मातलि हसत हंसत मला ह्मणाला "हे अर्जुना, तुझ्या ठिकाणीं ज वीर्य दृष्टोत्पत्तीस येत आहे तें देवांमध्येंही नाहीं २०. असो दैत्यगणांचा वध झाला असतां शरदृतूमध्यें शब्द करणाऱ्या हंसपक्ष्यांप्रमाणें त्यांच्या स्त्रिया त्या नगरामध्यें सर्वप्रकारें आक्रोश करूं लागल्या २१. तदनंतर मातलीसहवर्तमान मी त्याच्या नगरामध्यें आलों असतां रथाच्या ध्वनीची त्या निवातकवचनामक दैत्यांच्या स्त्रियांना भीति वाटू लागली २२ आणि ते दहा हजार मयूरतुल्य अश्व व तो सूर्यतुल्य तेजस्वी रथ अवलोकन करून तर त्या स्त्रियांच्या झुंडीच्या झुंडीच पळूं लागल्या २३. भूषणांनीं युक्त अ लेल्या त्या स्त्रिया भयभीत होऊन ओरडूं लागल्या असतां पर्वतावर पडणाऱ्या शिलांप्रमाणें त्यांचा शब्द होऊं लागला २४ आणि अशा प्रकारें अतिशय त्रस्त झालेल्या त्या दैत्यस्त्रिया नानाप्रकारच्या रत्नांनीं चित्रविचित्र असलेल्या आपआपल्या सुवर्णमय घरांमध्यें प्रविष्ट झाल्या २५. नंतर आश्चर्यकारक आकारानें युक्त आणि देवांच्या नगरांपेक्षांही श्रेष्ठ असें तें उत्कृष्ट नगर

दपृच्छं मातलिं ततः २६ इदमवंविधं कस्माद्देवा नावासयन्त्युत । पुरन्दरपु-
राद्धीदं विशिष्टमिति लक्षये २७ मातलिरुवाच ॥ आसीदिदं पुरा पार्थ
देवराजस्य नः पुरम् । ततो निवातकवचैरितः प्रच्याविताः सुराः २८
तपस्तप्त्वा महत्तीव्रं प्रसाद्य च पितामहम् । इदं वृतं निवासाय देवेभ्यश्चाभयं
युधि २९ ततः शक्रेण भगवान्स्वयंभूरिति चोदितः । विधत्तां भगवानत्रमा-
त्मनो हितकाम्यया ३० तत उक्तो भगवतादिष्टमत्रेति भारत । भवितान्तस्त्व-
मप्येषां देहेनान्येन शत्रुहन् ३१ तत एषां वधार्थाय शक्रोऽस्त्राणि ददौ तव । न हि
शक्याः सुरैर्हन्तुं य एते निहतास्त्वया ३२ कालस्य परिणामेन ततस्त्व-
मिह भारत । एषामन्तकरः प्राप्तस्तत्त्वया च कृतं तथा ३३ दानवानां
विनाशाय अस्त्राणां परमं बलम् । ग्राहितस्त्वं महेन्द्रेण पुरुषेन्द्र तदुत्त-
मम् ३४ अर्जुन उवाच ॥ ततः प्रशाम्य नगरं दानवांश्च निहत्य तान् ।
पुनर्मातलिना सार्धमगच्छं देवसद्म तत् ३५ [६८८६] मारण्यके पर्वणि निवा-
तकवचयुद्धपर्वणि निवातकवचयुद्धे द्विसप्तत्यधिकशततमोऽध्यायः ॥ १७२ ॥

अवलोकन करून मी मातलीला विचारिलें २६ 'ह्या अशा प्रकारच्या नगरामध्ये देव कां वास्तव्य करीत नाहीत ? इंद्राच्या अमरावतीनगरीपेक्षांही मला हें नगर उत्तम दिसत आहे " २७. मातलि सांगतो:—हे कुंतीपुत्रा, हे पूर्वी देवराज इंद्राचेंच नगर होतें; परंतु, पुढें निवातकवच दैत्यांनीं येथून देवाना हांकून लाविलें २८. सारांश, मोठी तीव्र तपश्चर्या करून त्या दैत्यांनीं ब्रह्मदेवाला प्रसन्न केलें आणि वास्तव्य करण्याकरितां हें नगर व युद्धामध्ये देवांपासून अभय हे वर त्यांनीं त्या ब्रह्मदेवापासून मागून घेतलें २९. तदनंतर भगवान् ब्रह्मदेवाला इंद्र ह्मणाला " आपलें हित होण्याकरितां भगवानांनीं कांहीं तरी ह्यांच्या नाशाची तजवीज करावी " ३०. ह्याप्रमाणें इंद्रानें विनति केली असतां, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, ह्यासंबंधानें भगवान् ब्रह्मदेव इंद्राला ह्मणाले " हे शत्रुघ्ना, दुसऱ्या देहाच्या योगानें तू ह्यांचा नाश करशील " ३१. असें पूर्वीं ठरलें असल्यामुळें ह्यांच्या वधाकरितां इंद्रानें तुला अस्त्रें दिलीं. कारण, तू मारिलेल्या ह्या दैत्यांचा वध देवाच्या हातून होणें शक्यच नव्हतें ३२. हे भरतकुलोत्पन्ना अर्जुना, ह्यांच्या अभ्युदयकालाची परिसमाप्ति झाल्यामुळें ह्यांचा नाश करणारा तूं प्राप्त झाला आहेस आणि त्याप्रमाणें तू केलें आहेस ३३. हे पुरुषश्रेष्ठा अर्जुना, तें पराकाष्ठेचें अनुपम अस्त्रसामर्थ्य इंद्रानें तुला दैत्यांच्या नाशाकरितां दिलें आहे" ३४. अर्जुन सांगतो:— तदनंतर तें नगर अवलोकन करून अवशिष्ट राहिलेल्या दैत्यांचा मीं वध केला आणि मातलीसहवर्तमान पुनरपि स्वर्गामध्यें गेलों ३५. ह्याप्रमाण० वनपर्वांतील निवातकवच-

अर्जुन उवाच ॥ निवर्तमानेन मया महद्दृष्टं ततोऽपरम्। पुरं कामचरं दिव्यं पावकार्कसमप्रभम् १ रत्नद्रुममयैश्चित्रैः सुस्वरैश्च पतत्रिभिः। पौलोमैः कालकञ्जैश्च नित्यहृष्टैरधिष्ठितम् २ गोपुराट्टालकोपेतं चतुर्द्वारं दुरासदम्। सर्वरत्नमयं दिव्यमद्भुतोपमदर्शनम् ३ द्रुमैः पुष्पफलोपेतैः सर्वरत्नमयैर्वृतम्। तथा पतत्रिभिर्दिव्यैरुपेतं सुमनोहरैः ४ असुरैर्नित्यमुदितैः शूलर्ष्टिमुसलायुधैः। चापमुद्गरहस्तैश्च स्रग्विभिः सर्वतोवृतम् ५ तदहं प्रेक्ष्य दैत्यानां पुरमद्भुतदर्शनम्। अपृच्छं मातलिं राजन्किमिदं वर्ततेऽद्भुतम् ६ मातलिरुवाच। पुलोमा नाम दैतेयी कालका च महासुरी। दिव्यं वर्षसहस्रं ते चेरतुः परमं तपः ७ तपसोन्ते ततस्ताभ्यां स्वयंभूरददद्वरम्। अगृह्णीतां वरं तु सुतानामल्पदुःखताम् ८ अवध्यतां च राजेन्द्र सुरराक्षसपन्नगैः।

युद्धपर्वापैकी निवातकवचयुद्धसंबंधीं एकशें बहात्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ १७२॥

अर्जुन सांगतोः—मी तेथून परत फिरूं लागलों असतां त्याहून वेगळें असें एक दुसरें मोठें नगर माझ्या अवलोकनांत आलें. तें दिव्य नगर यथेष्ट संचार करणारें असून अग्नि आणि सूर्य ह्यांप्रमाणें तेजस्वी होतें १. रत्नवृक्षांनीं भरलेलीं अद्भुत उपवनें त्या ठिकाणीं होतीं; सुस्वर गायन करणारे पक्षी तेथें रहात होते आणि सर्वदां आनंदित असलेले पौलोम व कालकंज दैत्य तेथें वास्तव्य करीत होते २. वेशी आणि राजवाडे ह्यांनी तें युक्त होतें; त्याला चोहोंकडे चार मुख्य द्वारें होतीं; त्याच्यावर हल्ला होणें अशक्य होतें आणि तें दिव्य नगर सर्व प्रकारच्या रत्नांनीं भरलेलें असून दिसण्यांत तर आश्चर्यकारकच होतें ३. पुष्पें, फळें आणि सर्व प्रकारचीं रत्नें ह्यांनीं युक्त असलेल्या वृक्षांनीं तें घेरलेलें होतें आणि त्याचप्रमाणें फारच मनोहर अशा पक्ष्यांनीं तें युक्त होतें ४. शूल, ऋष्टि आणि मुसलें हीं आयुधें धारण करून धनुष्य व मुद्गल ज्यांनीं हातांमध्यें घेतले आहेत व ज्यांनीं कंठांमध्यें माला घातलेल्या आहेत असे सर्वदां आनंदित असलेले दैत्य त्या नगराला सर्व बाजूनीं वेढा देऊन राहिले होते ५. असें दिसण्यांत अद्भुत असें तें दैत्यांचें नगर अवलोकन करून, हे राजा, "हें काय अद्भुत आहे?" म्हणून मीं मातलीला प्रश्न केला असतां ६ मातलि म्हणालाः— पुलोमा आणि कालका ह्या उभयतां दैत्यस्त्रियांनीं एक हजार दिव्य वर्षेंपर्यंत उत्कृष्ट तपश्चर्या केली ७. तेव्हां तपश्चर्या समाप्त झाल्यावर ब्रह्मदेवानें त्या उभयतांना वर देऊं केला असतां, हे राजाधिराज धर्मराजा, आपल्या पुत्रांना दुःख अगदींच कमी व्हावें आणि देव, राक्षस व पन्नग ह्यांच्या हातून त्यांचा वध होऊं नये" असा वर त्यांनीं मागून घेतला. हें नगर अत्यंत रमणीय व अतिशयच तेजस्वी असून

पुरं सुरमणीयं च खचरं सुमहाप्रभम् ९ सर्वरत्नैः समुदितं दुर्धर्षममरैरपि । महर्षियक्षगन्धर्वपन्नगासुरराक्षसैः १० सर्वकामगुणोपेतं वीतशोकमनामयम् । ब्रह्मणा भरतश्रेष्ठ कालकेयकृते कृतम् ११ तदेतच्च पुरं दिव्यं चरत्यमरवर्जितम् । पौलोमाध्युषितं वीर कालकञ्जैश्च दानवैः १२ हिरण्यपुरमित्येवं ख्यायते नगरं महत् । रक्षितं कालकेयैश्च पौलोमैश्च महासुरैः १३ त एते मुदिता राजन्नवध्याः सर्वदैवतैः । निवसन्त्यत्र राजेन्द्र गतोद्वेगा निरुत्सुकाः । मानुषान्मृत्युरेतेषां निर्दिष्टो ब्रह्मणा पुरा १४ एतानपि रणे पार्थ कालकञ्जान्दुरासदान् । वज्रास्त्रेण नयस्वाशु विनाशं सुमहाबलान् १५ अर्जुन उवाच । सुरासुरैरवध्यं तदहं ज्ञात्वा विशांपते । अब्रुवं मातलिं हृष्टो याह्येतत्पुरमञ्जसा १६ त्रिदशेशद्विषो यावत्क्षयमस्त्रैर्नयाम्यहम् । न कथंचिद्धि मे पापा न वध्या ये सुरद्विषः १७ उवाह मां ततः शीघ्रं हिरण्यपुरमन्तिकात् । रथेन तेन दिव्येन हरियुक्तेन मातलिः १८ ते मामालक्ष्य

आकाशामध्यें गमन करणारें आहे ८, ९; सर्व प्रकारच्या रत्नांनीं हें युक्त आहे; देव महर्षि, यक्ष, गंधर्व, पन्नग, दैत्य आणि राक्षस ह्यापैकीं कोणाच्याही हातून ह्याच्यावर हल्ला होणें कठिण आहे १०; हें सर्व प्रकारच्या भोग्य वस्तूंनीं युक्त असून सर्वगुणसंपन्न आहे; ह्या ठिकाणीं दुःखाचा व रोगाचा अभाव आहे आणि, हे भरतवंशजश्रेष्ठा, ब्रह्मदेवानें हें कालकेयाकरितां निर्माण केलेलें आहे ११. हे वीरा, देवरहित असलेलें हें दिव्य नगर संचार करीत असतें आणि कालकंज व पौलोम ह्या असुरांचें ह्या ठिकाणीं वास्तव्य असतें १२. हिरण्यपुर असें ह्या प्रचंड नगराचें नांव आहे आणि कालकेय व पौलोम ह्या महादैत्यांनीं ह्याचें रक्षण केलें आहे. हे राजा, त्या ह्या दैत्यांचा कोणत्याही देवांच्या हातून वध होणें अशक्य आहे १३ आणि ह्मणूनच, हे राजाधिराज, ते दैत्य निर्भय व निश्चिंत होऊन ह्या ठिकाणीं आनंदानें वास्तव्य करीत आहेत; परंतु, पूर्वी ब्रह्मदेवानें ह्यांचा मृत्यु मनुष्यापासून ठरविलेला आहे १४. ह्यास्तव, हे कुंतीपुत्रा अर्जुना, ह्या अत्यंत बलाढ्य व जिंकण्यास अशक्य अशा कालकंज राक्षसांचाही तूं वज्रास्त्राच्या योगानें सत्वर नाश करून टाक १५. अर्जुन ह्मणतोः—हे प्रजाधिपते धर्मराजा, देवदैत्यांचे हातून त्या नगराचा वध होणें अशक्य आहे असें समजून आल्यावर मला हर्ष झाला आणि मी मातलीला ह्मणालों " तर मग ह्या नगराकडे चल; ह्मणजे मी ह्या देवशत्रूंचा अस्त्रांच्या योगानें अनायासें वध करितों. देवांचा द्वेष करणारे जे पापी आहेत त्यांचा वध माझ्या हातून होणें अशक्य आहे असें कधींच नाहीं " १६,१७. ह्याप्रमाणें मीं त्याला

दैतेया विचित्राभरणाम्बराः। समुत्पेतुर्महावेगा रथानास्थाय दंशिताः १९
ततो नालीकनाराचैर्भल्लैः शक्त्यृष्टितोमरैः। प्रत्यघ्नन्दानवेन्द्रा मां क्रुद्धा-
स्तीव्रपराक्रमाः २० तदहं शरवर्षेण महता प्रत्यवारयम्। शस्त्रवर्षं महद्रा-
जन्विद्याबलमुपाश्रितः २१ व्यामोहयं च तान्सर्वान्रथमार्गैश्चरन्रणे। तेऽन्यो-
न्यमभिसंमूढाः पातयन्ति स्म दानवान् २२ तेषामेवं विमूढानामन्योन्यम-
भिधावताम्। शिरांसि विशिखैर्दीप्तैर्न्यहनं शतसङ्घशः २३ ते वध्यमाना
दैतेयाः पुरमास्थाय तत्पुनः। खमुत्पेतुः सनगरा मायामास्थाय दानवीम् २४
ततोऽहं शरवर्षेण महता कुरुनन्दन। मार्गमावृत्य दैत्यानां गतिं चैषामवार-
यम् २५ तत्पुरं खचरं दिव्यं कामगं सूर्यसप्रभम्। दैतेयैर्वरदानेन धार्यते
स्म यथासुखम् २६ अन्तर्भूमौ निपतति पुनरूर्ध्वं प्रतिष्ठते। पुनस्तिर्यक्प्रया-
त्याशु पुनरप्सु निमज्जति २७ अमरावतिसंकाशं तत्पुरं कामगं महत्।

सांगितलें असतां अश्व जोडिलेल्या त्या दिव्य रथासहवर्तमान मला तो मातलि सत्वर हिरण्यपुरासमीप घेऊन गेला १८. तेव्हां चित्रविचित्र भूषणें व वस्त्रें धारण करून अंगामध्यें चिलखतें चढविलेले ते महावेगवान् दैत्य मला पाहतांक्षणीं रथांवर आरूढ झाले आणि माझ्या अंगावर धांऊन आले १९; इतकेंच नव्हे; परतु, क्रुद्ध झालेल्या त्या प्रचंडपराक्रमी दैत्याधिपतींनीं नालीक, नाराच व भल्ल ह्या बाणांनीं आणि शक्ति, ऋष्टि व तोमर ह्या आयुधांनीं मला प्रहारही केले २०. तेव्हां, हे राजा, अस्त्रविद्येचें मोठें बल माझ्यापाशीं असल्यामुळें मीं आपल्या मोठ्या बाणवृष्टीनें त्यांच्या बाणवृष्टीचें निवारण केलें २१ आणि रथाच्या अनेक चालीनी मीं संग्रामामध्यें संचार करितां करितां त्या सर्वांना मोह पाडिला. तेव्हा गोंधळून गेलेले ते दैत्य (चोहोंकडून अर्जुनच येत आहे असें समजून) एकमेकांचा वध करूं लागले २२ आणि ह्याप्रमाणें ते गोंधळून जाऊन एकमेकांवर धावूं लागले असतां उज्ज्वल बाणांच्या योगानें मीं त्यांचे शेंकडों मस्तकसमुदाय तोडून टाकिले २३ व अशाप्रकारें जेव्हां माझ्या हातून त्यांचा वध होऊं लागला तेव्हां ते दैत्य पुनरपि त्या नगरामध्यें शिरले. आसुरी मायेचें अवलंबन करून नगरासहवर्तमान आकाशामध्यें ते उडून गेले असतां २४, हे कुरुनंदना धर्मराजा, मोठ्या बाणवृष्टीच्या योगानें दैत्यांचा मार्ग व्यापून टाकून मीं त्यांच्या गमनाला प्रतिबंध केला २५; तथापि, ब्रह्मदेवाचा वर असल्यामुळें सूर्यतुल्य तेजस्वी व यथेष्ट संचार करणारें असें तें आकाशगामी दिव्य नगर त्या दैत्यांनीं हवें तसें उचलून धरिलें होतें २६. क्षणामध्यें तें नगर भूमीवर पडत असे, क्षणामध्यें पुनरपि वर जात असे, फिरून एका क्षणामध्यें आडवें होऊन सत्वर खालीं येत असे आणि

अहमस्त्रैर्बहुविधैः प्रत्यगृह्णं परन्तप २८ ततोहं शरजालेन दिव्यास्त्रनुदितेन च । व्यगृह्णं सह दैतेयैस्तत्पुरं पुरुषर्षभ २९ विक्षतं चायसैर्बाणैर्मत्प्रयुक्तैरजिह्मगैः । महीमभ्यपतद्राजन्प्रभग्नं पुरमासुरम् ३० ते वध्यमाना मद्बाणैर्वज्रवेगैरयस्मयैः । पर्यभ्रमन्त वै राजन्नसुराः कालचोदिताः ३१ ततो मातलिरारुह्य पुरस्तान्निपतन्निव । महीमवातरत्क्षिप्रं रथेनादित्यवर्चसा ३२ ततो रथसहस्राणि षष्टिस्तेषाममर्षिणाम् । युयुत्सूनां मया सार्धं पर्यवर्तन्त भारत ३३ तान्यहं निशितैर्बाणैर्व्यधमं गार्ध्रराजितैः । ते युद्धे संन्यवर्तन्त समुद्रस्य यथोर्मयः ३४ नेमे शक्या मानुषेण युद्धेनेति प्रचिन्त्य तत् । ततोहमानुपूर्व्येण दिव्यान्यस्त्राण्ययोजयम् ३५ ततस्तानि सहस्राणि रथिनां चित्रयोधिनाम् । अस्त्राणि मम दिव्यानि प्रत्यघ्नञ्छनकैरिव ३६ रथमार्गान्विचित्रांस्ते विचरन्तो महाबलाः । प्रत्य-

---

पुनरपि कांहीं वेळानें तें उदकामध्यें निमग्न होत असे २७. तथापि, हे शत्रुतापना धर्मराजा, अमरावतीप्रमाणें असलेलें तें प्रचंड नगर जरी यथेष्ट संचार करणारें होतें तरी नानाप्रकारच्या अस्त्रांनीं मीं त्याचा समाचार घेतला २८. सारांश, हे पुरुषश्रेष्ठा धर्मराजा, तदनंतर दिव्य अस्त्रांनीं अभिमंत्रण करून सोडिलेल्या बाणसमुदायांच्या योगानें दैत्यांसहवर्तमान मीं त्या नगराची गति कुंठित करून टाकिली २९ व, हे राजा, एकसारिखे समोर जाणारे जे लोखंडाचे बाण मीं सोडिले त्यांच्या योगानें ठिकठिकाणीं क्षतें पडलेलें तें दैत्यांचें नगर छिन्नभिन्न होऊन पृथ्वीवर पडलें ३० आणि हे राजा, वज्रतुल्य वेगानें युक्त असलेल्या माझ्या लोखंडी बाणांनीं त्या कालाची प्रेरणा झालेल्या दैत्यांचा वध होऊं लागला असतां ते दैत्य संग्रामामध्यें सर्व बाजूंनीं भ्रमण करूं लागले ३१. तेव्हां सूर्याप्रमाणें तेजस्वी असलेल्या रथासहवर्तमान मातलि आकाशामध्यें आरूढ झाला आणि दैत्यांच्यासमोर आकाशांतून उडया टाकीतच येत आहे कीं काय अशा रीतीनें तो सत्वर भूतलावर आला ३२. तदनंतर, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, हें मातलीचें करणें त्यांना सहन न झाल्यामुळें ते दैत्य साठ हजार रथामध्यें बसून माझ्याबरोबर युद्ध करण्याकरितां मला गराडा देऊन उभे राहिले ३३ आणि गृध्रपक्ष्यांच्या पिसांनीं सुशोभित अशा तीक्ष्ण बाणांच्या योगानें जरी मीं त्यांना उडवून दिलें तरी समुद्राच्या लाटांप्रमाणें ते त्या संग्रामामध्यें परत येऊं लागले ३४. असो. मानवी युद्धानें ह्यांचा पराभव होणें शक्य नाहीं असें आढळून आल्यामुळें मी क्रमाक्रमानें दिव्य अस्त्रांचा प्रयोग करूं लागलों असतां ३५ अद्भुत युद्ध करणाऱ्या त्या हजारों रथ्यांनां माझ्या दिव्य अस्त्रांनीं धीराधीरानें प्रहार केले ३६. तेव्हां

दृश्यन्त संग्रामे शतशोथ सहस्रशः ३७ विचित्रमुकुटापीडा विचित्रकवचध्वजाः । विचित्राभरणाश्चैव नन्दयन्तीव मे मनः ३८ अहं तु शरवर्षैस्तानस्त्रप्रचुदितै रणे । नाशक्रुवं पीडयितुं ते तु मां प्रत्यपीडयन् ३९ तैः पीड्यमानो बहुभिः कृतास्त्रैः कुशलैर्युधि । व्यथितोस्मि महायुद्धे भयं चागान्महन्मम ४० ततोहं देवदेवाय रुद्राय प्रयतो रणे । स्वस्ति भूतेभ्य इत्युक्त्वा महास्त्रं समचोदयम् ४१ यत्तद्रौद्रमिति ख्यातं सर्वामित्रविनाशनम् । ततोपश्यं त्रिशिरसं पुरुषं नवलोचनम् ४२ त्रिमुखं षड्भुजं दीप्तमर्कज्वलनमूर्धजम् । लेलिहानैर्महानागैः कृतचीरममित्रहन् ४३ विभीस्ततस्तदस्त्रं तु घोरं रौद्रं सनातनम् । दृष्ट्वा गाण्डीवसंयोगमानीय भरतर्षभ ४४ नमस्कृत्वा त्रिनेत्राय शर्वायामिततेजसे । मुक्तवान्दानवेन्द्राणां पराभावाय भारत ४५ मुक्तमात्रे ततस्तस्मिन्रूपाण्यासन्सहस्रशः । मृगा-

---

रथगतीमधलें नानाप्रकारचे डावपेच करून संचार करूं लागलेले ते महाबलाढ्य दैत्य संग्रामामध्यें शकडों हजारों माझ्या दृष्टीं पडूं लागले ३७. चित्रविचित्र मुकुटमाला त्यांनीं धारण केलेल्या होत्या, त्यांचीं कवच व ध्वज हीं अद्भुत होतीं आणि नाना प्रकारचीं भूषणें त्यांनीं धारण केलेलीं होतीं; ह्यामुळें एकप्रकारें त्यांच्या योगानें माझ्या मनाला आनंदच होऊं लागला ३८. संग्रामामध्यें अस्त्रांनीं अभिमंत्रण करून जरी मीं बाणांचे वर्षाव त्यांच्यावर केले तरी त्यांना धक्काही लावण्यास मी समर्थ झालो नाहीं आणि उलट त्यांनीं मात्र मला जर्जर करून टाकिलें ३९; इतकेंच नव्हें; परंतु, युद्धामध्यें निपुण आणि अस्त्रसंपन्न अशा त्या असंख्य दैत्यांनीं मला अगदीं जर्जर केलें असतां त्या घोर संग्रामामध्यें मी व्याकुल झालो आणि मला मोठेंच भय उत्पन्न झालें ४०. तेव्हां त्या संग्रामामध्यें देवाधिदेव रुद्राला मीं प्रणाम केला आणि निरुपद्रवी प्राण्यांचें कल्याण असो असें ह्मणून पाशुपतसंज्ञक महास्त्राची योजना केली ४१. तें अस्त्र रौद्र ह्या नावानें प्रसिद्ध असून सर्व शत्रूंचा नाश करणारें आहे. असो. अस्त्रसंबंधी मंत्र जपतांक्षणीं तीन मस्तकें, नऊ नेत्र, तीन मुखें आणि सहा हात ह्यांनीं युक्त असलेला एक पुरुष माझ्या दृष्टीं पडला. त्याची कांति उज्ज्वल असून केश तर सूर्याप्रमाणें व अग्नीप्रमाणें तेजस्वी होते आणि, हे शत्रुनाशका धर्मराजा, जिभल्या चाटीत असलेले मोठमोठे सर्पच वस्त्राच्या ऐवजी त्यानें परिधान केले होते ४२, ४३. ह्याप्रमाणें तें सनातन घोर पाशुपतास्त्र मूर्तिमंत अवलोकन केल्यावर, हे भरतवंशजश्रेष्ठा धर्मराजा, मीं निर्भयपणानें गांडीव धनुष्याशीं त्याचा संयोग केला ४४ आणि अपरिमित तेजस्वी त्रिलोचन शंकराला नमस्कार करून, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, दैत्याधिपतींचा

णामथ सिंहानां व्याघ्राणां च विशांपते ४६ ऋक्षाणां महिषाणां च पन्नगानां तथा गवाम् । शरभाणां गजानां च वानराणां च सङ्घशः ४७ ऋषभाणां वराहाणां मार्जारणां तथैव च । सालावृकाणां प्रेतानां भुरुण्डानां च सर्वशः ४८ गृध्राणां गरुडानां च चमराणां तथैव च । देवानां च ऋषीणां च गन्धर्वाणां च सर्वशः ४९ पिशाचानां सयक्षाणां तथैव च सुरद्विषाम् । गुह्यकानां च संग्रामे नैर्ऋतानां तथैव च ५० झषाणां गजवक्त्राणामुलूकानां तथैव च । मीनवाजिसरूपाणां नानाशस्त्रासिपाणिनाम् ५१ तथैव यातुधानानां गदामुद्गरधारिणाम् । एतैश्चान्यैश्च बहुभिर्नानारूपधरैस्तथा ५२ सर्वमासीज्जगद्व्याप्तं तस्मिन्नस्त्रे विसर्जिते । त्रिशिरोभिश्चतुर्दंष्ट्रैश्चतुरास्यैश्चतुर्भुजैः ५३ अनेकरूपसंयुक्तैर्मांसमेदोवसास्थिभिः । अभीक्ष्णं वध्यमानास्ते दानवा नाशमागताः ५४ अर्कज्वलनतेजोभिर्वज्राशनिसमप्रभैः।अद्रिसारमयैश्चान्यैर्बाणैररपि निबर्हणैः५५ न्यहनं दानवान्सर्वान्मुहूर्तेनैव भारत । गाण्डीवास्त्रप्रणुन्नांस्तान्गतासून्नभ-

---

अत्यंत अभाव होण्याकरितां मीं तें अस्त्र सोडिलें ४५. तें अस्त्र सुटतांक्षणीं, हे प्रजाधिपते धर्मराजा, हजारों मृग, सिंह आणि व्याघ्र उत्पन्न झाले ४६; अस्वलें, रेडे, सर्प, गाई, शरभ, गज आणि वानर ह्यांचे तर कळपच्या कळपच उत्पन्न झाले ४७; बैल, डुकर मांजरें, लांडगे, प्रेत आणि भुरुंडसंज्ञक पक्षी ह्यांची सर्व बाजूंनीं गर्दी होऊन गेली ४८; गृध्रपक्षी, गरुडपक्षी, चमरसंज्ञक मृग, देव, ऋषि आणि गंधर्व हे सर्व तेथें उत्पन्न झाले ४९; पिशाच, यक्ष, दैत्य, गुह्यक आणि नैर्ऋत हेही त्या संग्रामामध्यें प्रकट झाले ५०; हत्तीप्रमाण मुख असलेले जलचर, उलूक पक्षी आणि रूपानें मत्स्य व अश्व ह्याप्रमाणें असून नानाप्रकारचीं शस्त्रें व खड्ग हातांमध्यें धारण केलेले राक्षसही दृष्टिगोचर होऊं लागले ५१ व त्याचप्रमाणें गदा आणि मुद्गर धारण करणारे राक्षसही तेथें दृष्टोत्पत्तीस येऊं लागले. असो. त्या अस्त्राचा प्रयोग होतांक्षणीं ह्या व नानाप्रकारचीं रुपें धारण करणाऱ्या अशाच प्रकारच्या दुसऱ्या असंख्य प्राण्यांनीं सर्व जगत् व्याप्त झालें आणि तीन मस्तकें, चार दाढा, चार मुखें, चार हात, अनेक आकृति व मांस, मेद, मज्जा आणि अस्थि ह्यांनीं युक्त असलेले ते प्राणी एकसारिखा त्या दैत्यांचा वध करूं लागले असतां त्यांचा नाश झाला ५२, ५३, ५४. असो. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, अस्त्रप्रयोगापासून उत्पन्न झालेल्या ह्या प्राण्यांच्या योगानें, व सूर्य आणि अग्नि ह्याप्रमाणें तेजस्वी, वज्र अथवा विद्युलता ह्याप्रमाणें उज्ज्वल व नाशकारक अशा इतर लोहमय बाणांच्या योगानें, मीं

सश्रुयुतान् ५६ दृष्ट्वाहं प्राणमं भूयस्त्रिपुरघ्नाय वेधसे । तथा रौद्रास्त्रनिष्पिष्टान्दिव्याभरणभूषितान् ५७ निशम्य परमं हर्षमगमद्देवसारथिः । तदसह्यं कृतं कर्म देवैरपि दुरासदम् ५८ दृष्ट्वा मां पूजयामास मातलिः शक्रसारथिः । उवाच वचनं चेदं प्रीयमाणः कृताञ्जलिः ५९ सुरासुरैरसह्यं हि कर्म यत्साधितं त्वया । न ह्येतत्संयुगे कर्तुमपि शक्तः सुरेश्वरः ६० सुरासुरैरवध्यं हि पुरमेतत्खगं महत् । त्वया विमथितं वीर स्ववीर्यतपसो बलात् ६१ विध्वस्ते खपुरे तस्मिन्दानवेषु हतेषु च । विनदन्त्यः स्त्रियः सर्वा निष्पेतुर्नगराद्बहिः ६२ प्रकीर्णकेश्यो व्यथिताः कुरर्य इव दुखिताः । पेतुः पुत्रान्पितॄन्भ्रातॄञ्शोचमाना महीतले ६३ रुदत्यो दीनकण्ठ्यस्तु निनदन्त्यो हतेश्वराः । उरांसि परिनिघ्नन्त्यो विस्रस्तस्रग्विभूषणाः ६४ तच्छोकयुक्तमश्रीकं दुःखदैन्यसमाहतम् । न बभौ दान-

---

एका क्षणामध्यें त्या दैत्यांचा वध केला. नंतर, गांडीव धनुष्यापासून सुटलेल्या बाणांचे प्रहार झाल्यामुळें गतप्राण होऊन आकाशापासून भ्रष्ट झालेल्या त्या दैत्यांना ५५,५६ अवलोकन करितांक्षणीं मीं जगद्व्यापक त्रिपुरांतक शंकराला पुनरपि प्रणाम केला. असो. दिव्य भूषणें धारण केलेले ते दैत्य पाशुपत अस्त्राच्या योगानें वध पावलेले ५७ अवलोकन करून देवसारथि मातलीला पराकाष्ठेचा आनंद झाला आणि देवांच्या हातूनही होण्यास अशक्य असें तें मीं केलेलें असह्य कर्म ५८ अवलोकन करून इंद्रसारथि मातलि माझी प्रसंशा करूं लागला आणि प्रसन्न होऊन व हात जोडून मला ह्मणाला ५९ " देवदैत्यांना अशक्य असें जें कर्म संग्रामामध्यें तू केलेंस तें करण्यास देवराज इंद्रही समर्थ नाहीं ६०. हे वीरा, आकाशमार्गानें गमन करणाऱ्या ह्या प्रचंड नगराचा देवदैत्यांच्याही हातून वध होणें अशक्य असतांना तूं आपल्या पराक्रमाच्या बळानें आणि तपःसामर्थ्यानें ह्याचा नाश करून टाकिला आहेस " ६१. ह्याप्रमाणें ह्या आकाशगामी नगराचा विध्वंस होऊन राक्षसांचा वध झाला असतां सर्व स्त्रिया आक्रोश करीत करीत त्या नगरांतून बाहेर पडल्या ६२ कुररीपक्षिणींप्रमाणें गांगरून गेलेल्या त्या दुःखित स्त्रियांचे केश अस्ताव्यस्त झाले आणि पुत्राकरितां, पित्यांकरितां अथवा भ्रात्याकरितां शोक करूं लागलेल्या त्या स्त्रिया भूतलावर पडल्या ६३. भर्त्यांचा वध झाल्यामुळें त्या स्त्रिया करुण स्वरानें आक्रोश करून रडूं लागल्या, त्यांनीं धारण केलेलीं मालाप्रभृति भूषणें अस्ताव्यस्त पडूं लागलीं आणि त्या आपआपलें ऊर बडवून घेऊं लागल्या ६४. दुःख व दैन्य ह्यांच्या तडाक्यांत सांपडून शोकयुक्त, वैभवहीन, शोभारहित आणि अनाथ झालेलें तें दैत्यनगर पूर्वीप्रमाणें चांगलें दिसेनासें

वपुरं हतत्विट्कं हतेश्वरम् ६५ गन्धर्वनगराकारं हतनागमिव ह्रदम् । शुष्कवृक्षमिवारण्यमदृश्यमभवत्पुरम् ६६ मां तु संहृष्टमनसं क्षिप्रं मातलिरानयत् । देवराजस्य भवनं कृतकर्माणमाहवात् ६७ हिरण्यपुरमुत्सृज्य निहत्य च महासुरान् । निवातकवचांश्चैव ततोहं शक्रमागमम् ६८ मम कर्म च देवेन्द्रं मातलिर्विस्तरेण तत् । सर्वं विश्रावयामास यथाभूतं महाद्युते ६९ हिरण्यपुरघातं च मायानां च निवारणम् । निवातकवचानां च वधं संख्ये महौजसाम् ७० तच्छ्रुत्वा भगवान्प्रीतः सहस्राक्षः पुरन्दरः । मरुद्भिः सहितः श्रीमान्साधु साध्वित्यथाब्रवीत् ७१ ततो मां देवराजो वै समाश्वास्य पुनः पुनः । अब्रवीद्विबुधैः सार्धमिदं स मधुरं वचः ७२ अतिदेवासुरं कर्म कृतमेव त्वया रणे । गुर्वर्थश्च कृतः पार्थ महाशत्रून्घ्नता मम ७३ एवमेव सदा भाव्यं स्थिरेणाजौ धनञ्जय । असंमूढेन चास्त्राणां कर्तव्यं प्रतिपादनम् ७४ अविषह्यो रणे हि त्वं देवदानवराक्षसैः । सयक्षासुरगन्धर्वैः सपक्षिगणपन्नगैः ७५ वसुधां चापि कौन्तेय त्वद्बाहुब-

---

झालें ६५. सारांश, गंधर्वनगराप्रमाणें असलेलें तें दैत्यनगर गजरहित झालेल्या सरोवराप्रमाणें अथवा ज्यांतील वृक्ष शुष्क होऊन गेलेले आहेत अशा अरण्याप्रमाणें समजण्यांत येईनासें झालें ६६. असो. पराक्रम केल्यामुळें मनामध्यें आनंदित झालेल्या मला मातलीनें संग्रामांतून सत्वर देवराज इंद्राचे घरीं नेलें ६७ व मींही निवातकवचनामक दैत्यांचा वध केल्यावर हिरण्यपुर सोडून इंद्राकडे गेलों ६८. तेथें पोंचल्यावर हे महातेजस्वी धर्मराजा, हिरण्यपुराचा घात, दैत्यांनीं सोडिलेल्या मायांचें निवारण व महाबलाढ्य निवातकवचांचा संग्रामामध्यें वध हें जें माझें कर्म तें सर्व मातलीनें देवराज इंद्राला इत्थंभूत सविस्तर कथन केलें ६९, ७० व तें श्रवण केल्यावर भगवान् वैभवसंपन्न सहस्रनयन इंद्र, मरुद्गणांसहवर्तमान प्रसन्न होऊन " शाबास, शाबास " असें ह्मणाला ७१. इतकेंच नव्हे; परंतु, माझें वारंवार सांत्वन करून त्या देवराज इंद्रानें देवांसहवर्तमान माझ्याशीं असें मधुर भाषण केलें कीं ७२, " हे कुंतीपुत्रा अर्जुना, देवदैत्यांना अशक्य असें कर्म तूं आज संग्रामामध्यें केलेंस आणि माझ्या महाशत्रूंचा वध केल्यामुळें गुरूंचा मनोरथही तुझ्या हातून परिपूर्ण झाला आहे ७३. हे धनंजया, ह्याचप्रमाणें तूं सर्वदां संग्रामामध्यें अचल रहाशील; मोहित न होतां अस्त्रांचे प्रयोग करशील ७४; रणामध्यें यक्ष, असुर, गंधर्व, पक्षिगण आणि पन्नग ह्यांसहवर्तमान देव, दानव आणि राक्षस ह्यांच्याशीं जरी प्रसंग पडला तरी तूं अजिंक्यच रहाशील ७५ व, हे कुंतीपुत्रा अर्जुना, तुझ्या बाहुबलानें जिंकिलेल्या पृथ्वीचें धर्मात्मा

लनिर्जिताम् । पालयिष्यति धर्मात्मा कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः ७६ [६७६२]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां० मारण्यके पर्वणि निवातकवचयुद्धपर्वणि हिरण्यपुरदैत्यवधे त्रिसप्तत्यधिकशततमोऽध्यायः ॥ १७३ ॥

अर्जुन उवाच ॥ ततो माममतिविश्वस्तं संरूढशरविक्षतम् । देवराजो विगृह्येदं काले वचनमब्रवीत् १ दिव्यान्यस्त्राणि सर्वाणि त्वयि तिष्ठन्ति भारत । न त्वाभिभवितुं शक्तो मानुषो भुवि कश्चन २ भीष्मो द्रोणः कृपः कर्णः शकुनिः सह राजभिः । संग्रामस्थस्य ते पुत्र कलां नार्हन्ति षोडशीम् ३ इदं च मे तनुत्राणं प्रायच्छन्मघवान्प्रभुः । अभेद्यं कवचं दिव्यं स्रजं चैव हिरण्मयीम् ४ देवदत्तं च मे शङ्खं पुनः प्रादान्महारवम् । दिव्यं चेदं किरीटं मे स्वयमिन्द्रो युयोज ह ५ ततो दिव्यानि वस्त्राणि दिव्यान्याभरणानि च । प्रादाच्छक्रो ममैतानि रुचिराणि बृहन्ति च ६ एवं संपूजितस्तत्र सुखमस्म्युषितो नृप । इन्द्रस्य भवने पुण्ये गन्धर्वशिशुभिः सह ७ ततो मामब्रवीच्छक्रः प्रीतिमानमरैः सह । समयोऽर्जुन गन्तुं ते भ्रातरो हि स्मरन्ति ते ८ एवमिन्द्रस्य भवने पञ्च वर्षाणि भारत । उषितानि

कुंतीपुत्र युधिष्ठिर परिपालन करील " ७६. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील निवातकवचयुद्धपर्वापैकीं हिरण्यपुरदैत्यवधाविषयीं एकशें त्र्याहत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ १७३ ॥

अर्जुन सांगतो:— तदनंतर अत्यंत विश्वासास पात्र झालेल्या व शरीरामध्ये रुतलेल्या बाणांच्या योगानें ठिकठिकाणी जखमी झालेल्या माझा स्वीकार करून योग्य कालीं देवराज इंद्र मला ह्मणाला १ " हे भरतकुलोत्पन्ना अर्जुना, सर्व दिव्य अस्त्रें तुझे ठिकाणीं सिद्ध आहेत; ह्यामुळें भूतलावरील कोणीही मानव तुझा पराभव करण्यास समर्थ नाहीं २. हे पुत्रा, भीष्म, द्रोण, कृप, कर्ण, शकुनि आणि इतरही राजे ह्या सर्वांना मिळूनही संग्रामामध्यें स्थित असलेल्या तुझ्या एका षोडशांचीही योग्यता नाहीं ३. असें ह्मणून प्रभु इंद्रानें शरीराचें रक्षण ज्याच्यापासून होतें असें हें दिव्य अभेद्य कवच आणि सुवर्णमय माला मला अर्पण करून ४ प्रचंड गर्जना करणारा देवदत्त शंखही पुनरपि त्यानें मला दिला, हा दिव्य किरीटही त्यानें स्वतः माझे मस्तकीं घातला ५ आणि तदनंतर मनोहर आणि मोठीं मौल्यवान् अशीं हीं दिव्य वस्त्रें व भूषणेंही त्यानें मला अर्पण केलीं ६. हे धर्मराजा, ह्याप्रमाणें माझी मानप्रान्यता होत असतांना इंद्राच्या पवित्र गृहामध्यें गंधर्वकुमारांसहवर्तमान मी सुखानें राहिलों ७. नंतर (कांहीं दिवस लोटल्यावर) माझेवर प्रेम करणारा तो इंद्र देवांसहवर्तमान मला ह्मणाला " हे अर्जुना, आतां तुझा जाण्याचा समय प्राप्त झाला

मया राजन्स्मरता द्यूतजं कलिम् ९ ततो भवन्तमद्राक्षं भ्रातृभिः परिवारितम्। गन्धमादनपादस्य पर्वतस्यास्य मूर्धनि १० युधिष्ठिर उवाच॥ दिष्ट्या धनञ्जयास्त्राणि त्वया प्राप्तानि भारत। दिष्ट्या चाराधितो राजा देवानामीश्वरः प्रभुः ११ दिष्ट्या च भगवान्स्थाणुर्देव्या सह परन्तप। साक्षाद्दृष्टः स्वयुद्धेन तोषितश्च त्वयानघ १२ दिष्ट्या च लोकपालैस्त्वं समेतो भरतर्षभ। दिष्ट्या वर्धामहे पार्थ दिष्ट्यासि पुनरागतः १३ अद्य कृत्स्नां महीं देवीं विजितां पुरमालिनीम्। मन्ये च धृतराष्ट्रस्य पुत्रानपि वशीकृतान् १४ इच्छामि तानि चास्त्राणि द्रष्टुं दिव्यानि भारत। यैस्तथावीर्यवन्तस्ते निवातकवचा हताः १५ अर्जुन उवाच॥ श्वः प्रभाते भवान्द्रष्टा दिव्यान्यस्त्राणि सर्वशः। निवातकवचा घोरा यैर्मया विनिपातिताः १६ वैशंपायन उवाच॥ एवमागमनं तत्र कथयित्वा धनञ्जयः। भ्रातृभिः सहितः सर्वै रजनीं तामुवास ह १७ [६७७९] इति श्रीमहाभारते०आरण्यकेपर्वणि निवात-

---

असून तुझे भ्रातेही तुझी आठवण करीत आहेत " ८. असो. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, द्यूतामुळें उत्पन्न झालेल्या कलहाचें एकसारिखें स्मरण ठेवून मीं ह्याप्रमाणें पांच वर्षे इंद्रभवनामध्यें घालविलीं ९ आणि नंतर ह्या गंधमादन पर्वताच्या माथ्यावर भ्रात्यांनीं परिवेष्टित असलेल्या तुला मीं अवलोकन केलें १०. युधिष्ठिर ह्मणतोः—हे भरतवंशजा धनंजया, सुदैवानें तुला अस्त्रें प्राप्त झालीं आणि सुराधिपति प्रभु इंद्राचें तूं आराधन केलेंस हीही फार उत्तम गोष्ट झाली ११. हे निष्पापा शत्रुतापना, देवीसहवर्तमान भगवान् शंकराचें तुला प्रत्यक्ष दर्शन होऊन स्वतःच्या युद्धानें तूं त्याला संतुष्ट केलेंस हीही मोठ्या भाग्याची गोष्ट होय १२. हे भरतवंशजश्रेष्ठा अर्जुना, लोकपालांशीं समागम झाला हाही महाभाग्याचाच प्रकार असून तूं परत आलास हेंही सुदैवच आहे आणि ह्यामुळें, हे कुंतीपुत्रा, सुदैवानें आमचा अभ्युदय झाला असें मी समजत आहें १३. खरोखर, नगरांनीं गजबजलेली ही संपूर्ण भूदेवी आज आपण जिंकिली असून धृतराष्ट्राचे पुत्रही आपल्या तावडींत आले आहेत असें मी समजत आहें १४. करितां, हे भरतकुलोत्पन्ना अर्जुना, ज्यांच्या योगानें त्या बलाढ्य निवातकवचनामक दैत्यांचाही तूं पराभव केलास तीं दिव्य अस्त्रें पहाण्याची मला इच्छा झाली आहे १५. अर्जुन ह्मणतोः— ज्यांच्या योगानें मीं घोर निवातकवचांचा वध केला तीं सर्व दिव्य अस्त्रें उद्यांच प्रातःकाळीं आपल्या अवलोकनांत यतील १६. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें आपल्या आगमनाचा वृत्तांत कथन करून त्या धनंजयानें सर्व भ्रात्यांसह-

कवचयुद्धपर्वणि अस्त्रदर्शनसंकेते चतुःसप्तत्यधिकशततमोऽध्यायः ॥१७४॥

वैशंपायन उवाच ॥ तस्यां रात्र्यां व्यतीतायां धर्मराजो युधिष्ठिरः । उत्थायावश्यकार्याणि कृतवान्भ्रातृभिः सह १ ततः संचोदयामास सोऽर्जुनं मातृनन्दनम् । दर्शयास्त्राणि कौन्तेय यैर्जिता दानवास्त्वया २ ततो धनञ्जयो राजन्देवैर्दत्तानि पाण्डवः । अस्त्राणि तानि दिव्यानि दर्शयामास भारत ३ यथान्यायं महातेजाः शौचं परममास्थितः । गिरिकूबरपादाक्षं शुभवेणुत्रिवेणुमत् ४ पार्थिवं रथमास्थाय शोभमानो धनञ्जयः । दिव्येन संवृतस्तेन कवचेन सुवर्चसा ५ धनुरादाय गाण्डीवं देवदत्तं स वारिजम् । शोशुभ्यमानः कौन्तेय आनुपूर्व्यान्महाभुजः ६ अस्त्राणि तानि दिव्यानि दर्शनायोपचक्रमे । अथ प्रयोक्ष्यमाणेषु दिव्येष्वस्त्रेषु तेषु वै ७ समाक्रान्ता मही पद्भ्यां समकम्पत सद्रुमा । क्षुभिताः सरितश्चैव तथैव च महोदधिः ८ शैलाश्चापि व्यदीर्यन्त न ववौ च समीरणः । न बभासे सहस्रांशुर्न जज्वाल च पावकः ९ न वेदाः प्रति-

ती रात्र तेथें वास्तव्य केलें १७. ह्याप्रमाणें वनपर्वांतील निवातकवचयुद्धपर्वापैकीं अस्त्रदर्शनविषयकसंकेताविषयीं एकशें चौऱ्याहत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ १७४ ॥

वैशंपायन सांगतातः—ती रात्र लोटल्यावर धर्मराज युधिष्ठिर उठला आणि भ्रात्यांसहवर्तमान त्यानें अवश्यकृत्यें आटपून घेतलीं १. " हे कुंतीपुत्रा, ज्यांच्या योगानें तूं दैत्यांचा पराभव केलास तीं अस्त्रें दाखीव " ह्मणून मातेला आनंद देणाऱ्या अर्जुनाला त्यानें आज्ञा केली असतां २, हें भरतकुलोत्पन्ना जनमेजयराजा, देवांनीं दिलेलीं तीं दिव्य अस्त्रें पांडुपुत्र धनंजयानें त्याला दाखविलीं ३. प्रथमतः त्या महातेजस्वी अर्जुनानें उत्कृष्ट तऱ्हेनें यथाविधि शरीरशुद्धि केली आणि अस्त्रप्राप्तीमुळें शोभा पावत असलेला धनंजय मानसिक भूमिरूप रथावर आरूढ झाला व भूमीवरील पर्वतच जूं ठेवण्याचें काष्ठ, चक्रें, कणा, उत्कृष्ट कळक ज्यामध्यें आहेत अशा दांड्या वगैरे रथावयव आहेत अशी त्यानें कल्पना केली. नंतर महातेजस्वी असें तें दिव्य कवच अंगांत घालून ४, ५ गांडीव धनुष्य व देवदत्त शंख हीं त्यानें धारण केलीं आणि अतिशयच शोभूं लागलेल्या त्या आजानुबाहु कुंतीपुत्र अर्जुनानें क्रमाक्रमानें तीं दिव्य अस्त्रें दाखविण्यास सुरुवात केली. असो. अर्जुन त्या दिव्य अस्त्रांचा प्रयोग करूं लागला असतां ६, ७ त्याच्या पायांचा भार पृथ्वीवर पडतांक्षणीं ही पृथ्वी वृक्षांसहवर्तमान कंपित होऊं लागली; नद्या क्षुब्ध झाल्या; त्याचप्रमाणें समुद्रही खवळून गेला ८; पर्वत विदीर्ण झाले; वारा वाहीनासा झाला; सूर्य निस्तेज झाला; अग्नि प्रज्वलित होई-

भान्ति स्म द्विजातीनां कथञ्चन । अंतर्भूमिगता ये च प्राणिनो जनमेजय १० पीड्यमानाः समुत्थाय पाण्डवं पर्यवारयन् । वेपमानाः प्राञ्जलयस्ते सर्वे विकृताननाः ११ दह्यमानास्तदास्त्रैस्ते याचन्ति स्म धनञ्जयम् । ततो ब्रह्मर्षयश्चैव सिद्धा ये च महर्षयः १२ जङ्गमानि च भूतानि सर्वाण्येवावतस्थिरे । देवर्षयश्च प्रवरास्तथैव च दिवौकसः १३ यक्षराक्षसगन्धर्वास्तथैव च पतत्रिणः । खेचराणि च भूतानि सर्वाण्येवावतस्थिरे १४ ततः पितामहश्चैव लोकपालाश्च सर्वशः । भगवांश्च महादेवः सगणोभ्याययौ तदा १५ ततो वायुर्महाराज दिव्यैर्माल्यैः समन्वितः । अभितः पाण्डवं चित्रैरवचक्रे समन्ततः १६ जगुश्च गाथा विविधा गन्धर्वाः सुरचोदिताः । ननृतुः सङ्घशश्चैव राजन्नप्सरसां गणाः १७ तस्मिंश्च तादृशे काले नारदश्चोदितः सुरैः । आगम्याह वचः पार्थं श्रवणीयमिदं नृप १८ अर्जुनार्जुन मायुङ्क्ष्व दिव्यान्यस्त्राणि भारत । नैतानि निरधिष्ठाने प्रयुज्यन्ते कथंचन १९ अधिष्ठाने न वा नार्तः

नासा झाला ९; ब्राह्मणांना वेदांची विस्मृति पडूं लागली; हे जनमेजयराजा, भूमीच्या गर्भामध्यें असलेले प्राणीही १० पीडा होऊं लागल्यामुळे वर निघून आले; पांडुपुत्र अर्जुनाच्या भोंवतालीं त्यांनीं गराडा दिला आणि अस्त्राच्या योगानें दग्ध होऊं लागल्यामुळें ज्यांच्या मुखांवर विकार उत्पन्न झालेला आहे असे ते सर्व थरथर कांपत असलेले प्राणी हात जोडून धनंजयाची प्रार्थना करूं लागले. तदनंतर, ब्रह्मर्षि, सिद्ध, महर्षि ११, १२, सर्वही चलनवलन करणारे प्राणी अर्जुनाच्या समोर येऊन उभे राहिले श्रेष्ठ देवर्षि, त्याचप्रमाणें देव, १३ यक्ष, राक्षस, गंधर्व, पक्षी आणि इतरही आकाशामध्यें संचार करणारे प्राणी तेथें येऊन उभे राहिले १४. तदनंतर ब्रह्मदेव, सर्वही लोकपाल आणि रुद्रगणांसहवर्तमान भगवान् महादेव हेही तेथें आले १५. नंतर, हे महाराजा, दिव्य पुष्पांनीं युक्त असलेला वायु पांडुपुत्र अर्जुनासभोंवती वाहूं लागून अद्भुत पुष्पांनीं त्याला सर्व बाजूनीं भरून काढूं लागला १६; देवांची आज्ञा झाल्यामुळें गंधर्वही नानाप्रकारचीं गायनें करूं लागले व, हे राजा, अप्सरांचे गणही समुदायानें नृत्य करूं लागले १७. हे राजा, तशा प्रकारचा तो प्रसंग प्राप्त झाला असतां देवांच्या सांगण्यावरून नारदमुनि तेथें आले आणि अर्जुनाशीं त्यांनीं असें सुश्राव्य भाषण केलें कीं १८, " हे अर्जुना, हे भरतकुलोत्पन्ना अर्जुना, तूं दिव्य अस्त्रांचा प्रयोग करूं नकोस. प्रतिपक्षी असल्यावांचून ह्यांचा प्रयोग होत नसतो १९. अथवा, प्रतिपक्षी जरी असला तरी अगदीं व्याकुल झाल्यावांचूनही योद्ध्यानें ह्यांचा कधींही प्रयोग करितां उपयोगीं नाहीं. हे

प्रयुञ्जीत कदाचन । प्रयोगेषु महान्दोषो ह्यस्त्राणां कुरुनन्दन २० एतानि रक्ष्यमाणानि धनञ्जय यथागमम् । बलवन्ति सुखार्हाणि भविष्यन्ति न संशयः २१ अरक्ष्यमाणान्येतानि त्रैलोक्यस्यापि पाण्डव । भवन्ति स्म विनाशाय मैवं भूयः कृथाः क्वचित् २२ अजातशत्रो त्वं चैव द्रक्ष्यसे तानि संयुगे । योज्यमानानि पार्थेन द्विषतामवमर्दने २३ वैशंपायन उवाच ॥ निवार्यार्थं ततः पार्थं सर्वे देवा यथागतम् । जग्मुरन्ये च ये तत्र समाजग्मुर्नरर्षभ २४ तेषु सर्वेषु कौरव्य प्रतियातेषु पाण्डवाः । तस्मिन्नेव वने हृष्टास्त ऊषुः सह कृष्णया २५ [६८०४] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्या मारण्यके पर्वणि निवातकवचयुद्धपर्वणि अस्त्रदर्शने पञ्चसप्तत्यधिकशततमोऽध्यायः ॥ १७५ ॥

समाप्तं च निवातकवचयुद्धपर्व ॥ अथाजगरपर्व ॥ जनमेजय उवाच ॥ तस्मिन्कृतास्त्रे रथिनां प्रवीरे प्रत्यागते भवनाद्वृत्रहन्तुः । अतः परं किमकुर्वन्त पार्थाः समेत्य शूरेण धनञ्जयेन १ वैशंपायन उवाच ॥ वनेषु तेष्वेव तु ते नरेन्द्राः सहार्जुनेनेन्द्रसमेन वीराः । तस्मिंश्च शैलप्रवरे

कुरुनंदना अर्जुना, ह्या अस्त्रांचे निरर्थक प्रयोग करण्यामध्यें मोठा दोष आहे २०. हे धनंजया उपदेशाप्रमाणें ह्यांचें रक्षण केलें असतां हीं प्रबल अस्त्रें निःसंशय सुखकारक होतात २१; परंतु, हे पांडुपुत्रा अर्जुना, ह्यांचें नर रक्षण होईनासें झालें तर हीं त्रैलोक्याच्याही नाशाला कारण होतात. ह्यास्तव, तूं फिरून असें कधींही करूं नकोस २२. हे अजातशत्रो धर्मराजा, शत्रूंचा वध करण्याचा प्रसंग आला असतां अर्जुन संग्रामामध्यें त्या अस्त्रांचा प्रयोग करूं लागला ह्मणजे तीं तुझ्या दृष्टोत्पत्तीस येतीलच " २३. वैशंपायन सांगतातः—हे पुरुषश्रेष्ठा जनमेजया, ह्याप्रमाणें अस्त्रप्रयोगापासून अर्जुनाचें निवारण करून सर्व देव आणि त्याप्रमाणें तेथें जुळलेले इतरही आल्यामार्गानें परत गेले २४ व, हे कुरुवंशजा जनमेजया, ते सर्व परत गेल्यावर त्याच वनामध्यें ते पांडव द्रौपदीसहवर्तमान आनंदानें राहिले २५. ह्याप्रमाणें॰ वनपर्वांतील निवातकवचयुद्ध पर्वापैकीं अस्त्रदर्शनाविषयीं एकशें पंचाहत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ १७५ ॥ ह्या ठिकाणीं निवातकवचयुद्धपर्वही संपूर्ण झालें.

येथून पुढें आजगरपर्वाला आरंभ झाला. जनमेजय प्रश्न करितोः—(हे मुने,) तो श्रेष्ठ रथी अर्जुन कृतास्त्र होऊन वृत्रनाशक इंद्राच्या गृहापासून परत आला असतां त्या शूर धनंजयाचा समागम झाल्यानंतर कुंतीपुत्र पांडवांनीं काय केलें ? १. वैशंपायन सांगतातः—कुबेराच्या बागेमध्यें रहात असलेले ते प्रजाधिपति वीर पांडव इंद्रतुल्य

सुरम्ये धनेश्वराक्रीडगता विजह्रुः २ वेश्मानि तान्यप्रतिमानि पश्यन्क्रीडाश्च नानाद्रुमसन्निबद्धाः । चचार धन्वी बहुधा नरेन्द्रः सोऽस्त्रेषु यत्तः सततं किरीटी ३ अवाप्य वासं नरदेवपुत्राः प्रसादजं वैश्रवणस्य राज्ञः । न प्राणिनां ते स्पृहयन्ति राजञ्शिवश्च कालः स बभूव तेषाम् ४ समेत्य पार्थेन यथैकरात्रमूषुः समास्तत्र तदा चतस्रः । पूर्वाश्च षट् ता दश पाण्डवानां शिवा बभूवुर्वसतां वनेषु ५ ततोऽब्रवीद्वायुसुतस्तरस्वी जिष्णुश्च राजानमुपोपविश्य । यमौ च वीरौ सुरराजकल्पावेकान्तमास्थाय हितं प्रियं च ६ तव प्रतिज्ञां कुरुराज सत्यां चिकीर्षमाणास्त्वदनुप्रियं च । ततो न गच्छाम वनान्यपास्य सुयोधनं सानुचरं निहन्तुम् ७ एकादशं वर्षमिदं वसामः सुयोधनेनात्तसुखाः सुखार्हाः । तं वञ्चयित्वाधमबुद्धिशीलमज्ञातवासं सुखमाप्नुयामः ८ तवाज्ञया

अर्जुनासहवर्तमान त्याच वनामध्यें आणि त्याच अत्यंत मनोहर अशा श्रेष्ठ पर्वतावर क्रीडा करूं लागले २. अस्त्राविषयीं नेहमीं तत्पर असलेला तो राजकुमार अर्जुन त्या बागेंत असलेलीं ती अप्रतिम गृहें व नानाप्रकारच्या वृक्षांवर सुरू असलेल्या (पक्ष्यांच्या) क्रीडा अवलोकन करीत करीत बहुधा धनुष्य बरोबर घेऊन संचार करीत असे ३. हे राजा, कुबराच्या कृपेमुळें त्याच्या बागेमध्यें ते राजकुमार वास्तव्य करूं लागले असतां त्यांचे दिवस इतके कांहीं उत्कृष्ट रीतीनें गेले कीं, भूतलावर वास्तव्य करणाऱ्या प्राण्यांच्या ऐश्वर्याची त्यांना इच्छाही होईनाशी झाली ४ कुंतीपुत्र अर्जुनाचा समागम झाल्यानतर त्या ठिकाणीं त्या पाडवांचीं चार वर्षे एका अहोरात्राप्रमाणें निघून गेलीं. तेव्हां ती चार आणि पूर्वीं निघून गेलेलीं सहा मिळून दहा वर्षे त्या पांडवांचीं वनांमध्यें वास्तव्य करीत असतांना उत्तम प्रकारें निघून गेलीं ५. ह्याप्रमाणें दहा वर्षे लोटल्यानंतर वायुपुत्र बलाढ्य भीम, अर्जुन आणि इंद्रतुल्य वीर नकुलसहदेव हे धर्मराजाला एकांतीं गांठून व त्याच्या शेजारीं बसून हितावह आणि प्रिय असें भाषण त्याच्याशीं करूं लागले ६. (ते ह्मणाले) "हे कुरुराज, आह्मी तुझी प्रतिज्ञा शेंवटास नेऊन तुझ्या मर्जीप्रमाणें वागण्याची इच्छा करीत आहोंत; ह्यामुळें एकाएकीं वनांचा त्याग करून अनुयायांसहवर्तमान दुर्योधनाचा वध करण्याकरितां आह्मी येथून निघून जात नाहीं ७. अरे, सुखाचाच उपभोग घेण्यास योग्य असे आह्मी दुर्योधनामुळें सुखरहित झाल्यापासून आज हें अकरावें वर्ष काढीत आहोंत तेव्हां ज्याची बुद्धि व स्वभाव हीं नीच आहेत अशा त्या दुर्योधनाला फसवून आपण आतां अज्ञातवासामध्यें सुखानें राहूं ८. हे राजा, तुझ्या आज्ञेमुळें आह्मी मान सोडून

पार्थिव निर्विशङ्का विहाय मानं विचरन्वनानि । समीपवासेन विलोमिताम्ते ज्ञास्यन्ति नास्मानपकृष्टदेशान् ९ संवत्सरं तत्र विहृत्य गूढं नराधमं तं सुखमुद्धरेम । निर्यात्य वैरं सफलं सपुष्पं तस्मै नरेन्द्राधमपूरुषाय १० सुयोधनायानुचरैर्वृताय ततो महीमावस धर्मराज । स्वर्गोपमं देशमिमं चरद्भिः शक्यो विहन्तुं नरदेव शोकः ११ कीर्तिस्तु ते भारत पुण्यगन्धा नश्येद्धि लोकेषु चराचरेषु । तत्प्राप्य राज्यं कुरुपुङ्गवानां शक्यं महत्प्राप्तुमथ क्रियाश्च १२ इदं तु शक्यं सततं नरेन्द्र प्राप्तुं त्वया यल्लभसे कुबेरात् । कुरुष्व बुद्धिं द्विषतां वधाय कृतागसां भारत निग्रहे च १३ तेजस्तवोग्रं न सहेत राजन्समेत्य साक्षादपि वज्रपाणिः । न हि व्यथां जातु करिष्यतस्तौ समेत्य देवैरपि धर्मराज १४ तवार्थसिद्ध्यर्थमभिप्रवृत्तौ सुपर्णकेतुश्च शिनेश्च नप्ता । तथैव कृष्णोऽप्रतिमो बलेन तथैव चाहं

घेऊन निःशंकपणें वनामध्यें संचार करीत आहोंत; परंतु, आपण जर त्यांच्या समीपच अज्ञातवास करूं लागलों तर राज्यलुब्ध कौरव आपणांला हुडकून काढतील; दूर प्रदेशामध्यें आपण राहिलों असतां त्यांना आपला पत्ता लागणार नाहीं ९. तस्मात्, हे प्रजाधिपते धर्मराजा, दूर ठिकाणीं एक संवत्सरपर्यंत आपण गुप्तपणें वास्तव्य करूं आणि त्या नीच पुरुषाचें वैर राज्यप्राप्तिरूप फल व शत्रुवधरूप पुष्प ह्यांसहवर्तमान उगविल्यानंतर आपण त्या नराधमाला कांट्याप्रमाणें अनायासें उपटून टाकूं १०. हे धर्मराजा, अनुयायांनीं परिवेष्टित असलेल्या दुर्योधनाचें वैर उगविल्यानंतर तूं भूतलावर निःशंकपणें वास्तव्य कर. हे राजा, ह्या स्वर्गतुल्य प्रदेशामध्यें आपण संचार करूं लागलों असतां आपला हा शोक नाहींसा होणें शक्य आहे ११. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, चराचर त्रैलोक्यामध्यें उत्कृष्ट रीतीनें प्रसिद्ध असलेली तुझी कीर्ति (तूं जर सूड न उगवशील तर) नाहींशी होईल. ह्याकरितां, कुरुवंशजश्रेष्ठांचें तें राज्य प्राप्त झाल्यावर आपणांला मोठें सुख होणें शक्य आहे आणि यज्ञयागादि कर्मेंही आपल्या हातून होण्याचा संभव आहे १२. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, कुबेरापासून जें तुला मिळत आहे तें केव्हांही प्राप्त होणे शक्य आहे. ह्यास्तव, तूं आतां आपला अपराध केलेल्यांचा वध करण्याचें मनांत आण अथवा (ते भ्राते असल्यामुळें त्यांचा वध कसा करावा हें जर तुझ्या मनांत येत असेल तर) त्यांच्या बंधनाचें तरी तूं मनामध्यें आण १३. हे राजा, प्रसंग पडला असतां साक्षात् वज्रपाणि इंद्रही तुझें उग्र तेज सहन करण्यास समर्थ होणार नाहीं. हे धर्मराजा, तुझे मनोरथ परिपूर्ण करण्याकरितां उद्युक्त झालेला कृष्ण आणि सात्यकी ह्या उभयतांना देवांशीं जरी युद्ध

नरदेववर्य १५ तवार्थसिद्धयर्थमभिप्रपन्नो यथैव कृष्णः सह यादवैस्तैः ।
तथैव चाहं नरदेववर्य यमौ च वीरौ कृतिनौ प्रयोगे १६ त्वदर्थयोगप्रभवप्रधानाः शर्म करिष्याम परान्समेत्य । वैशंपायन उवाच ॥ ततस्तदाज्ञाय मतं महात्मा तेषां च धर्मस्य सुतो वरिष्ठः १७ प्रदक्षिणं वैश्रवणाधिवासं चकार धर्मार्थविदुत्तमौजाः । आमन्त्र्य वेश्मानि नदीः सरांसि सर्वाणि रक्षांसि च धर्मराजः १८ यथागतं मार्गमवेक्षमाणः पुनर्गिरिं चैव निरीक्षमाणः । ततो महात्मा स विशुद्धबुद्धिः संप्रार्थयामास नगेन्द्रवर्यम् १९ समाप्तकर्मा सहितः सुहृद्भिर्जित्वा सपत्नान्प्रतिलभ्य राज्यम् । शैलेन्द्र भूयस्तपसे जितात्मा द्रष्टा तवास्मीति मतिं चकार २० वृतश्च सर्वैरनुजैर्द्विजैश्च तेनैव मार्गेण पतिः कुरूणाम् । उवाह चैतान्गणशस्तथैव घटोत्कचः पर्वतनिर्झरेषु २१ तान्प्रस्थिता-

---

करण्याचा प्रसंग पडला तरी ते कधींही डगमगणार नाहींत. हे नृपश्रेष्ठा, कृष्णाप्रमाणें अर्जुनही बलानें अप्रतिम असून मीही तसाच आहें १४,१५. हे नृपश्रेष्ठा धर्मराजा, ज्याप्रमाणें त्या यादवांसहवर्तमान कृष्ण तुझे मनोरथ सिद्धीस नेण्याकरितां उद्युक्त झालेला आहे त्याचप्रमाणें मी व अस्त्रप्रयोगामध्यें कुशल असलेले हे वीर नकुलसहदेव असे आह्मी उद्युक्त झालों आहोंत १६. तुला धनप्राप्ति होऊन तुझ्या ऐश्वर्याची वृद्धि व्हावी ह्या मुख्यतः दोन गोष्टी नेहमीं मनामध्यें वागवीत असलेले आह्मी शत्रूंची गांठ घेऊन शांतता करून टाकूं. वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें तें भीमसेनाचें मत जाणून आणि तसाच त्या इतर भ्रात्यांचाही विचार घेऊन त्या श्रेष्ठ यमधर्मपुत्र महात्म्या धर्मराजानें १७ कुबेराच्या निवासस्थानाला प्रदक्षिणा केली. तदनंतर धर्म व अर्थ जाणणाऱ्या त्या महातेजस्वी धर्मराजानें तेथील गृहें, नद्या, सरोवरें आणि सर्व राक्षस ह्यांचा निरोप घेतला १८ आणि आलेल्या मार्गाकडे दृष्टि देऊन व पुन्हां पुन्हां त्या पर्वताकडे पाहून शुद्ध मनानें युक्त असलेला तो महात्मा धर्मराज त्या श्रेष्ठ पर्वताची स्तुति करूं लागला १९ कीं, "हे पर्वतराज, आपली प्रतिज्ञा शेवटास नेऊन व सुहृदांच्या साहाय्यानें शत्रूंना जिंकून राज्य परत मिळविल्यावर मी इंद्रियदमन करून तपश्चर्येकरितां पुनरपि तुझें दर्शन घेईन." अशी त्याची प्रार्थना केल्यानंतर त्यानें तेथून जाण्याचें मनामध्यें आणिलें २०. असो. सर्व अनुयायी आणि द्विज ह्यांनीं परिवेष्टित असलेल्या त्या कुरुवंशजाधिपति धर्मराजानें आलेल्याच मार्गानें परत जाण्याचें मनामध्यें आणिलें असतां घटोत्कच त्यांच्या वेगवेगळ्या टोळ्या करून त्यांना पर्वतासंबंधीं जलप्रवाहांतून घेऊन गेला २१. आणि ते पांडव परत निघाले असतां

प्रीतमना महर्षिः पितेव पुत्राननुशिष्य सर्वान् । स लोमशः प्रीतमना जगाम दिवौकसां पुण्यतमं निवासम् २२ तेनार्ष्टिषेणेन तथानुशिष्टास्तीर्थानि रम्याणि तपोवनानि । महान्ति चान्यानि सरांसि पार्थाः संपश्यमानाः प्रययुर्नराग्र्याः २३ [६८२७] इति श्रीमहाभारते० आरण्यके पर्वण्याजगरपर्वणि गन्धमादनप्रस्थाने षट्सप्तत्यधिकशततमोध्यायः ॥१७६॥

वैशंपायन उवाच ॥ नगोत्तमं प्रस्रवणैरुपेतं दिशां गजैः किंनरपक्षिभिश्च । सुखं निवासं जहतां हि तेषां न प्रीतिरासीद्भरतर्षभाणाम् १ ततस्तु तेषां पुनरेव हर्षः कैलासमालोक्य महान्बभूव । कुबेरकान्तं भरतर्षभाणां महीधरं वारिधरप्रकाशम् २ समुच्छ्रयान्पर्वतसंनिरोधान्गोष्ठान्हरीणां गिरिसेतुमालाः । बहून्प्रपातांश्च समीक्ष्य वीराः स्थलानि निम्नानि च तत्र तत्र ३ तथैव चान्यानि महावनानि मृगद्विजानीकप-संवितानि । आलोकयन्तोभिययुः प्रतीतास्ते धन्विनः खड्गधरा नराग्र्याः ४ वनानि रम्याणि नदीः सरांसि गुहा गिरीणां गिरिगह्वराणि । एते

मनामध्यें प्रसन्न झालेल्या लोमशमहर्षींनीं पिता ज्याप्रमाणें पुत्राला उपदेश करितो त्याप्रमाणें सर्वांना उपदेश केला आणि नंतर त्याचें अंतःकरण तसेंच आनंदित असतांना देवांच्या अत्यंत पुण्यदायक निवासस्थानाकडे ते चालते झाले २२ व त्या आर्ष्टिषेणानें त्याप्रमाणें उपदेश केला असतां ते पुरुषश्रेष्ठ कुंतीपुत्र पांडव तीर्थें, रम्य तपोवनें आणि दुसरीं मोठमोठीं सरोवरें अवलोकन करीत करीत चालते झाले २३. ह्याप्रमाणें •वनपर्वांतील आजगरपर्वापैकीं गंधमादनप्रस्थानासंबंधीं एकशें शहात्तरावा सर्ग समाप्त झाला ॥ १७६॥

वैशंपायन सांगतातः—जलप्रवाह, दिग्गज आणि किंनर व पक्षी ह्यांनीं युक्त असून सुखकारक निवासस्थान असलेल्या त्या श्रेष्ठ पर्वताला सोडून जातांना त्या भरतवंशजश्रेष्ठ पांडवांना बरें वाटेना १; परंतु, कुबेराला प्रिय आणि मेघाप्रमाणें श्वेतवर्ण असा कैलास पर्वत अवलोकन केल्यावर त्या भरतवंशजश्रेष्ठांना पुनरपि मोठा आनंद झाला २. इकडे तिकडे पसरलेलीं पर्वतांचीं टेकाडें, सिंहांचीं वसतिस्थानें, पर्वतावरील नद्या उतरून जाण्याकरितां बांधिलेले सेतु आणि तयार ठेविलेले सागाडे, अनेक कुंड व सखल भूप्रदेश ठिकठिकाणीं त्या वीर पांडवांनीं अवलोकन केले ३ आणि त्याचप्रमाणें मृग, पक्षी व गज ह्यांनीं ज्यांचा आश्रय केलेला आहे अशीं दुसरींही मोठीं मोठीं वनें अवलोकन करीत करीत ते धनुष्य व खड्ग धारण करणारे पुरुषश्रेष्ठ प्रसिद्ध पांडव चालते झाले ४. जातां जातांना रम्य वनें, नद्या, सरोवरें, आणि पर्वताच्या लहान मोठ्या गुहा हींच रात्रंदिवस त्या पुरुषश्रेष्ठ

निवासाः सततं बभूवुर्निशानिशं प्राप्य नरर्षभाणाम् ५ ते दुर्गवासं बहुधा निरुष्य व्यतीत्य कैलासमचिन्त्यरूपम् । आसेदुरत्यर्थमनोरमं ते तमाश्रमाग्र्यं वृषपर्वणस्तु ६ समेत्य राज्ञा वृषपर्वणा ते प्रत्यर्चितास्तेन च वीतमोहाः । शशंसिरे विस्तरशः प्रवासं गिरौ यथावद्वृषपर्वणस्ते ७ सुखोषितास्तस्य त एकरात्रं पुण्याश्रमे देवमहर्षिजुष्टे । अभ्याययुस्ते बदरीं विशालां सुखेन वीराः पुनरेव वासम् ८ ऊषुस्ततस्तत्र महानुभावा नारायणस्थानगताः समग्राः । कुबेरकान्तां नलिनीं विशोकाः संपश्यमानाः सुरसिद्धजुष्टाम् ९ तां चाथ दृष्ट्वा नलिनीं विशोकाः पाण्डोः सुताः सर्वनरप्रधानाः । ते रेमिरे नन्दनवासमेत्य द्विजर्षयो वीतमला यथैव १० ततः क्रमेणोपययुर्नृवीरा यथागतेनैव पथा समग्राः । विहृत्य मासं सुखिनो बदर्यां किरातराज्ञो विषयं सुबाहोः ११ चीनांस्तुषारान्दरदांश्च सर्वान्देशान्कुलिन्दस्य च भूमिरत्नान् । अतीत्य दुर्गं हिमवत्प्रदेशं पुरं सुबाहोर्ददृशुर्नृवीराः १२ श्रुत्वा च तान्पार्थिवपुत्रपौत्रान्प्राप्तान्सुबाहु-

---

पांडवांचीं निवासस्थानें नेहमीं होऊं लागलीं ५ ह्याप्रमाणें वास्तव्य करण्यास कठीण असलेल्या आणि अचिंत्य आकारांनीं युक्त असलेल्या कैलासपर्वतावर नानाप्रकारें वास्तव्य केल्यानंतर ते तो पर्वत सोडून अत्यंत मनोरम अशा वृषपर्व्याच्या श्रेष्ठ आश्रमाला गेले ६. तेथें वृषपर्वाराजाची भेट झाल्यावर त्याचें त्यानें पूजन केलें व मोहरहित असलेल्या त्या पांडवांनीं त्या वृषपर्व्याला आपल्या पर्वतसंबंधीं प्रवासाची हकीकत सविस्तर कथन केली ७. देव आणि महर्षि जेथें वास्तव्य करीत आहेत अशा त्या पुण्याश्रमामध्ये ते एक रात्र सुखानें राहिले; तदनंतर ते वीर पांडव सुखानें विशाल बदरिकाश्रमामध्यें पुनरपि वास्तव्य करण्याकरितां गेले ८ आणि नारायणाच्या निवासस्थानाला जाऊन पोंचलेले ते उदार, शोकरहित व सर्वगुणसंपन्न पांडव देव आणि सिद्ध ह्यांनीं आश्रय केलेलें व कुबेराला प्रिय असलेलें सरोवर अवलोकन करीत करीत तेथें राहिले ९. इतकेंच नव्हे; परंतु नंदनवनामध्यें राहण्याकरितां आल्यावर निर्मल ब्रह्मर्षि जसे रममाण होतात तसे ते सर्व मानवांमध्यें मुख्य असलेले शोकरहित पांडुपुत्र तें सरोवर अवलोकन करून रममाण होऊं लागले १०. ह्याप्रमाणें बदरिकाश्रमामध्यें एक महिना आनंदानें काढिल्यानंतर ते सुखी, सर्वगुणसंपन्न व पुरुषश्रेष्ठ पांडव आल्या मार्गानेंच क्रमाक्रमानें जातां जातां किरातराज सुबाहूच्या देशाकडे चालले ११ आणि चीन, तुषार, दरद, भूमिगत रत्नांनीं युक्त असलेले कुलिंद देशांतील सर्व प्रदेश व हिमालयपर्वतावरील

विषये समग्रान् । प्रत्युद्ययौ प्रीतियुतः स राजा तं चाभ्यनन्दन्वृषभाः कुरूणाम् १३ समेत्य राज्ञा तु सुबाहुना ते सुतैर्विशोकप्रमुखैश्च सर्वे । सहेन्द्रसेनैः परिचारकैश्च पौरोगवैर्ये च महानसस्थाः १४ सुखोषितास्तत्र त एकरात्रं सूतान्समादाय रथांश्च सर्वान् । घटोत्कचं सानुचरं विसृज्य ततोऽभ्ययुर्यामुनमद्रिराजम् १५ तस्मिन्गिरौ प्रस्रवणोपपन्नहिमोत्तरीयारुणपाण्डुसानौ । विशाखयूपं समुपेत्य चक्रुस्तदा निवासं पुरुषप्रवीराः १६ वराहनानामृगपक्षिजुष्टं महावनं चैत्ररथप्रकाशम् । शिवेन पार्था मृगयाप्रधानाः संवत्सरं तत्र वने विजह्रुः १७ तत्राससादातिबलं भुजङ्गं क्षुधार्दितं मृत्युमिवोग्ररूपम् । वृकोदरः पर्वतकन्दरायां विषादमोहव्यथितान्तरात्मा १८ द्वीपोऽभवद्यत्र वृकोदरस्य युधिष्ठिरो धर्मभृतां वरिष्ठः । अमोक्षयद्यस्तमनन्ततेजा ग्राहेण संवेष्टितसर्वगात्रम् १९ ते द्वादशं वर्षमुपो-

---

दुर्गम प्रदेश ओलांडिल्यावर त्या वीर पांडवांनीं सुबाहूचें नगर अवलोकन केलें १२. तदनंतर राजपुत्र व राजपौत्र असलेले ते पांडव आपल्या देशामध्यें सर्व आले आहेत अशी बातमी लागतांक्षणीं तो सुबाहु राजा आनंदानें त्यांना सामोरा गेला व त्या कुरुवंशजश्रेष्ठ पांडवांनींही त्याचें अभिनंदन केलें १३. तदनंतर सुबाहुराजा, त्याचे विशोकप्रभृति पुत्र, इंद्रसेनप्रभृति सेवक, तंबू वगैरे ठोकण्याचें काम ज्यांचेकडे आहे असे स्वारीमध्यें पुढें जाणार सेवक व मुदपाकावर असलेले अधिकारी ह्यांच्या भेटी घेऊन ते सर्व पांडव १४ त्या ठिकाणीं सुखानें राहिले आणि तेथें मिळालेले सारथि व सर्व रथ ह्यांचा स्वीकार करून घटोत्कचाला त्याच्या अनुयायांसहवर्तमान जाण्याचा निरोप दिल्यावर ते पांडव यमुनोद्गम पर्वताकडे गेले १५. जलप्रवाहानीं युक्त असलेल्या त्या पर्वतावर बर्फ पडल असल्याकारणानें आणि त्याचीं शिखरें कांहीं तांबडीं व कांहीं पांढरीं दिसत असल्यामुळें श्वेत वस्त्र परिधान करून डोक्याला तांबडें—पांढरें पागोटें घातलेल्या पुरुषाप्रमाणें तो दिसत हाता. अशा त्या पर्वतावर असलेल्या विशाखयूप वनामध्यें जाऊन त्या पुरुषश्रेष्ठ पांडवांनीं मुक्काम केला १६. तें महावन इंद्राच्या चैत्ररथसंज्ञक उपवनाप्रमाणें असून वराह व नानाप्रकारचे पशुपक्षी ह्यांनीं त्याचा आश्रय केलेला होता. त्या वनामध्यें मुख्यतः मृगयेचाच उद्योग करून ते पांडव एक वर्षभर सुखानें राहिले १७. तेथें अतिबलाढ्य, क्षुधेनें व्याकुल व मृत्यूप्रमाणें भयंकर रूप धारण करणाऱ्या अशा एका भुजंगाशीं भीमसेनाची पर्वताच्या गुहेमध्यें गांठ पडली असतां विषाद आणि मोह ह्यांच्या योगानें भीमाचें मन अगदीं गोंधळून गेलें १८. परंतु, त्या प्रसंगीं धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ असलेला युधिष्ठिर (महासागरांत सांपडलेल्या पुरुषाला आश्रयभूत

प्रयातं वने विहर्तुं कुरवः प्रतीताः । तस्माद्वनाच्चैत्ररथप्रकाशाच्छ्रिया ज्वलन्तस्तपसा च युक्ताः २० ततश्च यात्वा मरुधन्वपार्श्वं सदा धनुर्वेदरतिप्रधानाः । सरस्वतीमेत्य निवासकामाः सरस्ततो द्वैतवनं प्रतीयुः २१ समीक्ष्य तान्द्वैतवने प्रविष्टान्निवासिनस्तत्र ततोभिजग्मुः । तपोदमाचारसमाधियुक्तास्तृणोदपात्राहरणाश्मकुट्टाः २२ प्लक्षाक्षरौहीतकवेतसाश्च तथा बदर्यः खदिराः शिरीषाः । बिल्वेङ्गुदाः पीलुशमीकरीराः सरस्वतीतीररुहा बभूवुः २३ तां यक्षगन्धर्वमहर्षिकान्तामागारभूतामिव देवतानाम् । सरस्वतीं प्रीतियुताश्चरन्तः सुखं विजह्रुर्नरदेवपुत्राः २४ [९८५१]

इति श्रीमहाभारते शतसहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वण्याजगरपर्वणि पुनर्द्वैतवनप्रवेशे सप्तसप्तत्यधिकशततमोध्यायः ॥ १७७ ॥

जनमेजय उवाच ॥ कथं नागायुतप्राणो भीमो भीमपराक्रमः । भयमाहारयत्तीव्रं तस्मादजगरान्मुने १ पौलस्त्यं धनदं युद्धे य आह्वयति

होणाऱ्या) बेटाप्रमाणें भीमसेनाला आश्रयभूत झाला आणि सर्पानें भीमसेनाचें सर्व शरीर ग्रस्त केलें असतांही त्या अपरिमिततेजस्वी धर्मराजानें त्याची सुटका केली १९. तदनंतर जवळच आलेल्या बाराव्या वर्षी वनामध्यें विहार करण्याकरितां ते कांतीनें देदीप्यमान, तपस्वी व प्रसिद्ध पांडव त्या चैत्ररथाप्रमाणें असलेल्या वनांतून निघाले २०. तदनंतर सर्वदां मुख्यत्वेंकरून धनुर्वेदाचा अभ्यासच बरा वाटत असलेले ते पांडव त्या विशाखयूप वनांतून निघाल्यावर दुसऱ्या एका अरण्याचें संनिध आले आणि वास्तव्य करण्याच्या इच्छेनें सरस्वती नदीचे संनिध येऊन तेथून ते द्वैतवननामक सरोवराकडे चालते झाले २१. तेव्हां द्वैतवनामध्यें प्रविष्ट झालेले पांडव अवलोकन केल्यावर तेथें वास्तव्य करणारे वानप्रस्थ त्यांच्याकडे आले. ते तप, इंद्रियदमन, सदाचार आणि समाधि ह्यांनीं युक्त असून आसनार्थ तृण व पाद्यार्थ उदकपात्र एवढ्यांचाच स्वीकार करीत असत आणि (वार्धक्यानें त्यांचे दांत पडले असल्यामुळें) ते वनांतील अन्न धोंड्यांनीं चेंचून खात असत २२. असो. वड, बेहडे, रोहिडा, वेत, बोरी, खैर, शिरस, बेल, हिंगणबेट, अक्रोड, शमी आणि नेप्ती हीं झाडें सरस्वतीचे तीरीं होतीं २३. असो. यक्ष, गंधर्व व महर्षि ह्यांना प्रिय असून देवतांचें गृहच बनून राहिलेल्या त्या सरस्वतीचे तीरीं आनंदानें संचार करीत असलेले ते राजकुमार पांडव सुखानें त्या वनामध्यें राहिले २४. ह्याप्रमाणें० श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील आजगरपर्वांपैकीं पांडवांच्या पुनरपि द्वैतवनागमनसंबंधीं एकशें सत्त्याहत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ १७७ ॥

जनमेजय प्रश्न करितोः—हे मुने, दहाहजार हत्तींचें सामर्थ्य असलेल्या महापराक्रमी

दर्पितः । नलिन्यां कदनं कृत्वा निहन्ता यक्षरक्षसाम् २ तं शंससि भया-
विष्टमापन्नमरिसूदनम् । एतदिच्छाम्यहं श्रोतुं परं कौतूहलं हि मे ३ वैशं-
पायन उवाच ॥ बह्वाश्चर्ये वने तेषां वसतामुग्रधन्विनाम् । प्राप्तानामा-
श्रमाद्राजन्राजर्षेर्वृषपर्वणः ४ यदृच्छया धनुष्पाणिर्बद्धखड्गो वृकोदरः ।
ददर्श तद्वनं रम्यं देवगन्धर्वसेवितम् ५ स ददर्श शुभान्देशान्गिरेर्हिमवत-
स्तदा । देवर्षिसिद्धचरितानप्सरोगणसेवितान् ६ चकोरैरुपचक्रैश्च पक्षि-
भिर्जीवजीवकैः । कोकिलैर्भृङ्गराजैश्च तत्र तत्र निनादितान् ७ नित्यपु-
ष्पफलैर्वृक्षैर्हिमसंस्पर्शकोमलैः । उपेतान्बहुलच्छायैर्मनोनयननन्दनैः ८ स
संपश्यन्गिरिनदीर्वैदूर्यमणिसंनिभैः । सलिलैर्हिमसंकाशैर्हंसकारण्डवा-
युतैः ९ वनानि देवदारूणां मेघानामिव वागुराः । हरिचन्दनमिश्राणि
तुङ्गकालीयकान्यपि १० मृगयां परिधावन्स समेषु मरुधन्वसु । विध्य-

---

भीमाला अजगरापासून प्रचंड भय कसें प्राप्त झालें? १. बलाविषयीं गर्व वहात असल्यामुळें पुलस्त्यपुत्र कुबेरालाही ज्यानें युद्धामध्यें आव्हान केलें आणि सरोवरांत युद्ध करून ज्यानें यक्षराक्षसांचा वध केला २ तो शत्रुघातक भीमसेन भयभीत होऊन अजगराच्या तावडींत सापडल्याचें आपण कथन करीत आहां. तेव्हां हें वर्तमान इत्थंभूत श्रवण करण्याविषयीं मला फारच उत्कंठा आहे ३. वैशंपायन सांगतात:—हे राजा, उग्र धनुष्य धारण करणारे ते पांडव वृषपर्व राजर्षीच्या आश्रमांतून निघून त्या फारच आश्चर्यकारक वनामध्यें येऊन राहूं लागले असतां ४ एकदां धनुष्य हातांत घेऊन व तरवार लटकावून सिद्ध झालेल्या भीमसेनाची दृष्टि सहज देवगंधर्वांनीं सेवित असलेल्या त्या रम्य वनाकडे गेली ५ आणि हिमालयपर्वताचे शुभ प्रदेश त्यानें अवलोकन केले. त्या प्रदेशावर देव, ऋषि आणि सिद्ध संचार करीत असून अप्सरांचे समुदाय वास्तव्य करीत असत ६; चकोर, उपचक्र, जीवजीवक, कोकिल आणि भृंगराज ह्या पक्ष्यांनीं ते प्रदेश ठिकठिकाणीं नादित झालेले असत ७ व विपुल छाया, शीतल स्पर्श आणि अक्षय्य पुष्प व फलें ह्यांनीं संपन्न असून मनाला व दृष्टीला आनंद देणाऱ्या कोमल वृक्षांनीं ते युक्त असत ८. असो. वैदूर्यमण्याप्रमाणें भासणाऱ्या हंस व कारंडव पक्ष्यांनीं युक्त व बर्फाप्रमाणें शुभ्र अशा उदकांनीं भरलेल्या पर्वतावर नद्या अवलोकन करीत करीत ९ आणि मेघांना अडकवून टाकणारीं जाळींच कीं काय अशीं देवदारुवृक्षांचीं वनें व चंदनमिश्रित असलेलीं अशीं उंडणी व दारुहळद ह्या वृक्षांचीं वनें अवलोकन करीत करीत तो चालला १०. ह्याप्रमाणें सपाट व निर्जल अशा पर्वतप्रदेशांवर